
म. ग्रं. सं. ठाणे.
विषय
सं. क्र.



RELFBK-0024232

# एका नास्तिकाची तीर्थयात्रा

## श्रीपाद जोशी

म. ग्रं. सं. ठाणे
स्वीकार 2750

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, असे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा फी भरावी लागेल.

2 AUG 1984
2 SEP 1984
16 SEP 1984
26 SEP 1984
OCT 1984
4 OCT 1984
17 OCT 1984
6 FEB 1985
20 FEB 1985
28 FEB 1990
27 FEB 1985
30 MAY 1985
7 FEB
2 JUN 1985
23 JUN 1985
1 JAN 1986
25 JUN 1986
23 JUL 1986
7 MAY 1988
५०००-१२-८२

विश्वमोहिनी पुस्तक ८९

# एका नास्तिकाची तीर्थयात्रा

श्रीपाद जोशी

REFBK-0024232

आता अभिनव वाग्विलासिनी । जे चातुर्यार्थकलाकामिनी ।
ते शारदा विश्वमोहिनी । नमस्कारिलि मिया ।।

प्रकाशक
आनंद अंतरकर,
विश्वमोहिनी, ६२।१२, कर्वे रोड,
पुणे ४

मुद्रक
पी. बी. महांगरे
प्रशांत मुद्रणालय,
१०७१ बुधवार पेठ,
पुणे २

प्रथमावृत्ती
२ एप्रिल १९८४
गुढीपाडवा

© श्रीपाद जोशी

वेष्टण
चंद्रमोहन कुलकर्णी

मूल्य ३० रुपये

संदर्भ सूप्रकाश
६५०
२४२३२
२६।७।८४

माझे बालमित्र

देशभक्त गणपती जोती कुंभार

यांना,

स्नेहपूर्वक

# म्हातारचळ ?

आजपर्यंत माझी अनेक प्रवासवर्णने प्रसिद्ध झाली आहेत प्रस्तुत संग्रहातील प्रवासलेख त्यांहून वेगळ्या प्रकारचे आहेत सर्वसामान्य वाचकाला माहीत नसलेल्या व आपल्याला प्रवासाची संधी मिळाल्यामुळे पहावयास मिळालेल्या गोष्टी त्याला सांगाव्यात, त्याच्या माहितीत भर घालावी, अशी काहीशी भूमिका आता-पर्यंतच्या प्रवासवर्णनात होती या भूमिकेमुळे लेखकावर मोठी जबाबदारी येऊन पडते माहितीचा अचूकपणा तर आवश्यक असतोच, पण तिच्यात काही आगळेपणा असावा आणि वाचकाला ती जाणून घेण्याची ओढही वाटावी, अशी एक प्रकारची तारेवरची कसरत अशा प्रवासवर्णनात करावी लागते आता आयुष्याची साठी उलटून गेल्यानंतर ' शहाणे करूनि सोडावे सकळ जन ' हा उत्साह स्वाभाविकपणेच ओसरला आहे त्यामुळे ती जुनी भूमिका आपोआपच सुटली ते जबाबदारीचे ओझे मानेवरून काढून टाकल्यामुळे कसे हलकेहलके वाटले त्या मोकळ्याढाकळ्या मनाने लिहिलेले हे प्रवासलेख आहेत

परंतु या मुक्त शैलीत एक धोकाही होता गंभीर व वैचारिक लिखाण करणारा लेखक म्हणून माझी जी प्रतिमा वाचकाच्या मनात तयार झाली होती तिला या शैलीने धक्का लागण्याची भीती होती आयुष्यभर प्रयत्न करून निर्माण केलेली व जपलेली आपली प्रतिमा आपल्याच हातांनी भग्न व्हावी, असे मला वाटत नव्हते त्यामुळे या लेखावर कशा प्रतिक्रिया येतात याची प्रतीक्षा मी अस्वस्थ चित्ताने करू लागलो आश्चर्याची व आनंदाची गोष्ट अशी की वाचकांच्या प्रतिक्रिया अपेक्षेहून वेगळ्या व अधिक चांगल्या आल्या हे लेख आवडल्याचे काही वाचकांनी पत्राने कळविले तर काही उत्साही वाचकांनी समक्ष भेटून लेखातील मोकळेपणा-बद्दल अभिनंदन केले

या संदर्भात एका सुविद्य व सुसंस्कृत वाचिकेच्या पत्रातील काही भाग नमूद करण्यासारखा आहे विदर्भातील अंजनगाव सुर्जी येथील सौ० नलिनी पाध्ये यांनी ' चल रे भोपळ्या टुणुक टुणुक ' हा लेख वाचल्यानंतर अगदी न रहावून उत्स्फूर्त-पणे आपले विचार व्यक्त करणारे एक सविस्तर पत्र लिहिले सौ० पाध्ये या स्वतः लेखिका व समीक्षिका आहेत. त्यामुळे त्यांच्या अभिप्रायाला विशेष महत्त्व आहे त्यांच्याशी त्या वेळी माझा काहीच परिचय नसल्यामुळे त्यांच्या अभिप्रायावर

वैयक्तिक स्नेहाचा प्रभाव पडला असण्याचीही शक्यता नाही त्या आपल्या ता ८ ऑक्टोबर १९८२ च्या पत्रात लिहितात,

" एका निरपेक्ष, निःस्पृह व समाजसुधारणेची तळमळ असणाऱ्या व तद्-विषयक लेख लिहिणाऱ्या व्यक्तीकडून एवढ्या बहारदार प्रवासवर्णनाची अपेक्षाच नव्हती त्यामुळे ह्या वाचनातून अनपेक्षित आनद मिळाला ... आपले लिखाण आपल्याविषयीचा आदरभाव कायम राहून वाढावा असेच सापडले. आता व्याख्यान ऐकण्याची सधी मिळावी, असेही वाटत आहे ह्या प्रवासवर्णनाला दिलेले नाव सार्थ असे की जणू परतीच्या प्रवासाचे तिकीटच . आजवर अनेक प्रवासवर्णने वाचली अरविंद गोखले, शरयू भोपटकर, रमेश मत्री, वगैरे याशिवाय आणखीही अनेक पण चल रे ' मात्र एक अजब चीज आहे प्रथम काही पाने वाचली आणि एकदम मनाने निर्णय घेतला की आत्मचरित्र लिहावे तर फक्त लक्ष्मीबाई टिळका-नीच आणि प्रवासवर्णन लिहावे तर श्रीपाद जोशींनीच ! . हे मत शेवटपर्यंत कायम राहिले. .. साहित्य, ससार, समाजकारण, राजकारण, ठिकठिकाणचे लोक, रीतिरिवाज, सम्मेलनातील गोंधळ, शिस्त वगैरे सारेच्या सारे कसे काय लेखकाने आणून ठेवले काही समजत नाही मती गुग होते पण कितीही चोखदळ समीक्षक असला तरी हे सारे लेखकाने ओढूनताणून आणले आहे, अशी टीका तो करू शकणार नाही सर्वच काही सुसगत, भाषावैभवाने नटलेले व सहजसुदर आहे तशी भाषा अलकारिक नाही पण वाक्यावाक्यातून सूचकता डोकावते सूचक वाक्ये लिहिणे ही एक कलाच आहे हे प्रवासवर्णन पुस्तकरूपाने प्रसिद्ध होऊन साहित्य-क्षेत्रात चिरस्थायी राहील हे नि सशय ! "

अर्थात याच्या अगदी दुसऱ्या टोकाची प्रतिक्रियाही ऐकायला मिळाली लेखकाला म्हातारचळ लागल्याची शका काही वाचकानी व्यक्त केली, तर नेहेमी माझे गभीर लिखाण वाचणाऱ्याना मी असले उथळ लिखाण का केले असावे, हे कोडे उलगडले नाही अशा प्रकारच्या उलटसुलट प्रतिक्रिया ऐकून व वाचून माझी मात्र भरपूर करमणूक झाली

खरी गोष्ट अशी आहे की मी सामान्यत व प्रामुख्याने गभीर व विचारोत्तेजक साहित्याची निर्मिती केली असली तरी सुरुवातीपासूनच माझ्यामध्ये एक मिस्किल मुलगा दडून राहिलेला आहे, आणि सधी मिळताच तो हळूच डोकावून पहात आला आहे ' उथळपाणी ', ' उल्लूचा पठ्ठा ', ' उटावरचे शहाणे ' यासारख्या काही पुस्तकातून त्या मिस्किल मुलाचे अस्तित्व वाचकाच्या प्रत्ययास आले आहे परतु ती फार जुनी गोष्ट झाली अलीकडे तशा प्रकारचे लिखाण करणे मी बद केले होते तरी पण तो खोडकर मुलगा अजूनही केव्हातरी डोके वर काढतो आणि या सग्रहातील लेखांसारखे लेख मजकडून लिहवून घेतो त्या मुलाला मी चागला

ओळखतो. त्याला कह्यात ठेवण्याचा माझा प्रयत्नही चालू असतो पण केव्हा तरी गफलतीच्या क्षणी तो माझ्या मानगुटीवर बसतोच अर्थात तो काही माझा शत्रू नाही त्याच्या खोडचा मलाही आवडतातच म्हणून एखाद्या वेळी मी त्याला पूर्ण स्वातंत्र्य देतो. त्या स्वातंत्र्याचे दृश्य स्वरूप म्हणजेच हे लेख होत

हा जो खोडकर मुलगा आहे त्याच्यावर त्याच्या लहानपणी अस्सल किंवा इरसाल ग्रामीण सस्कार झाले आहेत. गावरान भाषा, गावढळ वर्तन याचे त्याला खास आकर्षण आहे. तरीपण नतरच्या गाधीवादी सस्कारामुळे त्याची भाषा ग्राम्यतेच्या मर्यादा ओलाडून अश्लीलतेच्या, असभ्यतेच्या प्रदेशात प्रवेश करीत नाही त्यामुळे त्याची सूचकताही असस्कृत बनत नाही

याच शैलीत मी पुन्हा असले लिखाण करू शकेन किंवा नाही, हे मला सागता येणार नाही प्रवासवर्णनाची माझी नेहेमीची शैली प्रौढ, भारदस्त राहिली आहे तीच माझी आता प्रकृती बनली आहे परतु खोडकर, मिस्किल शैली वर्ज्य किंवा त्याज्य मानावी, अशी माझी वृत्ती नाही कधी काळी योगायोगाने त्या शैलीचा वापर करण्याची स्फूर्ती मला झाली तर ती मी दडपून टाकणार नाही

या लेखाचे स्वरूप काहीसे अनिर्बंध, शिथिल, गप्पागोष्टीसारखे असले तरी त्यात नुसताच उथळपणा आहे, असे कोणी म्हणणार नाही, असा विश्वास वाटतो कारण नेहेमीचा माहिती देणारा, विशिष्ट जीवनमूल्ये जपणारा लेखक या लेखा-मध्येही विद्यमान आहेच त्याचे दर्शन अधूनमधून घडत रहाते किंबहुना वयो-मानाबरोबर येणारी वैचारिक परिपक्वताही त्यात आढळते त्यामुळे हे लिखाण अगदीच निरर्थक आहे, असे कोणाला म्हणता येणार नाही

या लेखांचे श्रेय प्रामुख्याने 'हस'चे तरुण सपादक श्री० आनद अतरकर याना आहे तसा मी 'हस'चा फार जुना लेखक आहे १९४७ पासून सतत वीस वर्षे मी 'हस'मध्ये लिहीत होतो 'हस'चे सस्थापक-सपादक कै० अनतराव अंतरकर याच्याशी माझे चांगले जमले होते वस्तुत मी भांडखोर लेखक म्हणून आजही बदनाम आहे परतु अनतरावाशी मात्र माझे भांडण झाले नाही त्याची जबाबदारी अर्थातच माझ्यावर नाही ! माझ्यासारखे अनेक लेखक अनतरावानी वर्षानुवर्षे जवळ केले होते त्यांच्या पश्चात 'हस'शी लेखक या नात्याने माझा सबध उरला नाही माझ्या लेखनाचे स्वरूपही बरेच बदलले 'हस', 'मोहिनी'च्या परपरेशी हे नवे गभीर स्वरूप मेळ खाणारे नव्हते शिवाय साहित्यिक क्षेत्रातून बाहेर पडून मी मोठ्या प्रमाणावर मुख्यत वृत्तपत्रीय राजकीय-सामाजिक लिखाण करू लागलो होतो त्यामुळेही 'हस', 'मोहिनी'शी सबध चालू ठेवणे मला जुळत नव्हते परतु जुना सबध पुन्हा चालू व्हावा, असे नियतीच्या मनात असावे. एका प्रसगाने आनदरावाचा परिचय ताजा झाला, आणि मी 'हस'मध्ये लिहू लागलो माझ्या

नेहमीच्या नियतकालिकात ज्या प्रकारचे लिखाण मी करीत होतो त्याहून अगदी वेगळ्या प्रकारचे, हलकेफुलके व लालित्यपूर्ण लिखाण करण्याची जी ऊर्मी मी दाबून ठेवली होती, तिला व्यक्त होण्याची पुन्हा एकदा संधी मिळाली 'हंस'शी नव्याने संबंध स्थापित झाला नसता तर कदाचित या प्रकारचे लेख मी लिहिले नसते तसे लेख लिहिण्याची इच्छाच बहुधा मला झाली नसती

या संग्रहातील चारही लेख तसे मोठेच आहेत त्याचे कारण जेव्हा मी शोधू लागलो तेव्हा माझ्या असे लक्षात आले की वयाबरोबर येणारा पाल्हाळ किंवा गोष्टीवेल्हाळपणा त्याला कारणीभूत असावा वाचकाशी जणू लेखक गप्पागोष्टीच करीत आहे एका दृष्टीने ते स्वाभाविकही असते ज्या व्यक्तीने इतरांपेक्षा चार पावसाळे जास्त पाहिलेले असतात तिला आपले अनुभव इतरांना सांगण्याची इच्छा असते त्यातून मग शिळोप्याच्या गप्पागोष्टी रंगतात त्यांना तसा शेंडाबुडखा नसतो पण त्यातही गमत असते वरवर निरर्थक किंवा असंबद्ध वाटणाऱ्या गोष्टी लालित्यपूर्ण ढंगात मांडल्या तर त्यातून मजेदार अर्थही निघतो, आणि एक सुश्लिष्ट सुसंगतीही निर्माण होते

काही लेखकांना वृद्धावस्था प्राप्त झाल्यानंतरही आपण म्हातारे झालो आहोत हे मान्य करायचे नसते एका अर्थाने पाहिल्यास आपले वृद्धत्व मान्य करण्यासही एक विशिष्ट प्रकारचे धैर्य लागते ज्यांना जरेची भीती वाटते ते शरीराने शक्य नसले तरी मनाने, त्यांना राक्षसी वाटणाऱ्या, जरेपासून चार हात दूर राहू पहातात त्यांच्या वाचकांनाही ते सदैव तरुण राहिलेलेच हवे असतात खरे तर ही शुद्ध आत्मवंचना असते. लेखकाची व वाचकाचीही माझ्यासारखे जे लेखक तरुणपणी तत्कालीन परिस्थितीमुळे व्रतस्थ राहिलेले असतात त्यांना तर ती परिस्थती बदलल्यानंतर म्हातारपणात आपल्या स्वाभाविक रसिक व रंगेल वृत्तीची अभिव्यक्ती करणे फारच अवघड वाटते कारण त्यांची सारी प्रतिष्ठाच नष्ट होण्याची भीती असते अशा वेळी स्वतःशी प्रामाणिक रहाणे खपच कठिण असते त्या दडपणातून मुक्त होण्याचा प्रयत्न मी या लेखाद्वारे केला आहे त्यात मी कितपत यशस्वी झालो आहे, हे वाचकांनीच ठरवावयाचे आहे

माझ्या या नव्या 'अवतारा'त वाचकांसमोर येण्याची संधी दिल्याबद्दल विश्वमोहिनी प्रकाशनाचा मी अत्यंत आभारी आहे

— श्रीपाद जोशी

'श्री रघुवंश',
डॉ केतकर मार्ग,
पुणे ४११ ००४
२३ जानेवारी १९८४.

# अनुक्रम


एका नास्तिकाची तीर्थयात्रा ........................ १

चल रे भोपळ्या टुणुक टुणुक ........................ ६८

काश्मिरचे पुनर्दर्शन ........................ १३२

श्रीमंतांचा तिरुपती ........................ १५९


## शुद्धिपत्र

| पृष्ठ | ओळ | अशुद्ध | शुद्ध |
|---|---|---|---|
| २९ | १ | कडी | दडी |
| ५९ | २१ | डोझरच्या | बुलडोझरच्या |
| ७६ | १३ | देखणे | देखणे नसलेले |
| ९८ | ११ | दर्शन | दर्शन असत टेकडी मडळात माझं खर दर्शन |
| १०२ | २ | आमचाही | आईचाही |
| १०८ | २९ | उत्सुक | उत्सुक आहे |
| १०९ | ९ | Kobage | Coorg |
| १११ | ४ | पण | तिथ |
| ११२ | ११ | माता | माता म्हणून उभ्या असलेल्या तरुणी |
| ११३ | १२ | वसिर | विसर |
| १२७ | २८ | स्पष्ट | स्पष्टवक्ते |
| १३४ | १७, १८ | रवी | रावी |
| १४७ | २८ | प्रयत्न | साथ |
| १५५ | ३३ | जाणाऱ्या | जाणाऱ्या व एक भाग येणाऱ्या |

# ॥ एका नास्तिकाची तीर्थयात्रा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र.

मी बद्रीकेदारला जाणार, हे ऐकताच अनेक मित्रांच्या कपाळाला प्रश्नार्थक आठ्या पडल्या त्याचही बरोबरच होत देवाधर्मासंबंधीची माझी मुलुखावेगळी मत मी कधीच इतरांपासून लपवून ठेवली नाहीत त्यामुळ मी नास्तिक आहे असा अनेकाचा समज झाला आहे रूढ अर्थानं तो खराही आहे कारण मी मूर्तिपूजा निषिद्ध मानतो. कोणत्याही देवमूर्तीला नमस्कार करीत नाही की देवापुढ पैसा ठेवीत नाही भटजींना दक्षिणा देण तर मला चूकच वाटत त्यामुळ मला कुणी नास्तिक समजत असले तर त्यात त्यांची काही गफलत नाही मी निर्गुण–निराकार परमेश्वराचा उपासक आहे माझ्या देवाला नवस बोलावे लागत नाहीत फक्त त्यानं मला मनःशान्ती द्यावी, संकटप्रसंगी धीर द्यावा, एवढच माझ त्याच्याजवळ मागण असत म्हणून मी त्याच स्मरण अधूनमधून करीत असतो, आणि सामान्यतः तो मला कधी दगा देत नाही परतु हे सारे बारकावे माहीत नसल्यामुळ लोक मला नास्तिक समजतात, आणि मीही ते बिरुद बिनतक्रार शिरोधार्य मानतो

परतु माझ्या बद्रीकेदारच्या यात्रेत हा आस्तिकनास्तिकतेचा मुद्दा फारसा महत्त्वाचा नव्हताच. खर म्हणजे ते एका चुकीच परिमार्जन किंवा प्रायश्चित्त होत मी स्वतः आजवर खूप भटकलो. किंबहुना गलो पन्नास वर्षं मी पायाला भिंगरी लागल्याप्रमाणं सारखा फिरतोच आहे— देशात आणि परदेशातही ! माझ्या पायावरच चक्र असाव ' देव कशाला ?' या माझ्या कवितेत मी लिहून गेलो होतो,—

' माझ्यासारख्या फिरस्त्याचेही
मन क्षणभर घुटमळते
चक्र असलेले पाऊल माझे
उबऱ्यातच अडखळते. '

सुमारे एकवीस वर्षांपूर्वी लिहिलेली ही कविता. त्या वेळी माझी भ्रमंती तुफान वेगात चालू होती.

तसा भटकतीचा योग लहानपणापासूनच असावा. माझ मूळ गाव मुरगूड

(जिल्हा कोल्हापूर) तिथून शिक्षणासाठी अल्पवयातच मला वाईला जाव लागल तिथली प्राज्ञपाठशाळा सरकारने बंद केल्यावर पुण्याला आलो तिथून मग वर्धा, दिल्ली, आणि सर्वत्र भारत! लग्नानंतर संसाराच्या बेड्या पायांत अडकल्या की मी–मी म्हणणाऱ्या फिरस्त्यांचेही 'गृह'–स्थ बनतात पण सुदैवान मला अशी पत्नी मिळाली, जिन खुषीन त्या बेड्या आपल्या पायात अडकवून घेतल्या आणि मला मुक्त विहार करायला सोडून दिल त्या साध्वीन स्वत ला एका जागी खिळवून घेतल आणि संसाराचा गाडा ओढण्याची सारी जबाबदारी आपल्या शिरावर घेतली मला घराची चिंता अशी तिन करूच दिली नाही त्यामुळ संसारात असूनही मी जलकमलवत त्यापासून अलिप्तच राहिलो कालातरान मुल मोठी झाली, सुना आल्या, आणि घरसंसाराची जबाबदारी त्यांच्यावर सोपवून सौभाग्यवती माणिक-बाई मोकळ्या झ ल्या त्याना जग पहायची भारी हौस शरीर फारस साथ देत नसल तरी मनाचा उभारी जबर! जगाच्या पाठीवर कुठही, केव्हाही जायची तयारी इकडे मी मात्र पुरा कटाळलो, थकलो आहे –– शरीरान आणि मनानही! आपल सत्तेच घरकुल सोडून कुठच जाऊ नये मुला–नातवडाच्या सह-वासात शातपणान उर्वरित आयुष्य घालवाव पण सौभाग्यवतीच्या ऋणाच ओझ कधीकधी असह्य हात आणि मग त्यातून मुक्त होण्यासाठी तिला घेऊन मी प्रवा-साला निघतो यासाठीच गतवर्षी तिला घेऊन काश्मीरला गेलो होतो पूर्वी एकदा काश्मीरची सफर करून त्यासबधीच 'चिनारच्या छायेत' हे पुस्तकही मी लिहिल होत पण तिला काश्मीरच विलक्षण आकर्षण असल्यामुळ मी पुन्हा एकदा तिच्या-सोबत काश्मीरला गेलो यदा आमचे मित्र श्री मधुभाऊ रानड यानी बद्रीकेदारला जाण्याची कल्पना सुचवली सौ माणिकबाइनी ती तत्काल उचलून धरली, आणि मग त्याच्या सोबतीला म्हणून त्याच्याबरोबर जाण्याच मी मान्य केल यात्रा कप-नीतून जाण अलीकडे फारच सुलभ झालय अनेक वयस्कर स्त्रिया एकट्याच अशा प्रवासात सामील होतात त्याच्याप्रमाण सौ माणिकबाईही एकट्या जाऊ शकल्या असत्या परतु आपल्या अधू शरीराचा भार इतरावर पडू नय, त्याची काळजी घेणार आपल हक्काच माजूस आपल्याबरोबर असल पाहिजे, असा त्याचा आग्रह होता तो रास्तही होता म्हणून मी त्याच्याबरोबर जायच कबूल केल

ज्या सस्कारात आणि देशभक्तीन भारलेल्या वातावरणात मी वाढलो, त्यामुळ देवाधर्माविषयीच्या रूढ कल्पना जरी मला प्रभावित करू शकल्या नाहीत तरी स्वदेशाविषयीचा एक प्रकारचा कट्टर अभिमान, देशबाधवाविषयीची एक आतरिक आत्मीयता आणि त्याच्यासाठी काहीतरी करण्याची इच्छा या गाष्टी सतत जागृत राहिल्या

'तृणास जरि येथल्या कुणि अनार्यता लाविली!
बसेल हृदयास या तरिहि डागणी ताविली ।।'

एवढी प्रखरता या राष्ट्राच्या भक्तिभावात एके काळी होती कालांतरान ती प्रखरता थोडी कमी झाली कारण आपल्याच बांधवांमधल्या अनार्यतेच दर्शन हळू-हळू होत गेल तरी पण भारतमातेच्या दर्शनाची ओढ कायम राहिली ज्या भारता-वर आपण एवढ मनापासून प्रेम करतो तो आपला देश आहे तरी कसा, इथल्या लोकाचं जीवन कस चालत, त्याच्या अडीअडचणी, सुखदु:ख काय आहेत, हे आपण स्वत च्या डोळ्यांनी पाहिल पाहिजे, सार समजून घेतल पाहिजे, अशी गरज मला भासू लागली खऱ्या परिचयाशिवाय असणार प्रेम म्हणजे पाया नसलेली इमारत ! म्हणून मी भारतात भ्रमण करू लागलो जसजशी भारताची व भारतीय जनतेची ओळख वाढू लागली तसतस त्याच्याविषयीच माझ्या मनातल प्रेमही वाढू लागल हा देश माझा आहे, हे लोक माझे आहेत याची जाणीव अधिक सुदृढ, अधिक सखोल होत गेली हळूहळू हा देशच माझा देव बनला इथली जनताच माझी उपास्यदेवता बनली राष्ट्रवादावर पोसलेला माझा पिंड भारतदर्शनान अधिक जाणकार, अधिक परिपुष्ट बनला. माझ्या आयुष्यात एक काळ असा होता की वर्षातले सहा—आठ महिने मी घराबाहेरच असे किंबहुना एखाद्या वेळी बरेच दिवस घरी रहाव लागल तर माझ शारीरिक—मानसिक स्वास्थ्य बिघडू लागे मग माझी बायको मला म्हणे, " तुम्ही बऱ्याच दिवसात प्रवासाला गेला नाहीत, म्हणून तुमची प्रकृती बिघडलीय. तुम्ही आता कुठतरी दूर जाऊन या, म्हणजे तुमची तब्येत सुधारेल " आज तशी स्थिती राहिलेली नाही तरी पण माझ्या अत करणात दडून बसलेला भटक्या अधून-मधून अस्वस्थ होतच असतो, आणि प्रवासाला जाण्याची संधी दिसताच तो मला ढोसून घराबाहेर काढतो

हे झालं तात्कालिक कारण दुसर एक तेवढच महत्त्वाच कारणही होत ते सुप्त स्वरूपात होत एवढच ते म्हणजे हिमालयाच जबरदस्त आकर्षण तस पाहि-ल्यास नदी आणि डोंगर याची एक विलक्षण ओढ माझ्या मनाला नेहमीच लागलेली असते नदीत डुंबण—पोहण आणि डोंगरावर—किल्ल्यावर चढण हा माझा तरुण-पणीचा खास षौक होता आता शरीर साथ देत नसल्यान तो षौक रा करता येत नाही तरी पण ती ओढ मात्र कायमच आहे त्यात पुन्हा हिमालयाविषयीच आक-र्षण तर जणू भारतीयांच्या रक्तातच भिनलेल असत अध्यात्माची आवड अस-णाऱ्याची गोष्ट आपण सोडून देऊ त्याना हिमालयाच भलतच वेड असत माझ्या ठिकाणी त्याचा अभावच असावा पण हिमालयाची बर्फाच्छादित शिखर मला वार-वार बोलावीत असतात हिमालयाच स्वत.च अस एक आगळ सौंदर्य आहे वृक्ष-राजीनी आच्छादलेल्या हिरव्यागार डोंगराच्या सौंदर्याहून ते वेगळ असल तरी त्याच आकर्षणसामर्थ्यही काही कमी नसत तरुणपणी मसुरी, हृषीकेश वगैरे ठिकाणी जाऊन मी हिमालयाच दर्शन घेतल होत त्या वेळी शरीर धट्टकट्ट होत पण मनाला येईल तिकडे भटकण्यासाठी लागणार आर्थिक—कौटुंबिक स्वातंत्र्य व स्वास्थ्य उप-

लब्ध नव्हतं. आता ते लाभल आहे, तर शरीर साथ द्यायला तयार नाही तरी पण मनाची ओढ कायमच आहे 'मी घुमवी एक तराणा' या १९५६ साली लिहिलेल्या कवितेत मी म्हटल होत,

'निवातपणिचे सुख मज सलते,
'जा बाहेरी' – घरही म्हणते,
विश्व सर्व मम घरकुल बनते,
त्या घरट्याची ओढ मला रे।
मी घुमवी एक तराणा रे ।।

कुणीतरी मजला पुकारिते
डोकावुनिया सदा खुणविते
साद तयाची कानी येते,
मग निघतो स्वैर विहारा रे।
मी घुमवी एक तराणा रे ।।

त्यामुळ हिमालयात जायच म्हटल की मन चटकन तयार होत तशी खरी ओढ कैलास–मानससरोवराची आहे. पण ते सध्या राजकीय कारणामुळ (तो प्रदेश चीनच्या ताब्यात असल्यामुळे) शक्य नसल्यान दुधाची तहान ताकावर भागवावी, या न्यायान मी बद्रीकेदारला जायला लगेच तयार झालो

झेलम एक्सप्रेसन ( पुणे–जम्मूतवी) दिल्लीपर्यंत जायच आणि तिथून पुढचा प्रवास बसन करायचा अस यात्रा कपनीन ठरवल होत एकूण खर्च माणशी सुमारे एक हजार रुपये (मुळात तो ९६० रुपये होता परतु रेल्वेची भाडेवाढ झाल्यामुळ त्यात पाच टक्क्याची वाढ झाली होती!) यात्रा कपनीतून न जाता आपण स्वतत्रपण गेलो तर याच्या निम्म्या खर्चात हा प्रवास (किंबहुना कोणताही प्रवास) होऊ शकतो पण त्यात दगदग असते ती टाळण्यासाठी एवढा खर्च करण आवश्यकच असत तस पाहिल तर दिल्लीलाही बद्रीकेदारची यात्रा घडवून आणणाऱ्या चागल्या कपन्या आहेत त्यातून गेल्यास खर्चाची पुष्कळच बचत होते पण दिल्लीपर्यंत जाण्यात होणारी दगदगही टळावी अस वाटणाऱ्याना आपल्या गावातून निघणाऱ्या यात्रा कपनीचाच आश्रय घ्यावा लागतो.

झेलम पुण्याहून सायकाळी ४–५० ला सुटते आमच्या कपनीन दुपारी तीन वाजताच स्टेशनवर बोलावल होत निघण्यापूर्वी यात्रेकरूना काही खास सूचना, माहिती ते देणार असतील, प्रवाशाची परस्पराशी ओळख करून देण्याचा कार्यक्रम असेल, अशा समजुतीन आम्ही उभयता ता १९–९–८० रोजी साडेतीनच्या सुमारास स्टेशनवर पोचलो, तर तिथ कुणाचाच पत्ता नव्हता बहुधा आम्हीच पहिले होतो तिथं गेल्यावर समजल की झेलम दोन तास उशीरा आल्यामुळ दोन तास

उशीरा सुटणार आहे नतर कळल की झेलम कधीच वेळेवर येत नाही की वेळेवर सुटत नाही ! त्यामुळ आम्हाला निरोप द्यायला आलेले आमचे सन्मित्र श्री मो झा शहाणे परत गेले अखेर एकदाचे कपनीवाले आले त्यानी फक्त सर्वांच सामान ताब्यात घेतल त्याखेरीज इतर कसलाच कार्यक्रम झाला नाही सुदैवान झेलम सव्वापाचला सुटली. म्हणजे फक्त अर्धा तास उशीरा ! त्रिस्तरीय शयनागारात आम्ही ३४ यात्रेकरू आणि ६ कपनीचे लोक बसलो एवढ्या मोठ्या डब्यात आम्ही जणू एका कोपऱ्यात पडलो आम्हा उभयतांना उभ्या रांकेतले ( वरचा व खालचा असे ) बाक मिळाल्यान त्रिस्तराचा त्रास झाला नाही हे बाक लाबीला कमी अस-ल्यान उच माणसाना त्रासदायक ठरतात पण बसायच्या दृष्टीन ते फार सोयीचे असतात कपनीवाल्यांनी बरोबर तयार करून आणलेल जेवण दिल ते बरं होत. जेवण करून आम्ही ताणून दिली 'राजा ट्रॅव्हल्स' वगळता इतर मराठी यात्रा कपन्या निम्नमध्यमवर्गीयांच्या आहेत त्या वर्गाला परवडण्याएवढ्या खर्चात त्या आपला कार्यक्रम बसवतात. त्यामुळ त्या वर्गाचे लोक त्याची सारी अव्यवस्था किंवा अनास्था सहज सहन करतात मध्यम व उच्च मध्यमवर्गीयाना मात्र त्याचा त्रास होतो कारण त्याच जीवन वेगळ्या प्रकारच्या व्यवस्थेला व शिस्तीला सरावलेलं असत कप-नीच्या एका कर्मचाऱ्यान मला सांगितलं, " 'राजा ट्रॅव्हल्स'च्या शिस्तीला कटाळून अनेक लोक आमच्या कपनीकडे येतात " याचा अर्थ असा की, या लोकाना शिस्त मानवत नाही त्यामुळ मला जी अनास्था व अव्यवस्था वाटली ती त्याना मुळीच बोचली नाही

□

श्रीलका बौद्ध विश्रामालय,
नवी दिल्ली.
२०–९–८०

अखेर ता २०–९–८० रोजी सायकाळी सव्वासहा वाजता — म्हणजे पचवीस तासांच्या सलग प्रवासानतर आमची झेलमबाई दिल्लीला पोचली ठरलेल्या वेळच्या दहा मिनिट आधीच ! वेळेवर पोचण्याचा तिचा तो बहुधा पहिलाच विक्रम असावा गाडी जसजशी दिल्लीजवळ पोचू लागली, तसतशी आमच्या आरक्षित डब्यात भय-कर गर्दी होऊ लागली आमच्या डब्याला मुबईच्या लोकल गाडीच्या डब्याच स्वरूप प्राप्त झाल भावी अव्यवस्थेची जणू चुणूकच पहायला मिळाली गाडी केव्हा पोचेल हेही कुणी सागू शकत नव्हतं कपनीच्या माणसाजवळ रेल्वेच वेळापत्रकच नव्हतं. त्यालाही काही सांगता येईना. प्रत्येकजण आपापल्या कल्पनेप्रमाण वेळ सांगत होता.

नवी दिल्ली स्टेशनच्या समोर 'श्रीलका बौद्ध विश्रामालय' (Sri Lanka

Baudhist Pilgrims Rest) या ठिकाणी आमची उतरण्याची सोय करण्यात आली होती. परगावाहून व परदेशातून येणाऱ्या प्रवाशांसाठी या इमारतीत काही खोल्या बांधण्यात आल्या आहेत अर्थात आम्हाला त्यांचा काही उपयोग नव्हता म्हणून सस्थेच्या सभागृहातच सतरज्या टाकून आमची सोय करण्यात आली या ठिकाणी फक्त एक स्नानगृह आहे. पुरुषासाठी व स्त्रियांसाठी प्रत्येकी दोनदोन शौचकूप आहेत. पण त्यांत दिवे नाहीत पाण्याची वेळ टळून गेल्यामुळ नळाला पाणी नाही पण सुदैवान अगणात एक हातपप आहे. त्यान स्वत'च पाणी काढून घ्याव लागत स्नानगृहाच्या अभावामुळ स्नानाची गोळी घ्यावी लागली. कपनीन गाडीत रेल्वेच जेवण दिल होत. इथ गुजरात लॉजकडून थाळ्या मागवून आमची भूक भागवली वस्तुत दिल्लीसारख्या ठिकाणी निवासाची याहून अधिक चागली व्यवस्था सहज होऊ शकली असती. परतु लहान–सहान बाबतीत काटकसर करण्याची सवय लागलेल्या कपनीला ते सुचण शक्य नव्हत. दात कोरून पोट भरण्याची सवय असलेल्या सहप्रवाशाना जनता कपनीच्या या काटकसरीत काही आक्षेपार्ह वाटल नाही

□

२१–९–८०

आजचा दिवस दिल्लीदर्शनासाठी राखून ठेवला होता सकाळी बिर्ला मदिर, त्रिमूर्तिभवन, कुतुबमिनार वगैरे पहायचा कार्यक्रम होता. त्यात मला काही स्वारस्य नव्हत सौभाग्यवतीला ती दगदग सोसणार नसल्यान ती काही मैत्रिणीबरोबर बाहुल्यांच आतरराष्ट्रीय प्रदर्शन पाहून आली मी आणि मधुभाऊ बाजारात फेरफटका मारून आलो नेहेमीप्रमाण लस्सी पिण्याचा कार्यक्रम झाला बनारसी पान, जाफरानी जर्दा, किमाम, पानमसाले वगैरेची खरेदीही करून टाकली.

दुपारनतर गाधीसग्रहालय, राजघाट, शांतिवन, विजयघाट व लालकिल्ला पहाण्याचा कार्यक्रम होता. गाधीसग्रहालयात मला काहीच नवीन नव्हत गाधीजींची समाधी असलेल्या राजघाटावर मी अनेकदा गेलो असल्यान त्यात नावीन्य नव्हत शांतिवन हे पडित जवाहरलाल नेहरूची समाधी असलेल ठिकाण अनेकदा दिल्लीला जाण झाल असूनही या ठिकाणाला भेट द्यायच राहूनच गेल होत ते प्रथमच पाहिल. तस आवार खूपच मोठ आहे राजघाटाच्या तिप्पट–चौपट तरी असाव मात्र प्रत्यक्ष समाधी अगदीच सामान्य, उपेक्षित वाटली. ती अजून कच्चीच आहे समाधीच्या जागी नुसती हिरवळ आहे. एखाद प्रचड स्मारक उभारण्याची योजना इदिराजींच्या मनात असावी, परतु सत्तेच्या राजकारणाचे डावपेच लढवण्यात अडकून पडल्यामुळ त्यांना पित्याच्या समाधीकडे लक्ष द्यायला सवड झाली नसावी तिथल एकूण वातावरण उदास वाटल फरक एवढाच की पिकनिक-षौकिनांनी समाधीच्या अस्तित्वाकडे पूर्ण दुर्लक्ष करून तिथ चौपाटी किंवा पेशवे पार्क-

सारखं वातावरण तयार केल आहे गांधीजीच्या समाधीला अशी अवकळा किंवा बाजारी स्वरूप आलेल नाही, हे पाहून त्यातल्या त्यात बर वाटल

परतु शातिवनात मुख्य कुतूहल सजयच्या दहनभूमीविषयी होत अलीकडेच त्यासबधी उलटसुलट बातम्या वृत्तपत्रात येऊन गेल्यामुळ ते कुतूहल निर्माण झाल होत सजयच्या दहनाचा ओटा रातोरात गुपचप खणून साफ केल्याची बातमी वृत्तपत्रानी दिली होती, तर जो ओटा खणून टाकला तो दहनाचा नसून प्रेक्षकाना बसण्यासाठी बाधलेला होता, अस सरकारी प्रवक्त्यान जाहीर केल होत. त्यामुळ वस्तुस्थिती काय आहे ते पहायची इच्छा होती आमच्याबरोबर आलेल्या वाटाड्यान एक भुईसपाट झालेली व राख मिसळलेली जागा आम्हाला दाखवली, आणि त्याच ठिकाणी सजयच दहन झाल्याच सांगितल. त्या जागेवर एक लहानशी रिकामी मातीची कुडी कलडलेल्या स्थितीत पडलेली होती एकूण दृश्य पहाता त्या जागी सजयच दहन झाल असल पाहिजे, हे सहज लक्षात येत होत. त्याच्या आसपास खूप खणाखणी झाल्याच्या खुणा दिसत होत्या. त्यावरून प्रेक्षकाचा व दहनाचा असे दोन्ही ओटे खणून काढल्याच स्पष्ट होत होतं आपल्या पित्याप्रमाण आपल्या चिरजिवाचही एखाद प्रचड स्मारक उभारण्याचा मानस माताजीचा असावा परतु सजयच्या अपघाती निधनानतर वृत्तपत्रातून आलेल्या एकूण विरोधी प्रतिक्रिया लक्षात घेऊन त्यांनी आपला बेत बदलला असावा, अस वाटत[१] खर म्हणजे शातिवनात सजयच दहन करण हेच मुळात अप्रशस्त होत आता तिथं त्याची समाधी न उभारण्याचा निर्णय माताजीनी खरोखरीच घेतला असेल ( त्यांच्या मनातल्या बेताविषयी कुणालाच खात्री देता येत नाही ! ) तर त्या घोडचुकीच अल्पस परिमार्जन त्यानी केल, असं होईल ता २४ ऑक्टोबर १९८० रोजी 'इंदिरा युवक काँग्रेस'च्या दोनशेहून अधिक कार्यकर्त्यांनी शातिवनामध्ये सजय

१ दिल्लीच्या एका जाणकाराशी अलीकडेच भेट झाली असता त्यांच्याकडून अस समजल की शातिवनात सजयच स्मारक न उभारण्याचा निर्णय श्रीमती इंदिरा गाधीना परदेशातून येणाऱ्या उच्चपदस्थ व प्रतिष्ठित व्यक्तींची होणारी अडचण लक्षात आल्यामुळ घ्यावा लागला सजय गाधी हे भारतीय राज्यघटनेच्या दृष्टीनं एक सामान्य नागरिक होते देशाचा पतप्रधान, राष्ट्रपती, राष्ट्रपिता वगैरेसारख पद ज्यान भूषवलेल नाही त्याच्या समाधीला काहीच अर्थ नसतो (गुडाच्या थडग्यांनाही समाधी म्हणण म्हणजे त्या शब्दाचा अपमान करण्यासारखच आहे ! ) अशी समाधी शातिवनात उभारली गेली तर परकीय थोरामोठ्यांनी काय करायच? तिच्यावर पुष्पचक्र वाहाव तरी पचाईत! त्याची ही अडचण लक्षात येताच सजयच्या दहनभूमीवर काहीही खूण शिल्लक ठेवायची नाही, असा निर्णय माताजींना घ्यावा लागला अस म्हणतात.

गांधींचं दहन जिथं झालं होतं ( अशी त्यांची समजूत होती ) त्या जागेभोवती कडं करून तिथं धरणं धरल्याची बातमी ता. २५ च्या वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली. त्या बातमीत असं म्हटलं होतं की, ' दीड महिन्यापूर्वी संजय गांधीच्या दहनभूमी-वरचा ओटा अधिकाऱ्यांनी रातोरात गुप्तपणे काढून टाकून त्या ठिकाणी गवत लावले होते. त्यामुळे नक्की दहनस्थान शोधून काढणे आता अवघड झाले आहे. ' संजय विचार मंच ' ( इंग्रजी वृत्तपत्रात ' विचार ' ऐवजी ' विहार ' छापलं होतं ! ) या गटाचे हे सभासद असून, या ठिकाणी संजयचे योग्य स्मारक उभारण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांकडून मिळेपर्यंत तेथे ठाण मांडून बसण्याचा त्यांनी निर्धार केला आहे. '

विजयघाटावरील लालबहादुर शास्त्रींच्या समाधीचं स्वरूप गांधींच्या समाधी-सारखं आहे. तशीच काळ्या संगमरवरी दगडाची चौकोनी समाधी आणि तिच्या-वर ' हे राम ' या शब्दाऐवजी ' जय जवान जय किसान ' हे शब्द चमकदार पितळी अक्षरात बसवलेले आहेत. या समाधीचा आवार मात्र फारच लहान वाटलं. गर्दीही फारशी दिसली नाही. गांधींच्या समाधीवर होती तशी झेंडूची फुलं शास्त्रींच्या समाधीवरही होती. यावरून कुणीतरी भाविक मंडळी समाधीकडे पहात असावीत असं दिसलं. पंडितजींच्या समाधीवर मात्र फुलांचा मागमूस नव्हता. बहुधा त्यांच्या भक्तांना सत्तास्पर्धेच्या मारामाऱ्यातून समाधीकडे लक्ष द्यायला सवड होत नसावी !

लालकिल्ला अनेकदा पाहिला असल्यानं त्यात नवीन असं काही नव्हतं. फक्त जुन्या आठवणींना उजळा मिळाला. नाही म्हणायला आझाद हिंद फौजेतील शाहनवाज खान, सहगल व ढिल्लाँ ( मुसलमान, हिंदू व शीख ) या तीन प्रमुख अधिकाऱ्यांवर ब्रिटिश सरकारनं आणि गांधींचा खुनी नथूराम गोडसे याच्यावर भारत सरकारनं ज्या ठिकाणी खटले चालवले होते ती इमारत या खेपेला प्रथमच पाहिली.

' भारत पर्यटन विकास निगम 'तर्फे दाखवला जाणारा ' ध्वनी व प्रकाश-दर्शन ' हा शो आज प्रथमच पाहिला. वस्तुतः यापूर्वीच ही संधी घ्यायला हवी होती. परंतु या ना त्या कारणानं ते राहूनच गेलं. गतवर्षी काश्मीरच्या सहलीत तिथला कार्यक्रम पहायचा योग आला होता. पण त्याच वेळी तिथल्या दूरदर्शनवर माझ्या मुलाखतीचा कार्यक्रम असल्यानं तो योग हुकला होता. म्हणून आवर्जून (स्वखर्चानं) आज तो कार्यक्रम पाहिला. मला तो आवडला. एकदा पहायला बरा आहे. परंतु पुन्हापुन्हा पहाण्यासारखं त्यात काही नाही. लोकमान्य टिळक, नेताजी सुभाषचंद्र बोस (चलो दिल्ली), महात्मा गांधी वगैरे महापुरुषांना या कार्यक्रमात पुरेसं स्थान नसल्याबद्दल काही मंडळी तक्रार करीत होती. मुगल दरबारातली नाचगाणी आणि

मुशायरे याच्यासाठी खर्च केलेल्या वेळात कपात करून या राष्ट्रपुरुषाच्या कार्याला स्थान द्यायला हव होत, अस त्यांच म्हणण परंतु हा कार्यक्रम मूळातच लाल-किल्ल्यावर बतलेला असल्यामूळ त्याचयाशी संबध नसलेल्या व्यक्ती व घटना त्यात आणता येणार नाहीन, हे उघड आहे इंदिराजी व संजय गांधी यांचा उदोउदो त्यात ओढूनताणून करण्यात आलेला नाही, हे काय थोडे उपकार झाले ? (अर्थात स्वातंत्र्यप्राप्तीपर्यंतच्याच घटनांचा आढावा त्यात घेतलेला असल्यामुळ या गाय-वासरांना त्यात घुसडण अगदीच हास्यास्पद ठरल असत !)

आमचा हा जथा मुख्यत' स्त्रियांचाच आहे चौवीस प्रवाशांत फक्त दहा-बारा पुरुष व बाकीच्या स्त्रिया आहेत बहुतेक सगळच पन्नाशी–साठी ओलांडलेल्या. पुरुष हे माझ्यासारखेच आपल्या पत्नीच्या सोबतीला आलेले–– थकलेले! त्यामुळे ते फारसे बोलत नाहीत कदाचित जबाबदारीच्या जाणिवेने दबलेले असावेत बायका मात्र अष्टौप्रहर वाग्‌यज्ञात गढून गेलेल्या असतात मी दूर बसून ते मजशीर दृश्य पहात होतो महिलामंडळी लहान–लहान घोळके करून गप्पा मारीत होती त्यांच्या चेहेऱ्यावरील हावभाव मला स्पष्ट दिसत होते त्यावरून आणि त्या करीत असलेले हातवारे, डोळे वटारण, बारीक करण, जीभ बाहेर काढण, नाक फेंदारण किंवा मुरडण, आश्चर्योद्‌गार, खदखदून हसणं, या सर्वांतून त्यांच्या हर्षामर्षांची अभि-व्यक्ती होत होती त्या काय बोलत असतील त्याची सहज कल्पना त्यांच्या अभि-नयावरून येत होती. कोणती बाई घुमी आहे कोण आतल्या गाठीची, कोण आढ्यताखोर, कोण घमेंडखोर, कोण मनमोकळी, कोण भावनाप्रधान, हे सार समजत होत शालिनीबाईंसारखी इतरांत न मिसळता स्वत मधेच गुंग असणारी बाई कसल्या तरी विचारात गढून गेली होती ती स्वत वरच प्रेम करणारी असली पाहिजे, हे उघड होत ते दृश्य पाहून माझ्या मनात एक मजेदार विचार चमकून गेला बचावचा बडबडण्याची ही वृत्ती स्त्रीच्या दास्याला कारणीभूत झाली असेल का ? की तिच्या परस्वाधीनतेच ते प्रतीक असेल ? आपली सारी जबाबदारी पुरुषांवर टाकून निश्चिंतपणान जगण्याच तर ते लक्षण नसेल ? आपली वाचाळता आपल्या मुक्तीला बाधक असल्याची जाणीव तिला असेल काय ? बाई अन्नाशिवाय राहू शकेल तशी तिला उपासतापासाची सवय असतेच ! पण बोलल्याशिवाय मात्र जगू शकणार नाही कोणत्या प्रकारच्या पुरुषाच्या बायका जास्त बडबड करतात? बाईलवेड्या, बाईलबुद्ध्या, पुरुषार्थहीन, नामर्द नवऱ्याच्या बायका जास्त बडबड करीत असतील का ? की बायकोला जरबेत ठेवणाऱ्या नवऱ्यांच्या बायका नवरा जवळपास नाही हे पाहून आपला सारा उत्साह, आवेश बडबडीच्या रूपान व्यक्त करीत असतील? बडबडीचा आहाराशी––फॉस्फरसयुक्त खाद्याशी––संबध आहे अस म्हणतात त्यामुळ मासळी खाण रे बंगाली व कोकणवासी अधिक बडबडये असतात असही कुणी म्हणतात श्रीमती इंदिरा गांधीसारखी कमी, मोजक बोलणारी स्त्री

दाताखाली ओठ दाबून ठेवून इतरांच बोलण ऐकून घेते, पण आपल मन मात्र उघड करीत नाही हे वर्चस्व गाजवण्याच्या प्रवृत्तीच लक्षण म्हणता येईल का? यावरून आणखी एक प्रश्न मनात आला जे पुरुष भयंकर बडबडत असतात त्यांच्यातही अशी दास्यवृत्ती असेल काय? म्हणून आपला हीन मनोगंड बडबडीच्या आवरणाखाली लपवू पहातो काय ?

यातून आणखी एक विचार मनात आला गोडाची आवड हे बालबुद्धीच लक्षण समजल जात पण बाईला तर सहसा गोड आवडत नाही तिखट, आंबट, कडू आवडणारी स्त्री स्वभावान मवाळ कशी? .. हा गुंता सोडवण्यात मी गुंग होऊन गेलो.

☐

बहावलपुरी धर्मशाळा,
हरिद्वार.
२२–९–८०

सकाळी ८ वाजता विश्रामालयातून खास बसन निघालो आणि १४५ मैलाच अंतर ६ तासांत कापून दुपारी दोनला इथ पोचलो निघाल्यानंतर जुन्या दिल्लीत गाडीतळावर बराच वेळ गेला म्हणजे प्रत्यक्षात दिल्लीतून बाहेर पडायला ९ वाजले. वाटेत खतौली या गावाबाहेर आधुनिक पद्धतीच एक उत्कृष्ट उपाहारगृह आहे तिथं अर्धा तास गेला तिथल्या छोटयाशा डिअर पार्कमध्ये मजेदार चितळ पहायला मिळाले रुडकीला मोटारमालक रहातो त्याला भेटण्यात चालकान एक तास घालवला. म्हणजे मधला वाया गेलेला वेळ सोडला तर चार तासातच गाडीन एवढ अंतर कापल होत यावरून शीख चालकाची कुशलता लक्षात यावी

या वेगाच श्रेय जस चालकाला आहे तस या भागातल्या रस्त्यांनाही आहे अगदी सरळ, सपाट जमीन कुठही चढउतार नाही मग घाट–डोंगराच तर नावच नको गाझियाबाद, मेरठ, मुजफ्फरनगर व सहारनपूर या चार जिल्ह्यातून आम्ही गेलो या चार जिल्ह्यांची मुख्यालय असलेली त्याच नावाची शहर आणि मोदी-नगरसारख औद्योगिक केंद्र वाटेत लागत परंतु या भागात प्रवास करताना शहरी संस्कृतीच दर्शन क्वचितच घडत शहराभोवतालो ग्रामीण संस्कृतीचा वेढा इतका जबरदस्त आहे, की शहरही मोठी खेडीच असल्याचा भास होतो गलिच्छपणा व अव्यवस्था ही ग्रामीण संस्कृतीची लक्षण विशेषत्वान मनावर प्रभाव टाकून जातात.

यंदा पाऊसपाणी छान झाल आहे शिवाय या भागात गंगायमुनांच्या कालव्यांच जाळही पसरलेल आहे त्यामुळ सर्वत्र हिरवंगार दिसत होत ऊस व बाजरीची पिक कशी तरारून आली होती महाराष्ट्रात पदोपदी भेटणारी माळरान आणि पडीक जमिनी यांचा मागमूसही नव्हता रस्त्याच्या कडेन रेड्याची गाडी

(भैंसागाडी) संथपणान चाललेली हटकून दिसते भैंसागाडी हे उत्तरप्रदेशाचं प्रतीक समजायला हरकत नाही जुनी परपरा न सोडणारा आणि अत्यत सथगतीन चालत रहाणारा हा प्रदेश आहे बैलाची गाडी क्वचितच दिसते चारपाच म्हशीत एखादीच गाय दिसायची म्हणजे हा मुख्यत महिषीचा प्रात आहे मात्र कोकणाप्रमाण शेतीत रेड्यांचा उपयोग होत नाही तिथ बैलच वापरले जातात याचा अर्थ असा की इथल्या लोकानी गाय आणि म्हैस याच्यांत मजेदार समतोल साधला आहे. रेड्याचा उपयोग शेतीत होत नसल्यामुळ त्यांची बालपणीच हत्या केली जाते, हा मुद्दा गोरक्षणवाली मडळी माडतात तो इथ लागू पडत नाही. हिंदू–मुसलमानांप्रमाण इथ गाई–म्हशींच सहजीवन मजेत चालू असावं, अस दिसतं.

या प्रवासात एक मजेदार गोष्ट पहायला मिळाली. देशात भ्रष्टाचार बोकाळल्याच आपण नेहमीच वाचतो, ऐकतो पण असा भ्रष्टाचार प्रत्यक्ष डोळ्याना मात्र क्वचितच दिसतो तो पहायचा असेल तर या रस्त्यावरून प्रवास करावा. वाटेत जागजागी पोलिस गाडी थांबवीत होते आणि ड्रायव्हर–कडक्टरकडून आपला हप्ता वसूल करीत होते नोटांचीही देवाण–घेवाण सर्व उतारूच्या देखत, राजरोस चालते. इतकच काय, पण आपण घेतलेल्या रकमेची नोंद पोलिसवाला ड्रायव्हर-जवळच्या वहीत करून, त्यावर तारीख टाकून आपली सहीही करतो ! ड्रायव्हरला जेव्हा या बाबतीत मी विचारल, तेव्हा कसलाही आडपडदा न ठेवता त्यान मला सांगितल, "साहेब, हे सार आर टी ओ च्या समतीन चाललेल असत नियमित हप्ता दिला की कसलीही गाडी झटपट पास होते शिवाय आम्ही नेहेमीच आमच्या गाडीत दुप्पट–तिप्पट उतारू कोंबतो. (टपावर उतारू दाटीवाटीन बसलेल्या गाड्या तर आम्ही पाहिल्याच होत्या !) आमचे पगार फ र कमी असतात दीडशे–दोनशे रुपयें दर महा! हे सगळे वरचे उतारूच आमची कुटुबं चालवतात कारण हा वरचा पैसा मालकाला द्यावा लागत नाही अशा स्थितीत पोलिसवाले आम्हाला केव्हाही अडवून आमच्यावर खटला भरू शकतात आणि आमचे आणि गाडीचे परवाने रद्द करू शकतात त्यानी तस काही करू नये, म्हणून हा हप्ता आम्ही देत असतो प्रत्येक शहरामाग दर महा शभर रुपये असा दर आहे तेवढा कर भरला की आम्ही निश्चित होतो "

यावर मी काय बोलणार ?

प्रवासाच्या दगदगीनं थकून, कटाळून आम्ही हरिद्वारात प्रवेश केला, तेव्हा केव्हा एकदा मुक्कामावर जाऊन जेवण करतो व पथाऱ्या पसरतो अस आम्हाला होऊन गेल होत पण कपनीच्या अकार्यक्षमतेन आम्हाला चांगलाच फटका दिला. ज्या माणसाकडे मुक्कामाची जागा ठरवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली होती तोच गायब झाला होता अखेर रखरखत्या उन्हात रखडल्यावर एका धर्मशाळेत जागा मिळाली सध्या यात्रेचा मोसम नसल्यामुळ सगळ्या धर्मशाळा रिकाम्याच

आहेत, हे सुदैव ! पण या तीनमजली धर्मशाळेत जेव्हा आम्हाला दोन मजले चढून तिसऱ्या मजल्यावरच्या धूळ भरलेल्या खोल्यात कोंबण्यात आलं, तेव्हा अशक्त व वृद्ध व्यक्तींना ब्रह्मांड आठवलं एकेका खोलीत पाच–सहा माणसांना उशा–पाय-थ्याला पडून एक रात्र काढायची होती पुष्कळ खोल्या रिकाम्या होत्या. त्या खूप स्वस्तही होत्या पण कंपनीची काटकसर पुन्हा आडवी आली. त्यात पुन्हा जेवायला तळमजल्यावर, अंगणात जाणं भाग होतं !

फक्त परदेशी जाणारी मंडळीच तिथली प्रेक्षणीय स्थळं आणि लोकजीवन पहाण्याऐवजी खरेदीतच सारा वेळ घालवतात असं नव्हे, तर देशातल्या देशात तीर्थयात्रा करणारे लोक— आणि त्यात स्त्रियांचा भरणा जास्त असेल तर मग विचारायलाच नको — आपला अधिकांश वेळ खरेदीतच खर्च करतात, हा अनु-भव मला काश्मीरच्या सहलीत आलाच होता त्याचीच पुनरावृत्ती इथं पहायला मिळाली (आणि तीच पुढं प्रत्येक ठिकाणीही पहायला मिळाली !) माणसं प्रत्यक्ष प्रवासावर जेवढी रक्कम खर्च करतात त्याच्या दुप्पट तरी खरेदीवर करीत असा-वीत, असा माझा अंदाज आहे प्रत्येक ठिकाणी त्यांना भरमसाट खरेदीसाठी सब-बीही छान मिळतात या भागात लोकरीचे कपडे, रग, टोप्या, मोजे वगैरे खूप स्वस्त मिळतात या समजुतीनं सर्वांनी भरपूर खरेदी केली काही भगिनींनी इथं बासमती तांदूळ स्वस्त मिळतो, म्हणून पाच–पाच, दहा–दहा किलो तांदूळही खरेदी करून टाकला त्या ओझ्याचं काय ? जो होगा देखा जायगा ! मी आयुष्यात खादी भांडाराबाहेर कधीच खरेदी केली नसल्यामुळं, त्यांची ती समजूत खरी असावी असं गृहीत धरतो

माझा ट्रॅन्झिस्टर बंद पडल्यामुळं तो दुरुस्त करून घेतला या प्रवासात वृत्त-पत्रं वेळच्या वेळी मिळणार नसल्यानं ट्रॅन्झिस्टर अत्यावश्यक ठरतो. माझं दुःख एवढंच की वीस रुपये किंमतीच्या ट्रॅन्झिस्टरच्या किरकोळ दुरुस्तीसाठी सात रुपये द्यावे लागले यात्रेच्या ठिकाणी यात्रेकरूंना व हौशी प्रवाशांना लुबाडणं हाच दुकानदाराचा व पंड्यांचा मुख्य व्यवसाय असावा !

कुठंही गेलं तरी बाजारात हिंडताना मला खुळ्यासारखं होतं दुकानात दिसणारी प्रत्येक गोष्ट विकत घ्यावी असं वाटतं, पण तिची आपल्याला काहीच गरज नसल्याचं दुसऱ्याच क्षणी लक्षात येतं, आणि मग मी काहीच घेत नाही या अनुभवानुसार बाजारातून फेरफटका मारून आणि पुढील प्रवासासाठी खाली अण-कुचीदार टोपण असलेली एक भक्कम काठी तीन रुपयांना खरेदी करून मी गंगेच्या घाटावर जाऊन बसलो तसं पाहिल्यास हरिद्वारला ब्रह्मकुंड, कुशावर्त, बिल्वकेश्वर महादेव, भीमगोडा, मनसादेवी, चंडीदेवी आणि कनखलचं दक्ष प्रजापती महादेवाचं मंदिर अशी अनेक प्रेक्षणीय ठिकाणं आहेत. पण माझं मन रमलं ते गंगेच्या हरकी पैडी या प्रख्यात घाटावरच चाळीस वर्षांपूर्वी (१९४० साली) मी हरिद्वारला

आलो होतो तेव्हाही या हरकी पैडीनच मला मंत्रमुग्ध केलं होतं सायंकाळचा समय. गंगेचं अरुंद व उथळ पात्र. खळखळ वहाणारा शुभ्र, निर्मळ पाण्याचा प्रवाह या ठिकाणची गंगा ही आपल्या विस्तारानं भयचकित करणारी उत्तर-भारतीय गंगा नसून आपल्या सखीप्रमाणं खळकरपणानं मोहून टाकणारी एखादी मराठी नदी वाटते— कृष्णा, गोदा, दूधगंगा, वेदगंगा यासारखी ! तिचा तो अवखळ प्रवाह नजर खिळवून टाकतो

तिच्या आकर्षणाचं आणखी एक कारण आहे सूर्यास्त झाला की अनेक भाविक स्त्रीपुरुष— मुख्यतः स्त्रिया आणि मुली— फुलांनी भरलेल्या झाडाच्या हिरव्यागार पानांच्या लहानमोठ्या द्रोणांतून गंगेच्या प्रवाहात फुलवातींचे दिवे सोडतात. होड्यांच्या आकाराचे ते द्रोणदीप मोठ्या मजेत, दिमाखात, हेलकावे खात, तरंगत जातात त्यांची शोभा अप्रतिम असते लहानपणी त्रिपुरी पौर्णिमेच्या चांदण्यात पाहिलेल्या अशाच दीपदानाची स्मृती चाळवते मन उगीचच नॉस्टाल्जिक होतं. चाळीस वर्षांपूर्वी याच दृश्यानं मला मोहित केलं होतं या कालावधीत जग किती पुढं गेलंय ! ज्ञानविज्ञानानं केवढी अफाट प्रगती केलीय ! शिक्षणाचा प्रसारही खूप झालाय पण गंगेवरील दीपांची संख्या कमी होण्याऐवजी वाढलेलीच दिसली यात्रेचा हंगाम नसतानाही प्रेक्षकांची दाटी बरीच वाढलेली दिसली स्कर्ट घालून दिवा सोडणाऱ्या व गंगेची पूजा करणाऱ्या एका तरुणीला मी विचारलं, " या साऱ्या कर्मकांडावर तुझा विश्वास आहे का ? ' ती लाजून म्हणाली, " वडील माणसांसाठी सारं करावं लागतं " तिची आई जवळच होती ती म्हणाली, " कुमारी मुलींनं असं दीपदान केलं की तिला चांगला नवरा मिळतो म्हणून ते करायचं " अर्थात म्हाताऱ्या स्त्रियांच्या चेहेऱ्यांवर मात्र खराखुरा भक्तिभाव दिसत होता इंजिनीयर असणाऱ्या, मध्यप्रदेशातून आलेल्या एका तरुणाला मी विचारलं, " हे दीपदान तू खरंच भक्तिभावानं करतोस का ?" यावर तो आश्चर्यानं उद्‌गारला, " खरंच म्हणजे काय ? तुम्हाला का शंका वाटते ? मी तर माझ्या बायकोला अन मुलाला घेऊन नुकताच जम्मूजवळच्या वैष्णोदेवीचं दर्शन घेऊन आलोय ती यात्रा तर केवढी अवघड अन कष्टाची ! खरी भक्ती नसती तर ती दगदग आम्ही कशाला केली असती ? '

अशी आहे आपल्या देशातल्या युवकाची मनःस्थिती !

माझ्या मनात कसलाच भक्तिभाव नव्हता मी अगदी अलिप्तपणानं त्या दीपसौंदर्याचा आनंद उपभोगीत होतो एखादा दिवा लाटेच्या तडाक्यात सापडून विझला की मनात उगीचच अशुभाची पाल चुकचुकून जाई. एखादा द्रोण आतील दिव्यासह डौलानं तरंगत दूरवर जाई व नजरेआड होई, तेव्हा लहान मुलं आनंदानं टाळ्या पिटीत त्या वेळी माझं मनही उत्साहानं त्यांच्या आनंदात सामील होई

त्या दीपदर्शनात वेळ कसा भर्रकन निघून गेला सात वाजले आणि गंगेच्या

आरतीचा घटानाद सुरू झाला या ठिकाणी गगा दक्षिणवाहिनी आहे तिच्या पश्चिम-तीरावर गगेची आणि इतर मदिर आहेत तिथली आरती चागली दिसावी म्हणून मी समोरच्या घाटावर जाऊन बसलो होतो अर्थात पात्र लहान असल्यान अतर फारच थोड होत त्यामुळ एकाच वेळी चाललेल्या बारा वेगवेगळ्या आरत्या मोठ्या छान दिसत होत्या उत्तर-भारतीयाचे आरतीचे अशुद्ध उच्चार आणि बेसूर सगीतही त्या वेळी कर्णमधुर वाटल या ठिकाणी गगेच पात्र दुभगलेल असून मधल्या मोकळ्या जागेत मालवीय द्वीपक्षेत्र तयार करण्यात आल आहे पडित मदनमोहन मालवीयाची लहानशी मूर्ती आणि बिर्लांनी उभारलेल एक घड्याळघर ( क्लॉक टॉवर) तिथ आहे मी परत जायला उठलो तेव्हा सारा घाट माणसांनी फुलून गेला होता गेल्या खेपेस मी मध्याकाळी या ठिकाणी बुड्या मारल्या होत्या नदीत डुब-णारी तरुण मुल पाहून मला माझ्या तरुणपणाच्या दिवसाची आठवण झाली आणि त्या मुलाचा हेवा वाटला हातपाय धुऊन आणि आचमनाच्या रूपान थोडस जल प्राशन करून मी मनाच समाधान करून घेतल.

अजून हवेन थडी आलेली नाही किंबहुना उकाडाच चालू आहे त्यामुळ गगेत एक तरी बुडी मारण्याचा मोह पुन्हापुन्हा होत होता पण नदीच पाणी फारच गार होत आणि उन्हाळ्यातही थड पाण्यान अघोळ केली तर आपल्याला फ्लू होतो हा नेहेमीचा अनुभव असल्यामुळ, पुढच्या प्रवासाचा विचार करून मी तो मोह टाळला

□

महाराष्ट्र भवन,
हृषीकेश
२३–९–८०

मला जे जमल नाही ते सौभाग्यवतीन करून टाकल शरीरान दुबळी माणस कधीकधी मन सामर्थ्याच्या जोरावर अकल्पितपणे अद्भुत काम कशी करून जातात, त्याचा जणू हा पदार्थपाठच होता मला स्नानाला जायच नव्हत म्हणून मी अथ-रुणातच आळसावून पडलो होतो काही चटपटया व चलाख भगिनींनी गगास्नानाचा कार्यक्रम योजला होता त्याच्याबरोबर जायच सौ माणिकबाईंनी ठरवल. पण त्या हळूहळू लगडत चालणार म्हणून इतर भगिनी त्याना तशाच मागे सोडून निघून गेल्या सौ माणिकबाई आपल्या धीम्या चालीन एकटयाच गगेवर गेल्या एरव्ही त्याना पायऱ्या चढताना–उतरताना कुणाचा तरी आधार लागतो पण आज त्यानी केवळ छत्रीच्या आधारान घाटाच्या पायऱ्या उतरण्या–चढण्याचा विक्रम केला. एवढच नव्हे तर पाण्याला एवढी प्रचड ओढ असताही न घाबरता पहिल्या पाय-रीवर बसून डोकीवरून न्हाऊनही घेतल थड हवा व गार पाणी याचा त्याच्या

निश्चयावर काहीच परिणाम झाला नाही एवढच नव्हे तर नेहेमीप्रमाण पडशा–खोकल्याचाही त्रास झाला नाही मला हे सार नतर समजल आधी कळल असत तर मी त्या धाडसापासून त्याना परावृत्त करायचा प्रयत्न केला असता निदान त्याच्या सोबतीला तरी गेलो असतो अनेक श्रद्धाळू लोक असख्य अडचणींना तोंड देऊन यशस्वीपणान अशा यात्रा कशा करीत असतील याची मला या उदाहरणा-वरून कल्पना आली. या श्रद्धेवरच तर सारे धर्म तग धरून आहेत !

हरिद्वार आणि हरद्वार व हृषीकेश आणि ऋषीकेश ही सर्वच नाव सर्रास प्रचलित आहेत गगेचा सबध शकराशी असल्यामुळ हरद्वार अधिक बरोबर वाटत पण तिचा उगम असलेल्या भागातील बद्रीनाथ हा विष्णूचा अवतार समजला तर हरिद्वार हा शब्दही चूक ठरत नाही कदाचित शैवानी हरद्वार आणि वैष्णवानी हरिद्वार ही नाव रूढ केली असतील हृषीकेश म्हणजे सर्व इद्रियाचा सचालक, परमात्मा विष्णू किंवा कृष्ण. हे नाव अधिक बरोबर असाव अस वाटत ऋषींच्या आश्रमाशी सबधित असल्यामुळ ऋषिकेश (इग्रजीत Rishikesh) हे नावही चूक वाटत नाही आमच्यासारख्यानी कोणत्याही एका नावाबद्दल आग्रह धरण्यात तसा फारसा अर्थ नाही. ज्यांची गाव त्यांचाच आग्रह नाही, तर तुमच्याआमच्या आग्र-हाचा उपयोग तरी काय ?

पुराणामधे जी सात क्षेत्र मोक्षदायक मानली गेली आहेत त्यामधे हरिद्वाराचा समावेश आहे मात्र त्या श्लोकात हरिद्वार हा शब्द नसून ' माया ' ( मायापुरी ) असा उल्लेख आहे

' अयोध्या, मथुरा, माया, काशी, काची, अवतिका ।
पुरी द्वारावती चैव सप्तैता मोक्षदायिका ॥ '

यांपैकी अयोध्या सोडल्यास इतर सहा ठिकाणी मी पूर्वीच जाऊन आलो आहे तीही योगायोगान.

महाभारताच्या वनपर्वात या प्रदेशाचा उल्लेख येतो इथ देव–देवता निवास करतात, अस समजल जाई सगर राजाच्या पुत्राचा उद्धार करण्यासाठी गगामाई याच ठिकाणी पर्वतप्रदेश ओलाडून खुल्या मैदानात आली आहे त्यामुळ हरिद्वारला गगाद्वार असही म्हणतात

गगेच्या उजव्या काठावर वसलेल हृषीकेश मोठं रम्य स्थान आहे या ठिकाणी रैम्य ऋषींनी उग्र तपश्चर्या केली होती असा पुराणात उल्लेख आहे त्याच्या तप-स्यन प्रसन्न होऊन परमेश्वरान त्याना दर्शन दिल आणि सागितल, " यापुढ मी ऋषिकेश या नावान प्रकट होईन या स्थानाच नाव ऋषिकेशाश्रम अस पडेल त्रेतायुगात दशरथाचा पुत्र भरत या ठिकाणी येऊन तपश्चर्या करील " त्याप्रमाण या ठिकाणी भरताचं एक छोटस रमणीय मदिर आहे. इथल्या इतर मदिरात रामाच आणि हनुमानाचं मदिरही महत्त्वाच समजल जात

हिमालयातल्या प्रवासासाठी लागणाऱ्या वस्तू हरिद्वार आणि हृषीकेश या शहरात विकत घ्यायची प्रथा आहे डोंगरावर चढताना उपयोगी पडणारी काठी, लोकरीची टोपी, मोजे, स्वेटर वगैरे वस्तूंचा त्यात समावेश असतो डोंगरातून वाहणाऱ्या झऱ्याच पाणी खनिजांनी युक्त असल्यामुळ ते पचायला फार जड असत म्हणून अस पाणी थोडा वेळ भाड्यात ठवून मग प्याव अशा सूचना सरकारी पत्रकातून दिलेल्या असतात पण अशिक्षित यात्रेकरूना त्या कशा कळायच्या ? म्हणून कॉलरा व टॉयफइडला प्रतिबधक इजेक्शन घण अनिवार्य करण्यात आलेल आहे. ह इजेक्शन टोचण्याची सोय या शहरातून जागोजागी करण्यात आली आहे अर्थात आम्ही पुण्यातून निघतानाच ही इजेक्शन घेऊन त्याची सरकारी सर्टिफिकेट बरोबर आणली असल्यान आम्हाला या ठिकाणी ती दगदग करावी लागली नाही.

हरिद्वारहून हृषीकेश फक्त २६ कि मी (१६ मैल) असल्यान अर्ध्या तासात बसन तिथ पोचता येत आगगाडीही जाते पण तिला एक तास लागतो वाटेतल्या स्टेशनांमुळ ! आम्ही दुपारी दोन वाजता निघून अडीच वाजता इथ पोचलो बहुधा काटकसरीच्या हेतून कपनीन सरकारी बस घेतली होती ती इतकी खिळखिळी झालेली होती की तिच्यातली बाक झोपाळ्यासारखी डोलत होती बाकावरच्या गाद्या तर पार फाटून गेल्या होत्या बहुधा ती स्क्रॅप म्हणून काढून टाकलेली गाडी असावी यात्रेच्या दिवसात आमचे वारकरी मालडब्यातून आणि गुराच्या डब्यातून जर वर्षानुवर्ष पढरपूरला मजेत जाऊ शकतात, तर असल्या गाड्यातून यात्रेकरू हरिद्वारहून हृषीकेशला जायला का विरोध करतील ?

हृषीकेश म्हणज हिमालयाचा प्रारभ किंवा पायथा इथं बरीच प्रेक्षणीय स्थळ आहेत कपनीच्या कार्यक्रमात त्यातल्या काही स्थळांचा समावेश होता म्हणून टॅक्सीतून ती आम्हाला दाखवण्यात आली प्रत्येक टॅक्सीत सात उतारू. (आणि आठवा ड्रायव्हर !) भाड सर्वांच मिळून चाळीस रुपये आमची टॅक्सी अगदी दिव्य होती दुपारच्या बसची धाकटी बहीण तिची खिळखिळी दार काथ्याच्या दोरीन बाधावी लागत होती यावरून तिच्या स्वरूपाची कल्पना यावी !

प्रथम आम्ही लक्ष्मणझूला पहायला गेलो एका दृष्टीनं पाहिल्यास या भागात असल्या झुलत्या पुलामध्ये कसलीच नवलाई उरलेली नाही हिमालयातून खळखळत्या व फुसफुसत्या नागिणीप्रमाण भयकर वेगान धावणाऱ्या बहुतेक सर्वच नद्यांवर असे झुलते पूल जागजागी उभ रलेले आहेत. 'उभारलेले'च म्हटल पाहिजे, 'बाधलेले' नव्हे. कारण या पुलामध्ये दोन्ही किनाऱ्याना जोडणाऱ्या लोखडी तुळयाचा किंवा दोरखडाचा वापर केलेला असतो, आणि प्रचड लोखडी दोरखडानीच सारा पूल ताणून धरलेला असतो पूर्वीच्या काळी त्यांच्या जागी काथ्याचे

किंवा वांखाचे दोर असत, किंवा दोरखडाच्या साह्यान ओढली जाणारी शिकी असत. दोर किंवा शिक तुटून गच्छती होण्याचा मोठाच धोका असे खळाळणाऱ्या, खडकाळ नदीच्या प्रवाहात खांब उभारण्याची शक्यता नसल्यामुळ अधांतरी लोंब-कळणारे हे झुलते पूल अस्तित्वात आले गेल्या खेपेला हा पूल चागलाच हलत, लवत होता कारण त्यावर लाकडी फळ्या टाकून रस्ता केलेला होता आता त्यावर डांबरी रस्ता करण्यात आल्यामुळ तो फारसा हलत नाही तरी पण तो झुलता पूल आहे एवढ लक्षात येण्यापुरता तो लपकतो

पैलतीरावर एक अनेकमजली नवी इमारत असून तिच्या प्रत्येक मजल्यावर अनेक देवादिकाच्या ठोकळेबाज, बटबटीत, सगमरवरी मूर्ती आहेत त्याच्याच समवेत एका बाजूला देशभरातून मिळवलेल्या नाजुक कलाकुसरीच्या धातूच्या व दगडांच्या मूर्तीही आहेत परंतु त्यांच्याकडे बहुधा कुणाच लक्ष जात नाही.

इथून गगा ओलाडल्यावर वस्तुत स्वर्गाश्रम व गीताभवन पहायला जायला हरकत नव्हती परंतु बहुधा ते अतर जास्त असल्यामुळ 'मुनिकी रेती' या ठिकाणी जाऊन तिथून नावेतून पैलतीरावर जाण्याचा कार्यक्रम ठेवला होता (नावेच भाड माणसी पन्नास पैसे ) इथ गगा नदी चागलीच रुद व खोल आहे पैलतीरावरच्या स्वर्गाश्रमाच्या व गीताभवनाच्या नव्याकोऱ्या इमारतीच दृश्य खरोखराच छान दिसत नौका यत्रचलित असल्यान तीन–चार मिनिटांत पलीकडे पोचता येत या नौकेच कत्राट खासगी इसमाला देण्यात आलेल असल्यान नावेत किती माणस भरावीत याला काही धरबदच नसतो परत येताना नावेत जी भयकर गर्दी झाली ती पाहिल्यानतर उत्तरप्रदेश–बिहारमधे गगा नदीत नौका बुडाल्याच्या ज्या बातम्या आपण वारवार वाचतो त्याच मूळ कशात असाव याची कल्पना आली. नौकाविहाराचा आनद निश्चितच मिळतो मात्र ही वाहतूक कायमची असताना चढण्या–उतरण्यासाठी पक्के घाट अजूनही का बाधले नसावेत हे समजत नाही

स्वर्गाश्रमात स्वामी विशुद्धानद ऊर्फ बाबा काली कमलीवाले (निधन १८९७) यांची समाधी आहे त्याच भव्य तैलचित्र आणि भिंतीवर रेखाटलेली बाळबोध, पौराणिक चित्र सामान्य जनाना निश्चितच आकर्षक वाटतात या काली कमलीवाल्यांनी मुख्यत: हिमालयात जागजागी अनेक तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी धर्मशाळा बाधून गरीब यात्रेकरूची चागली सोय केली आहे.

गीताभवनात सर्वत्र गीतेचे श्लोक आणि महाभारतीय युद्धातले प्रसग चित्रित केलेले आहेत गोरखपूर (उ प्र )च्या गीता प्रेस या सस्थेतर्फे (जेथून 'कल्याण' हे प्रचड खपाच धार्मिक मासिक प्रकाशित होत असत) ही सस्था चालवली जाते. गोरखपूरला तयार होणार हातमागाच कापड इथ विकत मिळत. ते खूप स्वस्त

असल्याच्या समजुतीने आमच्यासकट सर्वांनी भरपूर चादरी, नॅपकिन, टॉवेल वगैरे खरेदी केले.

इथून पुढं खराखुरा हिमालयातला प्रवास सुरू होतो सुरुवातीपासून शेवट-पर्यंत घाटच घाट असल्यामुळे मोटारीचा आकार लहान असतो म्हणून मोठमोठ्या पेट्या, बॅगा, ट्रंका इथच ठेवून जावं लागतं फक्त अंथरूण–पांघरूण आणि अंगात घालायचे कपडे बरोबर नेता येतात

मोहनरावांनी हृषीकेशचं विठ्ठलमंदिर पाहून येण्याची खास शिफारस केली होती परंतु वेळेच्या अभावी ते जमलं नाही, याची हुरहुर लागून राहिली. परत जाताना जमल्यास प्रयत्न करावा, असं मनाशी योजलं

□

सीतापूर.

२४–९–८०

आजचा दिवस फारच कटकटीचा गेला हृषीकेशहून केदारनाथ हे अंतर तसं फार अधिक नाही फक्त २२० कि मी (१३० मैल) परंतु संपूर्ण रस्ता अवघड घाटातून असल्यामुळे हे अंतर अकरा तासांत काटून अंधार पडण्यापूर्वी केदार-नाथच्या पायथ्याशी असलेल्या गौरीकुंडाला सायंकाळी पाचपर्यंत पोचावं म्हणून आम्ही सकाळी सहालाच खास बसमधून निघालो पण लक्ष्मणझूला भाग ओलांडून पुढं येताच मोटारचं पुढचं चाक करकरू लागलं सुदैवानं गाडीत गाडीचा मालक होता. त्यामुळे हृषीकेशला माणूस पाठवून मेकॅनिक आणण्याची व्यवस्था तरी चटकन झाली मात्र त्या साऱ्या प्रकरणात दोन–अडीच तास वाया गेले चाकातील बॉलबेअरिंगच झिजून–गळून गेले होते नदी जवळच असली तरी किमान अर्धा मैल खोल होती तरी पण कंपनीच्या नोकरांनी पाणी आणून चहा केला, आणि सकाळची न्याहरी उरकून घेतली नऊ वाजता आम्ही पुढं रवाना झालो गाडी ठरवताना आवश्यक तेवढी काळजी घेतली नसावी, किंवा काटकसर म्हणून भिकार गाडी घेतली असावी, हे स्पष्ट झालं गाडी जुनाट असल्यामुळे इतकी हळू चालत होती की तिला 'गजगामिनी' हेच नाव शोभून दिसलं असतं खरी गोष्ट अशी आहे की, ती 'लोकल बस' असून जवळगावच्या प्रवासाला चालण्याइतपतच तिची क्षमता आहे. पण मालकानं ती यात्री बस म्हणून आमच्या कंपनीच्या गळ्यात बांधलीय एकाच पत्र्याच्या तुकड्यावर एका बाजूला 'लोकल बस' आणि दुसऱ्या बाजूला ' यात्री बस ' हे शब्द रंगवून घेण्यात आले आहेत त्यामुळे सोयीप्रमाणे गाडीचा वापर करता येत असावा इतर बसेस मागून येऊन वेगानं पुढं जात होत्या किंबहुना मागून येणाऱ्या गाड्यांना पुढं जाऊ देण्यास आमचा चालक एका पायावर तयार असे एकदा चुकून एका गाडीनं त्याला पुढं

जायची खूण केली, तर त्याला कस चुकल्याचुकल्यासारख झाल, आणि नाइ-लाजान पुढ जाऊन आमचा चालक थाबला आणि त्या गाडीला पुढ जाऊ दिल्यावरच त्याच्या जिवात जीव आला सामान्यत सार्वजनिक वाहतूक करणाऱ्या गाड्या ताशी ४० मैल वेगान धावतात घाटात त्यांचा वेग २५–३० मैल होतो पण आमची ही बाई तासाला दहा–बारा मैलांच्या पुढ जायला तयारच नसते घाट चढताना तर ताशी आठ मैलांचीही सरासरी पडत नाही खर म्हणजे हिमालया-तल्या प्रवासासाठी सरकारन फक्त सुस्थितीत असलेल्या नव्याकोऱ्या गाड्यांनाच परवानगी द्यायला हवी पण सार राज्यच भ्रष्टाचारात रुतलेल असल्यान तशी अपेक्षा करण वेडेपणाचच ठरेल

केदारनाथ व बद्रीनाथ याच्या यात्रेच जे एक वैशिष्टय चटकन लक्षात येत ते अस की, या यात्रेचा मार्ग नदीच्या काठाकाठानं जातो बहुधा पायी चालणाऱ्यानी जो मार्ग शोधून काढला होता त्याचच अनुसरण आधुनिक मार्गअभियत्यानी केल असाव केदारनाथाला जाताना एकामागून एक असे तीस–बत्तीस प्रचड डोंगर (म्हणजे पर्वतच) ओलाडावे लागतात हे डोंगर एकमेकापासून वेगळे आणि एका-हून एक अधिक उच असल्यान प्रत्येक डोंगर ओलाडण्यासाठी किमान त्याच्या मध्यापर्यंत तरी वर चढून खाली उतराव लागत शिवाय दरीतून वाहणारी नदी पुन पुन्हा ओलांडावी लागते. हे डोंगर ओलाडताना वारवार मनात विचार येतो : आधुनिक अणुविज्ञानाचा वापर करून या डोंगराच्या पोटातून लांबलचक बोगदा काढता आला तर किती पेट्रोल, श्रम आणि वेळ वाचेल ! शिवाय किती धोके टळतील ! दऱ्यांतून वाहणाऱ्या नद्यावर धरण बाधूनही हे अतर खूप कमी करता येईल आणि नालाच्या आकाराची प्राणघातक वळण टाळता येतील या हेतून नव्हे, तर विद्युत्‌निर्मितीसाठी जागजागी अशा धरणाची आखणी केली जात आहे अस आढळून आल कासवाच्या गतीन चालणाऱ्या या योजना येत्या शभर वर्षांत तरी पुऱ्या होतील की नाही, याविषयी शका वाटते पण जेव्हा त्या पुऱ्या होतील तेव्हा हा प्रवास पुष्कळच निरापद झालेला असेल यात शका नाही

हिमालयातले हे घाट खरोखरीच अत करणात धडकी भरवणारे आहेत पुणे-मुबई मार्गावरचा खडाळा, शिरवळजवळचा खबाटकी यासारखे क्षुद्र घाटच आप-ल्याला केवढे मोठे वाटतात मी तर फोडा, आंबोली, मगळूरजवळचा आगुबे आणि श्रीनगरला जाताना लागणारे वेगवेगळे घाट असे कितीतरी घाट आजवर पाहिले आहेत. परतु या हिमालयातल्या घाटांसमोर ते अगदी खेळण्यातले घाट ठरतील. एका बाजूला अस्मानाला भिडलेले डोंगर आणि दुसऱ्या बाजूला पाताळलोकाप्रमाण खोल-खोल असणारी आणि घेरी आणणारी दरी यांमधून नागिणीसारखी अर्धचद्रा-कार वळण घेत, सरपटत जाणारी, खाचखळग्यानी भरलेली सडक ! खर म्हणजे स्वत च्या पायानी चालत जायलाच हा मार्ग सोयीचा. निदान आपण डोंगराच्या

बाजून चालू शकतो पण असख्य लोकाचे प्राण एका वाहनचालकाच्या हातात स्वाधीन करणाऱ्या मोटारीतून प्रवास करताना प्रत्येकजण जीव मुठीत घेऊनच बसलेला असतो

हिमालयातल्या घाटामध्ये उची आणि खोली यांच्या खेरीज आणखी एक भयंकर धोक्याची बाब असते ती म्हणजे दरड कोसळण्याची ज्याला इग्रजीत 'लॅंडस्लाइड' ( भूमिस्खलन किंवा भूभ्रश) अस म्हणतात इथल्या डोंगरापैकी काही भुसभुशीत शाडू मातीचे आहेत. थोडासा जरी पाऊस पडला तरी या डोंगरावरची माती वाहून रस्त्यावर येते किंवा रस्त्याखालची जमीनच धुपून जाते अशी ठिकाण आता सर्वांना माहीत झाल्यामुळ त्या ठिकाणी वाहन जपून चालवली जातात, आणि दरड कोसळल्यास रस्त्यावरची दगड–माती दूर करण्यासाठी ड्रेजरसारखी यत्रही जवळपास सज्ज असतात या लॅंडस्लाइडपासून रस्त्याच रक्षण करण्यासाठी जपानमध्ये सबध डोंगराला लोखडी जाळी बसवून पाणी बाहेर काढण्याकरता नळ लावले आहेत त्याची मला आठवण झाली.

या घाटातून जाताना मृत्यूसबधी विचार आपल्या मनात सतत पिंगा घालीत असतो क्षणाक्षणाला त्याची चाहूल आपल्याला ऐकू येते अगदी हातभर अतरावर तो आल्यासारखी ! माझ्या बाबतीत यात काही नवीन नव्हत कशी कोण जाणे, अगदी बालपणापासूनच मृत्यूसबधी काहीशी उत्सुकता, काहीशी आत्मीयता मला वाटत आली आहे त्याच्या कल्पनेनं भेदरून गल्याच मला फारस आठवत नाही मात्र इतरांच्या मृत्यून किंवा केवळ मृत्यूच्या कल्पनेनही मी अनेकदा व्याकुळ, विव्हळ झालो आहे विशेषत अल्पवयीन बालकाच्या किंवा तारुण्याच्या उबरठ्यावरच्या स्त्रीपुरुषांच्या मरणाची कल्पना मला नेहेमीच कमालीची अस्वस्थ करीत आली आहे तसे मृत्यूशी साक्षात्कार किंवा 'आमना–सामना' होण्याचे प्रसग माझ्यावर थोडेच आले, पण त्या वेळी गर्भगळित होण्याऐवजी काही वेगळ्याच कल्पना माझ्या मनात तरळून गेल्या होत्या कवितांच्या रूपान मी त्या कल्पनाना वेळोवेळी शब्दबद्धही केल होत त्यातल्या काही कविताच मला आज अचानक स्मरण झाल

एक अमर क्षण प्रेमाचा मज
मिळु दे, मग तू मरणा ये !
सज्ज स्वागता होईन मी तव
दर्शन मग चरणाचे दे ॥

(२४–८–४१)

किंवा स्वातंत्र्यलढ्यातील सैनिकाला काळाच दर्शन झाल्यावर तो मृत्यूला म्हणतो,

" रे थाब जरा
वा जा पुढती !
उसत नाही मुळी जिवाला,
आज पर्वणी स्वातंत्र्याची ! "
( २-१०-४२ )

अथवा--

"जाउ नको परतून मरणा,
जाउ नको परतून !
राग तुला का येई माझा,
होई उशिर म्हणून ? "
( ७-१-४२ )

या काहीशा गंभीर कविता मनात घोळत असताना मधेच एक मिस्किल कविता डोकावून गेली

" मी गेल्यावर, मी मेल्यावर
कोण म्हणतील ? काय म्हणतील ?
कोण काय विचार करतील ?
खर म्हणजे,
कुणी काही म्हणणार नाही,
कुणी विचार करणार नाही,
आणि म्हणून,
'आप मुवे पीछे डुब गयी दुनिया'
हे कबीरवचनच सत्य ठरेल !"
(२६-९-५६)

परंतु या साऱ्या कविता काहीशा अपरिपक्व, भावविवश मनःस्थितील स्फुरलेल्या आहेत त्या मानान २१ मार्च १९६० रोजी स्फुरलेली 'मृत्यू माझा जीवनसाथी' ही कविता अधिक परिपक्व म्हणता येईल त्यामुळ घाटातला प्रवास सुरू झाल्यावर थोड्याच वेळात तिन माझ्या मनाचा कब्जा घेतला :

" जन्मापासून मरणापर्यंत,
मृत्यूच माझा खरा साथी !
आई गेली, वडील गेले,
बहीण-भाऊ दूर झाले,
बायको-पोराशी नाही पटले,

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८९०
दा. क्र. २४२३२
२६/७/०
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

पण माझ्या त्या मित्राने
मला कधीच नाही सोडले
सुखात आणि दु:खात,
एकांतात, समूहात,
उभा होता पाठीशी
द्रौपदीच्या सख्याप्रमाणे
जेव्हा कधी स्मरण होई
दत्त म्हणून उभा राही
भीती कधी वाटली नाही
स्वप्नातही मला त्याची.
आणि आज आता येथे
आयुष्याच्या सायंकाळी
आठवतो आहे मला
माझा तो जीवनसखा——
जो विसरला नाही कधी
मला क्षणभर चुकूनही !
हे धन, ही संपत्ती,
हे शरीर, ही दीप्ती,
मुले—बाळे, त्यांची प्रीती
सर्व काही पडून राहील
या असह्य धरतीवरती !
येईल माझ्या सगे फक्त
माझा लाडका मित्र मृत्यू !

माझ्या कवितांमधे प्रामुख्यान मरणासंबंधीच्याच कविता जास्त असाव्यात, हे एखाद्या मानसिक विकृतीच तर लक्षण नसेल ? तस असण्याची शक्यता मी नाकारीत नाही कारण मृत्यूच्या विचारान मला आनंदाच्या परमोत्कट क्षणीही कधी सोडल नाही खर म्हणजे रस्त्यान जाताना मृत्यूचे विचार मनात यायच काहीच कारण नाही. पण तसे ते माझ्या मनात नेहेमीच येत राहिले आहेत आपण अपघातात सापडल्यावर, चिरडून खलास झाल्यावर, आपल्या माग काय-काय घटना घडतील याचीच चित्र रेखाटण्यात मी गुग होऊन जातो सुदैवान त्या अवस्थेत कधी खरोखरीच भयंकर अपघात झाला नाही

आजही राहून—राहून मनात विचार येत होता चालकाच किंचित दुर्लक्ष झाल तर पाच-सहा हजार फूट खोल दरीत आपली ही डबडी गाडी एका क्षणात पार तळाशी जाऊन पोचेल किंबहुना तळापर्यंत ती पोचणारच नाही त्याआधीच

तिचे (आणि आमचेही तुकडेतुकडे होऊन जातील मग आमच्या मुलाना आमची प्रेतही ओळखू येणार नाहीत किंबहुना त्यांना बातमी कळून ती इथ येण्यापूर्वीच आमच्या छिन्नविच्छिन्न शरीराची वासलात लागलेली असेल कोल्हयाकुत्र्याच्या तावडीतून ती सुटली तर अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडणार !

बहुधा यामुळेच की काय, सरकारनं ज्या गमतीदार पाट्या वाहनचालकांन सावध करण्यासाठी जागजागी लावल्या आहेत, त्यांमधे ' नजर हटी, दुर्घटना घटी ' ही पाटी सर्वत्र लावलेली दिसते अर्थात स्वतःच्या तद्रीत असणारे चालक या पाट्या वाचीत असतील की नाही याविषयी मला शकाच आहे !

माझ्या मनात नेहेमी एक विचार येतो आपल्या जवळच्या लोकाना सांगून ठेवाव, ' मी मरताना माझ्या कानांवर सैगलच्या ' बाबुल मोरा नैहर छूटो जाय ' या गीताचे सूर पडतील अशी व्यवस्था करा ' त्या अमर भैरवीचे सूर कानात घुमवीत इहलोकाचा निरोप घ्यावा एवढीच इच्छा तेच माझ श्राद्ध आणि तेच तर्पण ! माझा स्वर्ग आणि मोक्षही त्यातच सामावला आहे पण या प्रवासात सौभाग्यवतीजवळ हे बोलण्याची सोय नाही एक तर तिला ते सहन होणार नाही, आणि दुसर अस की ते सूर ऐकवायला ती तरी कुठ जागेवर असणार ?

बाकी सौभाग्यवती या बाबतीत फार सुखी आहे मोटारीत बसल्याबरोबर ती पेगू लागते. शिवाय बुटकी असल्यान रौद्रभीषण दऱ्याच भयकर स्वरूप तिच्या नजरेला पडत नाही, अथवा रस्त्याच्या अवघडपणाची तिला कल्पनाही येत नाही त्यामुळ ती निश्चिंत असते परतु तिच्या या निर्धास्तपणाच कारण वेगळच असल्याच मला आढळून आल दऱ्या, डोंगर आणि मृत्यू याविषयी बायकामधे चर्चा चालली असताना ती सांगत होती, " हे बरोबर असताना त्यांच्यासह मला मरण आल तर त्यापेक्षा जास्त आनददायक गोष्ट दुसरी कोणती असणार ? ही सहमरणाची सधी कुणालाही हेवा वाटण्यासारखीच आहे. माझ सार मनासारख झालय मुल-नातवड मजेत आहेत त्यांच सर्वांच छान चाललय त्यामुळ कसलीच इच्छा-आकांक्षा उरलेली नाही तृप्त मनान मी मरणाला सामोरी जाईन ! "

अशा प्रकारे तिन भारतीय सतीसाध्वींच्या पारपरिक भूमिकेतून आपला प्रश्न सोडवून टाकलाय पण मला मात्र सारख वाटतय की, तिला इतक्या लौकर मरण येऊ नये तिच शरीर दुबळ झाल असल तरी तिची जिजीविषा अजून खूपच प्रबळ आहे ससारात तिला रस आहे आणखी काही वर्षं तरी तिला सुखान जगता आल पाहिजे

हे सारे विचार मनात घोळत असताना एक वेगळाच विचार मनात चमकून गेला पुण्या–मुबईत एखाद्या भिकार आडदांड ट्रकखाली किंवा बसखाली चिरडून मरण्याऐवजी किंवा रिक्शा–स्कूटरन धडक देऊन पाडल्यामुळ जायबदी होऊन पडण्याऐवजी असं डोंगरावरून दरीत कोसळून मरण लाखपटीन बर नव्हे काय ?

आणि मग वाटल, गाडी कोसळणारच असेल तर ती उगीच भिकारड्या उंचीवरून न पडता किमान दहा हजार फुटांवरून तरी कोसळावी भव्यभीषणतेत तेवढीच भर!

बद्रीकेदारच्या यात्रेत अनेक प्रयाग भेटतात जिथ नद्यांचा सगम होतो त्या स्थानाला 'प्रयाग' अस म्हणतात केदारनाथाच्या मार्गावर प्रथम भेटतो इद्रप्रयाग व्यासघाट नावाच्या ठिकाणी नयार (नवर्तलका) नदी गगेला येऊन मिळते तशी ही नयार नदी अगदीच सामान्य आहे. पण या स्थानाच धार्मिक माहात्म्य मोठ आहे. वृत्रासुराकडून पराभूत झाल्यावर देवराज इद्रान इथ येऊन शकराची आराधना केली होती त्या वेळी शकरान प्रसन्न होऊन इद्राला वर दिला आणि त्याच्या सामर्थ्यावर इद्रान वृत्रासुराचा पराभव केला तेव्हापासून या स्थानाला इद्रप्रयाग हे नाव प्राप्त झाल

दुपारी साडेअकराच्या सुमारास आम्ही देवप्रयागला पोचलो. इथपर्यंत सोबतीला गगा होती या ठिकाणी भागीरथी व अलकनदा यांचा सगम होतो आणि अलकनदेला 'गगा' हे नामाभिधान प्राप्त होत थोड्या अतरापर्यंत भागीरथी साबत करते पण तिच काही वैशिष्टच मनात ठसत नाही आपण गगा आणि भागीरथी ही समानदर्शक किंवा पर्यायवाची नाव समजतो त्या दोन वेगवेगळ्या नद्या असल्याच आपल्यापैकी फार थोड्याना माहीत असत भागीरथी ओलांडल्यावर अलकनदा आपली सोबत करू लागते, ती थेट रुद्रप्रयागपर्यंत! वाटेत श्रीनगर-(गढवाल)च्या अलीकडे कीर्तिनगरजवळ अलकनदेवरील नवा झुलता पूल पाहिला त्याच्या शेजारी नदीच्या विशाल पात्रात हृदयाच्या आकाराच शुभ्र वाळूच बेट मोठ मनोहर दिसत अलकनदा ज्या प्रदेशातून म्हणजे बद्रीनाथाच्या बाजून वाहात येते, तिथली माती शाडूसारखी पांढरी आहे त्यामुळ तिच्या पात्रातली वाळू व दगडही पांढरेच दिसतात गगा गोरी आणि यमुना सावळी दिसते याच कारणही हेच त्यामुळ अलकनदा हीच मूळ गगा असावी अस वाटत गोरी-गोबरी अलकनदा मोठी लडिवाळ आहे श्रीमत व उदार आईबापांची लाडात वाढलेली खानदानी अलसकन्याच जणू ती कशी नखरेलपणान रमतगमत चालते तिचा तो लाडिकपणा कुणालाही मुग्ध करील असाच आहे तिच पात्र चागल विस्तृत असून त्याला खोलीही भरपूर आहे किनारे उच असल्यान हिच्या काठी शेती क्वचितच दिसते 'क्लासेस' (उच्च वर्गीया)च प्रतिनिधित्व करणाऱ्या नदीला 'मासेस' (निम्नवर्गीया)शी जवळीक कशी आवडणार?

हरिद्वार ते बद्रीनाथ (३२० कि. मी) या मार्गावर अगदी मधोमध (१६० कि मी वर) रुद्रप्रयाग येत या ठिकाणी मदाकिनी व अलकनदा यांचा सगम होतो इथून एक रस्ता उत्तरेला मदाकिनीच्या काठाकाठान केदारनाथला जातो, तर दुसरा रस्ता ईशान्येला (उत्तर-पूर्वेला) अलकनदेच्या काठाकाठान बद्रीनाथला जातो आम्हाला प्रथम केदारनाथला जायच होत एका दृष्टीन ते योग्यही होत.

कारण केदारनाथला शेवटपर्यंत वाहन जाऊ शकत नाही शेवटचे सात मैल खूप उंच चढावही लागत माणूस ताजतवान असतानाच ही यात्रा उरकून घेण चांगल.

त्याप्रमाण आम्ही मदाकिनीच्या काठान प्रवास सुरू केला अलकनंदेहून सर्वस्वी भिन्न अशी ही नदी आहे कृश बांध्याची, काळीसावळी, फुसफुसणाऱ्या नागिणीसारखी, चैतन्याची मूर्तिमत धाराच ! हिच पाणी काळभोर आहे ज्या प्रदेशातून म्हणजे केदारनाथाच्या बाजून ती वाहात येते, तियली माती काळी असावी तिच्या पात्रात रेती फारशी दिसत नाही बहुधा सारखा उतार असल्या-मुळ रेती तयार व्हायला वावच नसावा लहानमोठे दगडगोटे मात्र भरपूर दिस-तात गरीब परतु स्वाभिमानी आईबापाची तेजस्वी कन्या, अस तिच रूप मनात एक वेगळीच प्रतिमा निर्माण करत तिला स्थैर्य, सथपणा जणू माहीतच नसावा क्षणाक्षणाला ती उसळत, फेसाळत उड्या मारीत धावत असते. तिची ती फेसाळ सळसळ पहाणाऱ्याच्या मनात जरबही बसवते आणि त्याचबरोबर मोहिनीही घालते गमतीची गोष्ट अशी की, ही लोकमाता (किंबहुना तिला लोकमाता म्हणण्या-ऐवजी लोकसखीच म्हणण अधिक योग्य होईल ! ) अशी अवखळपणे उड्या मारीत धावत असली तरी तिचे किनारे फारसे उंच नाहीत त्यामुळ दोन्ही काठावर भर-पूर शेती होते भाताची हिरवी–पिवळी रोप कशी डौलात डोलत होती तिची गरी-बाशी, शेतकऱ्याशी जवळीक असल्याचं ते प्रत्यक्ष प्रमाणच समजल पाहिजे ही अगदी थेट केदारनाथापर्यंत आपली सोबत करते तिचा कलकल निनाद कानात सतत घुमत रहातो कधी तो रौद्ररूप धारण करून कान बधिरही करून टाकतो पण ती आपली, सामान्य जनतेची मैत्रीण आहे, ही भावना मात्र सतत जागृत रहाते

श्रीनगरला आम्ही एक वाजताच पोचलो, आणि गाडीत बसल्याबसल्याच बरोबर आणलेल जेवण उरकून घेतल अर्ध्या तासात तो कार्यक्रम आटोपून दीड वाजता तिथून पुढ रवाना झालो श्रीनगर हे या भागातल महत्त्वाच आणि मोठ शहर एके काळी ही सयुक्त गढवाल सस्थानाची राजधानी होती इथून २५ कि मी-वर उत्यासू (Utyasu) या ठिकाणी अलकनदेवर एक प्रचड धरण बांधून विद्युत्निर्मिती करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्याची पूर्वतयारी चालू असलेली दिसली

रुद्रप्रयाग (उंची १९८० फूट)ला न थाबता आम्ही सरळ कदारनाथाच्या दिशेन निघालो या ठिकाणी अलकनदा व मदाकिनी याचा सगम होतो सगमाच्या काठावर रुद्रनाथाच मदिर आहे इथ सस्कृत विद्यालय, कॉलेज व इस्पितळ असून हे विद्येच केंद्र समजल जात इथून अलकनदा नजरेआड होऊन मदाकिनी आपली सोबत करू लागते वाटेत अगस्तमुनी या नावाच एक मोठं गाव लागत नावातल्या वेगळेपणामुळ ते लक्षात राहिल आजकाल त्याला विजयनगर असही म्हटल जात खर म्हणजे 'अगस्त्य' किंवा 'अगस्ति' अस लिहिल–बोलल पाहिजे. पण जनसामा-

त्यांच्या जिभेला एवढा अवघड उच्चार झेपत नसावा. त्यावरून मनात विचार आला ज्यांना अगस्तीची कथा माहीत नाही अशा नव्या पिढीच्या लोकांना 'अगस्त' (हिंदीत ऑगस्टला अगस्त असं म्हणतात ) साहेबानच हे नगर वसवलं असाव आणि मग जनतेन त्याला 'मुनी' हा किताब बहाल केला असावा (मोक्ष मुल्लर ऋषीप्रमाण ! ) अस वाटू लागल तर नवल नाही.

वाटेत एके ठिकाणी पाणचक्की पहायला मिळाली डोंगरातून वाहात येणाऱ्या जोरदार प्रवाहाच्या ओढ्यासारख्या झऱ्यावर ती वसवलेली होती दगडाच मोठ जात प्रवाहाच्या जोरान फिरत रहात त्याच्यावर एका वेळी मणभर गहू राहील एवढ पत्र्याच घमेल होत एवढा गहू दळून व्हायला सहज आठ–दहा तास लागतात त्यामुळ एकदा घमेल्यात गहू टाकले की गिरणीवाला आपली इतर काम करायला मोकळा होतो तिथ कुणालाच हजर रहाव लागत नाही कुत्र्यानी किंवा गुराढोरांनी पीठ खाऊ नये म्हणून राखण काय ती करायची तिथल्या राखणदाराला विचारल, " हे पीठ दळून द्यायला मालक कोणत्या दरान पैसे घेतो ?" तो म्हणाला, "साहेब, इथ पैशाचा हिशेब चालत नाही मणभर गहू दळून दिला की त्यातला पाच किलो आटा मालक घेतो तीच मजुरी " अशा पाणचक्क्या नदीच्या प्रवाहावरही चालतात अस समजल

या मार्गावर गुप्तकाशी हे एक महत्त्वाच ठिकाण आहे मोठ टुमदार, देखण गाव आहे डोंगराच्या उतरणावर असलेला नाटनटका घर, पायऱ्या–पायऱ्याची हिरवीगार शेत, भाजीपाल्याच्या परसबागा, यामुळ हे गाव विशेष मनात भरल आणि स्मरणात राहून गेल या भागात भोपळा आणि दुध्या याच उत्पादन भरमसाट होत असाव. एके ठिकाणी रस्त्याच्या कडेला असलेल्या वेलीवर लटकलेला छोटा भोपळा रस्त्यावरच बसलेला पाहून गमत वाटली तो चोरून न्यावा असं कुणाच्या मनातही आल नसाव (या भागात चोऱ्या होत नाहीत, कारण लोक फार अल्पसंतुष्ट आहेत चोराना मोह व्हावा अस फारस काही लोकाजवळ नसत शिवाय प्रदेश इतका डोंगराळ आहे, की चोराला पकडण सहज शक्य होत ! ) जागजागी भोपळ्यांचे मोठमोठे ढीग लागलेले पाहून भगिनीवर्गाच्या तोंडाला पाणी सुटत होत काशीचा विश्वेश्वर इथ गुप्तरूपान वास करतो, म्हणून हिला गुप्तकाशी किंवा गुह्य वाराणसी ' अस म्हणतात सन्यस्त वृत्तीच्या शंकराला ही मोह पडावा अस हे ठिकाण नक्कीच आहे या प्रवासात इथच फक्त केळीचं झाड पहायला मिळाली या ठिकाणी विश्वेश्वराच मदिर व काशीप्रमाण मणिकर्णिका नावाच कुड आहे त्यात गोमुखातून ज्या जलधारा पडतात त्या यमुना व गगा आहेत अस लोक समजतात हे गाव म्हणजे पड्याच केंद्र केदारनाथचे पडे इथ असतात आमच्याबरोबर हृषीकेशपासून असलेला पडा इथलाच रहाणारा आहे मी स्वत भिक्षुक घराण्यातला असल्यामुळ भिक्षुकाच्या नव्या पिढीची काय स्थिती आहे, याची मला

चागली कल्पना आहे आता भिक्षुकीचा व्यवसाय करायला कुणी तयारच होत नाही त्यात प्राप्ती भरपूर असली तरी त्याला प्रतिष्ठा नाही भिक्षुकीचा व्यवसाय करणाऱ्या तरुणाशी लग्न करायला गरीब ब्राह्मणांच्याही मुली तयार होत नाहीत हे सार माहीत असल्यामुळ मी आमच्या पड्याला विचारल, "तुमच्याकडे काय परिस्थिती आहे ? तुमच्या मुलापैकी कुणी या धद्यात पडलाय का?" यावर तो म्हणाला, "नाही बाबूजी आमची मुल या धद्यात यायला तयार नाहीत. शाळा–कॉलेजच शिक्षण घेऊन कसली तरी नोकरी मिळवायची, याच्याच माग ती लागलेली आहेत" एकूण भटाबामणांची दुर्दशा सगळीकडे सारखीच आहे !

गुप्तकाशीनतर फाटा नावाची चट्टी (पडाव) लागली फाटा हा खास मराठी शब्द इथ कसा आला असेल कोण जाणे पश्चिम–महाराष्ट्रात आणि विशेषत कोकणात जागोजागी असे फाटे आहेत त्याच अर्थान तो शब्द इथं वापरला जातो किंवा काय ते कळल नाही हिदी भाषेत नसलेला हा शब्द कानावर पडल्यामुळ तो लक्षात राहिला, एवढच याआधी लागलेल्या व्यूगमल्ला व व्यूगतल्ला या नावाच्या चट्टयाही अशाच विचित्र उच्चारामुळ लक्षात राहिल्या.

सायकाळी साडेपाचच्या सुमारास रामपूर गावाजवळ आमची गाडी पुन्हा एकदा बद पडली चोहो बाजूनी उच–उच डोंगरानी वेढल गेल्यामुळ हिमालयात सूर्यास्त लवकर होतो आणि अधाराच साम्राज्य सुरू होत. त्यामुळ गाडी बद पडताच भावी सकटाच्या आशकेन हृदय धडधडू लागल यंत्राच्या पाइपमधून तेल बाहेर येऊ लागल होत ते थाबवण भाग होत गाडीचे दिवे चालत नव्हते. त्यामुळ अधार पडण्यापूर्वी कोणत्याही परिस्थितीत मुक्कामावर जाऊन पोचण आवश्यक होत पण आता काय करणार ? गाडी थांबली आणि ड्रायव्हर–क्लीनर दुरुस्तीत गढून गेले एव्हाना आम्ही पाच हजार फुटावर येऊन पोचलो होतो. थडीची चाहूल जाणवू लागली होती पण ती असह्य झालेली नव्हती. अखेर तासभर यत्राशी झटापट करून बाहेर येणार तेल मालकान थांबवल आणि गाडी सुरू केली इथून गौरीकुड फक्त पाचसहा मैल दूर राहिल होत पण मुक्काम गाठण्यापेक्षा सर्वांना आपापला जीव प्यारा होता त्यामुळ कसंबस धडपडत, चाचपडत दीड–दोन मैलांवरील सीतापूर गाडीन गाठल आणि किट्ट काळोख पडला म्हणून इथच मुक्काम करायच ठरवल हा दोन मैलांचा प्रवास करताना ब्रह्माड आठवल रस्त्याच्या कडेला असलेल्या एका घरात आम्ही उतरलो थडीमुळ घराबाहेर पडायची हिंमत होत नव्हती कढी व खिचडीच गरमगरम झणझणीत भोजन करून झोपी गेलो

☐

**केदारनाथ.**

२५–९–८०

पहाटे चारलाच उठून सकाळचे विधी उरकले आणि पाच वाजता निघालो

दोन मैलावरील सोनप्रयागला पावणेसहाला पोचलो या ठिकाणी सोनगगा नावाची लहानशी नदी मदाकिनीला येऊन मिळते, म्हणून या स्थानाला सोनप्रयाग हे नाव मिळाल आहे ही सोनगगा किंवा सोनानदी म्हणजे एक ओढाच आहे पण भक्ताना इथ प्रयाग हवा होता म्हणून त्यानी त्या ओढ्यालाच गगा बनवल 'नाव सोनुबाई आणि हाती कथलाचा वाळा' ही म्हण या ठिकाणी अगदी सार्थ झालेली दिसली. काही वर्षांपूर्वी इथपर्यंतच मोटार येऊ शकत असे इथून केदारनाथपर्यंत १९ कि मी (१२ मैल) पायी जाव लागे रस्ता नवा नि अधिक अवघड असल्यामुळ सध्या इथ चेकपोस्ट आहे इथून सकाळी सहापूर्वी आणि सायकाळी सहानतर पुढ जाता येत नाही म्हणून आम्हाला पधरा मिनिट वाट पहात थाबाव लागल तिथून सहा वाजता निघून दोन–तीन मैलावरच्या गौरीकुडला आम्ही पावणेसात वाजता पोचलो इथ गौरीकुड नावाच एक कुड आहे त्यातल्या कोमट पाण्याचा रग अधूनमधून बदलत असतो अस म्हणतात गौरी (पार्वती) या कुडात स्नान करीत असे, अस सागतात मात्र सध्या तिथ कुणी अघोळ करीत नाही आम्ही पाहिल तेव्हा त्याच पाणी शेवाळलेल होत याच्या उलट त्याच्या जवळच असलेल्या तप्तकुडातल पाणी स्वच्छ, नितळ होत ते इतक गरम होत, की त्यातून वाफ निघत होती परतु बहुधा अनेक स्त्रीपुरुष त्यात स्नान करीत असल्यामुळ ते सुसह्य झाल होत कदाचित बाहेर कडाक्याची थडी असल्यामुळ ते गधकयुक्त पाणी आम्हाला असह्य वाटल नसाव गधकाचा अश फारच थोडा असल्यामुळ अशा गरम कुडात बराच वेळ स्नान केल्यानतर घेरी वगैरे येते, तशी आम्हाला आली नाही हिमालयातली ही गरम पाण्याची कुड किंवा उन्हाळी (उष्ण पाण्याचे झरे) म्हणजे निसर्गाचा एक चमत्कारच असतो शेकडो–हजारो वर्षांपासून बर्फाचा सहवास असूनही त्यांच्या पाण्यातली उष्णता थोडीही कमी झालेली नाही.

तप्तकुडातल स्नान उरकल्यावर ओले कपडे आणि हातातल जड सामान तिथच ठेवून आम्ही केदारनाथासाठी प्रस्थान केल गौरीकुड हा केदारनाथच्या यात्रेतला शेवटचा पडाव किंवा मुक्कामाच स्थान! इथून सात मैल अतरावर नि सुमारे साडेपाच हजार फूट उचीवर केदारनाथ आहे (गौरीकुडाची उची सहा हजार फूट, तर केदारनाथाची साडेअकरा हजार फूट आहे )

गौरीकुडाहून केदारनाथला जाऊन येण्यासाठी अशक्त माणसाकरिता डाडी (दडी), कडी (टोपली) व घोडा ही तीन साधन असतात दडीला २५० रुपये, कडीला १२५ रुपये व घोड्याला १५० रुपये अदाजे खर्च येतो सौभाग्यवतीला डोंगर चढून जाण शक्य नसल्यामुळ सुरुवातीपासूनच दडीसाठी तिच नाव मी नोंदवत आलो होतो हृषीकेशहून दडी वगैरे ठरवण्यासाठी कपनीचा माणूस पुढ आला तेव्हाही नाव नोंदवणाऱ्यांमध्ये माझा क्रमांक पहिला होता त्यामुळ गौरीकुडाहून

जेव्हा दड्या, कड्या नि घोडे निघाले तेव्हा प्रथम सौभाग्यवतीला कडी मिळेल अशी माझी अपेक्षा होती परतु झाल भलतच दड्या–कड्या येताच चलाख मड-ळींनी त्या भराभर आपल्या ताब्यात घेतल्या आणि सौभाग्यवती मात्र असहायपणे ते पहात राहिली मी प्रथमच पायी निघून आलो होतो त्यामुळ मला याची काहीच कल्पना आली नाही. मी तिथ हजर असतो तर हा अन्याय होऊ दिला नसता बराच पुढ आल्यावर मी सौभाग्यवतीच्या दडीची वाट बघत थांबलो. वस्तुतः पायी चालणाऱ्यापेक्षा हे दडी–कडीवाले नेहेमीच्या सरावामुळ फार झपझप डोंगर चढ-तात त्यामुळ ते मला लौकरच गाठतील अशी माझी अपेक्षा होती पण मी एक तासभर चालून गेलो तरी सौभाग्यवतीची दडी दिसेना. मला काळजी वाटू लागली अखेर दोनअडीच तासानी तिची दडी आली, तेव्हा सगळा प्रकार समजला सगळ्या दड्या निघून गेल्यावर मोठ्या मुष्किलीन, जणू मेहेरबानी केल्याप्रमाण तिला सचालकानी दडी मिळवून दिली त्याच्या त्या बेशिस्त कारभाराची नि बेजबाबदार वृत्तीची मला फार चीड आली त्यांच्या बेफिकीरपणाचा मला अधूनमधून राग येतच होता पण स्वत च्या भडकपणाला मी आवर घातला होता आजचा अन्याय मात्र अगदी असह्य झाला आणि मी सचालकांची चागलीच खरडपट्टी काढली परतु ते गृहस्थ इतके मख्ख व मठ्ठ, की त्याना मी कशाबद्दल तक्रार करतोय तेच कळेना ! ते मला पुन्हापुन्हा विचारीत होते, ' अखेर दडी मिळाली ना ? माग तर रहाव लागल नाही ना ?" असल्या मठ्ठ माणसावर उखडल्याबद्दल मग माझ मलाच हसू आल कसबस मुक्कामाला पोचण आणि तिथून सहीसलामत घरी परत येण एवढच ध्येय उराशी बाळगून यात्रेत सामील झालेल्या लोकानाही माझा राग अनाठायीच वाटला असावा ! या कपनीच्या सचालकाच्या जागी राजा पाटील असते तर त्यांनी नाव नोंदवलेल्या लोकाना त्यांच्या क्रमाप्रमाण दड्या–कड्या–घोडे देऊन, आयत्या वेळी नाव दिलेल्या लोकाची सर्वात शेवटी सोय केली असती पण आमचे सचालक नुसते मख्खपणे सारा प्रकार पहात राहिले

या वाहनाच्या भाड्याच्या बाबतीतही असाच सावळा गोंधळ झाला दडी हे पालखीसारख चार माणसानी वाहून न्यायच वाहन असत त्या वाहकाना प्रत्येकी ६० रुपये मिळतात म्हणजे दडीचा खर्च २४०रुपय येण रास्त होत परतु आमच्या-कडून प्रत्यक्षात ३२५ रुपये घेण्यात आले हे जादा ८५ रुपये दडी मिळवून देणारा एजट व कपनीचा माणूस यांच्यात वाटले जातात जेव्हा यात्रेचा मोसम असतो नि दडी मिळायला अडचण पडते तेव्हा हा भुर्दंड क्षम्य समजता येईल परतु आजकाल मुळीच गर्दी नाही त्यामुळ या भुर्दंडाला शोषणाखेरीज दुसर नाव देता येत नाही शिवाय या कामासाठी कपनीला वेगळी रक्कम द्यावी लागण याचा अर्थ कपनीच्या जबाबदारीतून तिला मोकळ करण्यासारख आहे. यात्रा कपनीच्या मूळ सकल्पनेशी हे मेळ खात नाही त्याचा सरळसरळ अर्थ हा होतो की यात्रेच्या ठिकाणी यात्रे-

करूंची जी लुबाडणूक होते तिच्यात हे कंपनीवालेही आपले हात धुऊन घेतात हे कोणत्याही परिस्थितीत क्षम्य ठरत नाही.

काही मंडळींनी कंपनीच्या नादाला न लागता स्वतंत्रपणे वाहन ठरवली आणि त्यांना ती खूप स्वस्तात मिळाली. माणसाच्या श्रमाचा त्याला योग्य मोबदला मिळ-ण्याच्या दृष्टीनं हे अन्यायाचंच म्हटलं पाहिजे. परंतु हे वाहनवाले गर्दीच्या काळात यात्रेकरूंची कोंडी करून जी लुबाडणूक करतात ती लक्षात घेतल्यास या अन्याया-विरुद्ध तक्रार करण्यात फारसा अर्थ उरत नाही.

तरीपण मनात असा विचार येऊन गेला की, या वाहनवाल्यांनी आपली पद्धत-शीर संघटना बनवून आपल्या मेहेनतीचा योग्य मोबदला मिळवण्याचा प्रयत्न केला पाहिजे, आणि सरकारनंही आपली जबाबदारी ओळखून वाहनवाले व यात्रेकरू या दोघानाही योग्य न्याय मिळेल, कोणावरही अन्याय होणार नाही, अशी खबरदारी घेतली पाहिजे. आमच्याकडून घेण्यात आलेला जादा आकार श्रमिकांना मिळाला असता तर आम्हाला आनंदच झाला असता

गौरीकुंडहून मी आठ वाजता निघालो आणि चार मैलांवर असलेल्या रामबाडा या पडावावर बारा वाजता पोचलो. सौभाग्यवतीच्या दंडीची वाट पहाण्यात वेळ गेला नसता तर बहुधा अकरा वाजताच पोचलो असतो मी माझ्या नेहेमीच्या चालीनं, झपाझप चाललो त्यामुळं बरोबरचे लोक खूप मागं राहिले परंतु अशा ठिकाणी भरभर चालण्याऐवजी हळूहळू चालणंच अती उपकारक ठरतं याचा अर्थ, हळू चालणारेच माझ्यापेक्षा अधिक शहाणे होते अर्थात एरव्हीही डोंगर चढताना आपसात बोलणं मला आवडत नाही तोंडची वाफ वाया गेल्यानं लौकर थकवा येतो हे एक कारण, आणि आपल्या चिंतनात व्यत्यय येतो हे दुसरं कारण आपल्याच मस्तीत डोंगर चढण्यामधे एक खास गंमत असते.

सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीनं हा प्रदेश मोठा रम्य आहे सर्वत्र हिरवेगार वृक्ष ध्यानात मग्न झालेल्या ऋषीसारखे भासतात पशु-पक्ष्यांची चाहूल ऐकू येत नाही सारं कसं शांतशांत असतं या निःस्तब्धतेची ही एक जादू असते त्या जादूत आपलं मन हरवून जातं आणि आपण किती चढून आलो याचं भान उरत नाही सखी मंदाकिनी आपल्या सोबतीला असते कारण केदारनाथाजवळच्याच एका हिमसरो-वरातून तिचा उगम झालेला आहे खडकाळ प्रदेशातून वाहात असल्यामुळं तिचा कलकल-निनाद मेंदूला गुंगी आणतो वाटेत एके ठिकाणी नदीच्या पात्रात सुमारे शंभर फूट लांबीची आणि पन्नास फूट उंचीची एक प्रचंड शिळा आडवी पडली होती ती पाहून मला कासे (डहाणू तालुका) गावाजवळच्या सूर्या नदीवरील भीमबांध ची आठवण झाली या शिळेच्या तोंडाशी एक प्रचंड धबधबा निर्माण झाला आहे या ठिकाणी इतके धबधबे आहेत, की नुसतं पहात-ऐकतच रहावंसं वाटतं पन्नास फुटापासून पाच फुटापर्यंत उंची असलेले असंख्य धबधबे ! प्रत्ये-

काचा आवाज वेगळा पण त्याच्या एकत्रित कल्लोळातून एक कर्णमधुर स्वरमेळ (ऑर्केस्ट्रा) तयार झाला आहे तो वाद्यवृंद पाहिल्या–ऐकल्यानंतर पाश्चात्य पद्धतीच्या वाद्यवृंदाचा धांगडधिंगा जास्तच कर्णकटू व अप्रेक्षणीय वाटू लागतो हा झाला दरीतला परिसर डोंगराच्या बाजून तस प्रेक्षणीय काही सहसा नसत. पण अधूनमधून वरच्या कड्यावरून कोसळणारा व रस्त्यातून आडवा वाहणारा एखादा धबधबा चटकन लक्ष वेधून घेतो

थोड्याच वेळात रविकिरणांनी आपला प्रभाव दाखवायला सुरुवात केली. थंडी कुठल्या कुठ पार पळाली आणि उन्हाच्या चटक्यानी अग भाजू लागल अंगातले गरम कपडे एकेक करून काढून टाकले तरीही उन्हाचा कडाका सुसह्य होईना सुदैवान डोंगराच्या बाजूला दाट झाडी असल्यामुळ आणि या रस्त्यावर डोंगराच्या बाजून चालण अधिक सुरक्षित असल्यामुळं त्या वृक्षाच्या सावलीतून चालायला मी सुरुवात केली उन्हाळयाच्या दिवसात आपण रायगड चढत आहोत असाच भास होऊ लागला गमतीची गोष्ट अशी की एवढा चढाव असूनही माझे पाय दुखले नाहीत पण पाठ मात्र दुखू लागली. गरजेच्या वस्तू असलेला झोला खांद्यावर असल्यामुळंही कदाचित पाठ दुखली असेल. जसजसा मी उंचावर जाऊ लागलो तसतशी धापही लागू लागली. तस पाहिल्यास सात–आठ हजार फूट ही काही फार मोठी उंची नव्हे परंतु समुद्रसपाटीवर वावरणाऱ्या शरीराला तीच जास्त वाटली असावी. त्यामुळ वारवार विश्रांतीसाठी थांबाव लागल

अखेर एकदाची सौभाग्यवतीची दंडी आली चार माणसाच्या खांद्यावर बसलेल्या अवस्थेत तिच एक छायाचित्र घेण्यासाठी मी माझा कॅमेरा सरसावला. त्याबरोबर दंडीवाले भडकले बहुधा कुणीतरी परपुरुष आपल्या खांद्यावरील गरती बाईच छायाचित्र टिपायचा प्रयत्न करतोय, अशी त्यांची समजूत झाली असावी. मी त्यांना परोपरीन समजावायचा प्रयत्न करू लागलो की, "बाबानो, मी कुणी परका इसम नसून या बाईचा नवराच आहे" पण आमच्या रंगा–रूपातील फरकामुळ, असल्या रुबाबदार बाईचा फडतूस नवरा असूच कसा शकतो या कल्पनेन ते न थांबता तसेच सुसाट पुढ चालले म्हणून मग मी तिच्या दंडीच मागूनच छायाचित्र घेतल त्या चित्रात नकळत एक ऐटदार पहाडी बकरा आल्यामुळ ते छायाचित्र त्या बकऱ्याचच ठरल, हा भाग वेगळा ! थोडा वेळ त्यांच्याबरोबर चालल्यावर मी खरोखरीच त्यांच्या मालकीणबाईचा यजमान असल्याची त्यांची खात्री पटली, आणि त्यानी आपल्या खांद्यावर दंडी असलेल्या स्थितीत छायाचित्र घेण्याची मला परवानगी दिली प्रथम माझा असा समज झाला की त्या लोकाना फोटो घेऊ देण्यासाठी माझ्याकडून काही दक्षिणा हवी असावी कारण 'आम्ही आपला फोटो काढू देणार नाही' अस म्हणून दंडी खाली ठेवून ते दूर उभे राहिले. पण नंतर

समजल की इतर दडीवाल्याप्रमाण त्यानी सौभाग्यवतीला बक्षिसीसाठी मुळीच त्रास दिला नव्हता यामुळ आपला समज चुकीचा असल्याचं माझ्या लक्षात आल

शिवाय माझ्याजवळचा पानतबाखू दिल्यानतर तर त्याच्याशी माझी चांगलीच गट्टी जमली तांबूलाऐवजी माझ्याजवळ बिडी असती तर ही गट्टी अधिक घनिष्ट बनली असती कारण या भागात पान–तबाखूचा प्रचार मुळीच नाही. उलट थडीमुळ धूम्रपानाचा रिवाज मात्र खूपच आहे.

'जगलचट्टी' या पडावावर थोडी विश्राती घेऊन चार मैलावरील रामवाडा या ठिकाणी आम्ही उभयता बारा वाजता पोचलो तिथ थोडी न्याहरी करून साडेबाराला पुढ रवाना झालो उरलेले तीन मैल आपण तीन तासांत सहज चढून जाऊ आणि दिवसाउजेडी केदारनाथाला पोचू अस वाटत होत म्हणून मी भरभर चालायला सुरुवात केली पण इतक्यात आकाश ढगानी भरून आल आणि चागला जोरदार पाऊस पडणार अशी लक्षण दिसू लागली या दिवसात रोज दुपारनतर न चुकता इकडे पाऊस पडतो, म्हणून शहाणे लोक गौरीकुडाहून भल्या पहाटे निघून मध्यान्हीपूर्वीच केदारनाथाला पोचतात अस समजल काल रात्री सीतापूरला अडकून पडण्याऐवजी आम्ही गौरीकुडाला ठरल्याप्रमाण मुक्काम करू शकलो असतो तर पावसाआधी नक्कीच इथ पोचलो असतो

आता काय करायच ? पाऊस पडला तर रेनकोटाच ओझ अंगावर वाहवीत चिखला–पाण्यातून वर चढाव लागणार केव्हा कुठ पाय घसरेल ते सांगता यायच नाही म्हणून मग मी घोडा करायच ठरवल रामवाडा हा महत्त्वाचा पडाव असल्यान इथ घोडे मिळतात फक्त पचवीस रुपयात वर जाण्यासाठी घोडा मिळाला. रामवाड्यानतर 'घिर्नूर पानी' ही चट्टी जवळच आहे पण तिथ आम्ही थाबलो नाही त्यानतर 'गरुडचट्टी' लागते तिथ घोड्याला विश्राती देण्यासाठी थोडा वेळ थाबलो घोड्यावर बसणही तस मोठ सुखदायक नसत सवय नसल्यानं गुडघे इतके भरून आले की त्यापेक्षा पायी चाललो असतो तर बर झाल असत, असा विचार मनात येऊन गेला केदारनाथाच मदिर दीड मैलाच्या टप्प्यात येईपर्यंत प्रवास चागला झाला त्यानतर मात्र निसर्गाची लहर फिरली, आणि एकदम आकाश भरून येऊन पाऊस पडू लागला थोडा वेळ तो सुखकरही वाटला मला अचानक गुरुदेव रवींद्रनाथाची प्रख्यात कविता आठवली 'बिष्टि पडे टापुर टुपुर !' ( टप्-टप् पाऊस पडतो ) त्या कवितेच्या प्रारभी वर्णन केल्यासारखीच परिस्थिती प्रत्यक्षात होती

'दिनेर आलो निबे एल, सूज्जि डोबे डोबे ।
आकाश घिरे मेघ जुटेछे चाँदेर लोभे लोभे ॥
मेघेर उपर मेघ करेछे, रङेर उपर रङ ।
मदिरेते काँसर घटा बाजल ठङ् टङ् ॥

.. ..

बादला हावाय मने पडे छेले बेलार गान—
बिष्टि पडे टापुर टुपुर, नदेय एल बान ॥ '

(दिवसाचा प्रकाश मंद झालाय सूर्य मावळू पहातोय आकाश मेघानी व्यापून टाकलय जणू ते चंद्राला घेरू पहात आहेत ढगावर ढग चढताहेत, रगांवर रग चढताहेत देवळातील काशाची घंटा ठणठण वाजली या पावसाळी हवेमुळ लहानपणच एक गाण आठवतय 'पाऊस पडतो टप्–टप्, नदीला आला पूर ')

म्हणजे आपण लहानपणी 'ये रे ये रे पावसा, तुला देतो पैसा' हे गाण म्हणत होतो, तसच हे बंगाली लोकगीत असाव. रवींद्रनाथाच्या काव्यातील शब्दसौष्ठव, निसर्गसौंदर्य, नादमाधुर्य यात मी सहज गुग होऊन गेलो असतो पण हां हा म्हणता पावसाचा सपाटा वाढला हवेतला गारठाही भयकर वाढला पावसाचा प्रत्येक टपोरा थेंब झिणझिण्या उठवू लागला काही लोकावर तर गाराचाही मारा झाला थोडयाच वेळात घोडयाचा लगाम धरलेले हात थडीन बधिर होऊ लागले अंगावर रेनकोट होता, पण तो त्या गडबडीत केव्हातरी फाटला आणि अंगावरील सुती व लोकरीच्या कपडयांना भेदून ते बर्फाच पाणी शरीराला स्पर्श करू लागल अशी हुडहुडी भरली की सारं ब्रह्मांड आठवल गतवर्षी काश्मीरमधे खिलनमर्गहून परत येताना असाच गाराचा मारा सहन करावा लागला होता परतु त्या वेळी हवा खूपच उष्ण होती. त्यामुळ अंगात फारसे कपडे नसूनही विशेष थडी वाजली नव्हती पण आज त्याच्या उलट स्थिती होती दुपारचे तीन–साडेतीन वाजले होते पण सध्याकाळचे सात वाजले असावेत असा भास होत होता अचानक मला जाणवल की काव्याचा सदर्भही कसा स्थल–काल–हवामानाशी सबद्ध असतो समुद्रापासून जवळ असलेल्या सपाट मैदानावर उकाडयाच्या दिवसात जो 'टापुर टुपुर' पाऊस स्वर्गसुखाचा आनद देतो, तोच पावसाची रिमझिम आडेअकरा हजार फूट उचीवरील हिमालयात जीवघेणी ठरते तस पाहिल तर हा पाऊस फार जोराचाही नव्हता अथवा फार वेळही लागला नव्हता जेमतेम अर्धापाऊण तास तो चालू असावा पण जणू आपण तासन् तास बर्फाच्या माऱ्यात कुडकुडत अडकलो आहोत अस वाटत होत सौभाग्यवतीजवळ छत्री होती यामळ ती सुरक्षित राहिली असावी अशी माझी समजूत होती पण नतर समजल की छत्रीच्या पागोळ्यानीच ती चिंब भिजून गेली ! एकेकाच नशीब ! ज्यांच्याजवळ उत्तम रेनकोट व इतर कपडे होते त्याचीही पावसाच्या माऱ्यातून सुटका झाली नाही त्यामुळ आपला रेनकोट फाटल्याबद्दलचं माझ दु:ख थोड कमी झाल !

हवा उत्तम होती तोपर्यंत घोडेवाल्याशी गप्पागोष्टी चांगल्या रगल्या त्या सुखसवादात जेव्हा त्यान आपल्याला सात मुल असल्याच सागितल तेव्हा मी त्याला म्हणालो, "तुमच्या या भागात कुटुबनियोजनाच्या प्रचाराच वार अजून फिरकलच

नाही की काय ? एवढ मोठ कुटुंब पोसण त्रासदायक असत अस तुला वाटत नाही काय ?" यावर त्याच उत्तर मोठ मर्मभेदक होत तो म्हणाला, "साहेब, आमची सगळी मुल काम करून ससाराला हातभार लावतात, किंवा त्याचे पटल नाही तर घरातून निघून जातात त्यामुळ कुटुंबावर त्याच ओझ पडतच नाही आता माझच उदाहरण घ्या माझ्या मुलांपैकी एकजण शेती करतो, दुसरा म्हशी पाळतो, तिसरा शेळयामेंढयाची राखण करतो. एकाच शिवणकामाच दुकान आहे जावई सैन्यात आहे हा घोडेवाला ठाकुर (क्षत्रिय) जातीचा असून तो गुप्तकाशीत रहातो मी त्याला विचारल, "तू आपल्या मुलाना शाळेत पाठवल नाहीस काय ?' त्यान सांगितल, "साहेब, सगळयाना शाळेत घातल पण शिकण्यात त्याच लक्ष लागत नाही आठवी–नववीपर्यंत शिकून शाळा सोडतात आणि कुठ चपराश्याची नोकरी मिळेल काय म्हणून धडपड करतात पण चपराश्याच्या नोकरीसाठीही अधिकाऱ्याना भरपूर लाच द्यावी लागते ती आम्हा गरीबांना परवडत नाही आता एक मुलगा सस्कृत शाळेत शिकतोय त्याच मन लागल तर तो शिकून मास्तरबिस्तर होईल नाहीतर इतर भावांप्रमाणच कामाला लागेल " "हे घोडेवाल्याच काम करायला तुझी मुल तयार होत नाहीत काय ?" मी विचारल यावर तो उत्तरला, "साहेब, आता या घोडयाच आयुष्य तरी किती उरलय ? जेमतेम पाच–दहा वर्षं! गौरीकुंडापासून केदारनाथापर्यंत मोटाररस्ता तयार करायच काम सुरू झालच आहे. ते पुर झाल की आम्हालाही 'हरी हरी' म्हणत घरी बसाव लागणार हृषीकेशपर्यंतच मोटार–रस्ता होता तोपर्यंत हजारो दंडी–कंडी–घोडेवाले सुखान दोन घास खाऊ शकत होते तुमच्या मोटारींनी आमच्या पोटावर पाय आणले शिवाय दिवसेंदिवस घोडेही महाग होत चाललेत हे तट्टू गतवर्षीच विकत घेतल पाच हजार रुपये पडले आमचा मोसम जेमतेम सहा महिन्यांचा असतो या अवधीत एका घोडयामाग सरासरीन पाच हजार रुपये मिळतात त्यांतले निम्मे घोडयांच्या खुराकासाठी खर्च होतात घोडा विकत घेण्यासाठी सावकाराकडून काढलेल्या कर्जाची आणि त्याच्या व्याजाची फेड करण्यापायी हजार–बाराशे उडून जातात म्हणजे आम्हाला उरतात बाराशे रुपये त्यावर वर्षभर कुटुंब चालवायच ! म्हणून मुल या धंद्यात पडायला तयार नाहीत त्यांचही बरोबरच आहे म्हणा ! शहरात पट्टेवाल्याची नोकरी किंवा हमाली करूनही यापेक्षा जास्त पैसे मिळतात '

दंडी–कंडी–घोडवाले प्रत्येक पडावावर विश्रांतीसाठी थांबतात, आणि आपल्या उतारूकडून चहापाण्यासाठी घोडयाला गूळ देण्यासाठी वगैरे निमित्त सांगून जादा बक्षिसी काढतात काही मंडळीकडून अशा पद्धतीन पचवीस–तीस रुपये उकळण्यात आल्याच समजल सुदैवान सौभाग्यवतींचे दंडीवाले असे त्रासदायक नव्हते त्यानी येता-जाता दहा रुपयात समाधान मानल. मी तर घोडेवाल्याला एक रुपयाच जादा दिला !

त्या घोडेवाल्याचं ते एकूण तर्कशास्त्र व अर्थशास्त्र त्या वेळी तरी मला अकाट्य, बिनतोड वाटलं घोडेवाल्याचा धंदा तसा थोडा अधिक खर्चाचा, भांडवलाची जरूर असणारा त्या मानानं दंडी–कंडीवाल्यांना एवढ्या भांडवलाची गरज नसते पण त्यांना गिऱ्हाइकही थोडीच मिळतात— दंडी महाग म्हणून आणि कंडी गैरसोयीची म्हणून ! कंडी ही वेताच्या खुर्चीसारखी मोठीशी टोपली असते तिच्यात यात्रेकरूला पाय बाहेर सोडण्याची सोय असते. कंडीवाला यात्रेकरूसकट ती टोपली पाठीवर घेतो आणि तिच्या दोऱ्या आपल्या कमरेला व डोकीला बांधतो यामुळं कंडी झोकांड्या खात नाही मात्र कंडीत बसणाऱ्याचं तोंड उलट्या दिशेला असतं आणि नजर आकाशाकडे लागलेली असते आपण कुठून कुठं चाललो आहोत, सभोवताली कसा रमणीय निसर्ग पसरलेला आहे, याचा काहीच थांगपत्ता त्याला लागत नाही चुकून दरीचं दर्शन झालं तर, आपण कंडीवाल्यासकट दरीत कोसळणार तर नाही ना अशी एक विचित्र भीती कंडीतल्या व्यक्तीला वाटत असते !

"आ पहुँचे साब हम !" घोडेवाला उद्गारला पावसाच्या रिपरिपीत मी चष्म्यावरील पाणी पुसत डोळे फाडून समोर पाहिलं (आतापर्यंत पावसाच्या माऱ्या-पासून बचाव व्हावा म्हणून मी मान खाली घालून घोड्यावरून चाललो होतो !) एक मोठं, विशाल मैदान समोर पसरलेलं होतं आतापर्यंतच्या प्रवासात एवढं मोठं मैदान पहायलाच मिळालं नव्हतं भूगोलात पाठ केलेलं पठार ते हेच साडेअकरा हजार फूट उंचीवरचं पठार झाडाझुडुपाचा मागमूस नसलेलं, नाममात्र गवत उग-वलेलं इथून केदारनाथपुरीचं आणि केदारनाथाच्या मंदिराच्या शिखराचं प्रथम दर्शन घडतं म्हणून या मैदानाला किंवा पठाराला 'देवदेखनी' म्हणतात हिमा-लयाच्या बर्फाच्छादित शिखरांचं दर्शनही प्रथम इथंच घडलं इथून पुरीपर्यंतचं अंतर दोन–तीन फर्लांग तरी असावं हा सपाट रस्ता तरी नीट करायला काय हरकत होती ? तेवढाच घोड्यांना आराम मिळाला असता पण उलट या पठारावरचा रस्ता इतका वाईट आहे, की त्यापेक्षा डोंगरचढणीचा रस्ता अधिक बरा म्हणायचा दगड–गोटे आणि चिखल याची रेलचेल आहे उतार नसल्यानं पावसाचं पाणी वाहून न जाता चिखल निर्माण करतं

आतापर्यंत सोबतीला असणारी मंदाकिनी आपल्याला सामोरी येते. तिचा उगम इथून जवळच एका हिमसरोवरात होतो तिच्यावरील पूल ओलांडून आपण केदारपुरीच्या आवारात प्रवेश करतो तत्पूर्वी सरस्वती व मंदाकिनी यांचा संगम पहायला मिळतो त्याच्या काठावर संगमेश्वर (महादेव) व गंगामाई यांची छोटी देवळं आहेत

केदारनाथपुरीत घोड्यावरून प्रवेश करता येत नाही म्हणून पुरीच्या वेशीवरच त्यानं मला सोडलं. परत जाताना मला घोड्याची गरज लागणार नव्हती म्हणून त्याचं भाडं देऊन मी त्याला निरोप दिला. आमच्या उतरण्याची

सोय कुठ'केलीय याची काहीच सूचना आधी मिळालेली नसल्यान मुक्कामाचं ठिकाण शोधण्यापायी मला पावसात इकडेतिकडे भटकाव लागल अखेर एकदाच ते सापडल. एका खवदाडातल्या जुनाट घरात आमची सोय करण्यात आली आहे इथ सडास-बाथरूमची काहीच सोय नाही थोड्या अतरावर सार्वजनिक शौचकूप आहेत, तेवढीच समाधानाची बाब ! या तथाकथित धर्मशाळेत दोन-तीन खोल्या व एक दिवाणखाना (म्हणजे मोठी खोली) आम्हाला मिळाला आहे धर्मशाळेतर्फे एका रात्रीसाठी प्रत्येकी एक रुपया भाड्यान रजया मिळाल्या आहेत पण त्या इतक्या गार पडल्या आहेत, की त्या भिजलेल्या असाव्यात असंच वाटत मी दिवाणखान्यातच अथरूण पसरल अगावरचे ओले कपडे काढून दोरीवर सुकत टाकले (ते वाळण्याची लक्षण मुळीच दिसत नाहीत ! ) आणि कोरडे कपडे अगात घालून, परवाच खरेदी केलेले गरम रग पांघरून मी गप्पगार पडून राहिलो सार अग थडीन एवढ गारठून गेल होत की काही केल्या ऊब म्हणून येईना सौभाग्य-वतीची स्थिती तर माझ्यापेक्षा दयनीय झालेली तिच सार अगच बर्फासारख थडगार पडलय रबराच्या पिशवीत गरम पाणी घेऊन ती अग शेकू लागली एवढ्यात समजल की मधुभाऊ रानडे अगदीच गार पडत चाललेत. म्हणून तिन आपली गरम पाण्याची पिशवी मधुभाऊंच्या पत्नीला दिली आणि आपण कुडकुडत पडून राहिली बिजलीबाई आपल्या अस्तित्वाची नोद करून ज्या गडप झाल्या त्या पुन्हा दिसल्याच नाहीत इथ नेहेमीच वीज जाते अस समजल (परतु मदिरातील लखलखीत विद्युद्दीप पाहिल्यावर, दोष विजेचा नसून धर्मशाळावाल्याची ती नेहेमीची काटकसर असावी हे लक्षात आल ! ) तसा दिव्यामुळ काही फार फायदा होतो अस नाही पण झगझगीत विद्युत्प्रकाशामुळ थोडीफार ऊब आल्याचा भास मात्र नक्की होतो. तेवढही सुख यात्रेकरूना देण्याची धर्मशाळावाल्याची इच्छा नसावी

दोन तास अथरुणात पडल्यावर ऊब जरी मिळाली नाही तरी थकवा गेला. म्हणून सायकाळी सहा वाजता होणाऱ्या केदारनाथाच्या आरतीला मी गेलो आता पाऊस थांबला असला तरी थडी खूपच होती म्हणून सौभाग्यवतीन बाहेर न पडण्याच ठरवल त्यामुळ काही फारस बिघडलही नाही

केदारनाथपुरी हे पन्नास-साठ घराच, डोगराच्या उतरणीवर वसलेल लहानस गावच आहे फरक एवढाच की हे गाव फक्त सहा महिने जाग (की जागेवर ? ) असत दिवाळीच्या पाडव्याला केदारनाथाची शेवटची पूजा होऊन मदिराची दार बद झाली की ती अक्षय्य-तृतीयेला उघडली जाईपर्यंत देऊळ आणि गाव बर्फाखाली दडलेल असत इथली उत्सवमूर्ती (किंवा चल, जगम मूर्ती) खाली उखीमठ य ठिकाणी नेण्यात येते दार बद करण्यापूर्वी सहा महिने एक मोठा दगडी नदादीप तेवत राहील एवढ्या तुपाची व्यवस्था करून ठेवलेली असते या दिव्याच्या वरच्या

बाजूस एक मोठी टाकी तुपाने भरून ठेवतात. या दिव्याच्या उष्णतेने या टाकीतल तूप पातळ होऊन थोडथोडे दिव्यात पडत रहाते आणि दिवा अखंड तेवत रहातो. सहा महिन्यानंतर त्या नंदादीपाच्या ज्योतीचं प्रथम दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक यात्रेकरू अक्षय्य-तृतीयेला इथं गोळा होतात.

देवळासमोर प्रशस्त दगडी रस्ता असून त्याच्या दोन्ही बाजूंना लहानमोठी घरं आहेत. आधुनिक पद्धतीची हॉटेलं इथं नाहीत. पुरीभाजी, मिठाई, पूजेचं साहित्य, लोकरी कपडे यांची दुकानं, टपाल व तारखात्याची कचेरी (डाकघर) वगैरे आहेत. जमिनीपासून सुमारे दोन पुरुष (सुमारे बारा फूट) उंचीवर केदार-नाथाचं मंदिर आहे. मोठ्या दगडी चौथऱ्यावर ते उभारलेलं आहे. वर जाण्यासाठी प्रशस्त पायऱ्या आहेत. त्या पायऱ्या चढून गेल्यावर चांगलं मोठं फरसबंदी पटांगण लागतं. महाद्वारासमोर कमरेइतक्या उंचीचा एक लहानसा चबुतरा असून त्यावर सुरेख, घाटदार दगडी नंदी आहे. नंदीच्या मागील बाजूस एक प्रचंड घंटा लोखंडी खांबाच्या आधाराने टांगलेली आहे.

या पटांगणासमोर आणखी एका दोनअडीच फूट उंचीच्या चौथऱ्यावर मंदिर आहे. हिमालयातल्या देवळातील मूठभर मोठ्या चिरेबंदी देवळात याची गणना होते. घडीव दगडांची सफाई सहज नजरेत भरते. महाद्वाराच्या दोन्ही बाजूस द्वारपाळांच्या भव्य मूर्ती आहेत. दरवाज्यावर महिरपदार कमानी आणि नक्षीदार जाळ्या वगैरे आहेत. मंदिरात प्रवेश करताना उजव्या हाताला गणपतीची दगडी मूर्ती आहे. केदारनाथाची पूजा करण्यापूर्वी या गणपतीची यथासांग पूजा करण्याची प्रथा आहे. दरवाज्यात एक अतिप्रचंड त्रिशूळ शंकराचं प्रतिनिधित्व करीत असतो.

मंदिराचा गाभारा लहानसा, एखाद्या खोलीएवढा आहे. त्याच्या पुढं असलेला सभामंडप दोन दालनांचा आहे. त्याच्या भिंतींत कमरेइतक्या उंचीवर पाच पांडव, द्रौपदी, कुंती, पार्वती, लक्ष्मी वगैरे देवतांच्या दगडी मूर्ती आहेत. दालनाच्या मध्य-भागी एक लहानसा नंदी आहे. गाभाऱ्यात केदारनाथाचं लिंग आहे. नेहेमीप्रमाणं शाळुंका व शिवलिंग अशा स्वरूपात ते नसून त्याच्या जागी त्रिकोणी आकाराची नुसती एक ओबडधोबड शिळाच आहे. या लिंगाच्या तळाचा घेर दहा-बारा हातांचा असून उंची सुमारे दोन हात आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी केदारनाथ हे एक स्वयंभू शिवलिंग आहे. सौराष्ट्रातील सोमनाथ, उज्जयिनीचा महाकालेश्वर, काशीचा विश्वनाथ व वेरूळचा घृष्णेश्वर ही चारच ज्योतिर्लिंगं मी आजवर पाहिली होती. त्यात या पाचव्याची आज भर पडली. ओंकारमांधाताचा ओंकारेश्वर (ओंकार अमलेश्वर), परळीचा वैजनाथ, पुण्याजवळचा भीमाशंकर, नाशिकचा त्र्यंबकेश्वर, आंध्रातील श्रीशैलमल्लिकार्जुन, मराठवाड्यातील औंढ्या नागनाथ आणि तमिळ-नाडूतील रामेश्वर हे सात अजून राहिले आहेत. वस्तुतः ह्यापैकी काही इतके जवळ आहेत, की थोडीफार श्रद्धा असती तर त्यांचं दर्शन कधीच घडून गेलं असतं.

सायकाळी मी गेलो तेव्हा केदारनाथावर मुखवटा ठेवून पूजा बाधण्यात आली होती त्यामुळ मूळ शिवलिंग मला दिसलच नाही आरतीही यथातथाच वाटली बहुधा थडीमुळ सगळे गारठून गेले असावेत

शकराच्या किंवा महादेवाच्या पिंडीवर अभिषेकपात्र असायच आणि त्यातून पाण्याची सततधार पिंडीवर पडत असायची, हे आपल्या नित्य परिचयाच दृश्य आहे अमृतमथनाच्या वेळी निर्माण झालेल हालाहल विषप्राशन करणाऱ्या शिवाच्या शरीराचा दाह शमण्यासाठी ही सोय असण उचितच ठरत पण इथ मात्र ते दृश्य दिसत नाही बहुधा सहा महिने बर्फाच्या ढिगाऱ्याखाली आणि नतर बर्फाच्या सान्निध्यात रहाव लागल्यान त्याला थड पाण्याची गरज भासत नसावी त्यामुळ पाण्याऐवजी तुपाचा लेप —— शकराच्या अगात उष्णता निर्माण करण्यासाठी ——प्रचलित झाला असावा केदारनाथाला पाण्याचा अभिषेक केला जात नाही अथवा लिंगावर पाणीही घातलं जात नाही त्याऐवजी लिंगावर यथाशक्ती तूप थापायच आणि त्याला छाती टेकवून भेटायच किंवा नुसता माथा टेकवायचा

ही अशी प्रथा का प्रचलित झाली असावी याचा थोडासा उलगडा या देव-स्थानाच्या निर्मितीशी सबधित पुराणकथेवरून होऊ शकतो अस सागतात की आपल्या हातून घडलेल्या भ्रातृहत्येच्या पातकापासून मुक्ती मिळावी म्हणून पाडव-मडळी राज्यत्याग करून हिमालयात तपश्चर्येला गेली होती [२] त्या वेळी ती केदारनाथाच्या दर्शनासाठी इथ आली असता या भ्रातृहत्या करणाऱ्यांचा स्पर्श आप-ल्याला होऊ नये म्हणून केदारनाथान महिषाच (रेड्याच) रूप घेतल आणि शिंगांच्या बाजून तो पृथ्वीच्या पोटात शिरू लागला त्याची ती क्लृप्ती पांडवांच्या लक्षात येताच भीमान धावत जाऊन त्या रेड्याच्या शरीराचा मागला अर्धा भाग घट्ट पकडून ठेवला त्याबरोबर त्यांची भक्ती पाहून शकरान त्याना दर्शन दिल आणि त्या गोत्रहत्येच्या पापातून त्याची मुक्तता केली शकराच्या (म्हणजेच त्या रेड्याच्या) शरीराचा जो पुढचा तोंडाचा भाग जमिनीत घुसला होता तो नेपाळात बाहेर आला त्यालाच पुढ पशुपतिनाथ हे नाव प्राप्त झाल अशा प्रकारे हे दोन भाग मिळून सपूर्ण शिवलिंग बनत, अशीही समजूत आहे त्यामुळ केदारनाथाची यात्रा पशुपतिनाथाच्या दर्शनानच पुरी होते. या महिषाच्या शरीरातील नाभीजव-ळचा भाग केदारनाथाला, बाहु तुगनाथाला, तोंड रुद्रनाथाला, नाभी मध्यमहे-श्वराला आणि जटा कल्पेश्वराला आहेत अस समजल जात या सर्वांना मिळून पच-

---

२. आपल्या हातून घडलेल्या ब्रह्महत्येच्या पापाच प्रायश्चित्त घेण्यासाठी (रामान ज्याची हत्या केली तो रावण ब्राह्मण होता) रामही सीता, लक्ष्मण, भरत वगैरेना बरोबर घेऊन या ठिकाणी आला होता अस म्हणतात ब्रह्महत्या —— मग ती कितीही दुष्ट ब्राह्मणाची का असेना—— हे पापच आहे, अस ठसवण्यासाठी ही कथा प्रचलित केली गेली असण्याची शक्यता नाकारता येत नाही

केदार अस म्हणतात (यात पशुपतिनाथाचा समावेश नाही. तिथ मग कोणता अवयव गेला ?) पचकेदारातील इतर चार स्थान इथून जवळपासच आहेत शकराच्या अस्तित्वाच प्रतीक म्हणून जी शिळा माग उरली तिची पूजा करून पाडवानी तिला तुपाचा लेप लावला आणि तिला आलिगन दिल म्हणून त्यानतर तीच प्रथा रूढ झाली परिणामत या देवळात सर्वत्र तुपाचा सडा पडलेला असतो दिवेही तुपाचेच असतात अर्थात आजकाल बहुधा तूप दुर्मिळ असल्यान त्याऐवजी वनस्पती तूपच लोक वापरीत असणार हे उघड आहे

रात्री मला जोराचा ताप आला पाठही खूप दुखली सौभाग्यवती जवळच झोपली होती तिला माझ्या तप्त शरीराची थोडीबहुत ऊब मिळाली असावी !

☐

गौरीकुंड

२६–९–८०.

सकाळी उठलो तर सार वातावरण पार बदलून गेल्याच आढळल पाऊस किवा ढग याचा मागमूस नव्हता जणू काल त्यानी आम्हाला छळलच नव्हत ! आकाश पूर्ण निरभ्र, निळशार दिसत होत हवेत गुलाबी गारवा होता आमच्या धर्मशाळेच्या मागील बाजूस असणाऱ्या पर्वतावरील बर्फ सूर्यकिरणात चमचमत होत पांढऱ्याशुभ्र चादीचा रसच जणू ! थोड्याच वेळात उन्ह इतक कडक झाल की उकडू लागल अगातील गरम कपडे काढून टाकावेत अस वाटू लागल कालचा थकवा कुठल्या कुठ पळून गेला होता तरी पण मला धर्मकृत्य करायची नसल्यान मी स्नानाची गोळीच घेतली आणि पुन्हा मदिराकडे गेलो

सौ. माणिकबाई तशा धार्मिक वृत्तीच्या असल्या तरी इथल्या भटजीचा अडाणीपणा व भाविकांना लुबाडण्याची त्याची वृत्ती लक्षात आल्यामुळ त्यांनी आपण काही धार्मिक कृत्य करायची नाहीत असा निर्णय घेतला होता परतु नतर त्यांच्या मनात असा विचार आला की आपला थोरला मुलगा शिवभक्त आहे इजीनियर असून व तीनदा युरोपची वारी करून आल्यावरही तो निष्ठेन सोमवारचा उपवास करतो (किबहुना पॅरिस–लडन–कोपनहेगनलाही त्यान सोमवारचा कडक उपास मोडला नव्हता !) तेव्हा त्याला बर वाटाव म्हणून आपण त्याच्या वतीन केदारनाथाची यथासाग पूजा करायच त्यांनी ठरवल त्यासाठी त्यानी स्नानही केल भटजीला सव्वाएकतीस रुपये दक्षिणा दिली शिवाय गणपतीची आणि केदारनाथाची प्रत्यक्ष पूजा करताना पावणेनऊ रुपये तिथ ठेवले. म्हणजे एकूण चाळीस रुपये चिरजिवासाठी तिन खर्च केले पूजेसाठी तिला दीड तास रागेत उभ रहाव लागल एरव्ही चागल्या जागेवर दहा मिनिट उभ रहाव लागल तर तिचे पाय मोडून येतात, गुडघे भयकर दुखू लागतात. परतु या देव-

ळात गार फरशीवर सतत दीड तास उभं राहिल्यावरही आपले पाय थोडेही दुखले नाहीत असं जेव्हा तिनं मला सांगितलं तेव्हा मी आश्चर्यानं थक्क झालो श्रद्धेचं (आणि तीही दुसऱ्याच्या वतीनं स्वीकारलेली श्रद्धा !) हे सामर्थ्य अद्भुत तर खरंच !

पूजेला आवश्यक असणारं साहित्य एका दुकानातून आम्ही विकत घेतलं बारीक–बारीक जंगली फुलं, खोबरं, सुकामेवा (खारीक, बेदाणा), मिठाई (बत्तासा, साखरफुटाणे), चण्याची डाळ, फुलवात, वस्त्र (पिवळ्या कापडाचा एक तुकडा) वगैरे वस्तू त्यात होत्या भटजीमहाराजांनी आम्हाला दाखवलेलं ब्रह्मकमळ[३] नावाचं, केदारनाथाच्या खास पसंतीचं फूल मात्र त्यात नव्हतं बहुधा त्याचा मोसम नसल्या-मुळं किंवा ते अधिक महाग असल्यामुळं त्याचा समावेश त्या थाळीत करण्यात आला नसावा या भागात बेलाची झाडं नसूनही एक बिल्वपत्र (त्रिदळ) ही त्यात होतं ही आश्चर्याची गोष्ट हृषीकेशहून अधूनमधून बेल आणण्याची व्यवस्था केली जात असावी, किंवा निर्माल्यातील बेलच पुन्हा विक्रीसाठी दुकानात येत असावा ! काही खास भक्तांनी सोन्या–चांदीची बिल्वपत्रं पूजेसाठी आणली होती

केदारनाथाच्या मंदिराच्या जवळपास 'अमृतकुंड', 'हंसकुंड', 'रेतकुंड', 'उदककुंड' वगैरे लहानमोठी कुंडं आहेत त्यात मला विशेष स्वारस्य नसल्यानं मी फक्त जवळच असलेली श्रीमत् आद्य शंकराचार्यांची समाधी पहायला गेलो तिथं कुणीच नव्हतं भक्तही नव्हते आणि बडवेही नव्हते ! शंकराचार्यांनीच केदारनाथाचं मंदिर बांधलं आणि त्यांनी या ठिकाणी आपली अवतारलीला संपवली असा समज आहे. परंतु या दोन्ही गोष्टी वादग्रस्त आहेत. त्याला काही ऐतिहासिक आधार नाही. समाधी तर अगदीच नवीन व सामान्य आहे नुसती एक छोटीशी खोली आणि तिच्यात आचार्यांची एक संगमरवरी मूर्ती ! शंकराचार्यांनी कैलास पर्वतावर जाऊन समाधी घेतली असा एक समज आहे. परंतु तो कैलास येथून खूपच दूर आहे केदारनाथाच्या मंदिराच्या मागील बाजूस बर्फाच्छादित असे जे पर्वत दिसतात त्यांपैकी एक कैलास असल्याचं सांगतात ते खरही असेल पण त्या पर्वतात विलीन झालेल्या शंकराचार्यांची समाधी इथं कशी असणार ? यात्रेकरूंचाही या गोष्टीवर फारसा विश्वास नसावा असं त्यांच्या तिथल्या अनुपस्थितीवरून मला वाटलं

---

३ इथून जवळच असलेल्या कैलास नावाच्या ज्या सरोवरातून मंदाकिनी उगम पावते त्यात उन्हाळ्यामध्ये (भाद्रपद-सप्टेंबरात) कमळं फुलतात ती नीलकमलं असतात ती केदारनाथाला फार प्रिय असल्यानं त्यांना ब्रह्मकमळ असं नाव पडलं असावं आजकाल ताजी कमळं दिसत नाहीत. परंतु. देवाला वाहिलेली व प्रसाद म्हणून भक्तांना मिळालेली अशी काही ब्रह्मकमळं आम्हाला पहायला मिळाली

इथून जवळच भैरवझाप किंवा भृगुपात नावाच एक ठिकाण एका उच्च कड्यावर आहे. तिथून खाली उडी टाकून आत्महत्या केली म्हणजे मोक्ष मिळतो, एवढच नव्हे तर आत्महत्येच पाप लागत नाही व पुढील जन्मी अतृप्त वासना पुऱ्या होतात, अस समजल जात पूर्वी इथून खूप लोक आत्महत्या करीत परतु ब्रिटिश राजवटीत या प्रकाराला कायद्यानच बदी घातली गेल्यामुळ हा भयकर प्रकार आपोआपच थांबला. इग्रजानी भारतीयावर नकळत केलेल्या काही उपकारापैकी हा एक म्हणायचा !

मध्यान्हीच्या पावसाची आपत्ती कोसळण्यापूर्वीच खाली उतरण शहाणपणाच होत म्हणून आम्ही जेवण उरकून सकाळी साडेअकरालाच केदारपुरीचा निरोप घेतला. निघण्यापूर्वी पुन्हा एकदा केदारनाथाच देखण, रुबाबदार मदिर आणि त्याच्या पार्श्वभूमीवर असलेल्या कैलासाची शिखर मनमुराद पाहून घेतली या शिखरांवरील बर्फ मला पिठीसाखरेसारख किंवा शुभ्र पिठासारख भासल (नरसोपत केळकरांना शिमल्याच बर्फ पाहून खिचडीवरील खोबऱ्याच्या किसाची आठवण झाली होती कदाचित शिमल्याच बर्फ त्या वेळी तस दिसत असेलही ! ) मात्र पुनःपुन्हा मनात विचार येत होता शरीरात ताकद आणि मनात उत्साह असता तर आपण नक्कीच या कैलासाच्या शिखरावर चढून गेलो असतो ! ती शिखर आपल्याकडे येण्यासाठी खुणावीत असल्याचा भास मला वारवार होत होता. त्याच्या त्या जादूभऱ्या आवाहनातून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी मी त्याच्याकडे पाठ फिरवून भरभर चालू लागलो

कालच्या चढाईन माड्या भरून आल्याची जाणीव होऊ लागली परतु ती वाहन करण्याची प्रेरणा देण्याइतकी तीव्र नव्हती शिवाय माझ्या डोक्यात एक वेगळच विचारचक्र चालू झाल होत अशा या दुर्गम ठिकाणी, वर्षातून सहा महिने बर्फाखाली दबून रहाणाऱ्या या अद्भुत स्थानाची तीर्थक्षेत्र म्हणून निवड कुणी केली असेल ? या जागेत त्या निवड करणाऱ्या व्यक्तीला अस कोणत वैशिष्ट्य, आकर्षण दिसल असेल ? अशा शिळा तिला सपूर्ण हिमालयात जागजागी दिसल्या असतील त्यांतून तिन याच शिळेची निवड का केली असेल ? ती इथून आणखी पुढ, उत्तरेला, अगदी कैलासाच्या गाभाऱ्यात का गेली नाही ? किंवा जिथ बर्फाचा त्रास होणार नाही अस अलीकडच, कमी उचीवरच स्थान तिन का निवडल नसेल ? काही लोकाना अस वाटत की हे मदिर पाडवानी बांधल होत परतु त्यालाही काही आधार नाही. आपल नाव माग रहाव (मरावे परी कीर्तिरूपे उरावे ) ही आकाक्षा जुन्या काळच्या लोकामध्ये नसल्यामुळच बहुधा मदिर बाधणाऱ्यान आपली नावनिशाणी मागे ठेवली नसावी

या सदर्भात आणखी एक उल्लेखनीय गोष्ट अशी की हिमालयातील व नेपाळातील प्रमुख मदिरांचे पुजारी दक्षिण-भारतीय असतात. ते वेगवेगळ्या

जातीचे आहेत उदाहरणार्थ, केदारनाथाचा मुख्य पुजारी किंवा महंत कर्नाटकातील लिंगायत पंथाचा असतो त्याला रावळ (रावल किंवा राऊळ) असं म्हणतात. एका दृष्टीनं पाहिल्यास हिंदूमधील शैव पंथ आणि लिंगायत पंथ यामध्ये पुष्कळच फरक आहे ब्राह्मण शैवाला लिंगायताचा स्पर्श सोवळ्यात चालणार नाही अशा स्थितीत या मंदिरात मठाधिपती म्हणून कन्नड लिंगायताची नियुक्ती कोणी व का केली असेल? कदाचित संपूर्ण भारताची धार्मिक एकात्मता ठसवण्यासाठी ही योजना एखाद्या दूरदर्शी हिंदु-संघटकानं केली असावी! केदारनाथाचं हिवाळ्यातील वसतिस्थान असलेल्या ऊखीमठ या ठिकाणी केदारनाथाचं एक सुबक मंदिर आहे. या लिंगायत रावळांजवळ भरपूर संपत्ती असून ते ऐषआरामात रहातात, असं म्हणतात

स्थानाच्या निवडीसंबंधीच्या प्रश्नाचं मला तरी एकच उत्तर सुचतं ते असं की, नदीच्या उगमाचा शोध घेतघेत जो कुणी पुरुष प्रथम या ठिकाणी आला असेल त्याला मंदाकिनीच्या उगमाजवळचं हे पठार खूप आवडलं असावं एकदा त्याच्या मनात ही जागा भरल्यानंतर त्यानं इथं दिसलेल्या एका शिळेला स्वयंभू शिवलिंग ठरवलं, आणि लोकांनीही ते मान्य केलं हिमालयातील निवांतपणामुळं या नगाधिराजाचं आकर्षण विरक्त वृत्तीच्या लोकांना नेहेमीच वाटत आलं आहे. त्यानाही हे स्थान आदर्श वाटलं असणार. नदीचं मूळ आणि ऋषीचं कूळ विचारू नये, अशी म्हण मराठीत आहे परंतु त्याच्याविषयीची जिज्ञासा मात्र प्रत्येकाच्या मनात असतेच ती जिज्ञासा पुरी करण्यासाठी संशोधकमंडळी नदीचा उगम शोधण्यासाठी अनेक प्रकारच्या संकटांना तोंड देत धैर्यानं तिच्या काठाकाठानं प्रवास करतात संपूर्ण उत्तर भारताला धनधान्यानं समृद्ध बनवणाऱ्या गंगेचा उगम शोधण्याची उत्सुकता आदिमानवाच्या काळापासूनच विद्यमान असली पाहिजे तो उगम शोधतशोधत माणसं रुद्रप्रयागपर्यंत आली मग एक तुकडी मंदाकिनीच्या काठानं केदारनाथपर्यंत आली आणि दुसरी तुकडी अलकनंदेच्या सोबतीनं बद्रीनाथापर्यंत गेली हा संशोधन-प्रवास कधी सुरू झाला असेल आणि कधी संपला असेल ते कोण सांगू शकणार? कारण त्या काळात आपल्या प्रवासाची नोंद करून ठेवण्याची प्रेरणाच कुणाला होत नसे

पाश्चात्यांप्रमाणं या संशोधनात राज्यतृष्णा किंवा सत्तापिपासा नव्हती. धार्मिक, आध्यात्मिक वृत्तीतूनच ते झालं असलं पाहिजे. कुणी सांगावं? काही निसर्गवेडे लोकही त्यात सामील झाले असावेत भूमी जिंकून तिच्यावर आधिपत्य गाजवावं असं इकडे काही नाही बहुधा त्यामुळंच मूर्तिभंजक मुस्लिम राज्यकर्त्यांची अथवा बाटवाबाटवी करणाऱ्या ख्रिस्ती मिशनऱ्यांची अधाशी, क्रूर नजर या मंदिरांकडे वळली नसावी आणि मंदिराचा विध्वंस किंवा मूर्तीची मोडतोड झाली नसावी निर्जन प्रदेश, नापीक डोंगराळ जमीन यामुळं आक्रमकांना या भूमीचं

आकर्षण वाटल नसाव तोही निसर्गाचाच उपकार म्हणावा लागेल त्यामुळे हा प्रदेश धार्मिक अत्याचारापासून मुक्त राहिला आता या नद्यावर धरण बांधून विद्युत्निर्मिती होईल, कालवेही काढले जातील त्यानतर याच काय स्वरूप राहील हे काळच ठरवील

केदारनाथपुरीहून साडेअकराला निघून मी रामबाड्याला दीड वाजता पोचलो वाटेत कुठही थांबलो नाही धाप तर मुळीच लागली नाही पाठीच दुखण थावून थोडा वेळ छातीत दुखू लागल पण तेही लौकरच थाबल गुडघे मात्र तक्रार करू लागले रामबाड्याला थोडी विश्रांती घेऊन निघालो आणि चार वाजता गौरीकुड गाठल शेवटीशेवटी काहीसा थकवा आला परतु घोडा न केल्या-बद्दल पश्चात्ताप मात्र झाला नाही आपल्या शरीरात किती सामर्थ्य आहे याची अशा वेळी आपल्याला कल्पना येते जातायेता एकूण अकरा मैल चालण झाल वर चढताना सात तास लागले, तर खाली उतरताना साडेचार तास लागले मनात विचार आला असला प्रवास म्हातारपणी करण्याऐवजी ऐन जवानीत केला पाहिजे किंबहुना नवविवाहित दांपत्यांनी मधुचद्रासाठीच या भागात याव !

या प्रवासात बगाली स्त्रीपुरुष मोठ्या सख्येन भेटले त्यात तरुण मडळीचा भरणा अधिक दिसला काश्मीरच्या प्रवासातही असाच अनुभव आला होता कदाचित दुर्गापूजेच्या सुटीमुळ अस घडत असाव तरी पण प्रवास व वाचन यांची आवड बगाली तरुणामध्ये इतरांपेक्षा जास्तच असावी अस दिसत काही तरुण-मडळी आपल्या वृद्ध मातापित्याच्या सोबतीसाठीही आली असावीत तेही शुभ-लक्षणच म्हटल पाहिजे कोणत्या का निमित्तान होईना, आपल्या या भारतभूमीच अगदी जवळून दर्शन प्रत्येकान घेतलच पाहिजे आपल्या देशाची नीट ओळख झाल्यावरच परदेशात जाव म्हणजे तिथल्या लोकानी भारताविषयी विचारलेल्या प्रश्नांना आत्मविश्वासान उत्तर देता येतील निदान ज्याला आपण आपला देश म्हणतो त्याची ओळख तरी अशा प्रवासान उत्तम प्रकारे होईल

इथ एका दुकानाच्या माडीवर आमच्या मुक्कामाची सोय करण्यात आली आहे खोल्या स्वच्छ असल्यान सडास-बाथरूमची गैरसोय विशेष खटकत नाही काही मंडळी गरम कुडात स्नान करून ताजीतवानी झाली माझे गुडघे व माड्या भयकर दुखत असल्यान कसलीही हालचाल करण्याची इच्छा होत नाहीय या यात्रेतला अवघड भाग सहीसलामत पार पडल्यामुळ सौभाग्यवतीही आनदात आहे आज दिवसभर हवाही मोठी प्रसन्न राहिली

□

महाराष्ट्र भवन,
बद्रीनाथ.

२७–९–८०

पहाटे तीनलाच उठलो आणि सकाळचे कार्यक्रम उरकून पाचला निघालो.

९० कि मी ( ६० मैल ) दूर असलेल्या रुद्रप्रयागला ९ वाजता पोचलो गेलेल्या रस्त्यानच परत यायच होत शिवाय येताना भरपूर उतार होता (रुद्रप्रयागची उची समुद्रसपाटीपासून फक्त २ हजार फूट आहे ) त्यामुळ ताशी २०–२५ कि मी. वेगान गाडी चालली असावी रुद्रप्रयागला सकण्टीच्या फराळाची न्याहरी करून सव्वानऊ वाजता निघालो आणि साडेदहाला २१ मैल दूर असलेल्या कर्ण-प्रयागला पोचलो या ठिकाणी कर्णगगा आणि अलकनदा यांचा सगम होतो कर्णगगेच दुसर नाव पिडर अस आहे अल्मोडा जिल्ह्यात नदाकोट (उची २२,५३० फूट) नावाच जे शिखर आहे त्याच्या पायथ्याशी (सुमारे १३ हजार फुटावर) पिडरी हिमप्रवाह (ग्लेशिअर) आहे त्यातून या नदीचा उगम होतो दानशूर कर्णान या ठिकाणी एक महायज्ञ केला होता म्हणून या स्थानाला कर्णप्रयाग हे नाव मिळाल, आणि पिडरच नाव कर्णगगा अस पडल तिथून १२ मैलावर असलेल्या नदप्रयागला आम्ही पाऊण तासात पोचलो या ठिकाणी मदाकिनी नदी अलकनदेला येऊन मिळते तिथून ७ मैलावर चमोली हे मोठ गाव लागत चमोलीला 'लाल सागा' असही म्हणतात सागा म्हणजे पूल इथला झुलता पूल लाल रगाचा असल्यान लोकानी गावाला हे नाव दिल असाव इथून अडीच मैलावर छिनका चट्टी नावाचा एक पडाव आहे त्या ठिकाणी विरही गगा व अलकनदा यांचा सगम होतो मध्येच ही विरही गगा कुठून आली आणि त्यांच्या सगमावर प्रयागाची निर्मिती का झाली नाही, याचा उलगडा कुणी करू शकल नाही इथून ९ मैलांवर पीपलकोटी हे छोट शहर लागल. तिथ आम्ही साडेबारा वाजता पोचलो रस्त्याच्या कडेला झाडांखाली बसून सर्वांनी फराळ केला आणि आम्ही दीड वाजता पुढ रवाना झालो एकूण प्रवास निर्विघ्नपणे पार पडणार अशी आशा वाटू लागली

आमची बस चालली असता वाटेत कडक्टरचा एक गाववाला भेटला. गाडी थाबवून त्यान त्याला आत घेतल कडक्टर स्वत ड्रायव्हरजवळ इजनावर बसला होता तिथच त्यान आपल्या मित्राला बसवून घेतल त्याच्या गप्पागोष्टी सुरू झाल्या. माझ्या माग बसलेले एक सहयात्री मला म्हणाले, " त्यांच्या बडबडण्यान ड्रायव्हरच लक्ष विचलित होईल आणि आपली गाडी दरीत कोसळेल म्हणून तुम्ही त्याना गप्प बसायला सांगा अशा प्रकारे कुणाला काही सांगण मला फारस आवडत नाही, जमतही नाही त्यामुळ बसमध्ये धूम्रपान करण्यास मनाई असूनही कुणी विडी–सिगरेट ओढीत असेल तर मी त्याबद्दल तक्रार न करता निमूटपणे तो धुराचा त्रास सहन करतो हा एक प्रकारचा मानसिक दुबळेपणाच आहे पण तो राहून गेलाय खरा

तेव्हा मी त्या लोकांना काही सांगितल नाही पण त्याच वेळी ड्रायव्हरच्या मागील बाकावर बसलेल्या चार भगिनी जोरजोरात बडबडत होत्या त्या इतक्या

जोरात बोलत होत्या, की इतराच बोलण तर राहू द्याच, गाडीचा घरघराटसुद्धा ऐकू येत नव्हता. त्याच्याकडे अंगुलिनिर्देश करून मी त्या सहप्रवाशाला म्हणालो, "सकाळपासून या भगिनींनी जो पट्टा सुरू केला आहे तिकडे तुमच लक्षच गेलेल दिसत नाही त्या दोघांच्या बोलण्यापेक्षा या भगिनींच्या बटबटीमुळच ड्रायव्हरच लक्ष विचलित होण्याची जास्त शक्यता आहे अर्थात त्याची भाषा (मराठी) त्याला कळत नसल्यामुळ तो धोका पुष्कळच कमी झाला आहे तरी पण आवाजाच प्रदूषण काय कमी हानिकारक असत ? मला तर वाटत, या भगिनींनी आतापर्यंत जेवढी तोंडची वाफ वाया घालवलीय, तेवढ्या वाफेवर ही गाडी सहज बद्रीनाथापर्यंत जाऊन पोचली असती !" ते गृहस्थ नुसते हसले कारण त्या बायकांच्या बडबडीचा सर्वांनाच कटाळा आला होता पण त्याना गप्प बसा म्हणून सांगायच धैर्य मात्र कुणालाच होत नव्हत एवढ्या बाबतीत सर्वजण माझेच अनुयायी होते ! बायकांच्या बडबडीपासून स्वत च रक्षण करण्याचा एक उत्कृष्ट उपाय माझ्याजवळ आहे बड-बड सुरू झाली की मी माझा छोटा ट्रान्झिस्टर सुरू करून कानाशी धरतो ! परतु ही युक्ती किंवा मात्रा चालत्या गाडीत मात्र लागू पडत नाही. गाडीची घरघर आणि तेलाचा दुर्गंध यामुळ अनेक प्रवाशाच डोक दुखत किंवा गरगरू लागत मला तसला त्रास होत नाही. पण या भगिनीमडळाच्या बडबडीन मात्र माझ डोक दुखू लागल.

रुद्रप्रयागपासून बद्रीनाथापर्यंतचा रस्ता लष्कराच्या ताब्यात आहे कारण इथून दीड मैलावर माणा हे भारत–तिबेट–सरहद्दीवरच गाव असून तिथ लष्कराचा पहारा आहे रस्ता अधिक रुद आहे. त्यामुळही असेल किंवा आतापर्यंतच्या प्रवा-सान नजर सरावल्यामुळ असेल, पदोपदी भेडसावणारी मृत्यूची सावली निदान जोशीमठापर्यंत तरी जाणवली नाही.

चमोलीनतर पीपलकोटी, गरुडगगा, पाताळगंगा वगैरे ठिकाण लागतात काही वर्षांपूर्वी पीपलकोटीपर्यंतच मोटाररस्ता होता तिथून पुढ चालत जाव लागे त्या-मुळ या गावाला महत्त्व होत आता ते उरलेल नाही. गरुडगगा चट्टी हे एक नयन-मनोहर स्थान आहे. आपल्याला विष्णूच वाहन बनण्याची सधी मिळावी म्हणून गरुडान इथ तपश्चर्या केली होती प्रत्यक्ष गरुडगगा नदी छोटीशीच आहे तिच्या-तील दगड जवळ ठेवला की सापाच भय नसत, अशी लोकाची भावना आहे त्यानतर येते पाताळगगा ती इतक्या खोल भागातून वाहते, की खरोखरीच पाताळाचा भास होतो. इथला डोंगर राखेसारख्या मातीचा असल्यान वरून केव्हा कडा कोसळेल ते सागता येत नाही. हिमालयातील धोक्याच्या ठिकाणांपैकी हे एक समजल जात. परतु अलीकडे लष्करी वाहनांची वाहतूक सुरू झाल्यामुळ हा धोका पुष्कळच कमी झाला आहे

इथून २० कि. मी.वर प्रख्यात जोशीमठ आहे. याच खर नाव ज्योतिर्मठ

असून जोशीमठ हा त्याचा अपभ्रंश आहे जोशी शब्दाशी त्याचा काही संबंध नाही आमच्या यात्रेच्या कार्यक्रमात जोशीमठाचा समावेश नव्हता धार्मिक वृत्तीच्या किंवा भाविक लोकांच्या दृष्टीन जोशीमठाच खास महत्त्व आहे कारण हिवाळ्याचे सहा महिने बद्रीनाथाचा मुक्काम या ठिकाणी असतो बद्रीनाथाच्या मंदिराचे दरवाजे बंद झाले की देवाची उत्सवमूर्ती इथ आणून तिची पूजाअर्चा करण्यात येते या ठिकाणी वासुदेव, नृसिंह व गरुड यांची देखणी मंदिर आहेत केदारनाथाच्या दृष्टीन जे महत्त्व ऊखीमठाच, तेच बद्रीनाथाच्या दृष्टीन जोशीमठाच आहे धर्मभोळ्या लोकाना शंकराचार्यांच महत्त्व फारस वाटत नसाव म्हणूनच आमच्या यात्रेच्या कार्यक्रमात जोशीमठाचा समावेश केला गेला नसावा परंतु व्यक्तिश' मला मात्र या स्थानाच फार आकर्षण वाटत होत विशेषत थोडा वेळ मिळावा आणि इथला शंकराचार्यांचा म5 पहाता यावा अस फार वाटत होत सुदैवान ती इच्छा अनपेक्षितपणे पुरी झाली आमची बस जोशीमठला सव्वातीन वाजता पोचली लष्करी कारणामुळ इथून बद्रीनाथपर्यंत एकेरी वाहतूक आहे (अर्थात लष्करी वाहनाना तो नियम लागू नाही ) बद्रीनाथाकडे जाणाऱ्या सगळ्या वाहनाना थांबवून ठेवून दिवसातून तीनचार वेळा एकदम सोडतात शेवटची सुटका सायंकाळी चार वाजता होते त्यानंतर खासगी वाहनाना पुढ जाता येत नाही आम्हाला पाऊण तास थांबण भाग होत यात्रा कंपनीच्या संचालकानी या बाबतीत थोडी तत्परता दाखवून प्रवाशाना आवश्यक ती माहिती द्यायला हवी होती परंतु गाडी थांबताच ते जे गडप झाले ते दिसलेच नाहीत

मला विशेष उत्सुकता असल्यामुळे मी इकडेतिकडे चौकशी केली, तेव्हा समजल'की ज्योतिर्मठ जवळच लहानशा टेकडीवर असून अर्ध्या तासात तिथ जाऊन येण सहज शक्य आहे मी जायला निघालो तेव्हा गोरे नावाचे दुसरे एक सहप्रवासी माझ्याबरोबर यायला तयार झाले आम्ही झपाझप चालत टेकडीवर जाऊन पोचलो टेकडी टुमदार व वृक्षराजीनी नटलेली आहे मात्र ती चढायला सुरुवात करताना मलमूत्राच्या दुर्गंधीतून जाव लागल !

इथली सर्वांत महत्त्वाची वस्तू किंवा वास्तू म्हणजे ज्या तुतीच्या (शहतुतच्या) झाडाखाली श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी ज्ञानप्राप्तीसाठी तपस्या केल्यानंतर त्याना ज्ञानज्योतीच दर्शन झाल होत ते झाड ही होय या ज्योतीवरूनच या स्थानाला ज्योतिर्मठ हे नाव मिळाल अखंड तेवणाऱ्या एका मोठ्या पणतीच्या रूपान ही ज्योत आजही तिथ पहायला मिळते तुतीचा एवढा मोठा हिरवागार वृक्ष मी यापूर्वी पाहिला नव्हता हा वृक्ष तसा फार उंच नाही परंतु दाट, टुमदार, डेरेदार आहे या भेटीची आठवण म्हणून मी त्या वृक्षाची तीन पान तोडून घेतली मनात विचार आला इतर भाविक लोकही माझ्याप्रमाणे पान तोडू लागले तर वृक्षावर पानच उरणार नाही परंतु सुदैवान तशी दुर्बुद्धी कुणाला होत असावी अस दिसल नाही !

आद्य शंकराचार्यांनी देशाच्या चार दिशांना जे चार मठ स्थापन केले होते, त्यांतील उत्तरेचा मठ बद्रीनाथला असून त्याची गादी जोशीमठला आहे टेकडीच्या माथ्यावर एका इमारतीत माडीवर असलेली ही गादी पहायला आम्ही गेलो तेव्हा पीठाधीश शंकराचार्य श्रीविष्णुदेवानंद सरस्वती सध्या अलाहाबादला असतात असं समजलं तिथंही मठाची एक शाखा आहे गादी असलेलं दालन सुरेख आहे तिथं असलेल्या तरुण शिष्यानी मामुली माहिती दिली

टेकडीच्या पायथ्याशी श्रीस्वरूपानंद सरस्वती नावाच्या एका स्वामींनी आपणच शंकराचार्यांच्या गादीचे खरे वारसदार असल्याचा दावा करून एक नवा मठ बांधला आहे या दोन शंकराचार्यांमधील गादीच्या लढाईनं एवढं उग्र रूप धारण केलं आहे की त्याचा केव्हा भडका उडेल ते सांगता येत नाही. म्हणून सर-कारनं सशस्त्र पोलिसांची एक तुकडीच तिथं कायमची तैनात करून ठेवली आहे पोलिसचे ते जवान तिथं एका मोठ्या मंडपात आपल्या खाटा टाकून आरामात लोळत होते. काही जवानांनी पत्त्यांचा डाव मांडला होता मी सहज त्यांच्याकडे चौकशी केली तेव्हा त्यांनीच ही माहिती मला दिली ज्योतिमंदिराच्या पुजाऱ्याला मी विचारलं, "या दोन शंकराचार्यांपैकी खरा कोण आणि खोटा कोण ? असली कोण आणि नकली कोण ?" पुजारीबुवा क्षणभर घुटमळले सांगावं की न सांगावं असा प्रश्न त्यांना पडला असावा. अखेर मी विशेष आग्रह केल्यावर ते म्हणाले, "विष्णुदेवानंद सरस्वती हेच खरे गादीचे हक्कदार आहेत. नवा शंकराचार्य उपट-सुंभ आहे !"

हिंदुधर्माच्या दुरवस्थेचं हे एक प्रतीकच म्हणता येईल !

या प्रवासात हिंदी भाषेचे काही नमुनेदार मासले पहायला (वाचायला) मिळाले चाळीस वर्षं हिंदीत लेखन–वाचन–भाषण करीत असूनही मी स्वतः अनेकदा चक्रावून गेलो शब्दाच्या वर्ण–लेखनाच्या किंवा शुद्धलेखनाच्या बाबतीत हिंदीमध्ये चालू असलेल्या अराजकाची मला कल्पना होती परंतु त्या क्षेत्रात इतकी भयंकर प्रगती झाली असेल याचा अंदाज मला नव्हता उदाहरणार्थ, 'हॉर्न' हा इंग्रजी शब्द या प्रवासात 'हौरन', 'होरन', 'होर्न', 'हार्न' व 'हारन' इतक्या प्रकारांनी लिहिल्याचं आढळून आलं 'हॉर्न दीजिए' हे सांगण्यासाठी 'कृपया ध्वनि दीजिए', 'ध्वनि दे' व 'ध्वनिसंकेत' या वाक्यांचा व शब्दांचा वापर करण्यात आला आहे. 'खतरनाक घुम' (धोक्याचे वळण) व 'अदृश्य मोड' (ब्लाइंड टर्न) यांचा अर्थ महत्प्रयासानं कळू शकला परंतु 'सीमा सडक कृतक बल' या पाटीचा अर्थ काही केल्या लागेना ! अखेर 'बॉर्डर रोड टास्क फोर्स' ही इंग्रजी पाटी वाचा-यला मिळाली, तेव्हा कुठं उलगडा झाला 'स्त्रीमूत्रालय'सारख्या विनोदी पाट्यांनी थोडी गंमत केली, 'राजकीय वाहन'(सरकारी वाहन)सारख्या पाट्यांनी गोंध-ळात टाकलं, तर 'स्लाइड', 'बराज' वगैरे इंग्रजी शब्द तसेच ठेवल्यानं सामान्य

जनतेला काय बोध होत असेल, असा प्रश्न मनात येऊन गेला हिंदीच्या बाबतीत खरी अडचण ही आहे की ती कुणाचीच मातृभाषा नाही प्रत्येक विभागातले लोक आपापल्या स्थानिक बोली किंवा बोलभाषा वापरतात मैथिलीसारख्या बोली-भाषांच्या (आता साहित्य अकादमीने त्यांना स्वतंत्र भाषा म्हणून मान्यता दिली असली तरी) प्रदेशात अजूनही हिंदीतूनच शिक्षण दिलं जातं, आणि त्या लोकांना तुमच्याआमच्याइतकेच परिश्रम पुस्तकी हिंदी शिकण्यासाठी करावे लागतात अशा स्थितीत स्थानिक शब्दांचा वापर कसा होणार ? मग क्लिष्ट संस्कृत पर्याय स्वीकारणं किंवा मूळ इंग्रजी शब्द तसेच वापरणं याखेरीज दुसरा मार्ग उरत नाही

जोशीमठ ते बद्रीनाथ हे अंतर फक्त वीस मैलांच आहे आम्ही सव्वाचारला तिथून निघालो तेव्हा जास्तीत जास्त दोन तासांत आपण मुक्कामावर पोचू अशी आमची कल्पना होती. त्यामुळं आम्ही खुशीत होतो जोशीमठ सहा हजार फूट उंचीवर असून बद्रीनाथाची उंची दहा हजार फूट आहे म्हणजे वीस मैलांत फक्त चार हजार फूट चढायचं होतं पण हा हिशेब फसवा असल्याचं लौकरच आढळून आलं जोशीमठापासून दोन मैलांवर विष्णुप्रयाग आहे तिथं अलकनंदा व धौलीगंगा (धवलगंगा) यांचा संगम आहे इथपर्यंत भयंकर उतार आहे दीड–दोन हजार फूट तरी आम्ही खाली उतरलो असू तिथून बलदौडा व घाटचट्टी ओलांडून आपण पांडुकेश्वरला पोचतो घाटचट्टीपासून एक मैलावर एक फाटा शिखांचं तीर्थक्षेत्र हेमकुंड (हेमकुट) या अकरा मैलांवरील स्थानाकडे जातो जोशीमठला आमची बस थांबली असता शिखांनी भरलेल्या अनेक मोटारी गुरुमुखी पंजाबीच्या पाट्या अंगाखांद्यावर वागवीत उभ्या होत्या त्यावरून त्या हेमकुंडाला चालल्या असल्याचं माझ्या लक्षात आलं होतं हेमकुंड हे विशाल सरोवर चौदा हजार फूट उंचीवर आहे तिथं जाताना घांगरिया-चट्टीपासून दोन मैलांवर एक विस्तृत पठार आहे त्याला 'फुलांची दरी' (व्हॅली ऑफ फ्लॉवर्स) किंवा पुष्पवाटिका असं म्हणतात तिथं असंख्य प्रकारची रंगीबेरंगी फुलं फुललेली असतात हौशी प्रवाशांचं हे अत्यंत आवडीचं ठिकाण आहे १९३१ साली स्मिथ नावाच्या साहेबानं हे नंदनवन शोधून काढलं तेव्हापासून त्याची ख्याती जगभर पसरली

मृगरूपानं मृगीशी क्रीडा करणाऱ्या किंदम ऋषीला पंडू राजानं चुकून बाणानं ठार मारलं त्या वेळी त्यानं पंडूला असा शाप दिला की तुलाही माझ्या-प्रमाणंच स्वस्त्रीशी संभोग करताना मृत्यू येईल. त्या शापातून मुक्त होण्यासाठी पंडू राजानं या ठिकाणी तपस्या केली होती. म्हणून या स्थानाला पांडुकेश्वर हे नाव मिळालं या भागातलं हे एक बऱ्यापैकी मोठं गाव आहे

पांडुकेश्वरापासून सहा मैलांवर हनुमानचट्टी व तिथून पाच मैल बद्रीनाथ. अलकनंदेच्या काठाकाठानं जाणारा रस्ता तसा प्रशस्त असला तरी चढउतार खूप

आहे केदारनाथाच्या मार्गावर जशी विपुल झाडी आहे तशी या मार्गावर नाही त्यामुळ लौकरच डोळे कटाळतात.

हनुमानचट्टीला पोचेपर्यंत सहा वाजून गेले अधार दाटू लागला. अलकनंदेचा खळखळाट मनात भीती निर्माण करू लागला लहानपणी स्नान करताना म्हणण्या-साठी पाठ केलेल्या गगाष्टकातील एक श्लोक मला आठवला

'पापापहारि दुरितारि तरगधारि ।
शैलप्रचारि गिरिराज गुहाविदारि ॥
झकारकारि हरिपादरजोपहारि ।
गाग पुनातु सतत शुभकारि वारि ॥ '

गिरिराज हिमालयातील गुहा विदारण करून झकार करीत वाहणारी गगा त्या काळी मोठी मनोहारी वाटे पण आता तिच साक्षात दर्शन झाल्यावर मात्र उरात धडकी भरली भर दुपारची वेळ असती तर तिचा खळखळाट कलरवासारखा मधुर भासला असता आणि क्षणाक्षणाला कड्यावरून उड्या मारीत चाललेल तिच रौद्र ताडव मोहक लास्य वाटल असत

पण जसजसा अधार काळोखात रूपातरित होऊ लागला तसतस आमच्या हृदयान ठाव सोडून आम्हाला दे माय धरणी ठाय करून सोडल भीतीन सर्वांची गठडीच वळली सर्वजण सामुदायिकपणे जोरजोरात रामरक्षा व इतर स्तोत्र म्हणू लागले. दहा हातावरचा रस्ता दिसत नव्हता आणि चढाई व वळण तर मी म्हणत होतो शेवटच्या टप्प्यासाठी राखून ठेवलेली बॅटरी खास लोकाग्रहास्तव वापरण चालकाला भाग पडल. ती थोड्याच वेळात सपली आणि काळोख जास्तच भेसूर बनला सकष्टीचा चद्रोदय रात्री सव्वानऊला होणार होता तोपर्यंत अधाराची सोबत अटळ होती हे पाच मैलाच अतर कापायला जवळजवळ एक तास लागला यावरून गाडीच्या वेगाची कल्पना यावी पण तेवढाही वेग त्या वेळी जास्त वाटला अर्थात खडी चढण असल्यानं वेग याहून कमी केला असता तर बहुधा गाडी पुढ जाण्याऐवजी मागे घसरून दरीतच कोसळली असती सुदैवान गाडी खराब असली तरी चालक तरबेज आहे तो शांत चित्तान गाडी चालवीत राहिला

आमच सार लक्ष रस्त्यावर खिळून राहिल होत त्यामुळ काचनगंगा येऊन अलकनदेला कुठ मिळाली तेही पहाण्याच भान आम्हाला राहिल नाही अर्थात आम्ही पहायचा प्रयत्न केला असता तरी ती अधारामुळ आम्हाला दिसली नसती, हा भाग वेगळा

अखेर एकदाचे आम्ही सात वाजण्याच्या सुमारास बद्रीनाथाच्या पठारावर येऊन पोचलो देवळापासून अर्ध्या मैलावर देवदेखनीला आम्ही आलो आणि बद्री-नाथाचे विद्युत्दीप डोळ्यांसमोर झगझगले सर्वांच्या जिवात जीव आला आणि सर्वांनी एकमुखान जयघोष केला 'बदरी विशाल की जय !'

बद्रीनाथपुरीच्या दोन बाजूना दोन प्रचड पर्वत उभे आहेत जणू नगरीच रक्षण करणारे खडे पहारेकरीच त्यांना नर व नारायण अशी नाव देण्यात आली आहेत [३] त्यांच्या वेशीतून बद्रीनाथपुरीत प्रवेश केला गाव चागल मोठ आणि पसरलेल आहे गावाच्या मधून फुसफुसणारी अलकनदा वाहाते तिच्या उजव्या काठावर बद्रीनाथाच मदिर व जुनी वस्ती आहे, तर डाव्या काठावर नवी वस्ती आहे तीत मुख्यत आधुनिक पद्धतीच्या धर्मशाळाचा समावेश आहे यात्रेचा मौसम ओसरला असल्यामुळ या झकपक धर्मशाळा रिकाम्याच होत्या त्यांत उतरण्याची सोय केली गेली असती तर फार बर झाल असत एक म्हणजे तळमजल्यावर प्रशस्त खोल्यात रहाता आल असत आणि दुसर म्हणजे अधारात ठेचकाळत बसस्टँडपासून दूर चालाव लागल नसत

पण कपनीला काटकसर करायची असल्यान आमची चांगलीच फरफट झाली. अलकनदेचा पूल ओलांडून काळोखातच अनेक चढउतार पार करावे लागले, आणि एका बोळकडीत असलेल्या कोंदट महाराष्ट्रभवनात वरच्या मजल्यावर आम्हाला चडफडत पथाऱ्या पसराव्या लागल्या कालपरवाच्या चालण्यामुळ आज माझ्या मांड्या व पिंडऱ्या इतक्या भयकर दुखत आहेत की माझी स्थिती सौभाग्यवतीपेक्षाही दयनीय झाली आहे स्नान–शौचगृह खालच्या मजल्यावर असल्यामुळ जिन्याच्या पायऱ्या उतरण–चढण भागच पडत

या वास्तूच नाव महाराष्ट्रभवन असल तरी ती सार्वजनिक सस्था नसून प रामनाथशास्त्री चमनवाले नामक गृहस्थाची ती खासगी वास्तू आहे हे गृहस्थ स्वत ला महाराष्ट्रीय म्हणवतात परतु त्याना नीट मराठी बोलता येत नाही त्यांच्या पत्नी तर इथल्या स्थानिकच आहेत त्यांना मराठी मुळीच येत नाही इथ उतरणाऱ्या यात्रेकरूच पौरोहित्य आपल्याला मिळाव एवढीच त्यांची अपेक्षा असते म्हणून ते इथ मुक्काम करण्याबद्दल यात्रा कपनीकडून पैसे घेत नाहीत अस समजल. त्याच्या त्या लोभापायी आम्हाला निष्कारण पायपीट करावी लागली खरी महाराष्ट्रभवनात आम्हाला रजयाही दिल्या आहेत परतु थडी फारशी नसल्यान त्याचा उपयोग करावा लागणार नाही

☐

२८–९–८०

बद्रीनाथाची उची केदारनाथापेक्षा सुमारे दीड हजार फुटानी कमी आहे शिवाय सध्या इथ पाऊसही पडत नाही त्यामुळ हवा फार थड नाही याखेरीज

---

३ काही लोकाच्या मते विष्णुप्रयागला दोन बाजूना जे दोन पर्वत आहेत त्यापैकी उजव्या बाजूच्या पर्वताच नाव 'नर' असून डाव्या बाजूला असलेला 'नारायण' आहे अर्थात हे पर्वत इतके उच व मोठे आहेत की तेच बद्रीनाथपुरीला दिसत असण्याची शक्यता आहे

आणखी एक कारण संभवत इथं गरम पाण्याचे झरे असल्यामुळेही हवेत थोडी ऊब येत असावी सकाळी उठून आम्ही बद्रीनाथाच्या मंदिरासमोर अलकनंदेच्या काठी असलेल्या इथल्या तप्तकुंडात मनसोक्त डुबून घेतलं पाणी इतकं कढत होतं, की प्रत्यक्ष धारेपासून थोडं दूरच रहावं लागलं ज्या ठिकाणी गोमुखातून झऱ्याचं पाणी वेगानं कुंडात पडतं तिथं त्याच्या वरच्या बाजूस एक लहानसा कोनाडा आहे त्या कोनाड्यावर एक कॉंक्रीटचा खांब असून तिथं बदरी(बोरी)चं झाड होतं, आणि त्या झाडाची मुळं अजून त्या कोनाड्यात विद्यमान आहेत व आत हात घालून स्पर्श केल्यास थंडगार मुळ्या हाताला लागतात, असं भक्तगण सांगतात. त्याचा प्रत्यक्ष अनुभव घ्यावा म्हणून मी त्या कोनाड्यात हात घालून पाहिलं तिथं सिमेंटचे कृत्रिम कोंब कोनाड्याच्या छतास चिकटवलेले आढळले त्याच्या स्पर्शात कसलाच गारवा अथवा वेगळेपणा जाणवला नाही. गरम पाण्याचे शितोडे उडून तो संपूर्ण कोनाडाच उबदार झाला होता. काठावर बसलेला एक भटजी संकल्पाचे मंत्र उच्चारून भक्ताकडून दक्षिणा घेत होता.

या कुंडाच्या बाहेरच्या बाजूस कपडे धुण्याची सोय आहे तिथं येणार झऱ्याचं पाणी इतकं गरम आहे, की हात भाजूनच निघतात एका बाजूला स्त्रियांसाठी आडोसा असणारं 'महिलाकुंड' आहे या सगळ्या कुंडांतून बहुधा एकच मोठा झरा खेळवला असावा असं दिसतं तरी पण ज्यांना इथून जवळच नदीकाठी असलेल्या ब्रह्मकपाल किंवा पितृतीर्थ या नावाच्या खडकावर पितरांना पिंडदान किंवा तर्पण करायचं असेल त्यांनी बाहेरच्या सार्वजनिक तप्तकुंडातच स्नान केलं पाहिजे, असा तथाकथित नियम असल्यामुळं स्त्रियांनाही उघड्यावर सर्वांसमवेत स्नान करावं लागतं भटजींनी ही गोष्ट आपल्याला आधीच का सांगितली नाही, म्हणून महिलाकुंडात स्नान केलेल्या काही महिलांनी चांगलंच अकांडतांडव केलं आणि काही स्त्रियांनी पुन्हा दुसऱ्यांदा सार्वजनिक कुंडात बुड्या मारल्या सौभाग्यवती माणिकबाईंना श्राद्ध वगैरे करायचं नसल्यामुळं त्या महिलाकुंडाच्या काठावर बसून तांब्यानं पाणी घेऊन अंघोळ करीत होत्या इतक्यात एक गोरीपान, सुंदर, गुटगुटीत बंगाली बाई तिथं आली तिच्या अंगात देवीचा संचार झालेला होता तिनं सौ माणिकबाईंना खसकन ओढलं, भसाभसा त्यांचा अंबाडा सोडला आणि त्यांच्या बकोटीला धरून कुंडाच्या धारेखाली त्यांचं डोकं धरलं व त्यांना तीन डुबक्या दिल्या त्या ओरडून आपले गुडघे दुखत असल्याचं तिला परोपरीनं सांगत होत्या त्या बंगाली बाईचा अवतार पाहून आधीच त्यांची पाचावर धारण बसली होती आपण काही या बाईच्या हातून जिवंत सुटत नाही अशी त्यांची खात्री झाली आणि त्या मदतीसाठी आरडाओरडा करू लागल्या ती बाई त्यांना म्हणाली, "तुला काही होणार नाही तुझे गुडघे आता पूर्ण बरे होतील" तिच्या बरोबरीच्या इतर बायका आदरानं तिचे पाय धरून तिला वंदन करीत होत्या. त्या माणिक-

बाईंना म्हणाल्या, " अहो, ही खुद्द लक्ष्मीच आहे. ती आपण होऊन तुमच्या भेटीला आली, हे तुमच महत्‌भाग्यच म्हटल पाहिजे ! "[४]

तप्तकुडाच्या पाण्यात गधकाचा अश कमी असल्यामुळ डोक गरगरल नाही किंवा अगाला चिकटपणा वगैरेही आला नाही शुद्ध गरम पाण्यान स्नान केल्याचाच आनद मिळाला माड्याच व पिंडऱ्याच दुखणही थोड कमी झाल शरीराला व मनाला चागली हुशारी आली उन्हही खूप कडक पडल होत त्यामुळ थडी पार पळून गेली मोठ्या उत्साहान मदिरात गेलो

बद्रीनाथाच मदिरही केदारनाथाच्या मदिराप्रमाण सुमारे दीड पुरुष उचीच्या दगडी चौथऱ्यावर उभारलेल आहे तळच्या पायऱ्याची दुरुस्ती चालू असल्यान अशक्त व म्हाताऱ्या लोकाना थोडा त्रास होतो हे काम अस का रेंगाळत पडल असाव ते समजल नाही. ज्या अर्थी यात्रेकरूना होणाऱ्या गैरसोयीबद्दल क्षमा मागणारी एक कायमची पाटी तिथ लावलेली आहे, त्या अर्थी हे काम बरेच दिवस चालू असाव अस दिसत बहुधा बद्रीनारायणालाही सिमेंटटचाईचा फटका बसला असावा !

बद्रीनाथाच मदिर दाक्षिणात्य शैलीच, दगडी, चिरेबदी असून मोठ देखण व रुबाबदार आहे मात्र यात्रेकरूचा विचार करता ते फारच लहान वाटत प्रवेशद्वार कलाकुसरीन नटलेल असून त्याच्या छताला एक मोठी घटा टांगलेली आहे ती सामान्य लोकाना वाजवता येत नाही बहुधा आरतीच्या वेळीच ती वाजवली जात असावी प्रांगणात प्रवेश करताच समोर गरुडाची दगडी मूर्ती दिसते तिच्यावरून मदिर विष्णूच आहे हे लक्षात येत मुख्य मदिराच्या सभोवती ओवरी असून तिच्यात लक्ष्मी, गणेश वगैरे देवदेवतांची लहानलहान देवळ, सस्थानची कचेरी, कीर्तनदालन वगैरे आहेत. या कीर्तनदालनात भजन-कीर्तन चालू असत काही वर्षांपूर्वी प्रख्यात रुद्रवीणावादक पडित पर्वतीकर इथ मौन राहून तपश्चर्या करीत होते. मात्र कीर्तनाच्या वेळी ते रुद्रवीणा वाजवीत असत तिथच देवाचा नैवेद्य तयार करण्याच स्थान आहे. देवाच्या नैवेद्यासाठी रोज दोन-तीन मणाचा भात शिजतो. तेवढीच आमटीही तयार होते नैवेद्याची ही भात-आमटी देवाचा प्रसाद म्हणून विकली जाते. थोड्या किमतीत भरपूर भात आमटी मिळत असल्यान चागली सोय होते जगन्नाथपुरीप्रमाण इथही नैवेद्याच्या बाबतीत सोवळ-ओवळ किंवा उष्ट-खरकट याचे विधिनिषेध पाळले जात नाहीत

हे मदिर गढवाल सस्थानच्या नरेशानी सुमारे सहाशे वर्षांपूर्वी बाधल अस

---

४ या घटनेला आता बरेच दिवस होऊन गेलेत. परतु सौ. माणिकबाईंचे गुडघे अजूनही पूर्वीसारखेच दुखताहेत त्या लक्ष्मीच्या आडदाडपणानं त्यांच टाळक मात्र चागलच शेकून किबहुना भाजून निघालं !

सांगतात मंदिराच्या शिखरावर अहिल्यादेवी होळकरानी सोन्याचा कळस बसवला आहे

बद्रीनारायण इतक्या अवघड व अडचणीच्या ठिकाणी कसा व का आला असावा यासबंधी थोडाबहुत अदाज पुराणकथा व लोककथा यावरून लावता येतो

ब्रह्मदेवाचा एक मुलगा दक्ष प्रजापती दक्षाच्या सोळा मुलींपैकी एक श्रीमूर्ती किंवा मातामूर्ती तिचा विवाह धर्माशी झाला त्याच्यापासून श्रीमूर्तीला दोन मुलगे झाले नर व नारायण ते दोघे हिमालयातील बदरीवनात (बोरींच्या वनात) जाऊन तपश्चर्या करू लागले. इंद्र घाबरला त्यान त्याचा तपोभग करण्यासाठी स्वर्गातून आपल्या नेहेमीच्या रिवाजाप्रमाण मेनका वगैरे अप्सरा पाठवल्या इंद्राच्या या युक्तीचा नर-नारायणावर काहीच परिणाम झाला नाही उलट त्याच्यापैकी नारायणान आपल्या तप सामर्थ्यान त्याच्यापेक्षाही अधिक सुदर अप्सरा निर्माण केल्या त्यातली एक उर्वशी होती तिच्यासह सगळ्या अप्सरा त्यान इंद्राला भेट म्हणून परत पाठवून दिल्या आणि त्याला आश्वासन दिल की, " तुझ्या सिंहासनाला आमच्यापासून काही भीती नाही, कारण आम्हाला राजसत्तेची मुळीच अभिलाषा नाही " (ही कथा ऐकताना माझ्या मनात एक विचित्र विचार चमकून गेला. इंद्रान अप्सरा पाठवण्याऐवजी राजनारायण-मधू लिमयाना नर-नारायणाकडे पाठवल असत, तर त्यानी त्या भावात भाडण लावून देऊन त्याची तपस्या निष्प्रभ करून टाकली असती व इंद्राच राजसिंहासन आपोआप निष्कटक बनल असत ! ) आणि ते पूर्ववत तपश्चर्या करीत राहिले.

कलियुगाचा प्रारभ होण्याच्या सुमारास नारायण कृष्णाच्या रूपान आणि नर अर्जुनाच्या रूपान पृथ्वीतलावर अवतरले. ऋषिमुनीनी त्यांना बदरीवनात निवास करण्याची विनती केली, एवढच नव्हे तर त्यांनी दोन भिन्न रूपात न रहाता एकाच रूपात प्रकट व्हाव अशीही इच्छा व्यक्त केली तेव्हा परमेश्वरान सांगितल की, " नारदकुडात माझी मूर्ती आहे ती बाहेर काढून तिच्यावर देऊळ बांधा " त्याप्रमाण या ठिकाणी विष्णूच्या मूर्तीची स्थापना करून तिच्यावर विश्व-कर्म्याकडून हे मदिर बाधवून घेतल बदरीवनातला हा विष्णू कालातरान बद्रीनाथ या नावान प्रख्यात झाला

पुढ बौद्धांचा जोर वाढला त्यांनी ती मूर्ती उचलून पुन्हा नारदकुडात फेकून दिली श्रीमत् आद्य शकराचार्यांनी बौद्धाचा पराभव करून ती मूर्ती पुन्हा बाहेर काढली आणि तिची नव्यान मदिरात प्रतिष्ठापना केली तेव्हापासून या मूर्तीची पूजाअर्चा करण्याच काम शकराचार्यांच्या जातीतील केरळच्या नबुद्री ब्राह्मणांकडे आल

ही झाली पौराणिक कथा परतु या स्थानासबधीची लोककथा मोठी विचित्र आहे तिच्यातून सामान्य जनतेच्या मनोवृत्तीची चागली कल्पना येते.

या लोककथेनुसार बद्रीनाथ हा सतलज नदीच्या काठी थोलिङ् नावाच्या मठात रहात होता. तिथले लामा त्याची पूजाअर्चा करीत परंतु ते मांसाहारी असल्यानं बद्रीनाथाला ते आवडत नसत म्हणून तो सूक्ष्मरूप धारण करून तिथून निसटला आणि श्यामकर्ण घोड्यावर बसून बदरीवनापासून दोन मैलावर तिबेट व भारत यांच्या सरहद्दीवर असलेल्या माणा गावापर्यंत आला (आजही माणा गावाजवळ तो घोडा खडकाच्या रूपात वास करीत आहे !) तिथून तो चालत बदरीवनात आला

त्या वेळी या भागावर शंकराचं राज्य होतं इथलं सृष्टिसौंदर्य व धनधान्याचं वैपुल्य पाहून बद्रीनाथाला लोभ सुटला परंतु शंकराशी युद्ध करून हा भाग कब्ज्यात घेणं त्याला शक्य नव्हतं म्हणून त्यानं एक युक्ती केली नुकत्याच जन्मलेल्या मुलाचं रूप धारण करून तो रडू लागला त्या वेळी शंकर-पार्वती सकाळी फिरायला चालले होते एकटंच पडलेलं मूल रडत असलेलं पाहून पार्वतीला दया आली आणि शंकराच्या विरोधाला न जुमानता तिनं ते मूल देवळात आणून ठेवलं आणि शंकराबरोबर ती तप्तकुंडावर स्नानाला गेली स्नान करून परत येते तो काय ? देवळाची दारं आतून जाम बंद केलेली !

शंकर म्हणाले, " पाहिलंस ? नवऱ्याचं ऐकलं नाही की असंच व्हायचं ! बायका आपली अक्कल चालवायला लागल्या की अशाच गोत्यात येतात "

अखेर नाइलाजानं त्यांना तो प्रदेश सोडून निघून जावं लागलं त्यानंतर बद्रीनाथ मजेत राहू लागला खाण्यापिण्याची चंगळ होती त्याची पत्नी लक्ष्मीही आता त्याच्या जवळ येऊन राहिली त्याच्या आईबापांना जेव्हा सारी हकीगत कळली तेव्हा म्हातारपणचे दिवस सुखात घालवावेत म्हणून ते काठी टेकीत-टेकीत बदरीवनात आले पण बद्रीनाथ आता जुना राहिला नव्हता. तो पार बदलून गेला होता. आपल्या स्वातंत्र्यात आईबापाची कटकट नको म्हणून त्यानं बापाला तिथून पाच मैल दूर असलेल्या वसुधारा या धबधब्याकडे पाठवून दिलं, आणि आईला माणाजवळ एका देवळात रहायला सांगितलं तिथं आजही मातामूर्तीचं मंदिर आहे.

माणसं आपल्या मनाच्या आकारानुसार देवाला कसा आकार देतात, आपल्या इच्छाआकांक्षा देवामध्ये कशा प्रतिबिंबित करतात, याचं हे उत्तम उदाहरण आहे आपल्याकडे काही देवांना दारूचा नैवेद्य लागतो, तर काही मांस--मटणाचे शौकिन असतात काही देवांना पुरणपोळ्या आवडतात, तर काहींना लाडू-मोदक काहींना दोन--चार बायका लागतात, तर काहींना सोळा हजार एकशे आठ बायकांचा जनानखानाही पुरत नाही खरं म्हणजे हे सारे आपल्याच मनाचे खेळ किंवा चाळे असतात ! गंमत अशी की अनादी काळी आदिवासींनी जे मनाचे खेळ सुरू केले होते तेच इतक्या शतकांनंतरही आपण तसेच चालू ठेवले आहेत केदारनाथ

व बद्रीनाथ ही आदिवासींचीच दैवत असतील काय ? आसपासच्या एकूण परि-स्थितीवरून तीच गोष्ट अधिक संभवनीय वाटते नतर आलेल्या बुद्धिवादी आर्यांनी व द्राविडांनी याच दैवताना वैदिक किंवा पौराणिक रूप प्रदान केली असण्याची शक्यता नाकारता येत नाही एका दृष्टीन ते योग्यच होत प्राचीन समाजाशी भावनिक साधा जोडण्याचा तोच उत्कृष्ट उपाय त्याच्याजवळ होता त्यामुळच दोन-तीन समाजाची साधेजोड होऊन सस्कृतीच सातत्य टिकून राहिल

बद्रीनाथाच्या गाभाऱ्यात मदिराचा मुख्य पुजारी व त्याच्या हाता-खालचा भटजी याच्या व्यतिरिक्त इतर कुणी आऊ शकत नाही उबऱ्याच्या बाहेरूनच दर्शन घ्याव लागत सकाळी ६ वाजल्यापासून दुपारी १२ वाजेपर्यंत व सायकाळी ६ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत देवदर्शनासाठी देऊळ उघड असत या वेळी मूर्ती सजवलेली असल्यामुळ तिच्या मूळ स्वरूपात ती दर्शनार्थींना पहायला मिळत नाही ज्यांनी अधिक सूक्ष्मपणे निरीक्षण केल होत ते माझे मित्र श्री यशपाल जैन 'उत्तराखडके पथपर ' या पुस्तकात ( पृ ११७ ) या मूर्तीच वर्णन करताना सागतात, " मदिरात बदरीविशालाची काळ्या दगडाची पद्मासनस्थ चतुर्भुजी मूर्ती आहे तिच्यासबधी लोकांच्या वेगवेगळ्या समजुती आहेत वैष्णव तिला विष्णू भगवानाची मूर्ती मानतात, शैव शिवाची, शाक्त शक्तीची, जैन पार्श्वनाथाची किंवा ऋषभदेवाची, बौद्ध बुद्धाची वगैरे सर्वजण आपापल्या दृष्टिकोनातून त्या मूर्तीकडे पहातात व तिच्या ठायी आपापल्या दैवताची कल्पना करतात मूर्तीच्या दोन भुजा पद्मासनाच्या मुद्रेत आहेत. दोन वर उठलेल्या आहेत खांद्याच्या वरचा भाग अस्तित्वात नाही तिथ सपाट दगड आहे त्यावर चदन थापून तिथ मस्तक अस-ल्याचा आभास निर्माण करण्यात येतो मूर्तीचे हात भगलेले आहेत छातीवर श्रीवत्साच चिन्ह आहे "

बद्रीनाथाची मूर्ती परिसाची आहे, म्हणून कुणाला गाभाऱ्यात जाऊ देत नाहीत, अशी एक किंवदती आहे परतु तिच्यात काही तथ्य दिसत नाही ती खरो-खरीच परिसाची असती तर लबाड पुजाऱ्यानी एव्हाना खडोगणती लोखडाचा स्पर्श तिला करवून सोन्याचा पूर वाहवला असता लोकांना त्या मूर्तीपासून दूर ठेवण्याची ती जुन्या काळची एक युक्ती असावी, एवढंच

मूर्ती तशी लहानशीच, हातभर उचीची आहे परतु तिच्यावर सर्वत्र चद-नाचा जो लेप लावलेला असतो आणि जी फुलांची व दागदागिन्याची सजावट केली जाते ( ती चागली पुरुषभर उचीची असते ), त्यामुळ मूळ मूर्तीच रूप मनात नीट ठसत नाही मूर्तीच्या चेहेऱ्याच्या जागी एक चांदीचा मुखवटा असतो त्याच्या कपाळावर चमचमणारा तेजस्वी हिराच मुख्यत भक्तांच लक्ष वेधून घेतो ही खडित मूर्ती विसर्जित करून तिच्या जागी एखादी भव्य आलीशान मूर्ती बसवण्याचा

विचार आजवर कुणालाच का सुचला नसावा, याच मला आश्चर्य वाटल ज्या मूर्तीवर अनेक पथांचे ( बौद्ध हा वेगळा धर्म मानल्यास धर्मांचेही ! ) लोक आपला हक्क सांगतात-- आणि मूर्तीला चेहेराच नसल्यामुळ तो हक्क नाकारताही येत नाही--तिच्या जागी सुस्पष्ट विष्णूच्या मूर्तीची स्थापना कुणी कशी केली नाही ? परपरेच्या बधनात अडकून पडल्यावाच हा परिणाम असेल काय ?

वरील मजकूर लिहून झाल्यानतर माझ्या मनात काही शका निर्माण झाल्या म्हणून माझे मित्र श्री यशपाल जैन याना मी पत्र लिहून त्या शका त्याच्यासमोर माडल्या ( ते गतवर्षी पुन्हा दुसऱ्यादा बदरीनाथला जाऊन आले होते ) त्यासबधी त्यानी आपल्या ता. १४-११-१९८० च्या पत्रात पुढीलप्रमाणे खुलासा केला आहे ते लिहितात,--

'बदरीनाथमें मैंने विशालकी प्रतिमा को बहुत निकटसे देखा था और वहाँके रावलसे बात की थी। उसीके बाद मैंने अपनी पुस्तकमें मूर्तिके विषयमे लिखा था। चाँदीके मुखौटेका मुझे ध्यान नही है। गतवर्ष जब मै गया था तो भीड बहुत थी और मैंने पक्तिमे खडे हो कर मूर्तिके दर्शन किये थे।

'मूर्ति खडित नही है। कहा यह जाता है कि उसका निर्माण ही इतना हुआ था। सभवत. भावना यह रही होगी कि सभी धर्मावलबी वहाँ जाये और उस मूर्तिमें अपने इष्टदेवके दर्शन करें। जब हम लोग पहली बार वहाँ गये थे तब किन-किन धर्मोंके व्यक्ति मिले थे, इसका अब मुझे स्मरण नही है। लेकिन चूँ कि उस समय सारी यात्रा पैदल की थी, इस लिए बहुत लोगोंसे सपर्क हुआ था। जैन धर्मके विख्यात मुनि विद्यानदजी महाराज तो बदरीनाथ गये थे और उनके साथ बहुत बडी सख्यामें जैन लोग थे। मुनि विद्यानदजीके वहाँ जानेके बाद तो जैनियोंके लिए वहाँ का रास्ता और भी खुल गया है। विद्यानदजी प्रतिमा को एक जैन प्रतिमा मानते है।'

यशपालजींच्या या खुलाशान माझ पूर्ण समाधान झाल नाही सर्व धर्मांच्या किंवा पथांच्या लोकाना अमुक मूर्ती आपल्याच इष्टदेवतेची आहे अस वाटाव, म्हणून तिच्या चेहेऱ्याच स्थान सपाट ठेवण्याची प्रथा आपल्याकडे इतरत्र कुठच असल्याच आढळत नाही मूर्ती खडित नाही असं म्हणतात, परतु त्याचबरोबर 'बाहे खडित है' असही त्यानी नमूद करून ठेवल आहे चादीचा मुखवटा पाहि-ल्याचा जो उल्लेख मी केला आहे तो मात्र चुकीचा असण्याची शक्यता आहे चेहेऱ्याच्या जागी असणाऱ्या सपाट दगडावर गधाचा लेपच असावा

देवदर्शनानतर मुक्कामावर परत येताना बाजारातूनच याव लागत त्यामुळ सहजच थोडीफार खरेदी होऊन गेली लोकरीचे तयार कपडे इथ स्वस्त मिळतात अस सौभाग्यवतीला वाटल्यामुळ पायमोजे, माकडटोपी, टोपडी वगैरे वस्तू घेतल्या त्या कानपूरच्या कारखान्यात तयार झालेल्या असल्यामुळ इथ थोड्या महागच

पडल्या असणार परंतु कदाचित पुण्यापेक्षा त्या स्वस्त असतीलही! तिला जपा-साठी एक रुद्राक्षाची माळ घ्यायची होती तिची चौकशी करता रुद्राक्षाची किंमत ऐकून मी तर थक्कच झालो. रुद्राक्षाचे १०८ मणी असलेल्या सर्वसामान्य माळेची किंमत १० रुपये असून, मणी जसजसे आकाराने लहान होत जातात तसतशी त्याची किंमत वाढत जाते, ही नवीन माहिती आम्हाला मिळाली. माझ्या भाविक बंधू-साठी मी १० रुपयाची एक माळ घेतली तीन-चारशे रुपये किमतीच्याही माळा पहायला मिळाल्या अर्थात त्या बाबतीत आपण पूर्ण अनभिज्ञ असतो त्यामुळ दुकानदाराच्या शब्दावरच विसवून खरेदी करावी लागते

आजचा सपूर्ण दिवस मोकळाच होता शरीरात थोडा अधिक उत्साह असता तर भारत–तिबेट–सरहद्दीवरील माणा चौकी किंवा १२५०० फूट उंचीवर असलेला वसुधारा हा धबधबा ( इथ चारशे फूट उचीवरून पाणी पडत ) पाहून आलो असतो परंतु कुठच जाण्याची इच्छा झाली नाही. दिवसभर बसून कंटाळा आला तेव्हा उठून अलकनदेच्या घाटावर गेलो गगोदक भरून नेण्यासाठी हरिद्वारला दोन ॲल्युमिनियमच्या छोट्या बुदल्या घेतल्या होत्या. त्यांपैकी एकीत गगेच पाणी भरून घेतल होत दुसरी रिकामीच होती तिच्यात अलकनदेच पाणी भरून घेतल अलकनदा ही मूळ गगा असल्यानं तिच पाणी गगोदकाहून वेगळ नसाव अशी माझी समजूत आहे पुण्याला गेल्यावर पाण्याच पृथक्करण केल्यास वस्तुस्थिती समजून येईल

अधार पडू लागल्यावर गगेचा निरोप घेतला आणि बदरी–विशालच्या मदि-रात जाऊन उभा राहिलो सहा वाजता सी. व्ही एन नपूतिरि (नबुद्री) हे मदि-राचे रावळ (पुजारी) देवळात आले (त्यांची खोली समोरच असून खोलीबाहेर नावाची पाटीही आहे—इग्रजीत ) त्यांच्या बरोबर चांदीच्या गदेसारखा चांदीचा दड घेऊन चोपदार पुढ चालला होता. तो सभामडपात थांबला आणि रावळ गाभा-ऱ्यात गेले हे रावळमहाशय एखाद्या सिनेनटासारखे दिसतात मानेपर्यंत रुळणारे भाग पाडलेले फॅशनेबल केस, झोकदार कल्ले, गुळगुळीत चेहेरा, झग्यासारखा पायघोळ मखमली अंगरखा, कमरेला रेशमी दुपट्टा वगैरे सारा अवतार मनात भक्ति-भाव जागृत करण्याऐवजी कुतूहलच निर्माण करतो. रंग काळासावळा गोलमटोल चेहेरा त्यांना पाहून मला पुण्याच्या फिल्म आर्काइव्हच्या नायराची आठवण झाली

या मदिरात भक्ताना स्वहस्ते पूजाअर्चा करता येत नाही त्याऐवजी सस्था-नाच्या कचेरीत आपल्याला ज्या प्रकारची पूजाअर्चा हवी असेल तिची रक्कम भरायची आणि मदिराच्या पुजाऱ्यानी त्याप्रमाण पूजाअर्चा करायची, असा रिवाज आहे वेगवेगळ्या पूजाचे दर ठरलेले असून त्याच छापील पत्रकच मिळत त्यावरून

महाभिषेक ( ७५१ रुपये ), विशेष अभिषेक–पूजा (वर्षातून एकदा याप्रमाण वीस वर्षं ३ हजार रुपये), श्रीमद् भागवत पाठ (१००१ रुपये), महाभोगम् (२५१ रुपये), गीतापाठ (६१ रुपये), विष्णुसहस्रनाम पाठ (४१ व ५१ रुपये), सुवर्ण–आरती (५१ रुपये), रजत–आरती (भव्य ३१ रु सामान्य २१ रु ), कर्पूर–आरती (११ रु ), अष्टोत्तरी (२५ रु.), खीरभोग (५१ रु ) असे अनेक प्रकार असल्याच दिसून येत भक्त स्वत हजर नसल्यास यांपैकी काही पूजाचे प्रसाद (निर्माल्य, चदन, तुलसीदल, अगवस्त्र वगैरे ) टपालान त्याच्याकडे पाठवण्यात येतात स्वत हजर असणाऱ्याना एका पावतीवर दोन व्यक्तींना गाभाऱ्याबाहेर सभामडपात बसून जवळून पूजा, आरती वगैरे पहाता येते त्यांच्यासाठी सतरज्या अथरून खास व्यवस्था केली जाते इतरांनी लांबूनच सारा सोहळा पहायचा असतो सुमारे तास–दीड तास उभ राहून मी तीनचार प्रकारच्या आरत्या पाहिल्या आणि विष्णुसहस्रनामाचा पाठ ऐकला आरती केवढयाही रकमेची असली तरी ती दोन-तीन मिनिटांहून अधिक वेळ चालत नाही त्या वेळी कुणी आरतीहो म्हणत नाही मदिराची मुख्य आरती सव्वासहाला झाली त्या वेळी तिमजली पचारतीचा प्रकाश खूप दूरवर पसरला होता प्रत्येक आरतीनतर लोकाना आरतीवरून हात फिरवता यावा म्हणून ती सभामडपात व बाहेर फिरवली जाते आपल्याकडल्याप्रमाण आरती सपूर्ण गोलाकार फिरवीत नाहीत डावीउजवीकडून ती अर्धचद्राकार फिरवली जाते दोन आरत्याच्या मधल्या काळात किवा विष्णुसहस्रनाम वगैरेचा पाठ चालू असता रावळमहाराज देवासमोर बसून तुलसीपत्र देवाच्या अगावर फेकत होते आरती सपल्यावर निर्माल्याचा प्रसादही असाच समोर बसलेल्या भक्तांच्या अगावर फेकला जात होता केदारनाथाच्या मानान इथ फुल अधिक व विविध प्रकारची पहायला मिळाली हवा उबदार असल्यामुळ इथ जवळपास फुलांच्या बागा असतील, किंवा हृषीकेश–हरिद्वारहून रोज थेट गाड्या येण्याची सोय असल्यामुळही ताजी फुल, तुळशी वगैरे मिळत असतील अस वाटत

□

देवप्रयाग

२९–९–८०

सकाळी ६–४० ला देवप्रयागमधल गेट खुलत—म्हणजे जोशीमठाकडे जायला मोटारींना परवानगी मिळते. उशीरा उठल्यामुळ थोडी धावपळ झाली खरी, परतु वेळेवर मोटार सुटली, आणि ' बदरीविशाल की जय 'च्या गजरात आम्ही बदरी-पुरी ऊर्फ विशालपुरीचा निरोप घेतला

बद्रीनाथला गेल्यापासून मला ध्रुवतारा पहायची उत्सुकता लागून राहिली होती ध्रुवतारा कुठ दिसतो ते तिथल्या लोकाना विचारल होत. त्यानी समोरच्या

पर्वताच्या शिखरावरची जागा दाखवली होती. परतु त्या वेळी आभाळात ढग असल्यामुळ ध्रुव दिसला नव्हता आज पहाटे आकाश निरभ्र असल्यान तो अगदी स्वच्छ दिसला खमध्यापासून (झेनिथ किंवा शिरोबिंदूपासून) क्षितिजापर्यंत रेखा काढल्यास पुण्याला तो या रेखेच्या मध्यावर दिसतो, तर बद्रीनाथला तो रेखेच्या वरील अर्ध्या भागाच्या मध्यावर दिसला आपण जसजसे उत्तरेकडे जातो तसतसा ध्रुवतारा क्षितिजापासून दूर, उचावर दिसतो प्रत्यक्ष ध्रुवक्षेत्रात तो डोकीवर दिसतो पर्वतशिखरावर तो मुकुटातील हिऱ्याप्रमाण चमकत होता काही लोकाना वाटल, तो शुक्र असावा पण शुक्र आजकाल पूर्वेला असल्याच मला माहीत असल्यामुळ माझा गैरसमज झाला नाही या वेळी पूर्वेकडील पर्वतशिखरावर सूर्याचे किरण पडून त्यावरील बर्फ चमकू लागल क्षणार्धात चांदीची शिखर सोन्याची बनून गेली

परतीचा प्रवास उतारावरून असल्यान जाताना ज्या प्रवासाला तीन तास लागले होते तेच अतर दोन तासांत ओलांडून आम्ही ८-४० ला जोशीमठला पोचलो. स्वच्छ उजेड असल्यामुळही गाडीला उतरताना काही त्रास झाला नाही. जोशीमठला चहापाणी उरकून ११ वाजता पीपलकोटीला पोचलो तिथ गाडीत डिझेल भरायच होत पण त्याच वेळी वीज गेल्यामुळ पप चालत नव्हता वीज केव्हा येईल याची काही खात्री नव्हती म्हणून तिथच दुपारच जेवण उरकून पुढ निघालो वाटेत रुद्रप्रयागाला थोडा वेळ थांबून चहापाणी केल आणि श्रीनगरला ५ वाजता पोचलो वाटेत 'कर्णप्रयाग स्लाइड--धीरे चले' व 'कलियासौड स्लाइड--धीरे चले' या पाट्या वाचल्यावर दरडी कोसळण्याच्या स्मृती जाग्या झाल्या कलियासौडला खरोखरीच एक दरड कोसळली होती तिथ डोझरच्या साहाय्यान रस्ता मोकळा करण्याच काम चालल होत ते करीत असता येणाऱ्याजाणाऱ्या गाड्यांची काही सोय आपण पाहिली पाहिजे याची मुळीच पर्वा तिथल्या कामकऱ्याना नसल्यामुळ थोडा विलब लागला त्या वेळी गाडी मागपुढ करताना ती दरीत कोसळेल की काय या कल्पनेन उतारू इतके घाबरले की ओरडू लागले!

गाडीला बॅटरी नसल्यामुळं अधार पडल्यावर ती घाटात चालवण शक्य नव्हत आधी ठरलेल्या कार्यक्रमानुसार आज हृषीकेशला पोचायच होत परतु सुमारे सत्तर मैलाच (१०४ कि मी च) अतर दिवसाउजेडी कापण शक्य नसल्यामुळ श्रीनगरलाच मुक्काम करावा आणि सकाळी उठून पुढ जाव अस यात्रा कपनीच्या सचालकानी ठरवल परतु मी त्याना म्हणालो, "अजून भरपूर उजेड आहे त्याचा उपयोग करून आपण हृषीकेशच्या जितक्या जवळ जाऊन पोचता येईल तितक जाण्याचा प्रयत्न करू म्हणजे उद्या सकाळचा तेवढाच वेळ वाचेल." सुदैवान त्यांना माझ म्हणण पटल तरी पण श्रीनगर मोठ गाव असल्यान तिथ उतरण्याची सोय सहजासहजी होईल, पण देवप्रयागला गेल्यास उतरण्याची अडचण होईल,

अशी शका त्याच्या मनात आली वस्तुत ते नेहमी या भागात येणारे मी अगदीच नवखा तरी पण मी त्याना म्हणालो, "सध्या यात्रेचा मोसम चालू नसल्यान उत-रायची मुळीच अडचण पडणार नाही तिथ अवश्य जागा मिळेल." त्याप्रमाण श्रीनगरहून ५ ला निघून दीड तासात ३२ कि मी अतरावरील देवप्रयागला आम्ही ६–३० ला पोचलो इथ नदीच्या ऐलतीरावर 'गढवाल विकासमडल निगम'–तर्फे चालवल्या जाणाऱ्या 'यात्री केंद्रा'त (टूरिस्ट सेंटरमधे) आम्हाला छान व भरपूर जागा मिळाली. लहानशा उचवट्यावर असलेली ही नवीकोरी इमारत सर्व सुखसोयींनी सुसज्ज असून इथला परिसरही प्रसन्न आहे

आता आम्ही समुद्रसपाटीपासून फक्त १७०० फूट उचावर आहोत त्यामुळ चागलाच उकाडा जाणवतो आहे. शिवाय थड हवेच्या प्रदेशातून आल्यामुळ तो अगदी असह्य वाटत आहे. म्हणून अघोळीच सामान काढून मी व सौभाग्यवतीन नळाच्या गार पाण्यान भरपूर स्नान केल (उन्हाळ्यातही गरम पाण्यानं स्नान करणारी आम्ही मडळी क्षणिक आनदापायी गार पाण्यान स्नान करून बसलो त्याबद्दल घरी परत आल्यावर पश्चात्ताप करावा लागला कारण आम्हा दोघांनाही सर्दी–खोकल्यान काही दिवस पार बेजार करून सोडल ) तरीही उकाडा होतोच आहे

श्रीनगरहून येताना वाटेत म्हशीचे मोठमोठे तांडे भेटले ते पहाडात रहा-णाऱ्या मुसलमान गुजर लोकांचे होते हे गुजर लोक भटके टोळीवाले आहेत उचेपुरे, गोरेपान गुजर आणि त्याच्या देखण्या बायका मूळ आर्यांची आठवण करून देतात धारदार नाक, उभट चेहेरा, तेजस्वी डोळे यावरून ते आर्यांचे वशज असले पाहि-जेत आणि त्यांच्यात अन्य रक्ताचा सकर फारसा झाला नसावा हे सहज लक्षात येत दिल्ली जातीच्या धष्टपुष्ट म्हशीही त्यांच्यासारख्याच दृष्ट लागतील अशा होत्या एकेका तांड्यात एक–दोन गलेलठ्ठ रेडे व दहावीस छोटीछोटी रेडक होती त्या रेडकाचा छोटा कळप स्वतत्रपणे चाललेला दिसे रस्त्याच्या कडेला पालापाचोळा अथरून त्यावर सतरज्या पसरून त्यानी घर तयार केली होती त्यांच्या घराना दार, खिडक्या, भिंती, छपर यापैकी काहीच नव्हत पण त्याना त्याच जणू भानच नव्हत तीन दगडाच्या चुलीवर तवा ठेवून त्याच्या बायका पांढऱ्याशुभ्र भाकरी भाजत होत्या त्या भाकरी पाहून माझ्या तोंडाला पाणी सुटल ! (या साऱ्या प्रवासात भाकरी एकदाच खायला मिळाली होती, आणि मी तर रोज आवडीन भाकरी खाणारा ) आपल्या आयांभोवती घुटमळणारी त्याची गुटगुटीत, गोरीगोबरी मुलही मोठी लोभसवाणी दिसत होती

हे गुजर लोक हिवाळा सुरू होताच खाली उतरतात आणि हृषीकेशच्या आसपास थडीचे दिवस घालवून उन्हाळ्यात पुन्हा हिमालयात जातात शेकडो–हजारो वर्षांपासून चालत आलेला आपला हा जीवनक्रम बदलण्यास ते मुळीच तयार

नाहीत. त्याच्या अदाधुंद गुरचराईमुळे वनाचा नाश होतो, म्हणून सरकारने या लोकांना स्थायिक होण्यासाठी जमिनी दिल्या आहेत दर बिघ्याला पाच हजार रुपये किंमत येईल इतक्या त्या सुपीक आहेत परंतु हे लोक काही केल्या शेती करायला तयारच होत नाहीत त्यांच्या या हट्टापुढे सरकारने हात टेकले आहेत

□

श्रीलंका बौद्ध विश्रामालय,

नवी दिल्ली.

३०–९–८०

देवप्रयागहून पहाटे ५–४० ला निघून ७० कि मी अंतरावरील हृषीकेशला ८–४० वाजता पोचलो रस्ता उताराचा, सकाळची ताजी वेळ आणि घरी जाण्याची ओढ, यामुळे गाडी वेगाने आली असावी इकडून जाताना पहिल्या प्रथम ज्या ठिकाणी आमची गाडी बंद पडली होती तिथे आल्यावर मी थोडा वेळ गाडी थांबवायला सांगितले, आणि गाडी इतकी भिकार असूनही आपल्या चालन-कौशल्याच्या जोरावर यानचालक डबलसिंग याने आम्हा सर्वांना सुखरूप परत आणले, याबद्दल सर्व उतारूतर्फे मी त्याचे आणि त्याचा सहकारी (कंडक्टर) बालदत्त याचे आभार मानले आपल्या कृतज्ञतेचे प्रतीक म्हणून प्रवासी मित्रांनी आपापल्या इच्छेप्रमाणे फूल ना फुलाची पाकळी त्या दोघांना द्यावी अशी मी सर्वांना विनंती केली कोणी किती पैसे दिले याची वाच्यता किंवा नोंद होणार नाही याची खात्रीही दिली थोड्याच वेळात १२० रुपये जमा झाले ते मी डबलसिंगाला दिले त्याने मूकपणे डोळ्यांनीच आपली कृतज्ञता व्यक्त केली डबलसिंग व बालदत्त—दोघेही अत्यंत सालस, मितभाषी आणि मदत करण्याच्या वृत्तीचे होते त्यामुळे त्यांच्याशी कुणाचाच भांडणतंटा झाला नाही रडतखडत चालणाऱ्या गाडीमुळे जो विलंब आणि विलंबामुळे जी गैरसोय झाली तिचा दोष या दोघांकडे नाही याची कल्पना असल्यामुळे त्यांच्यापैकी कुणावरच सहप्रवाशांचा राग नव्हता, हे त्यांनी दिलेल्या बक्षिसीवरून लक्षात आले दीडशे–दोनशे रुपये मासिक पगारावर अहो-रात्र राबणाऱ्या त्या कामकऱ्यांबद्दल सर्वांनाच एक प्रकारची सहानुभूती वाटत होती आमचा प्रवास सुखकर किंवा निदान कमी कष्टप्रद होण्यास त्याचे सौजन्य पुष्कळच कारणीभूत झाले होते, यात शंका नाही

बद्रीकेदारला जाताना कार्यक्रमाच्या घाईगर्दीमुळे हृषीकेशला अलीकडेच उभारण्यात आलेले विठ्ठलमंदिर पहाता आले नव्हते मनाला चुटपुट लागून राहिली होती आज सकाळी हृषीकेशला पोचल्यावर मुक्काम हलवीपर्यंतच्या काळात तिथे जाऊन येणे शक्य आहे हे लक्षात येताच आम्ही काही मंडळी

विठ्ठलाच दर्शन घेऊन आलो मुंबईचे विठ्ठलभक्त श्री. वसंतराव चिटणीस यांनी 'एअर इंडिया'तील आपली भारी पगाराची नोकरी सोडून देऊन याच कामाला स्वतःला वाहून घेतलं, आणि १९६४ साली गावापासून दोन-तीन मैलांवर गंगेच्या काठी निसर्गरम्य ठिकाणी जागा मिळवून तिथं विठ्ठलाश्रमाची स्थापना केली एका छोटयाशा उंचवटयावर त्यांनी विठोबाचं एक लहानसं देऊळही उभं केलं बिडला-शेठजींना ते आवडलं, आणि त्यांनी त्या मंदिराला जोडून एक भव्य, देखणा सभा-मंडप बांधून दिला. १९७८ साली महाराष्ट्रातून भाविक वारकऱ्यांची एक दिंडीही या हिमालयस्थ विठ्ठलाचं दर्शन घेण्यासाठी गेली होती वृत्तपत्रांतून या साऱ्या बातम्या वेळोवेळी वाचल्यामुळं महाराष्ट्राचं प्रतिनिधित्व करणारं हे मंदिर आहे तरी कसं हे पहाण्याची उत्सुकता मनात होती मंदिर, आश्रम व सभोवतालचा परिसर पाहून ती उत्सुकता शमली व मन प्रसन्न झालं

मुख्य मंदिर वरच्या मजल्यावर असून खालच्या बाजूस एक मोठा दिवाण-खाना व साधकांसाठी खोल्या आहेत मंदिरात मध्यभागी विठोबाची मूर्ती असून तिच्या डाव्या बाजूला रुक्मिणीची मूर्ती व उजव्या बाजूस महादेव आहे या सर्व मूर्ती काळ्याभोर संगमरवरी दगडाच्या असून कलापूर्ण व मोहक आहेत मंदिराच्या सज्ज्यातून दिसणारं गंगेच्या प्रवाहाचं दृश्य मन खिळवून ठेवतं

सौ मुळगावकर इथली व्यवस्था पहातात त्यांनी मोठ्या आनंदानं सारी माहिती दिली त्यांची तक्रार एकच ती अशी की, मंदिर पहायला येणारी मंडळी फार घाईत असतात त्यांनी निवांतपणानं यावं, चार दिवस रहावं, असं त्यांना वाटतं अत्यंत अल्प मोबदल्यात (फक्त बारा रुपयांत) इथं रहायची व जेवणा-खाण्याची सोय आहे चिंतनशील व निसर्गप्रेमी व्यक्तींना रहायला नक्कीच आव-डेल असं हे ठिकाण आहे

"महाराष्ट्रातून येणाऱ्या यात्रा कंपन्या इथं उतरायला का येत नाहीत ?" असा प्रश्न कुणीतरी विचारला त्यावर बाईंनी सांगितलं, "या कंपन्यांना मुक्का-माच्या भाड्यात कमिशन हवं असतं आमची संस्था ते देऊ शकत नाही म्हणून ते इकडे उतरत नाहीत " मुंबईच्या एका प्रख्यात यात्रा कंपनीचं नाव घेऊन त्या म्हणाल्या, "त्याचे संचालक आमचे चांगले मित्र आहेत पण तेही इथं उतरायला येत नाहीत" त्यांचं उत्तर ऐकून सर्वांना खूपच वाईट वाटलं

मंदिरासमोर श्री वसंतराव चिटणीस व सौ मुळगावकर यांचे आधुनिक सुखसोयींनी (वातानुकूलन वगैरेंनी) युक्त असलेले छोटे-छोटे बंगले आहेत कुणीही स्वखर्चानं इथं आपला बंगला बांधू शकतो मात्र त्या व्यक्तीच्या पश्चात तो बंगला आश्रमाच्या मालकीचा होतो (कर्नाटकातील घटप्रभेलाही अशी सोय आहे )

आम्ही टॅक्सीतून जाऊन आलो. सात उतारूंना मिळून ३० रुपये पडले मंदिर

पाहिल नसत तर एका मोठ्या आनदाला आपण मुकलो असतो, असा विचार मनात येऊन गेला

बद्रीकेदारला जाताना बरचस सामान आम्ही हृषीकेशला ठेवून गेलो होतो ते बरोबर घेऊन, जेवणखाण उरकून साडेबारालाच जवळच्या स्टेशनवर जाऊन बसलो वस्तुत या तासाभराच्या प्रवासासाठी रेल्वेचा वापर करण्याची काहीच जरूर नव्हती हरिद्वारला जी बस केली तिचा चालक म्हणत होता, " तुम्ही मला कळवल असत तर मी हृषीकेशलाच आलो असतो " तस झाल असत तर आम्ही दिवसाउजेडी इथ पोचलो असतो परतु आमच्या चालकांना तेवढ्यात काटकसर करण्याची बुद्धी झाली ! त्यानी १ रु ८ पैशाची तिकिट आमच्या हातावर ठेवली हरिद्वार–हृषीकेश अशी लोकल किंवा शटल ट्रेन आहे ती तासभर उशीरा म्हणजे दोनला निघून, वाटेत रेंगाळत साडेतीनला हरिद्वारला पोचलो तिथही दोन तास स्टेशनवर रखडून गेल्या खेपेच्या बसमधून सव्वापाचला निघालो आणि रात्री सव्वाअकराला दिल्लीला पोचलो ठरल्याप्रमाण रुडकीला ड्रायव्हरन मालकाला भेटण्याच्या निमित्तान एक तास वाया घालवला कालापव्ययाची बाब जणू कुणाच्या खिजगणतीतच नाही

□

१–१०–८०

आजचा सबध दिवस तसा वायाच गेला दुपारी रिकामपणाचा कटाळा आला म्हणून राजघाटाजवळ 'सन्निधि' या बंगल्यात रहात असलेले आचार्य काकासाहेब कालेलकर यांना भेटायला गेलो अलीकडे काकासाहेबाना भेटायची इच्छा होत नाही इदिरा गांधी व त्याच सरकार यांच्याविषयी आचार्य विनोबां-प्रमाण त्यांनाही आत्मीयता वाटते त्यांच हे वागण गाधीमार्गांशी मेळ खात नाही अस मी मानतो अर्थात भेट टाळण्याच मुख्य कारण हे नव्हे काकासाहेबाना अली-कडे मुळीच ऐकू येत नाही एवढच नव्हे तर त्याची स्मरणशक्तीही पूर्णपणे नष्ट झाली आहे क्षणापूर्वी काय घडल ते त्यांना आठवत नाही रोज भेटणाऱ्या माण-साची ओळखही ते विसरतात त्यामुळ त्यांच्याशी काहीही बोलण निरर्थकच ठरत (अर्थात हेही सभाषण पाटीवर लिहूनच कराव लागत ! ) त्याच्या खासगी चिट-णीस कु सरोजिनी नाणावटी (चाळीस वर्षांपूर्वी पुण्याला ज्यांच निधन झाल होत त्या जस्टिस नाणावटींच्या कन्या) याच्याविषयी सौ माणिकबाईंना विशेष आत्मी-यता वाटत असल्यान त्या दोघीना भेटता याव म्हणूनच मुख्यत मी 'सन्निधि'त गेलो योगायोगान सरोजताईंचा आज वाढदिवस होता त्याना ६९ व वर्ष लागल्याबद्दल आम्ही त्यांच मन:पूर्वक अभिनदन केल

या वास्तूत मी कितीदा तरी आलो आहे, राहिलो आहे. त्या वेळी इथ कस

चैतन्य फुललेल असे आता त्या परिसरावर एक प्रकारची अवकळा पसरलेली दिसते. तिथला प्राणच जणू हरवून गेला आहे कुणी नव्या दमाचे कार्यकर्तेही इथ फिरकत नसावेत अस वाटत एका अर्थान ही वास्तू आता इतिहासजमा झाली आहे कारण खुद्द काकासाहेबच इतिहासजमा झाले आहेत. ते शरीरान हयात आहेत, पण मनान, बुद्धीन, प्रतिभेन कधीच पडद्याआड गेले आहेत पाटीवरील अक्षराच्या मदतीन मी त्याच्याशी थोडा वेळ बोललो. ज्याच्या सहवासात मी आठ वर्षं काढली होती त्यांना त्यातल काहीच आठवत नाही, किंबहुना श्रीपाद जोशी नावाची एखादी व्यक्ती आपल्या जीवनात आली होती, याचाच त्यांना पूर्ण विसर पडला आहे त्यामुळ त्या निरर्थक बोलण्याचा मला लौकरच कटाळा आला.

आज काकासाहेबाच वय ९५ वर्षांचे आहे १९८५ च्या १ डिसेंबरला त्याना शभर वर्षं पूर्ण होतील त्यांची तब्येत तशी ठणठणीत दिसली खाणपिणही पूर्वीसारखच व्यवस्थित आहे त्यामुळ अजून पाचदहा वर्ष ते सहज काढू शकतील तोपर्यंत श्रीमती इदिरा गांधी अधिकारावर राहिल्या तर काकासाहेबाची शताब्दी त्या धूमधडाक्यान साजरी करतील कारण तेवढ उपकार काकासाहेबांनी त्याच्यावर नक्कीच केले आहेत

काकासाहेबाची अवस्था पाहून मनात एक विचित्र विचार येऊन गेला ज्याची स्मरणशक्ती नाहीशी होते त्याच्या मेंदूवरील ओझ नाहीस होत आणि मग शरीर मात्र टवटवीत रहात, अस घडत असेल काय ? जगात, देशात, परिवारात घडणाऱ्या घटनाचा परिणाम माणसाच्या मनावर होऊन त्याला हृद्रोग, कर्करोग वगैरे अनेक आधुनिक रोग पोखरून खातात विस्मरणशीलतेच्या प्रभावामुळ मनावरच ओझ उतरून गेल की त्याच्याशी सबधित असणारे रोगही दूर रहातात शहरी वातावरणापासून खूप दूर रहाणाऱ्या टोळीवाल्या जमातीत दीर्घायुषी माणस मोठ्या प्रमाणात आढळतात, याचही कारण मनाची ही निर्लेप अवस्थाच असेल काय ?

□

झेलम एक्सप्रेस

२–१०–८०

जम्मू–तवी–पुणे झेलम एक्सप्रेस पुण्याला जाण्यासाठी नवी दिल्ली स्टेशनवर १०–२५ ला येते आणि ११–०५ ला सुटते. त्यामुळ आधी सामान पाठवून देऊन आम्ही सावकाश १० वाजता स्टेशनवर आलो असतो तरी चालल असत विश्रामालयातून पायी पाच मिनिटांत स्टेशनवर पोचता येत. परतु व्यवस्थापकाच्या गावठी सावधगिरीमुळ आम्हाला साडेनऊ वाजताच याव लागल स्टेशनवर आल्यावर समजल की गाडी २ तास लेट आहे झेलम कधीच वेळेवर येत नाही, अशी तिची

ख्याती असल्यामुळं[५] स्टेशनवर येऊन आधी चौकशी केली असती तर आम्हाला निष्कारण ताटकळत बसाव लागल नसत गाडीला उशीर असल्यामुळ फलाटावर सतरज्या टाकून लोकाच्या बसण्याची सोय करावी आणि जमल्यास जेवणही उरकून घ्यावीत अशी सूचना मी केली परतु सचालकांनी ती या कानान ऐकून घेऊन त्या कानान सोडून दिली त्यामुळ ज्याला जिथ जागा मिळाली तिथ ताटकळत बसाव लागल गाडीचा उशीर क्षणाक्षणाला वाढतच होता अखेर ती चार तास उशीरा आली आणि पाऊण तास थांबून ३ वाजता सुटली म्हणजे आम्ही फलाटावर पाच तास माश्या मारीत बसलो !

गाडी सुरू झाली जेवण वगैरे आटोपली आम्ही अथरुण पसरून आडवे झालो इतक्यात एका जहाबाज भगिनीनं आपल्या परमपूज्य पतिदेवाच्या व दुसऱ्या एका भद्रमहिलेच्या अब्रूची लक्तर खड्या सुरात वेशीवर टागली विजेचा शॉक बसावा तसे आम्ही धक्काबक्का होऊन उठून बसलो आणि भानगड तरी काय आहे ते ऐकू लागलो. खर म्हणजे त्यात काहीही भानगड नव्हती साधाच सोयीचा व सौजन्याचा मामला होता परतु त्या भगिनींना त्यात काळबेर दिसल एक कुलीन, वयस्कर बाई स्नानाला, देवदर्शनाला वगैरे जाताना त्या भगिनीच्या यज-मानाना हाक मारीत असत, "चला अण्णा स्नानाला !" भारतीय सस्कृतीचा विचार करता त्याच ते वर्तन आक्षेपार्ह ठरण्याची शक्यता होती ही गोष्ट त्याच्या लक्षात आली नाही त्या गृहस्थांच्या पत्नींनी साभिनय सवाद म्हणून सर्वांना चाग-लाच धक्का दिला या अनपेक्षित बॉबस्फोटान नवरा बिचारा कावराबावरा झाला आणि भिजलेल्या माजराप्रमाण गप्प बसून राहिला. ज्याच्यावर हा हल्ला करण्यात आला होता त्या बाईही निमूटपणे टिप गाळू लागल्या महिषासुरमर्दिनीचा अवतार बनलेल्या त्या भगिनींना कस गप्प कराव हे कुणालाच समजेना. अखेर त्यानी आपल्या अत करणात कोडून ठेवलेली क्रोधाची वाफ जेव्हा शब्दावाटे बाहेर निघून गेली, तेव्हाच त्या शात झाल्या !

वस्तुत अशा प्रकारच्या सामुदायिक प्रवासातून काही नवीन मैत्रीसबध निर्माण व्हायला हवेत परतु तस काहीच घडल नाही त्याचं कारण काय असाव

---

५. झेलम एक्सप्रेस पुण्याला नेहेमीच उशीरा पोचते, म्हणून लोकांची गैरसोय दूर करण्यासाठी १ नोव्हेंबर १९८० पासून तिची वेळ बदलून सायकाळी १६–५०–ऐवजी ती १९–३० ला सोडण्यात येऊ लागली इंदिराजीची छुपी आणीबाणी सुरू झाल्यावरही, गाडी वेळेवर कशी येईल याचा विचार करण्याऐवजी त्या उशी-राला राजमान्यता देऊन जणू रेल्वे–अधिकाऱ्यांनी आपला व आणीबाणीचा परा-भवच मान्य केला आहे, अस म्हणाव लागत.

याचा मी विचार करू लागलो, तेव्हा वेळोवेळी सहज कानावर पडलेले काही सुख-संवाद मला आठवू लागले त्या शरसंधानातून आम्ही पतिपत्नीही सुटलो नव्हतो एक भगिनी दुसरीला कोपरान ढोसून सांगत होती, " विठोबा रुखमाईची कशी सेवा करतोय, पाहिलस ना ? मला बाई तिचा हेवा वाटतोय " यावर दुसरी कशी म्हणते, " गोन्या बायकाचे काळे नवरे असेच बायकाचे गुलाम असतात तू अशी काळीसावळी तुझा नवरा गोरापान म्हणून तू त्याची गुलाम बनलीस काळ्यांनी गोन्याची गुलामी करायची ही तर जगाची अनादी काळापासून चालत आलेली रीतच आहे " यावर पहिली म्हणाली, " पण तुझ हे विधान त्या आजी-बाईना लागू पडत नाही. त्याना ना रग, ना रूप बोलणही उग्रम–सुग्रम ! तरीही नवऱ्याला अन मुलाला त्या कशा राबवतात ते पाहिलस ना ? मला वाटत, हे नुसत रगारूपावर अवलबून नसत ज्याच्या–त्याच्या स्वभावावर अवलबून असत एखादी बाईच जहाबाज असते ती सर्वांशी तुच्छतेन वागते आणि तिच्याबरोबर जन्म काढायचा असल्यामुळ बिचारा नवराही 'सुसरबाई तुझी पाठ मऊ' म्हणून तिच्याशी जमवून घेतो तो दुसरा गोरापिट्ट नवरा बघितलास ना? बिचारा कसा गोगलगाय आहे " यावर दुसरीच उत्तर अस ' शी ! अगदीच मेला मेषपात्र आहे ! असला नवरा फुक्कट मिळाला तरी मी पत्करायची नाही त्याला ! नवरा कसा खणखणीत हवा ! "

स्त्रीस्वातत्र्य आणि नारीमुक्ती यासाठी जिवाच रान करून राहिलेल्या काही भगिनीच मला स्मरण झाल, आणि मी कपाळावर हात मारून घेतला

आणखी एक बाई दुसरीला विचारीत होती, " त्या लक्षाधीश बाई अशा एकट्या–एकट्या का ग बसतात ? त्याना आपल्या श्रीमतीचा फारच गर्व दिस-तोय असल्या बायकानी आमच्यासारख्या सामान्य लोकांबरोबर कशाला यात्रा करावी ?" दुसरीन आपली अक्कल चालवून खुलासा केला, " ती नुसती श्रीमतीची घमेंड नाही मुख्य कारण दुसरच आहे. त्या बाई फार आत्मकेंद्रित आहेत फक्त स्वत च्या सुखसोयीचाच विचार करणारी माणस अशी वागतात ज्याच्याकडून काही स्वार्थ साधायचा असेल त्याच्याशी ती दोस्ती करतात, आणि आपल काम झाल की जणू आपण त्या गावचेच नाही अशा थाटात त्याच्याकडे पाठ फिरवतात त्यांमुळ अशा माणसाना कुणी जवळ करीत नाहीत त्या बाई आपल्या नवऱ्याशी व मुलाशीही अशाच तोऱ्यात वागतात म्हणे त्यामुळ त्यांच्या-शीही त्याच पटत नाही इथ तर आपण सगळेच परके म्हणून त्या अशा एकट्या बसलेल्या दिसतात "

असल्या यात्रा वयस्क बायकानी एकट्यांनी कराव्यात की नवरा, मुलगा वगैरे घरच्या लोकांना बरोबर घेऊन कराव्यात यासबधी एका कोंडाळ्यात चर्चा चालली होती कुणी म्हणत होत्या, " घरच कुणी नसलेलच बर. आपल्याला

मोकळेपणान वावरता येत नाहीतर विनाकारण बंधनं पडतात नवरा दुबळा असला तर त्याचीच उसाभर आपल्याला करावी लागते " तर इतराच मत अस होत की, " घरच कुणी असल की तेवढाच आधार वाटतो "

या यात्रामधे लोक सामान्यत गटागटांनी सामील होतात, आणि प्रवासात आपल्या गटाबाहेरच्या लोकाशी मुळीच सबध ठेवीत नाहीत त्यामुळ नव्या मड-ळीशी मैत्री अशी सहसा होतच नाही कदाचित नवी मैत्री करण्याचं वय गेलेलं असल्यामुळही तस होत असेल

□

पुणे
३ १० ८०

अखेर एकदाची दि ३ ऑक्टोबर रोजी सायकाळी सव्वापाचला आमची 'झेलम' पुण्याला पोचली जाताना तिन जसा वेळ भरून काढला होता तसा येता-नाही ती काढील अशी आशा वाटत होती परतु सासरी जाणाऱ्या जुन्या काळच्या नववधूप्रमाणं तिची पावलं जड झाली होती (जम्मू हे तिच माहेर असल्यामुळ ती झपाट्यान जात असावी !) ती फक्त सहा तास उशीरा पोचली बहुधा यासाठीच तिला लोक 'जुलूम एक्सप्रेस' म्हणतात !

धाकटे चिरंजीव घरची गाडी घेऊन आल्यामुळ घरापर्यंतचा प्रवास मात्र निर्वेध झाला ! घरी पोचल्यानतरही अनेक दिवसपर्यंत हिमगिरीची बर्फाच्छादित शिखर डोळ्यासमोर तरळत राहिली !

(स्थळ प्रत)

# चल रे भोपळ्या टुणुक टुणुक
## अर्थात
# आमचा मैसूरचा प्रवास

आटपाट नगर होत त्याच नाव पुण त्या पुण्यात एक गाव होत त्याच नाव एरंडवणा त्या गावात एक म्हातारी रहात होती तिच स्वत'च एक ओबडधोबड दगडी घर होत दोन मुलगे, दोन सुना आणि तीन नाती यांच्याबरोबर ती मजेत रहात होती म्हातारा नवराही होता पण तो आपला नावापुरता. असून नसल्या-सारखा त्याला कुणी विचारीत नव्हत, आणि तोही कुणाच्या भानगडीत पडत नव्हता घरचा कारभार म्हातारीच्या हातात होता १९८१ सालची गोष्ट नवरात्र सपल आणि दसरा उजाडला. म्हातारीला आपल्या मुलीची आठवण येऊ लागली ती तिकडे लाब कर्नाटकात मैसूरला आपल्या कुर्गी नवऱ्याबरोबर रहात होती ती भाषाशास्त्रातली डॉक्टर आणि तिचा नवरा पुरातत्त्वशास्त्राचा डॉक्टर त्या दोघांवर म्हातारीचा फार जीव त्यातल्या त्यात लेकीपेक्षा जावयावर जास्त बऱ्याच दिवसांत तो भेटला नव्हता म्हणून म्हातारी बेचैन झाली होती ती आपल्या पोराना म्हणाली, " बाळांनो, मी आता मैसूरला जाव म्हणत्ये मला तिकीट काढून द्या " पोराना काळजी आपल्या बायकाची आणि मुलाची म्हातारी गावाला गेली की त्यांचे हाल होणार ! पण मनातुला विचार मनातच ठेवून ती म्हणाली, " म्हाताऱ्ये, कशाला सुखाचा जीव दुखात घालतीस ? आजकाल आगगाडीचा प्रवास किती धोक्याचा झालाय ! अपघात काय होतात, दरवडे काय पडतात ! गुमान पडून रहा की घरात ! "

पण म्हातारी महा चिकट. ती म्हणाली, " होय रे बाळानो, ते सार खर पण पोरीची लई सय येऊन राहिलीय. तिला भेटावस वाटतय "

धाकटा पोरगा मोठा नल्याक कुत्सितपणान म्हणतो कसा, " म्हाताऱ्ये, उगीच कशाला पोरीच नाव पुढ करतेस ? तुझा जीव तुटतोय जावयासाठी खर की नाही ? "

म्हातारी फसकन हसली. आपल्या वस्ताद पोरान आपल गुपित ओळखल, याचा तिला आनदच झाला. तरी पण आपल्या निर्णयाच समर्थन करण्यासाठी ती

म्हणाली, " होय रे माझ्या सुडक्या ! माझा जावई आहेच तसा गुणवान ! तुमच्या परीस तोच माझ्यावर जास्त माया करतो. अन अस बघ, त्याची आई नुकतीच वारलीय तेव्हा त्याच्या समाचाराला जायला हव की नको ? तुम्हाला आणि तुमच्या बापाला जगाची रीतभात पाळायची पर्वा वाटत नाही पण मला सगळ्यांना सभाळून ठेवायच आहे "

" खर आहे आजीबाई ! तुम्ही या द्वाडाच्या नादाला लागू नका आम्ही दोघी बघतो इथल सगळ, जस जमेल तस " थोरल्या सुनेन सासूला आश्वासन दिल

धाकट पोर तस इब्लिसच आपल्या थोरल्या वहिनीला उद्देशून ते म्हणाल, " बरोबरच आहे म्हणजे आम्हाला इकडे उनाडक्या करायला सार घर मोकळ ! "

म्हातारी म्हणाली, " अस म्हणू नकोस बाबा ! मी इथ असले तरी तुमच्या उनाडक्या काय कमी चालतात ? मी कधी काही विचारते तुम्हाला ? "

कोपऱ्यातल्या केरसुणीसारखा बसलेला म्हातारा हे सगळ ऐकत होता त्यान हळूच विचारल, " मीही येतो की पोरीकडे ! तुमची काही हरकत नाही ना ? "

" तुमची कशाला ब्याद ? घरात आहात तेच बर आहे " म्हातारी खेकसली

" तस नव्हे ! प्रवासात काही लागलसवरल..." म्हातारा सांगू लागला. पण त्याला मधेच चापून म्हातारी म्हणाली, " काही लागत नाही मी जाईन एकटी "

" अस काय करतेस आजी ? घेऊन जा की आजोबांना बरोबर तू लेकीच्या घरला जाणार, तूपरोटी खाणार, धष्टपुष्ट होणार, आणि आजोबा इथ तुझ्या आठवणीन खगत जाणार, आजारी पडणार ! " थोरल्या नातीन, चिमखडीन आपली अक्कल चालवली

" अग आजी, तू लेकीकडे जाणार म्हणतेस. मग वाटेत तुला वाघोबा भेटेल की. त्याला मारायला आजोबा उपयोगी पडतील तुझ्या " दुसरीन सल्ला दिला

" कुठला ग वाघोबा ? " म्हातारीन विचारल

" अग तुझ्या त्या गोष्टीतला. ' चल रे भोपळ्या टुणुक टुणुक'मधला ती म्हातारीही अशीच तुझ्यासारखी लेकीकडे गेली होती ना ? " तिसरी म्हणाली

खर आहे बायानो तुमच म्हणण ! तो वाघोबा बसलाय मिरजेला त्यान वाट अडवली तर मग पुढ जाण खुटलच." म्हाताऱ्यान सांगितल

" आजी, मग तर तू आजोबांना अवश्य घेऊन जा ते त्या वाघोबाला चागला वळणीवर आणतील त्यापेक्षा तू अस का करीत नाहीस ? ..."

" कस ग बाई ? " म्हातारीन विचारल

" लेकीकडून भोपळा आणण्याऐवजी इथनच भोपळ्यात बसून जा म्हणजे वाघोबा फसून हात चोळीत बसेल."

" कुठला भोपळा नि काय ! मी स्वतःच भोपळा झालेय! आता लेकीच्या घरी जाऊन डाएट करीन आणि शिडशिडीत होऊन येईन " म्हातारी म्हणाली

" अहो, पण माझं काय ?" म्हाताऱ्यान विचारल

" म्हाताऱ्या, तू काळजी करू नकोस. तुझही तिकीट काढून टाकतो म्हातारी-बरोबर चार दिवस तेवढीच डोक्याची कटकट कमी होईल " थोरल्या पोरान साळसूदपणान निर्णय घेतला

" आजी, आम्ही पण येणार तुझ्याबरोबर आत्याकडे ! " नातीनी एकदम गलका केला

" भल्या पहाटे उठून जाणार मी तुम्ही जाग्या झालात तर मी तुम्हाला नक्की घेऊन जाईन " म्हातारीन तोंड भरून आश्वासन दिल

" अन तुम्हालाही सागुन ठेवते प्रवासात काही फाजिलपणा करायचा नाही इतर सभ्य प्रवाशांसारख रहायच दिसेल ते खायला-प्यायला घे म्हणून हट्ट धरायचा नाही मैसूरला गेल्यावर दोन वेळेला गिळायच अन गप्प वाचत पडायच इकडे जाऊ या, तिकडे जाऊ या, अशी भुणभुण लावायची नाही वृंदावन गार्डन, चामुंडी हिल, श्रीरंगपट्टण, हळेबीड-बेलूर सगळ काही पाहून झालय तुमच कानडी लेखकाला भेटायच असल तर तुमच तुम्ही जायच माझ्या पोरीला किंवा जावयाला त्यासाठी वेठीला धरायच नाही आपल शहाणपण इतराना दाखवायचा हास्यास्पद प्रयत्न करायचा नाही. माझी पोरगी आणि जावई तुमच्यापेक्षा लाखपटींनी शहाणी आहेत त्यांच्या नखाची सर तुम्हाला यायची नाही " म्हातारीन म्हाताऱ्याला बजावल

" अगदी मान्य ! पिंडाएवढा भात खाऊन मढ्यासारखा पडून राहीन " म्हाताऱ्यान तिला आश्वासन दिल

" तर मग ठीक आहे ! " म्हातारी उद्‌गारली

आणि ठरल्याप्रमाण म्हातारा-म्हातारी आपल्या मुलीकडे जायला निघाली मुलाच्या गोष्टीतली म्हातारी एकटीच मुलीच्या गावाला जाते पण आम्ही मात्र दोघही निघालो अशा प्रकारे आमची मैसूर-यात्रा सुरू झाली

☐

यात्रावर्णन सुरू करण्यापूर्वी ज्याच्याकडे आम्ही निघालो होतो त्या आमच्या सुकन्येची आणि सुजामाताची थोडी माहिती देण उचित होईल आजकाल ' सुकन्या ' हा शब्द स्त्रीच्या आयुष्यात फक्त एकदाच वापरला जातो — लग्नपत्रिकेत ! तो वापरही अलीकडेच, स्त्री-पुरुष-समानतेची भावना जागृत झाल्यापासून होऊ लागला आहे वराला उद्देशून जर अमक्याचे ' सुपुत्र ' असा गौरवपूर्ण उल्लेख केला जातो, तर वधूला उद्देशून अमक्याची ' सुकन्या ' असा उल्लेख का करू नये, या भावनेतून हो वापर सुरू झाला आहे वस्तुत मुलाच्या संदर्भात जर आदरार्थी बहुवचन

वापरलं जातं तर मुलीच्या बाबतीतही अमक्याच्या 'सुकन्या' असं आदरार्थी बहुवचन वापरणं उचित ठरेल. परंतु अजून तिकडे कुणाचं लक्ष गेलेलं दिसत नाही. काही स्त्रीमुक्तिवादी महिला आपल्या नवऱ्याविषयी बोलताना जुनाट पद्धतीनं 'माझे मिस्टर' किंवा 'आमचे हे' असा उल्लेख न करता 'माझा नवरा' असा रोखठोक व समतावादी शब्द वापरतात, त्याचं या संदर्भात स्मरण व्हावं.

पण मी माझ्या मुलीला उद्देशून 'सुकन्या' हा शब्द वापरलाय तो केवळ उपचार म्हणून नव्हे. माझी खरोखरीच तशी भावना आहे. जिच्यामुळं मला आयुष्यात धन्यता अनुभवायला मिळाली, अशी ती मुलगी आहे. तिच्या जडण-घडणीस माझा काही हातभार लागलाय असं मला वाटत नाही. तिच्या जन्माला मी कारणीभूत झालो, एवढंच. पण लोक जेव्हा मला म्हणतात की, "तुमची मुलगी किती छान आहे!" तेव्हा मला फार बरं वाटतं. छान म्हणजे सुंदर नव्हे. माझ्यासारख्याची मुलं सुंदर होणार कशी? खाण तशी माती! परंतु कधीकधी चमत्कार घडतो. कोळशाच्या खाणीत हिरा सापडतो. तर ती मुलगी अशी छान आहे. सर्वांनाच हवीहवीशी वाटणारी. तिच्या मायाळू स्वभावाची कल्पना बहुधा मला तिच्या लहानपणीच आली असावी. म्हणून तिचं शाळेतलं नाव जरी राज्यश्री असलं तरी मी तिचं लाडकं नाव ठेवलं माया, आणि ती सर्वांचीच माया बनली. तिच्याभोवती मित्रमैत्रिणींचा गोतावळा अगदी लहानपणापासून जमू लागला. त्यात लहान मुलांपासून म्हाताऱ्यापर्यंत सर्व वयाचे, जातीचे, धर्माचे लोक असतात. ते लोक माझं लिखाण वाचणारे नसतात. त्यामुळं मायाचे वडील म्हणूनच ते मला ओळखतात. अशी ही माया पुण्याच्या डेक्कन कॉलेजातून भाषाशास्त्र घेऊन एम. ए. झाली. तिथं ती शिकत असताना त्याच कॉलेजात पुरातत्त्वशास्त्रात पीएच. डी. करणाऱ्या कोकणमाडा कार्यप्पा सुब्बय्या कोडव (कुर्गी) तरुणाचं तिच्यावर मन बसलं, आणि त्याचं लग्न झालं. जनरल करिअप्पा, तिमय्या वगैरे सरसेनापती ज्या कोडव जमातीचे आहेत त्याच जमातीचे डॉ. सुब्बय्या हेही आहेत. या जमातीचं वैशिष्ट्य असं की ती स्वतःला हिंदू समजत असली तरी हिंदू धर्माची कोणतीच वैशिष्ट्यं तिच्यात नाहीत. मूर्तिपूजा नाही, जातिभेद नाही, धर्मग्रंथ नाही की ब्राह्मणाला, संस्कृत मंत्रांना, विधींना स्थान नाही. सगळे कोडव क्षत्रिय आहेत. सैन्यात भरती होणाऱ्यांची संख्या अधिक. त्याखालोखाल कॉफी, वेलदोडे वगैरेंचे मळेवाले. शिक्षणक्षेत्रात शिरून तिथं काही कर्तबगारी दाखवावी, ही ब्राह्मणी वृत्ती फार थोड्या लोकांमध्ये आढळते. त्यामुळं विद्याव्यासंगी डॉ. सुब्बय्यांचं कौतुक त्यांच्या जमातीतल्या लोकांना विशेष वाटतं. मायानं कन्नड आणि कोडगू (कुर्गी) या भाषा आत्मसात केल्या, आणि तीही कोडव बनली. त्यांच्या लग्नाला जोरदार विरोध करणारे कोडव लोकच तिचे प्रशंसक बनले. तिच्या सासूला मुलगी नव्हती. तिनं मायालाच मुलगी मानलं. कोडव स्त्रिया सौंदर्याबद्दल प्रसिद्ध आहेत. असं

असून डॉ सुब्बय्यांना माया आवडली यावरून तिच्यात काहीतरी वेगळ आकर्षण असल पाहिजे, हे आमच्या लक्षात आल

कोडव लोक अत्यत शूर, स्वाभिमानी, बाणेदार, हुशार म्हणून प्रसिद्ध आहेत डॉ सुब्बयांमधे आम्हाला हे सारे गुण आढळले शिक्षणक्षेत्रात चालणाऱ्या भ्रष्टाचारापासून ते कटाक्षान दूर राहिले त्याची त्यांना किमतही मोजावी लागली परतु त्याचा त्यांना पश्चात्ताप होत नाही कर्नाटक विधान परिषदेतील विरोधी पक्षाचे जहाल नेते व भाजपचे पुढारी श्री ए के सुब्बय्या त्यांच्या गावाशेजारच्याच गावात रहाणार व त्याच मित्र आहेत मुख्य मत्री गुडूराव याच्याशीही त्याची ओळख आहे अनेक लक्षाधीश कॉफी–मळेवाले त्याचे स्नेही आहेत परतु यापैकी कुणाच्याही ओळखीचा फायदा आपण घ्यावा अस त्याच्या मनातही आल नाही. त्याच्या या तत्वनिष्ठ वृत्तीमुळ मला ते नेहेमीच आवडतात प्रत्येक सासूला तसा आपला जावई फार थोर वाटतो त्याप्रमाण माझ्या पत्नीनही त्याना आपला मुलगाच मानल त्यांनीही तिच्यावर अतोनात प्रेम केल ते तिला इग्रजीतसुद्धा 'आई'च म्हणतात आपल्या या आई'शी ते चक्क मराठीत बोलतात त्याच ते मराठी फक्त त्यांच्या आईलाच कळत, चार दिवस त्याच्याकडे रहाव, त्याना मांसमच्छर करून घालाव ( ती मडळी गोडधोड खाणारी नाहीत ! ), म्हणून प्रवासाची दगदग सोसून ती वर्षा-दोन वर्षांनी न चुकता मैसूरला जाते मैसूरला आम्हाला ओळखणार कुणी नसल्यामुळ तिथ भरपूर निवांतपणा मिळतो म्हणून मग मीही तिच्याबरोबर जातो, आणि पधरावीस दिवस राहून भरपूर विश्रांती घेतो. तिथून कूर्गलाही जाऊन डॉ सुब्बयाच्या घरच्या लोकांना भेटून येण्याचा आमचा एक कार्यक्रम असतो डोंगर–दऱ्या आणि वन–अरण्य यांनी नटलेली कूर्गची भूमी कुणाचही मन आकर्षित करील अशीच आहे तिथ कितीदाही गेल तरी कटाळा येत नाही तर आमच्या मैसूरयात्रेची अशी आहे पार्श्वभूमी

कुणा ज्योतिष्यान तस मला सागितलेल नाही, पण माझा असा अदाज आहे की, माझ्या पायावर चक्र असाव ते चक्र मला एका जागी वसू देत नाही सारख फिरवीत असत जेव्हा रीतसर प्रवास सुरू झाला नव्हता तेव्हाही एका जागी मला स्वस्थ बसवत नसे. शाळेतदेखील बसल्या जागी माझी चुळबुळ चालू असायची काळेमास्तर चिडून म्हणायचे, 'शिरप्या, तुझ्या गाडीत किडा वळवळतोय काय र ?'' आजच्या सुसस्कृत वाचकाना हे वाक्य अगदीच असभ्य, असस्कृत, गावढळ किंवा अश्लीलही वाटेल पण आम्ही ग्राम्य सस्कृतीत वाढलेली मुल आम्हाला ते ऐकताना किंवा मास्तरांना ते उच्चारताना त्यात काहीच खटकत नव्हत आता इतक्या वर्षांनतर—म्हणजे पन्नास वर्षं शहरी सस्कृतीत आणि गांधीवादी–राष्ट्रवादी वातावरणात काढल्यानतर ते वाक्य माझ्या कानाना चमत्कारिक वाटत मी स्वत'ला विचारतो काळेमास्तराना जे म्हणायच असे ते आपल्याला आजच्या आपल्या

शब्दांत कसं म्हणता येईल ? त्यांचा अभिप्राय सभ्य, नागर भाषेत आपल्याला कसा व्यक्त करता येईल याचा जेव्हा मी विचार करू लागतो, तेव्हा मात्र माझी मती कुंठित होते. कारण तो अर्थ चपखलपणे व्यक्त करणारं संभावित वाक्यच मला सुचत नाही

तर अशी ही आमची मूळ प्रकृती आणि प्रवृत्ती त्यामुळे योग्य संधी मिळताच जो प्रवास सुरू झाला तो अजून काही थांबत नाही ऐन जवानीत प्रवास म्हटला की अंगावर रोमांच उभे रहात आता साठी उलटल्यापासून अंगावर काटा उभा रहातो देशात आणि परदेशात मिळून हजारो मैलांचा प्रवास आजवर केला. कधी कंटाळा आला नाही त्यापैकी बहुतेक प्रवास तिसऱ्या वर्गाचा होता तोबा गर्दी, आगगाडीत किंवा मोटारीत घुसण्यासाठी करावा लागणारा एल्गार, जागा मिळवण्यासाठी कराव्या लागणाऱ्या मारामाऱ्या, खाण्यापिण्याचे हाल, रात्री-अपरात्री फलाटावर जीवघेण्या थंडीत अथवा भाजून काढणाऱ्या उन्हात गाडीची प्रतीक्षा करीत घालवावे लागणारे कंटाळवाणे तास, गाडी चुकेल या आशंकेने जिवाची होणारी घालमेल, गाडी वेळेवर पोचेल की नाही या काळजीने येणारी अस्वस्थता. . एक ना दोन, हजार अडचणी त्या प्रवासात असत पण तरीही प्रवास म्हटल की जुना सगळा अनुभव विस्मृतीत बुडून जाई, आणि जणू काही आपण प्रवासाच्या अडचणींची दगदग कधी सोसलीच नव्हती अशा ताजेपणाने मी प्रवासासाठी एका पायावर तयार होई चारसहा महिने प्रवासाशिवाय सुने गेले की माझं मन दैनंदिन कामांतून उडून जाई जुन्या कवींची परिभाषा वापरायची, तर माझं मुखकमल ( अर्थात कृष्णकमल ! ) कोमेजून जाई बायकोच्याही लक्षात ती गोष्ट येई आणि ती चिंतायुक्त स्वरात म्हणे, " तुम्ही बऱ्याच दिवसात कुठे बाहेर गेला नाहीत. त्यामुळे तुमचं चित्त थाऱ्यावर दिसत नाही कुठेतरी जाऊन या ना ! ' आणि मग मी प्रवासासाठी काहीतरी सबब शोधू लागे सुदैवाने मला ती सबब मिळूनही जाई मी प्रवासाला बाहेर पडे, आणि ताजातवाना होऊन घरी परत येई

जेव्हा माझ्या शरीरात टवटवीत जोम होता आणि मनात प्रवासाचा अदम्य उत्साह होता तेव्हा सौभाग्यवतीला घरातून बाहेर पडणं शक्य नव्हतं मुलांच्या शाळा, घरची कामं, बाळंतपणं, आजारपणं यातच ती गुरफटलेली असे पुढे मुलं मोठी झाली त्यांच्या बायका आल्या त्यांना मुलं झाली संसाराची जबाबदारी त्यांना (म्हणजे सुनांना आणि मुलांना) समजू लागली यामुळे सौभाग्यवतीला बाहेर हिंडायला फुरसत मिळू लागली खरं तर तिलाही प्रवासाची खूप आवड पण संसाराच्या जबाबदारीमुळे तिला ती कधी फारशी पुरी करता आली नाही आता ती कुठेही जायला तयार असते. प्रवासाचे बेत आखावेत म्हणून तिचं सूचक शब्दात माझ्यामागे टुमणं लागलेलं असतं पण मी आता शरीराने नसलो तरी मनाने खूप थकलोय घर सोडून कुठे जायला मनच तयार नसतं तसा मी पूर्वीही घरकोंबडाच

होतो दुसऱ्याच्या घरी जाऊन चकाट्या पिटण मला कधी जमलच नाही मोहनराव शहाणे, विठ्ठलराव घाटे, द रा गोमकाळे, गो प नेने यांच्यासारखी बुजुर्ग मडळी मित्रत्वाच्या नात्यान 'श्रीरघुवशा'त गप्पा मारायला नियमान येत; पण मी त्याच्या घरी कधी जात नसे याच त्यांना प्रारभी वैषम्यही वाटे, आणि त्याच्या घरच्या मडळींना माझ्या त्या उद्धटपणाचा रागही येई पण हळूहळू त्याच्या लक्षात आल की, माझ्या त्या वागण्यात उर्मटपणा नसून एक प्रकारचा सकोच किंबहुना न्यूनगडच आहे म्हणून त्यांनी मला माफ करून टाकल

तर असा मी मनान थकल्यामुळे आणि प्रवासातल्या दगदगीच प्रमाण फारच वाढल्यामुळे मी बाहेर पडायला नाखूष असतो पण आपण आपल्या धर्मपत्नीला कधी प्रवासाचा आनद लुटू दिला नाही, या अपराधभावनेमुळे मी ती नाखुषी फारशी व्यक्त होऊ देत नाही तशी ती धडधाकट असती तर मी तिला सागितल असत, "आता मी घर संभाळतो तू जाऊन मनमुराद भटकून ये नाहीतरी कितीतरी बायका यात्रा कपन्यातून एकट्या प्रवासाला जातातच की नाही ?" सौभाग्यवतीची मनाची उभारी इतकी प्रचड आहे, की अल्पशिक्षित असूनही जगाच्या पाठीवर कुठेही जाऊन यायला ती मनान एका पायावर तयार असते पण दुर्दैवान तिचा एकच नव्हे, तर दोन्ही पाय अधू आहेत गुडघ्यांच्या दुखण्यान तिला अगदी हैराण करून सोडलय त्यामुळ बरोबर कुणीतरी माणूस असल्याशिवाय तिला घराबाहेर पडता येत नाही आणि बाईच्या उतारवयात स्वत च्या नवऱ्याखेरीज हक्काच दुसर कुठल माणूस असू शकणार ? त्यामुळे दरवेशान अस्वलाला फरफटत ओढून न्याव त्याप्रमाणे मी तिच्या मागोमाग जायला तयार होतो मात्र त्याबद्दल माझी तक्रार नाही वैवाहिक जीवनाच्या पूर्वार्धात आपण तिला वेठीला धरल, आपल्या इच्छा तिच्यावर लादल्या, त्याची परतफेड करण्याची सधी आपल्याला मिळते आहे, तर ती हातची जाऊ देऊ नये अस मला वाटत नाटकामधे राजाची भूमिका करणाऱ्याला कधीतरी गुलामाची भूमिका करावी लागते, आणि गुलाम राजा बनतो तसच हे समजाव

'राळ्याचा भात पक्तीला, म्हातारा नवरा गमतीला' अशा पक्ती असलेल एक कवन आम्ही लहानपणी म्हणत असू त्याचा अर्थ तेव्हाही कळला नव्हता, आणि आजही पुरता कळलाय अस म्हणता येत नाही राळ्याचा भात तर कधी खाल्लाच नाही, आणि म्हातारा नवरा कसा काय गमतीला उपयोगी पडत असेल त्याचीही नीटशी कल्पना स्वत म्हातारा नवरा बनल्यावरदेखील अजून आलेली नाही किंबहुना म्हातारा नवरा हे बायकोच्या गळ्यातल एक असह्य लोढणच असत, आणि ईश्वरकृपेन ते शक्य तितक्या लौकर गळ्यातून सुटून जाव, असच प्रत्येक बायकोला वाटत असल पाहिजे पूर्वसस्कारांमुळ तस वाटत नसल्यास ते वाटण्याइतकी मुक्ती तिला लाभली पाहिजे, हे माझ प्रामाणिक मत आहे स्त्री

ही पुरुषाच्या मार्गातील धोंड आहे किंवा नाही हा पुरातन काळापासून चालत आलेला सनातन प्रश्न आहे परतु म्हातारपणी मात्र पुरुष हाच स्त्रीच्या मार्गातला सर्वांत मोठा धोंडा बनतो, असा माझा स्वानुभव आहे नवरा म्हातारा झाल्यावर त्याची बायको जर चागली-धडधाकट उत्साही असेल तर त्याच्यासारखा सुखी पुरुष जगात विरळा ! आमचे मधूभाऊ तसे भाग्यवान पुरुष आहेत माझी स्थिती त्याच्याहून अगदी भिन्न आहे तसा मी तत्त्वत किंवा बाह्यत तरी उदार पती आहे पत्नी ही पतीच्या मार्गातील धोंड आहे अस मी कधी मानलच नाही कारण ती धोंड असती तर तिन माझा ससार सुरळीत चालवण्याऐवजी तो बुडवूनच टाकला असता परतु स्त्री ही पुरुषाच्या मार्गातील धोंड असली किंवा नसली, तरी म्हातारी व अधू बायको ही तिच्या नवऱ्याच्या प्रवासात मोठीच डोकेदुखी बनते यात मात्र मुळीच शका नाही स्वत चच शरीर सभाळण जेव्हा मुष्किल होत तेव्हा तसलच दुसर एक अपग शरीर सभाळण अधिकच कटकटीच बनणार, हे उघड आहे पण त्याला इलाज नाही बायको म्हातारी झाली म्हणून प्रवासासाठी एखादी देखणी चुणचुणीत तरुणी जवळ बाळगण सगळ्यानाच शक्य नसत माझ्यासारख्याच्या बाबतीत तशी शक्यता असली तरीही ते घडण अशक्य असत नाही म्हटल तरी हिंदू सस्कृतीचे प्रभाव असे सहजासहजी पुसले जातात थोडेच ! आमच्या त्या सस्कृतीन स्त्रीला गुलामगिरीत जखडून ठेवलय, अस आजचे बुद्धिवादी, समाजप्रबोधनकार उठता-बसता आमच्या कानीकपाळी ओरडत असतात पण अधू, आजारी, कुरूप बायकोशी जन्मभर निष्ठेन ससार करणारे लक्षावधी पुरुष याच सस्कृतीन निर्माण केले आहेत याची त्याना कल्पना नसल्यामुळ त्यांची सारी पोपटपची वाया जाते व्यवहारचतुर अशिक्षितही त्यांच्या त्या बडबडीला फारशी किंमत देत नाहीत कारण ती सारी बुद्धी उधार-उसनवार घेतलेली असते, हे त्याना चटकन कळत

आता या वयात बायकोबरोबर प्रवास करायला मी नाखूष असतो याच कारण मात्र अगदीच वेगळ आहे प्रवासात बायको बरोबर असली की मला चाळवल्यासारख होत भलतेसलते विचार मनात थैमान घालू लागतात तिला खेटून बसाव, तिचा हात हातात घ्यावा, उगीचच तिच्या अगाशी आपल अग घुसळाव. . आणि असलच काहीबाही मनात येत मर्कटचेष्टा सुचतात बायको लाजेन अर्धमेली होते "तुम्हाला म्हातारचळ लागलाय ! अहो, मनाची नाही तर जनाची तरी !' अस म्हणून ती जितक्या जोरान दूर लोटू लागते, तितक्याच जोरात मी तिच्याकडे आकर्षित होत जातो आता आली का पचाईत ? तसा मी सभ्य पुरुष आहे, याबद्दल अजून तरी कुणी शका व्यक्त केलेली नाही परस्त्रीकडे तर मी मान वर करूनही कधी बघत नाही (त्यामुळे अनेक परस्त्रिया माझ्यावर नाराजही झाल्या आहेत ) मुला-नातवडांनी भरलेल्या घरात तर मी अगदी बऱ्याखुऱ्या साधूसारखा, धुतलेल्या तांदळासारख चारित्र्य असणारा पुरुष जसा वागेल तसा वागतो पण प्रवासातच

माझ्या मानगुटीवर कुठलं भूत बसतं, कोण जाणे ! बहुधा तरुणपणी एकटयानं प्रवास केल्यामुळे तसं घडलं असावं. बायकोलाही ते कोडं उलगडलेलं नाही. इतका शालीन, सभ्य नवरा प्रवासातच असा कानात वारं शिरलेल्या खोंडासारखा का गुण उधळतो ?

पहिल्या वर्गाचा कुपे ( दोन उताळूंचा डबा ) मिळालेला असेल, तर त्या मर्कटचाळयांना ऊतच येतो. भर दिवसा चांदणं फुलतं ! अर्थात कुपेमधे आपली बायको किंवा तेवढया सलगीची मैत्रीण असली तरच गमत ! आता आमच्या लैंगिक आयुष्यात लग्नानंतर बायकोखेरीज दुसरी बाईच आली नाही, त्यामुळं मैत्रिणीची लज्जत आम्हाला सांगता येणार नाही. आम्हाला अशी मैत्रीण का मिळाली नाही ? वेहेरेसाहेब म्हणतील, " आधी आरशात तोंड बघा ! " अहो, ते तर आरशात न बघताही लोकांच्या -- विशेषत बायकांच्या -- चेहेऱ्यावरच्या भावनांतच आम्हाला दिसतं. पण बदफैली व्हायला गोरामोरा रंग आणि देखणं रूपच हवं असतं असं नाही. तसं असतं तर सगळेच देखणे स्त्रीपुरुष साधु-संत, सती' साध्वी वगैरे झाले असते. तसं घडत नाही ही देवाची केवढी कृपा !

आता या कुपेवरून कुपेतला एक चित्तथरारक प्रसंग आठवला. कुपेमधे परकी बाई असेल, तर भित्र्या पुरुषाची कशी त्रेधातिरपीट उडते, तो स्वानुभवाचा किस्सा सांगण्यासारखा आहे. १९६३ सालची गोष्ट आहे. म्हणजे मी ऐन जवानीत होतो, त्या काळची गोष्ट. हैदराबादला भारत-सरकारतर्फे तीन आठवडयांचं एक अखिल भारतीय स्वरूपाचं लेखक-अनुवादकांचं शिबिर (वर्कशॉप) चालणार होतं. मराठीचा प्रतिनिधी म्हणून मला निमंत्रण होतं (दुसरे प्रतिनिधी श्री. वामन चोरघडे आले नव्हते. बहुधा मला आपल्या पंक्तीला बसवल्याचं त्यांना आवडलं नसावं ! ) पहिल्या वर्गाचा प्रवास ओघानंच आला (आजही पहिल्या वर्गाचा प्रवास मी फक्त दुसऱ्यांच्या-- सरकार, संस्था किंवा स्वतःची मुलं यांच्या— जिवावरच करीत असतो ! ) स्टेशनवर जाऊन पहातो तर माझं आरक्षण एका कुपेत--कुपीसारखा छोटा डबा असतो म्हणून त्याला 'कुपे' म्हणतात, अशी कोटी सोपानदेवांना सुचली तर मला आश्चर्य वाटणार नाही. ते असो. तर कुपेतला खालचा बाक (बर्थ) एका भद्र महिलेनं माझ्या आधीच व्यापला होता. बाई नाकीडोळी नीटस—किंबहुना देखणी व तरुण होती. कुणातरी लष्करी अधिकाऱ्याची ती पत्नी असावी. तिचा नवरा तिला निरोप द्यायला आला होता. मी डब्यात चढून वरच्या बाकावर माझं अंथरूण पसरलं. परंतु माझ्या अस्तित्वाची दखल त्या जोडप्यानं घेतली नाही. घरात वावरणाऱ्या रामा गडयाची दखल मुंबईतल्या श्रीमंतांच्या बायका कपडे बदलतानाही घेत नाहीत असं ऐकलंय. त्या जोडप्याच्या लेखी माझी किंमत बहुधा वढीही नसावी. प्रथम मला ते थोडसं अपमानास्पद वाटलं. पण नंतर मात्र माझी छाती धडधडू लागली. एका परक्या बाईच्या सान्निध्यात एकटयानं सारी रात्र

काढायची म्हणजे एक मोठं दिव्यच होतं या बाईला माझ्या सभ्यपणाविषयीच शंका आली आणि तिनं साखळी ओढून गाडी थांबवली, किंवा आरडाओरडा करून लोक गोळा केले, तर शिबिर राहील बाजूला, आणि आपल्याला येरवड्याला जाऊन खडी फोडावी लागेल ही भीती अगदीच काल्पनिक होती हे खरं, पण तिनं माझ्या जिवाला एवढा घोर लावला की मी ती सारी रात्र जागून काढली गंमत अशी की, ती सुंदरी मात्र आरामात घोरत होती !

असले पुचाट आम्ही ! आमचं सारं शौर्य, सारं पौरुष फक्त आमच्या बायकोसमोर ! ती प्रवासात जवळ असली की त्या पौरुषाला एवढी भरती का येत असेल याचा उलगडा मात्र मला कधी झाला नाही अर्थात हा सगळा धोका मुख्यत: पहिल्या वर्गाच्या प्रवासात असतो दुसऱ्यातिसऱ्या वर्गाच्या गर्दीत फाजिलपणाचे विचार मनात आणायलाही सवड नसते त्यामुळे आजपर्यंत मोठ्या इज्जतीनं घालवलेल्या आयुष्यावर उल्लूपणाचा कलंक लागू नये म्हणून मी सौभाग्यवतीसह प्रवास करताना दुसरा वर्ग अधिक पसंत करतो. परंतु नवश्रीमंत चिरंजिवांना आपल्या आईवडिलांनी भिकारड्यांसारखं दुसऱ्या वर्गातून प्रवास करणं आपल्या 'शान के खिलाफ' वाटतं त्यामुळं ते आमच्या इच्छेविरुद्ध पहिल्या वर्गाचं तिकिट काढून हातात ठेवतात खरं तर आपल्या साधुसंतांनीच असं सांगून ठेवलय की, सभ्य पुरुषानं स्त्रीपासून नेहेमी चार हात दूर रहावं कारण नारी ही आग असून पुरुष हे तिच्या सान्निध्यात वितळणारं लोणी आहे ते काही खोटं नाही माझ्या मनात दुसराच प्रश्न येतो मी–मी म्हणणाऱ्या वीरपुरुषानाही जी नारी केवळ आपल्या सान्निध्यानं वितळवून टाकते तिला अबला, गुलाम वगैरे समजणं कितपत उचित होईल ? आणि स्त्रीच्या संपर्कात येताच वितळण्यात किंवा विरघळण्यात एक और मजा, गंमत असते, असं कुणा चंगीभंगी पुरुषानं म्हटलं, तर आमचे संत त्याचं तोंड कसं बंद करणार ?

" अहो, पण तुम्ही प्रवासाबद्दल लेख लिहायला बसलाय की स्त्रीपुरुषसंबंधांचं चऱ्हाट वळायला ?" वाचक विचारतील

त्यांचा प्रश्न योग्य आहे पण तो थोडासा कालबाह्य आहे आजकाल ज्याप्रमाणं काव्य नसलेली कविता, कथानक नसलेली कथा, अर्थ नसलेलं अर्थशास्त्र, चित्र नसलेली चित्रकला याची फॅशन आहे, त्याप्रमाणं प्रवास नसलेलं प्रवासवर्णन हेच आज सर्वांत उत्कृष्ट व श्रेष्ठ समजलं जातं, हे बहुधा त्यांना माहीत नसावं आपण अगदीच मागासलेले लेखक समजले जाऊ नये म्हणून मी ही शैली अलीकडे स्वीकारली आहे.

" म्हणजे नमनाला घडाभर तेल लावायची शैलीच की नाही ? आता तुमचं नमन आटोपतं घ्या, आणि मुद्द्याला हात घाला !"

ही सगळी पार्श्वभूमी समजल्याखेरीज पुढच्या प्रवासवर्णनाला काही अर्थच उरणार नाही म्हणून हा प्रपंच ' पण थांबा हा प्रपंच अजून संपलेला नाही

आमचा तो तथाकथित प्रवास म्हटला तर अवघड, म्हटला तर सोपा, म्हटला तर जवळचा, म्हटला तर दूरचा, म्हटला तर मनोरंजक, म्हटला तर कंटाळवाणा असा होत. जेमतेम हजार किलोमीटरचा व अठ्ठावीस तासांचा प्रवास आजकाल काही फारसा अवघड, दूरचा अथवा कंटाळवाणा समजला जात नाही विशेषत जेव्हा तुम्ही आपल्या गावी गाडीत बसता आणि वाटेत कुठेही न थांबता गंतव्यस्थानी जाऊन उतरता, तेव्हा तो प्रवास अगदीच सोपा, किंबहुना मिळमिळीत असतो पण जेव्हा खुद्द तुमच्या गावच्या स्टेशनवर परगावहून येणाऱ्या गाडीत तुम्हाला जागा मिळवायची असते आणि पुन्हा एकदा ती गाडी सोडून देऊन दुसऱ्या गाडीत जागा पकडायची असते तेव्हा तो प्रवास म्हणजे एखाद हिमालय-शिखर सर करण्याइतकाच अवघड असणार,हे कुणालाही न सांगता समजेल आणि ज्याला सांगितल्यावरही ते समजणार नाही तो स्थितप्रज्ञ तरी असला पाहिजे किंवा महामठ्ठ तरी असला पाहिजे

पण हे सारं विवेचन थोडं मोघम झालं अधिक स्पष्ट शब्दात सांगायचं म्हणजे आम्ही पुण्याहून मैसूरला गेलो त्या प्रवासाची ही कर्मकथा आहे एके काळी पुण्याला गाडीत बसायच आणि थेट बंगळूरला जाऊन उतरायच तिथून बसनं, टॅक्सीनं किंवा आगगाडीनं मैसूर गाठायच, असा थोडा द्राविडी प्राणायाम करावा लागे

द्राविड देशात जायच म्हणजे थोडाफार द्राविडी हिस्का सोसावा लागणारच, असं आम्ही गृहीत धरलं होतं पुढे मिरजेपर्यंत ब्रॉडगेज झाली, आणि पुणेकरावर दुर्दैव ओढवलं आता मुंबई–नागपूरहून थेट आगगाड्या कोल्हापूरपर्यंत धावू लागल्या बिचारा पुणेकर उतारू 'चिउताई, चिउताई, दार उघड' म्हणून आरा-मात डब्यात बसलेल्या लोकांना दार उघडण्याची विनंती करणारा, पावसानं भिज-लेला कावळा बनला हे तर काहीच नाही मिरजेच्या पुढे बेळगाव, गोवा, हुबळी, मैसूर, बंगळूरला जायच म्हणजे मिरजकराच्या दयेवर अवलंबून रहायची पाळी आली आता असं पहा आम्हाला ८ नोव्हेंबरला मैसूरला जायच होत आम्ही १४ ऑक्टोबरलाच आरक्षण करून ठेवलं, दहाबारा दिवसांनी स्टेशनवर जाऊन कारण पुणे स्टेशनचा चौकशी–फोन नेहेमीच गुंतलेला असतो बहुधा ती हुशार मंडळी त्याचा रिसीव्हर कायमच बाजूला काढून ठेवीत असावीत !

चौकशी केली तेव्हा उत्तर मिळालं, ' वेटिंग लिस्टवर तुमचा प्रथम क्रमांक आहे. तुम्हाला नक्कीच जागा मिळेल बेलाशक जा तुम्ही ! " प्रतीक्षायादी म्हटली की माझ्या जिवाचा थरकाप होतो कारण ती यादी तयार करणारे आणि तिची अमलबजावणी करणारे बहुधा अप्रामाणिक, लाचखाऊ लोक असतात, अशी

का कोण जाणे, माझी दृढ समजूत होऊन बसलीय जागा मिळणार नाही असं त्यांनी सांगितलं असतं, तर कदाचित त्या दिवसाचं तिकिट रद्द करून पुढच्या तारखेचं तिकिट काढलं असतं पण उतारूंच्या उपयोगी पडण्यासाठी आगगाडी, एसटी, विमान वगैरे सेवा अथवा त्या सेवांचे संचालक (सेवक तर निश्चितच नव्हेत !) असतात, ही समजूत त्यांनी कधीच खोटी पाडली आहे शेवटपर्यंत उतारूंचा जीव टांगलेला रहावा आणि त्यानं हात ओले केल्यावर त्याचा जीव भांड्यात पडण्याची तरतूद करावी, अशी बहुधा सरकारनंच या कर्मचाऱ्यांना सक्त ताकीद देऊन ठेवलेली असावी नाहीतर जगाच्या कुठल्याही कोन्याकोपऱ्यात असलेल्या व्यक्तीशी हां हां म्हणता संपर्क साधण्याच्या या दिवसात चोवीस दिवस वाट पाहिल्यावरही पुण्याहून मिरजेला संपर्क साधता येऊ नये, या दुर्दैवाला काय म्हणावं ? मंत्री, आमदार, खासदार, पुढारी, धनिक वगैरे लोकांना अर्थातच या गोष्टीचा त्रास होत नसणार. त्यामुळे त्यात काही सुधारणा झाली पाहिजे, असा विचारही त्यांच्या मनात येत नसावा

हिंदी चित्रपटात कथेचा शेवट काय होणार याचा थोडाही अंदाज प्रेक्षकाला येऊ नये याची खबरदारी घेतली जाते त्याप्रमाणं आपल्या उतारूंना 'सस्पेन्स'चा चित्तथरारक अनुभव मिळवून देण्यासाठी, शेवटच्या क्षणापर्यंत त्यांना काहीही कळू नये याची कक्कळ खबरदारी घेतली जाते आयुष्यात मला या अनिश्चिततेचा जेवढा ताण सहन करावा लागला, तेवढा प्रत्यक्ष दुर्घटनेचाही सहन करावा लागलेला नाही मिरजेला आपल्याला जागा मिळणार की नाही याची कसलीच खात्री पहिल्या वर्गाचं तिकिट काढूनही मला मिळाली नव्हती दुसऱ्या वर्गानं गेलो असतो तर पन्नाससाठ रुपयात काम भागलं असतं त्याऐवजी सव्वादोनशे रुपये मोजूनही पदरात फक्त अनिश्चितताच पडली होती नागपूरहून येणारी 'महाराष्ट्र एक्सप्रेस' पुण्याला सकाळी ६-१० ला येते, आणि ६-४० ला रवाना होते म्हणजे घरातून ५-४५ ला निघालं पाहिजे त्यासाठी निदान पहाटे पाच वाजता उठलं पाहिजे म्हणून गजर लावून ठेवला पण भावी अनिश्चिततेनं मन इतकं व्यग्र होतं, की चारलाच जाग आली गाडी वेळेवर आली आणि वेळेवर सुटली स्टेशनवर नांदेडचे प्रा० पा श्री घारे भेटले म्हणाले, "तुम्ही नांदेडला अजून आला नाहीत ?"

मी म्हणालो, "नांदेडहून विद्वानांची निर्यात होते त्याला आयातीची गरज नाही"

"छे छे ! तसं नाही मी तुम्हाला निमंत्रण मिळण्याची व्यवस्था करतो"

प्रा० घारे यांनी मला प्रेमपूर्वक आश्वासन दिलं पण त्यानं मी मनातल्या मनात उलट हादरलोच इतक्या लांबच्या, दगदगीचा प्रवास करायला मन तयार नसतं पण पैसा, प्रसिद्धी याचा मोह इतका जबरदस्त असतो, की एखाद्या गाफील क्षणी मी तसलं आमंत्रण कबूल करून बसतो; आणि मग पस्तावतो प्रा० घारे

यांना खरोखरीच माझी आठवण राहिली तर माझ्यावर पस्तावण्याची पाळी नक्कीच येणार !

डब्यात किर्लोस्करवाडीचे एक तरुण इंजिनियर होते त्यांनी माझं नाव विचारलं मी ते सांगितल्यावर ते म्हणाले, "म्हणजे तुम्ही श्री ज जोशी काय ?" त्यांच्या त्या प्रश्नानं खरं म्हणजे मी थिजून बर्फ व्हायला हवं होतं पण हा प्रश्न इतक्यादा विचारला जातो, की त्या बाबतीत आता माझं मन बोथट झालंय मी शांतपणानं सगळा खुलासा करतो परंतु बहुधा माझं लिखाण कुणाच्या वाचनातच येत नसल्यामुळे त्या खुलाशालाही काही काही अर्थ नसतो त्या तरुण अधिकाऱ्यांचं मला विशेष कौतुक अशासाठी वाटलं, की आपण 'सोबत' वाचतो असं त्यांनी मला सांगितलं पण माझं नाव त्यांच्या वाचनात कधी आल्याचं त्यांना आठवत नव्हतं आता यावर मी काय बोलणार ? मी एवढंच म्हणालो, "किर्लोस्करवाडीतून शंकरराव आणि मुकुंदराव गेल्यापासून वाडीतल्या लोकांची भलतीच सांस्कृतिक उपासमार होत असावी, असं दिसतंय." त्या गृहस्थांच्या लक्षात या विधानातला उपरोध आला नाही ते हसतहसत म्हणाले, "तसं झालंय खरं !"

गाडी वेळेवर आली आणि वेळेवर निघाली, याचा जो आनंद झाला होता तो लौकरच हळूहळू मावळू लागला कारण गाडी मधेच फतकल मारून बसू लागली. या देशात इतर कुणाला व्यक्तिस्वातंत्र्य असो किंवा नसो, आमच्या आगगाड्यांना मात्र ते नक्कीच मिळालेलं आहे केव्हाही निघावं, केव्हाही पोचावं, मनाला येईल तेव्हा यावं, स्वतःलाच कंटाळा येईपर्यंत वाटेल तिथं थांबावं, आणि मर्जीस येईल तेव्हा पुढे चालू लागावं उतारूंना कनेक्टिंग गाड्या मिळोत किंवा न मिळोत, कुणालाच त्याची फिकीर नसते पुढली गाडी मिळाली तर उतारूंनी देवाचे आभार मानावेत ! किर्लोस्करवाडीपर्यंत गाडी अर्धा तास लेट झाली होती उरलेल्या प्रवासात तिनं आणखी उशीर केला, तरी 'कर्नाटक एक्स्प्रेस' सुटून जाईल अशी भीती फारशी नव्हती, कारण महाराष्ट्र येईपर्यंत कर्नाटक थांबते असं म्हणतात पण सौभाग्यवती आणि अवजड सामान घेऊन गाडी बदलायची होती मैसूरच्या डब्यात जागा मिळेल की नाही ? मिळाली नसली तर पुढे काय ? त्या डब्यात जागा मिळाली नाही तर बंगळूरच्या डब्यात तरी जागा मिळेल काय ? बंगळूरच्या डब्यात जागा मिळाली तर रात्री ३–३० ला अरसीकेरीला उतरून पुन्हा एकदा गाडी बदलावी लागणार ! अशा अपरात्री सामान हलवायला हमाल मिळणंही कठिण

डोकीत चिंतेचं मोहोळ उठलं असतानाच गाडी अर्धा तास उशीरा मिरजेला पोचली तरी पण वीसपंचवीस मिनिटं हातात होती मैसूरच्या डब्याजवळ जाऊन पाहिलं तर अजूनही आमची नावं प्रतीक्षायादीतच काळ्या अक्षरांनी लिहून ठेवलेली आम्हाला दिसली. आता काय करायचं ? कंडक्टरची शोधाशोध सुरू झाली. फुटबॉल-

प्रमाण एक कंडक्टर दुसऱ्याकडे फेकू लागला “ ‘ कर्नाटक एक्सप्रेस ’ लांबलचक गाडी असते, आणि मैसूरचा डबा सर्वात शेवटी असतो अनेकदा तो फलाटाला लागतही नाही त्यामुळे चहा-वडावाले तिकडे फिरकतच नाहीत ” एक सहप्रवासी सांगत होते त्यावर मी म्हणालो होतो,—

“ अहो, ही तर फारच चांगली गोष्ट म्हटली पाहिजे ! आमच्या दृष्टीने त्या गाडीची ती जमेची बाजू घाणेरडे पदार्थ समोर यायला नकोत आणि ते खाण्याचा मोह व्हायला नको ” परंतु गाडीच्या मधोमध असलेल्या इतर पहिल्या वर्गाच्या डब्यासमोर उभ्या असलेल्या कंडक्टरकडे फेऱ्या माराव्या लागल्या, तेव्हा आपला डबा गाडीच्या टोकाला असण्यात किती तोटा आहे, याची कल्पना माझ्या पायांना तरी निश्चित आली

अखेर एकदाचे पहिल्या वर्गाचे कंडक्टरसाहेब (एम चंद्रन) आणि त्यांच्या वरचे अधिकारी (श्री कुलकर्णी) भेटले मी त्यांना माझी तिकिट दाखवली आणि असहायपणे विचारलं, “ आता पुढे काय ?”

माझ्यापेक्षाही अधिक असहायपणे ते म्हणाले, “ आम्ही तरी काय सांगणार? इथून मैसूरला जाणाऱ्या डब्यात पहिल्या वर्गाच्या फक्त आठ जागा असतात त्यातल्या चार मिरजेसाठी आणि चार हुबळीसाठी असतात आता हुबळीच्या जागांच आरक्षण झालं नसल्यास तुम्हाला त्यांतल्या जागा मिळू शकतील. पण तिथ काय स्थिती आहे याची आम्हाला काहीच कल्पना नाही तिथं प्रत्यक्ष गेल्यावरच ती कळेल

श्री कुळकर्णी यांनी एक मार्ग सुचवला ते म्हणाले, “ तुम्ही हुबळीपर्यंत त्याच डब्यात बसा जर हुबळीला त्या जागा आधीच गेल्या असतील, तर तुम्ही दुसऱ्या डब्यात जा त्याच्या शेजारी स्लीपर—कोच आहे त्याच्या कंडक्टरला भेटून त्याच्याकडून दोन जागा तुम्ही आत्ताच घेऊन ठेवा म्हणजे हुबळीला तुम्हाला डबा सोडावा लागला, तर निदान झोपायची तरी सोय होईल त्या कंडक्टरकडून तुम्ही पावती घ्या. म्हणजे तुम्हाला तुमचं पहिल्या वर्गाचं भाडं परत मागता येईल ”

माझ्या डोक्यात एक दुसरा विचार आला मी विचारलं, ‘ बंगळूरच्या डब्यात तुम्ही मला जागा का देत नाही ? तिथं जागा मिळाल्यास निदान रात्री ३–३० पर्यंत तरी निश्चितता लाभेल, आणि अरसीकेरीला उतरून आम्ही मैसूरच्या डब्यात जाऊ ”

श्री चंद्रन म्हणाले, “ बंगळूरच्या डब्यातही जागा शिल्लक नाही. तरी पण तुम्ही मला लोंढयाला भेटा. तिथं जागा होण्याची शक्यता आहे

मी अधिकच हताश आणि गोंधळलेल्या मन स्थितीत माझ्या डब्याकडे परतलो. शेजारच्या शयनागाराच्या कंडक्टरला विचारलं, तर त्यानं एकही जागा

शिल्लक नसल्याचं सांगितलं थोडी चिरीमिरी दिल्यास जागा सहज मिळाली असती कारण बऱ्याच जागा रिकाम्या असल्याचं स्पष्ट दिसत होतं परंतु पहिल्या वर्गाचं तिकिट काढून दुसऱ्या वर्गात जागा मिळवण्यासाठी लाच द्यायला माझं मन चटकन तयार होईना त्याच उद्विग्न मन स्थितीत मी डब्यात जाऊन बसलो पहिल्या वर्गाच्या त्या चार उतारूच्या छोट्या खोलीत आम्ही दोघच होतो बायकोशी रोमान्स करायला अगदी नामी संधी पण मी इतका 'अप्सेट' झालो होतो, की बायकोजवळ बसण्याएवजी मी खोलीचा दरवाजा सताड उघडा टाकून एखाद्या तिऱ्हाइतासारखा तिच्या समोरच्या बाकावर कपाळाला हात लावून बसून राहिलो सौभाग्यवतीशी बोलण्याचीच नव्हे, तर तिच्याकडे बघण्याचीही इच्छा मला होत नव्हती बरोबर आणलेलं जेवण कसबस घशाखाली ढकलल त्याची चवही लक्षात आली नाही बरोबर आणलेली वृत्तपत्र, पुस्तक माझ्याकडे आशाळभूतपणे पहात होती पण मी भकास नजरेनं खिडकीतून बाहेर बघत आपल्याच चिंतेत व्यग्र झालो होतो

त्या संकटातून बाहेर पडण्यासाठी आपल्याजवळ कोणकोणते पर्याय आहेत याचा मी विचार करू लागलो हुबळीला जे लोक चढतील त्याना पाझर फुटण्याची शक्यता दिसल्यास त्यानी आम्हाला — निदान सौभाग्यवतीला — मधल्या जमिनीवर झोपण्याची परवानगी द्यावी अशी विनंती करायची, हा एक पर्याय होता याचाच एक भाग म्हणून मिरजेस चढलेल्या शेजारच्या खोलीतील उतारूकडेही विनंती करून पहावी असं मी सौभाग्यवतीला सुचवल कारण त्या उतारूत दोन स्त्रियाही होत्या पण तिला ती सूचना फारशी आवडली नाही किती झाल तरी ती क्षत्रिय कुळातली होती कुणाकडे मदतीची भीक मागण तिच्या रक्तातच नाही तरी पण माझी केविलवाणी अवस्था पाहून ती ते दिव्य करायलाही तयार झाली थोड्या वेळान तिनं येऊन जो अहवाल दिला तो फारसा आनंददायक नव्हता ती म्हणाली, ' मी त्यांच्या खोलीकडे गेले, पण त्या बायकानी मला साधं 'आत या, बसा' असंदेखील म्हटलं नाही मी दारात उभी राहूनच त्यांच्याशी बोलले त्यांच्यातल्या वयस्क गृहस्थाना थोडी दया आली ते म्हणाले, तुमची हरकत नसेल तर तुम्ही इथं जमिनीवर झोपू शकाल ' मी त्यावर काही बोलण्यापूर्वीच त्या बायका घाईघाईनं म्हणाल्या, ' छेः छे ! आम्हाला डब्यात वावरायला त्यामुळं फार अडचण होईल ' बाईचा सर्वांत मोठा शत्रू बाईच असते, असं जे मी नेहेमी म्हणते, त्याचा आज पुन:-प्रत्यय आला "

कधीकधी आपण ज्यांना अडाणी, गावढळ समजतो ती माणसं आपल्यापेक्षा अधिक शहाणी असल्याचा अनुभव येतो माझ्या बायकोनं आज तसा अनुभव मला आणून दिला मला धीर देत ती म्हणाली, ' तुम्ही कशाला एवढी काळजी करता? दुसरी काही सोय झाली नाही तर आपण आपलं सामान घेऊन या डब्याच्या

बाहेरच्या कॉरिडॉरमध्ये बसून रात्र काढू मला मुळीच त्रास व्हायचा नाही " तिच्या तोंडून ती सूचना आल्याचं पाहून मला आनंदाश्चर्य वाटल ही सूचना करून तिन स्वत च्या डोकीवरच काळजीच ओझ फेकून दिल; आणि ती आरामात झोपी गेली नेहेमीच्या सवयीप्रमाण ती थोड्याच वेळात घोरूही लागली खरोखरी मोठी नशीबवान बाई ! नवऱ्याच्या नव्हे — झोपेच्या बाबतीत !

आमच्या डब्याच्याच अर्ध्या भागात दुसऱ्या वर्गाचा आरक्षणरहित असा भाग होता हुबळीला पहिल्या वर्गाच्या डब्यातून बाहेर पडाव लागल आणि दुसरी काहीच सोय झाली नाही, तर त्या डब्यात शिरायच आणि सडासाजवळच्या जागेत सामान ठेवून त्यावर बसून रात्र काढायची, असाही एक पर्याय मी मनाशी योजून ठेवला

परतु त्या पर्यायाचा वापर करावा लागला नाही लोंढ्याला श्री. चद्रन यानी बगळूरच्या पहिल्या वर्गात दोन बर्थ मला तात्पुरते बहाल केले. तिथून माझ्या भाग्यान पलटी खायला सुरुवात केली —– चागल्या अर्थान ! त्या डब्यात चद्रन आणि त्याचे वरिष्ठ अधिकारी श्री कुळकर्णी हेही आले चद्रन आपल लिहिण्याच काम करू लागले श्री कुळकर्णी यानी गप्पागोष्टी सुरू केल्या माझा नेहेमीचा एक मजेदार अनुभव आहे एकदा सभाषण सुरू झाल की समोरच्या व्यक्तीला कस वश करून घ्यायच ते मला चटकन समजत, आणि त्या प्रयत्नात मी सहसा अयशस्वी होत नाही खर म्हणजे, मी स्वत अशा वेळी फार कमी बोलतो समोरच्या व्यक्तींलाच मनसोक्त बोलू देतो मात्र आपण ज्याच्याशी बोलतो आहोत तो कुणी अगदीच फडतूस माणूस नाही एवढ तिला जाणवून देण्याची मी खबरदारी घेतो सुदैवान कुळकर्णी हे फार सज्जन गृहस्थ होते. सदाचाराचे काही सिद्धान्त त्यानी ठरवले होते, आणि त्याप्रमाणे आपल, आपल्या कुटुबियाच आचरण असाव, असा त्याचा प्रयत्न असावा, अस लक्षात येत होत वस्तुत ते मूळचे महाराष्ट्रीय पुण्याजवळचे पुरदरे परतु अनेक पिढ्यापूर्वी त्याचे पूर्वज कर्नाटकात जाऊन स्थायिक झाले, आणि कुळकर्णी बनले आता ते धारवाडला असतात तसे ते कन्नडिग पण महाराष्ट्राशी अधूनमधून सबध येत असल्यामुळे मराठी जाणतात त्याची मुल तर महाराष्ट्रातच नोकरीधदा करतात बऱ्याच दिवसानी अस्सल मराठी बोलणारा एक लेखकच भेटल्यामुळ ते खूष होऊन बोलत होते त्यानी आपल्या कुटुबाची सगळी हकीगत रसाळपणे सागितली मीही ती रस घेऊन ऐकली माझ्या मनावरचा ताण कमी होण्यास त्याचा निश्चितच उपयोग झाला

कुळकर्णीसाहेब धारवाडला उतरले त्यांनी चद्रनना बजावून सागितल, "या साहेबाची नीट सोय लावून दिल्यावर तुम्ही घरी जा ह !" चद्रनही तसे सौम्य, सज्जनच वाटले केरळीय माणूस तसा थोडा अबोलच त्यानाही मी थोडफार बोलत केल त्यामुळे आणि मुख्यत कुळकर्णीसाहेबांच्या आदेशामुळ आपल्यावर काहीतरी

नैतिक जबाबदारी असल्याचं त्यांनी मानलं आपला साहेब ज्याच्याशी इतक्या मोकळेपणानं गप्पा मारीत होता तो इसम अगदीच सामान्य नसावा, अशी चंद्रनची समजूत होणं स्वाभाविकच होतं परंतु ' गांधीजी एक झलक ' हे माझं हिंदी पुस्तक केरळच्या कालिकत विद्यापीठात काही वर्षं पाठ्यपुस्तक म्हणून लागलेलं होतं. ही माहिती जेव्हा त्यांना माझ्याकडून समजली तेव्हा ते माझ्याकडे विशेष आपुलकीनं पाहू लागले, असा मला भास झाला

अखेरची एकदाची हुबळी आली धडधडत्या अंतःकरणानं मी चंद्रनबरोबर नव्या कंडक्टरकडे गेलो अहाहा ! जेव्हा त्या कंडक्टरनं सांगितलं की, ' हुबळीला एकाही उतारून आरक्षण केलेलं नाही आणि आम्ही मजेत त्या डब्यातून मैसूरला जाऊ शकतो,' तेव्हा माझा आनंद गगनात मावेना काळजीच, अनिश्चिततेच ओझं फलाटावर फेकून देऊन मी धावतच आमच्या डब्याकडे गेलो सौभाग्यवतीला कडाकडून मिठी मारावी, म्हणजे तिला न सांगताच ती बातमी कळेल, असा विचार माझ्या मनात चमकून गेला पण त्यात एक अडचण होती मैसूरला जाण्यासाठी रेल्वेचेच एक अधिकारी बेळगावला आमच्या डब्यात चढले होते मी गेलो तेव्हा ते तिथंच होते त्यांनीही ती बातमी ऐकून सुटकेचा निःश्वास सोडला सुदैवानं ते गृहस्थ मोठे उमदे होते त्यामुळे आमच्या एकान्तात त्यांनी विघ्न आणल्याबद्दल मला त्यांचा मुळीच राग आला नाही दुपारी दोन वाजल्यापासून रात्री नऊ वाजेपर्यंत मेंदूवर जो भयंकर ताण पडला होता तो आता संपल्यामुळे वस्तुतः मला गाढ झोप यायला हवी होती परंतु माझ्यासारखी माणसं दुःखाप्रमाणेच सुखानंही अनेकदा अस्वस्थ होतात त्या अस्वस्थतेमुळं म्हणा, अथवा गाडीच्या आवाजामुळं म्हणा, मला झोप अशी लागलीच नाही सौभाग्यवती आणि तिसरे उतारू श्री गोविंदमोहन वाही डाराडूर झोपून गेले त्यांच्या घोरण्याची जुगलबंदी ऐकत मी मात्र या कुशीवरुन त्या कुशीवर लोळत पडलो अशा जुगलबंदीत सौभाग्यवती कुणालाही हार जाणार नाही, हा माझा विश्वास पुन्हा एकदा दृढ झाला.

हरिहरपासून बिरूरपर्यंत गाडी तुफान वेगात चालली होती मला एक अगदीच वेगळा, अपरिचित आवाज ऐकू येऊ लागला चित्रपटात वादळवाऱ्याचा आभास निर्माण करण्यासाठी जसा आवाज देतात, तसा तो होता चक्रीवादळ घोंघावत असावं, मुसळधार पाऊस पडत असावा, मधूनच विजांचा कडकडाट व्हावा, तसा काहीसा तो आवाज होता क्षणभर मला असा भास झाला की, खरोखरीच बाहेर वादळ चालू असावं म्हणून मी खिडकीची झापड वर करून बाहेर डोकावलं. तिथं काय होतं ? शांत, स्निग्ध चांदणं आणि नीरव शांतता खूप लांबलचक असणाऱ्या गाडीच्या शेवटच्या डब्यात बसणाऱ्यांना असा अनुभव नेहेमी येत असेल काय ? की तो सगळा निव्वळ भासच होता ? मी त्याचा पुन्हापुन्हा बराच वेळ अनुभव घेतल्यामुळे तो केवळ आभास नव्हता, एवढं मी नक्की म्हणू शकतो

त्या आवाजाचा अनुभव घेत असताना मला अचानक लहानपणीच्या पाठ्य-पुस्तकातल्या ' सोमदत्त (की देवदत्त? ) वादळात सापडला ' या धड्याचं शीर्षक आठवलं तो धडा मात्र मी पार विसरून गेलो आहे

——बहुधा प्रत्येक प्रवासात एखादी तरी लक्षात रहाण्यासारखी व्यक्ती किंवा वल्ली मला पूर्वी भेटत असे अलीकडे प्रवास कमी झाला, जुना उत्साहही उरला नाही, आणि शक्य तर सहकुटुंब प्रवास करण्याची प्रथा स्वीकारली यामुळे अशा व्यक्ती फारशा भेटत नाहीत पूर्वीच्या तिसऱ्या आणि आताच्या दुसऱ्या वर्गात अशा व्यक्ती प्रकर्षानं भेटत पहिल्या वर्गातले उतारू सामान्यत आत्मकेंद्रित किंवा अहं-मन्य असतात इतराशी सभाषण न करण्याची साहेबी संस्कृती त्यांनी पुढं चालव-लेली असते परतु त्या वर्गातही चुकूनमाकून अशी व्यक्ती भेटते आजकाल पहिल्या वर्गाचा प्रवास इतका महाग झाला आहे, की सरकारी अमलदार, मोठ-मोठ्या कपन्यांचे अधिकारी, राजकीय पुढारी मत्री–आमदार–खासदार यासारखी दुसऱ्याच्या पैशान प्रवास करणारी मडळीच त्या वर्गात भेटतात अर्थात मोही [illegible] बाळावतात तव्हा मी पहिल्या वर्गाच प्रवासभाड घेतो, आणि त्याप्रमाण त्या वर्गातून प्रवासही करतो जेव्हा सहकुटुब प्रवास करा-यचा असतो, तेव्हा आमची मातृभक्त मुल आपल्या आईची प्रकृती लक्षात घेऊन पहिल्या वर्गाच तिकिट काढून देतात. मग मलाही गाड्याबरोबर नळ्याला यात्रा या न्यायानं पहिल्या वर्गाचा प्रवास घडतो आपल्या कुटुबाच्या बाबतीत थोर सत्पुरुष सजय गाधी याचा ' बाते कम, काम ज्यादा ' हा आदेश आम्ही शिरोधार्य मानलेला असल्यामुळे आणि आगगाडीत करण्यासारख काम म्हणजे फक्त वाचनच असल्यामुळे आम्ही उभयता वाचनात दग होऊन जातो त्यामुळही फाजिल कुतूहल दाखवून इतराशी ओळख करून घेण्याची सधी आपोआपच कमी होते

या प्रवासातही असच घडल असत मिरजेला आम्हाला जागा मिळून गेली असती, तर आम्ही पुस्तक वाचण्यात गढून गेलो असतो परतु तस न घडल्यामुळ विषण्ण चित्तान मी नुसताच बसून होतो त्या स्थितीत जेव्हा बेळगावला एक काळा-सावळा पण धिप्पाड पुरुष एक जाडजूड ट्रक घेऊन डब्यात शिरला, तेव्हा माझ कुतूहल चाळवल गेल तरी पण मी गप्पच राहिलो इतक्यात त्या गृहस्थाचं माझ्या पठाणी सुरवारीकडे लक्ष गेल त्याच कुतूहल जाग झाल त्याच्यान स्वस्थ बसवल नाही त्यानी मला विचारल, ही पठाणी सुरवार तुम्ही कशी काय वापरता ? महाराष्ट्रात अशी सुरवार वापरणारे लोक क्वचितच पहायला मिळतात " आणि अनोळखीपणाच्या भिती ढासळून पडल्या तेव्हापासून आमच्या ज्या गप्पा सुरू झाल्या त्या थेट मैसूरला गाडीतून उतरेपर्यंत चालत राहिल्या अर्थात माझ्या सवयी-प्रमाणे मी फारच थोड बोललो आपल्या मोठेपणाचा रुबाब या गृहस्थावर पडणार

नाही, हे ओळखून मी त्याचीच माहिती ऐकायच ठरवल अधूनमधून चावी देण्यापुरतच मी बोलत राहिलो

तर असे हे गृहस्थ होते श्री गोविंदमोहन वाही आपण हिंदू पठाण असल्याचा त्यांना केवढा अभिमान ! त्यांचे आजोबा मनमोहन आणि वडील राममोहन याच्या आठवणी त्यानी अगदी रगवून सागितल्या त्यांचे एक चुलते आय सी एस होते, आणि त्याचे सख्खे बधू शिवमोहन हेही आय. सी एस आहेत लक्षाधीशाच घराण तसे ते लोक फाळणीपूर्वीच वायव्य-सरहद्द प्रात सोडून मुबईत आले होते त्यामुळे ते एका अर्थान आता महाराष्ट्रीयच झाले आहेत मोडकीतोडकी मराठी बोलतातही सुकी फळ आणि कापड याचा मोठा व्यापार त्याचे वडील करीत त्यातल्या काही गमती त्यांनी सागितल्या ते म्हणाले, "तुम्हाला खर वाटायच नाही जोशीसाहेब, पण आम्ही काबूलहून एक पैशाला शेरभर या भावान अगूर (द्राक्ष) आणीत असू, आणि मुबई-मद्रास-कलकत्त्याला ती तीन पैशाना शेर या भावान किरकोळ व्यापाऱ्याना विकीत असू पिस्ता तेव्हा दहा आणे शेर या भावान आम्ही विकत होतो जपानहून दहा पैसे वाराच 'मारकिन' (मांजरपाट) कापड आणून ते तीन आणे वारान विकत होतो कापड इतक उत्कृष्ट, की अजूनही त्याचे कपडे आमच्याजवळ आहेत बाजारात एवढी भयकर स्पर्धा होती, की जादा भाव घेण शक्यच नसे नुसत्या गोणपाटावर आमचा धदा चालत होता ! एका गाठी-भोवती गुडाळून येणाऱ्या गोणपाटाचा एक रुपया मिळे दिवसाकाठी चाळीसपन्नास गाठी विकल्या की चाळीसपन्नास रुपये मिळत स्वस्ताई एवढी कमालीची होती, की एका आण्यात पावशेर दूध आणि अदपाव जिलबी यायची ही ट्रक तुम्ही पहाताय ना, ती शभर वर्षापूर्वीची आहे. अस्सल पोलादाची आहे फ्रान्समधे तयार झालेली या ट्रकेतून फ्रान्सच किनखापाच कापड यायच ऐंशी किलो वजनाच सामान पेलण्याची ताकद या ट्रकेत आहे. माझ्याकडे अशा दहा-बारा ट्रका होत्या त्यातली आता फक्त एवढीच उरलीय इतर मित्रानी लाबवल्या !"

पठाणांबद्दल गोविंदजींना भलताच अभिमान ते म्हणाले, 'इस्लामच शातीच खर तत्त्वज्ञान फक्त पठाणानाच समजलय भारतात आणि पाकिस्तानच्या इतर प्रांतात किंवा इराण-इराकसारख्या मध्यपूर्वेतल्या देशांत इस्लामन लोकांना विद्वेषच शिकवला म्हणून ते खरे मुसलमानच नव्हेत अस पठाण मानतात आमच्याशी त्याचे अत्यत प्रेमाचे सबंध होते आजही शेकडो हिंदू खेड्यापाड्यातल्या पठाणां-बरोबर प्रेमान रहात आहेत राजकारणी लोकानी धर्मवेडाच विष पद्धतशीरपणे पसरवल नसत, तर हिंदू आणि मुसलमान पठाण मोठ्या प्रमाणावर, आजही गुण्या-गोविंदान एकत्र नादलेले दिसले असते पठाण हा अत्यत धर्मनिष्ठ असतो— मग तो हिंदू असो की मुसलमान असो पण त्याचा धर्म त्याला इतराविषयी द्वेष बाळगायला शिकवत नाही (गोविंदजीचा हा मुद्दा फार महत्त्वाचा आहे त्याची पुष्टी लौकरच

झाली ता. १५–११–८१ रोजी बिहारमधल्या फुलवारी शरीफ इथं भाषण करताना सरहद्द-गांधी खान अब्दुल गफारखान यांनी स्पष्टच सांगितलं की, "अनेक मुसलमानांना इस्लाम म्हणजे काय हेच माहीत नाही कारण आम्हाला इस्लाम धार्मिक चळवळीतून मिळाला नसून, राजकारणातून, बादशहांच्या मार्फत आणि हिंसाचारातून मिळाला आहे इतर धर्मांविषयी द्वेषाची शिकवण इस्लाम मुळीच देत नाही हिंदू-मुसलमानांनी देशाची फाळणी घडवून आणली नसून, काँग्रेस व मुस्लिम लीग यांच्या राजकारणातून ती घडून आली आहे पाकिस्तानातले जे लोक स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांशी लढले ते देशद्रोही ठरले, आणि जे खरोखरी देशद्रोही होते तेच तिथले राज्यकर्ते बनले" असे उद्‌गार पठाणच काढू काढतो ) माझ्या वडिलांचंच उदाहरण सांगतो ते अतिशय कर्मठ होते तसे आम्ही ब्राह्मण नव्हे पण माझ्या वडिलांना भगवद्‌गीता, रुद्र, चंडीपाठ, भागवत, हे सारं जणू तोंडपाठ होतं त्यांनी कधी मांस-मच्छर खाल्लं नाही इतकंच काय, पण ते कधी नळाचं पाणीही प्यायले नाहीत महादेवीच्या देवळाच्या आवारात एक विहीर होती. तिचं पाणी ते प्यायला आणि स्वैपाकाला वापरीत ते पाणी आणण्यासाठी दर महा दहा रुपये पगारावर त्यांनी दोन कहार (पाणक्ये) नोकरीला ठेवले होते त्यांना आपला मरणकाळ समजला होता मरणापूर्वी सात दिवस त्यांनी भटजीकडून नियमानं रोज रुद्रपाठ करवला रुद्र म्हणताना त्याचं काही चुकलं तर ते दुरुस्त करीत मी त्या वेळी सैन्यात होतो त्यांनी मला बोलावून घेतलं मित्रांना ते सांगत, 'हा माझा फायरब्रिगेड (अग्नी देणारा) आहे' रुद्रपाठ चालू असताना ते रोज पुरोहिताला सांगत 'पंडितजी, कल जरूर आना!' परंतु शेवटच्या दिवशी त्यांनी सांगितलं, 'पंडितजी, कल आनेकी जरूरत नही है!' आम्हाला त्याचा अर्थ त्या वेळी कळला नाही दुसऱ्या दिवशी शिवरात्र होती अंत्यसमय जवळ येताच त्यांनी मला सांगितलं, 'इथली जमीन गाईच्या शेणानं सारवून घे, आणि तिच्यावर मला झोपव भूमातेच्या मांडीवर मला मरू दे' त्याप्रमाणं मी त्यांना जमिनीवर झोपवलं, आणि त्यांनी जगाचा निरोप घेतला"

वाही-कुटुंब परम शिवभक्त गोविंदजींच्या बोटात एक अंगठी होती ती माझ्या हातावर ठेवून ते म्हणाले, "माझ्या पणजोबाची ही अंगठी हिच्यात दुहेरी मोती आहे वरच्या बाजूला आतल्या भागात शिवलिंगाची आकृती असून फणा काढलेला नागही आहे पहा दिसतोय का ते"

मी न्याहाळून पाहिलं तशी अस्फुट आकृती खरोखरच दिसत होती ते पुढे सांगू लागले, "हा बसऱ्याचा अस्सल मोती आहे एरवी ही अंगठी आमच्या पूजेत असते दिवाळीत एकदाच ती काढून मी बोटात घालतो, आणि पुन्हा पूजेच्या चांदीच्या डबीत ठेवून देतो यंदा चुकून ती बोटात राहिली त्यामुळं माझी प्रकृती अस्वस्थ झाली सर्दीनं हैराण करून सोडलंय मला केव्हा एकदा घरी जाऊन ती जागच्या जागी ठेवतो असं झालंय अशीच एक हिऱ्याची अंगठी पूजेत आहे हिरा

चांगला टपोरा असून त्यातही स्पष्ट दिसणारं शिवलिंग आणि नाग आहेत. तो मी कधी बोटात घालत नाही."

गोविंदजींनी आपल्या गळयातली माळही दाखवली. तिच्यात चोवीसमुखी रुद्राक्ष आहे. दंडावरही त्यांनी सोळामुखी रुद्राक्ष बांधलेला आहे. गोविंदजीशी बोलताना ते सनातनी किंवा जुनाट वृत्तीचे असतील असं वाटत नाही. पण त्यांचा तो देवभोळेपणा पाहिला की आश्चर्य वाटतं. माणसाचं धर्मजीवन मोठं गूढ, रहस्यमय असतं, हेच खरं. बाहेरून पहाणाऱ्याला ते समजणं एकूण कठिणच.

आपल्या वडिलांसंबंधी गोविंदजींनी सांगितलेली इतर माहितीही मोठी बोधप्रद होती. त्यांच्या वडिलांनी 'बनारस हिंदू विश्वविद्यालया'ला १९३२ साली दोन लाख रुपयांची देणगी दिली होती. त्यातून जशी त्यांची उदारता दिसून येते, तशी आणखी एका घटनेतून त्यांची निःस्पृहताही दिसून येते. 'झवेरी बाजारा'त त्यांच्याकडे दोन हजार चौरस फुटांची रहाण्याची जागा होती. भाडं होतं फक्त पासष्ट रुपये. त्यांनी जेव्हा आपला व्यवसाय गुंडाळण्याचं ठरवलं तेव्हा एक व्यापारी त्यांच्याकडे गेला आणि म्हणाला, "मी तुम्हाला दोन लाख रुपये देतो. तुम्ही ती जागा मला द्या." त्याला त्यांनी सांगितलं, "बाबा रे, हे पाप घेऊन मी कुठे जाऊ? मला आता त्या जागेची गरज उरली नाही म्हणून मी ती मालकाला परत देणार आहे." त्याप्रमाणे खरोखरीच त्यांनी ती जागा मालकाला परत देऊन टाकली!

गोविंदमोहननी आपल्या लहानपणची एक मजेदार घटना सांगितली. त्या वेळी लालबहादूर शास्त्री काशी विद्यापीठात शिक्षक होते. गोविंदजींच्या वडिलांनी आपल्या मुलासाठी शास्त्रीजींची शिकवणी ठेवली. फी दर महा पाच रुपये. गोविंदजींबरोबर आणखी चार विद्यार्थी शिकत. त्यात श्रीप्रकाशांचे वडील लाला भगवानदीन यांचा एक भाचाही होता. त्या सर्वांना शिकवण्यासाठी शास्त्रीजी चार मैल पायी चालत येत. त्यांनी या विद्यार्थ्यांना मुख्यतः संस्कृत शिकवलं. पंचतंत्र, लघुकौमुदी यासारखे काही ग्रंथ ते शास्त्रीजवळ शिकले. परंतु गोविंदजींना अभ्यासाची गोडी नसल्यानं ते सैन्यात गेले, आणि तिथून निवृत्त होऊन रेल्वेत नोकरी करू लागले. सध्या ते 'इन्स्पेक्टर ऑफ वर्क्स' आहेत. त्यांची मुलं मात्र व्यापारात पडली असून त्यांचा व्यवसाय जोरात चालला आहे. त्यांनी रेल्वेत नोकरी धरली तेव्हा लालबहादूर रेल्वेमंत्री होते. त्यांची भेट झाली असताना त्यांनी गोविंदजींना विचारलं, "तुमच्यासाठी मी काय करू शकतो?" गोविंदजींनी सांगितलं, "फक्त तुमचा आशीर्वाद असू द्या. दुसरं काही नको."

हिंदी-उर्दूभाषी माणसं भेटली की त्यांच्याशी माझी तार चटकन जुळते. कारण त्या भाषा मी मराठीइतक्याच सफाईनं बोलतो-लिहितो. इंग्रजी आली की आमचं गाडं अडतं. अडतं म्हणजे अगदीच रुतून बसतं असं नव्हे. काम चालवण्याइतकं इंग्रजी मला आता येतं. पण आपलं म्हणणं समाधानकारकपणे इंग्रजीतून

माडण मला जमत नाही. हिंदी–उर्दूच तस नाही. अनेकदा मी हिंदी–उर्दूभाषी आहे असाच अनेकाचा समज होतो. आणि जेव्हा माझी मातृभाषा मराठी आहे हे त्यांना कळन, तेव्हा ते आश्चर्यान विचारतात, " ऐसी अच्छी हिंदी आपने कहाँ सीखी? " याच कारण अस की, १९४० साली मी दिल्लीला एक वर्षभर राहिलो होतो तेव्हा मी केवळ त्या दोन भाषा आणि त्यांच साहित्य एवढच शिकून घेतल नाही, तर त्या भाषाचे उच्चार, बोलण्याचा स्वाभाविक ढग, म्हणी–लोकोक्ती वगैरे गोष्टीही मी शिकून घेतल्या होत्या, आणि त्यानतरही हिंदी–उर्दू लोकाशी सपर्क टिकून राहिल्यान त्या गोष्टी कायम राहिल्या, एवढच सुदैवान मराठी लोकांना हे काही माहीत नाही त्यामुळे त्याच्यापुढे तो प्रश्न कधी उभा रहात नाही किंबहुना अनेक मराठी मडळीना –– विशेषत नागपूरकरांना –– अस वाटत की, आपण जी हिंदी बोलतो तीच खरी उत्तम हिंदी !

हिंदीभाषी व्यक्तीन माझ्या हिंदीची स्तुती केली की मी लगेच खुलतो, आणि त्या वेळी माझ्याजवळ एखाद स्वत च हिंदी पुस्तक असल तर ते तिला सप्रेम भेट देऊन टाकतो अशा वेळी माझी बायको मिस्किलपणान म्हणते, " बर झाल बाई, घरातली तेवढीच रद्दी कमी झाली !" तिच्या या विधानाशी मी पूर्णपणे सहमत असतो कारण या पुस्तकांनी माझ्या घरात फारच आक्रमक भूमिका घेतलेली आहे अरबांच्या तबूत चचुप्रवेश केलेल्या उटान अखेर त्या अरबालाच तबूबाहेर ढकलाव, त्याप्रमाण माझी पुस्तक शिरजोर बनली असून त्यानी एवढी जागा व्यापलीय, की ती मालक बनून मी पाहुणा झालोय शिवाय जुनी रद्दी काढून टाकल्याशिवाय नवी रद्दी कशी यायची ? त्याच हेतून मी माझी पुस्तक लोकाना भेट म्हणून देत असतो कारण ती कुणी विकत घेणार नाहीत, याविषयी माझी खात्री असते कोरा कागद ही मौल्यवान सपत्ती असते कागदावर तुम्हाला वाटेल तेवढ कर्ज मिळू शकत, पण एकदा त्याच्यावर मजकूर छापला गेला की त्याची रद्दी बनते, आणि रद्दीची जी किंमत तीच त्या पुस्तकांची बनते ! सोन्याबापू ढवळे गमतीन म्हणत, ' माझ्या गोदामात पाच लाखांची रद्दी आहे पण ती बाहेर काढली तर तिची किंमत पाच हजारही होणार नाही " हे विधान कितीही कटू किंवा दाहक असल, तरी त्यात सत्याचा फार मोठा अश आहे यात शका नाही

श्री गोविंदमोहन सरकारी नोकरीत असले तरी त्याची प्रचलित राजकारण-अर्थकारणाची जाण फार चागली दिसली आपल म्हणण कथाच्या रूपात साग्ण्याची त्याची शैली मला विशेष आवडली बोलताबोलता हिंदी–उर्दूतली उद्धरण वापरण्याच त्याच वैशिष्टच इतर हिंदी–उर्दूभाषी व्यक्तीसारखच आहे वडिलाच्या सच्चरित्राचा खूपच प्रभाव त्याच्यावर पडलेला आहे लाच–लुचपत, भ्रष्टाचार याच त्यांना वावडं असल्यामुळ त्याच्या खात्यातल्या इतराना ते नेहेमीच दूरचे, परके वाटतात पण त्याच त्यांना दु ख नाही ते म्हणाले, ' आपण प्रेम करीत जाव त्याच

प्रतिफळ मिळो अथवा न मिळो हमें तो यारकी यारीसे मतलब है, उसकी गद्दारीसे क्या लेना देना ?"

आजकाल सर्वत्र बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचा विषय दोन माणस भेटली की हटकून निघतोच त्याप्रमाणे तो आमच्या गप्पांतही निघाला त्या संदर्भात बोलताना गोविंदजींनी एक मजेदार गोष्ट सांगितली

उत्तम अरबी घोडे तयार करणाऱ्या अरबस्तानातल्या एका छोट्या राजाची ही गोष्ट आहे अस्सल अरबी घोडा तयार करायचा म्हणजे त्याला बदाम, पिस्ते, खजूर, बेदाणा खायला घालावा लागतो एकदा त्याच्या राज्यात दुष्काळ पडला त्यामुळे घोड्याच्या खुराकात अर्धा किलो कपात करावी लागली. वस्तुत: त्याचा काही घोड्यावर फारसा परिणाम व्हायची जरूर नव्हती परंतु पाण्याची टंचाई आणि दुष्काळाच वातावरण यामुळे घोडे खंगू लागले. त्यामुळ त्या घोड्यावर देखरेख ठेवणारा प्रमुख मोतद्दार उर्बा सईसही चिंताग्रस्त झाला दरबारात त्याच्या विरुद्ध असणाऱ्या लोकाना चांगला मोका मिळाला. त्यांनी राजाकडे तक्रार केली की, "हा उर्बा सईस घोड्याचा खुराक चोरतो, म्हणून घोडे खंगत चालले आहेत"

राजा स्वत बघायला आला उर्बा प्रामाणिक होता त्यान खर होत ते सागितल तो म्हणाला, "सरकार, घोड्यांच्या गवाणीत जे काही उरत ते धुऊन, साफ करून मी माझ्या मुलाना खायला देतो मी मुळीच चोरी करीत नाही तुम्ही म्हणत असाल तर उरलेला खुराक मी घरी न नेता उकिरड्यात फेकून देत जाईन." पण राजाच्या मनात सशयाचा किडा शिरला होता उर्बा सईसवरचा त्याचा विश्वास उडाला होता म्हणून त्यान त्याच्यावर देखरेख करण्यासाठी एक फौजदार नेमला त्या फौजदारान नेमणूक होताच उर्बा सईसला बोलावून सागितल, "घोड्यांच्या खुराकात माझा चार किलोचा हिस्सा! तेवढा माल चुपचाप माझ्या बगल्यावर पोचता करायचा मग बघतो तुला कोण हात लावतय ते!"

त्याप्रमाण घोड्याच्या खुराकातली चार किलो सुकी फळ फौजदाराच्या बगल्यावर जाऊ लागली घोडे जास्तच खंगत चालले राजाकडे पुन्हा तक्रार गेली राजा स्वत तबेल्यात गेला त्यान घोड्यांची हालत बघितली त्याला फौजदाराच्या लबाडीचा सुगावा लागला त्यान त्याच्यावर नजर ठेवण्यासाठी एक आय सी एस च्या दर्जाचा अधिकारीच नेमला तो अधिकारी कामावर रुजू झाला, आणि पहिल्याच दिवशी त्यान उर्बा सईसला बोलावून घेऊन विचारल, 'तू त्या फौजदाराला किती मलिदा चारतोस? उर्बा सईसन सांगितल, हुजूर, त्या साहेबाना चार किलो देतो

"तर मग आम्हाला रोज सहा किलो सुकामेवा मिळत राहील अशी व्यवस्था कर" वरिष्ठ अधिकाऱ्यान फर्मावल त्याप्रमाण त्याचाही हप्ता सुरू झाला घोडे जास्तच खगायला लागले अखेर राजाला आपली चूक कळून आली त्यान ओळ-

खल की, उर्वा सईस जे उच्छिष्ट घेत होता त्यान फारस बिघडत नव्हत, पण त्याच्यावर नेमलेल्या अधिकाऱ्याच्या भ्रष्टाचारामुळे मात्र घोड्याच्या पोटाला चिमटा बसला आता या गोष्टीच तात्पर्य काय ?" गोविंदजींनी मलाच विचारल

"बरीच तात्पर्यं काढता येतील " मी म्हणालो, "पहिल अस की, भ्रष्टाचाराचा फार बाऊ करू नका, तो तर जगभरच चाललाय दुसर तात्पर्य अस की, जुन्या काळी अधिकारी, अमलदार भ्रष्ट झाले तरी राजा स्वत भ्रष्टाचारापासून अलिप्त राही त्यामुळे भ्रष्टाचाराला आळा बसण्याची शक्यता असे आजकाल पाटील-तलाठ्यापासून सगळ्यांचेच हात लाचलुचपतीत गुतलेले असल्यामुळे कोण कुणाचे हात धरणार ? त्यामुळे भ्रष्टाचाराला शिष्टाचाराच लेबल अडकवून मोकळ होण शहाणपणाच ! तिसर तात्पर्य अस की, अधिकारी, व्यापारी, कामगार या सर्वावर अविश्वास ठेवून नियत्रण लादण, एकावर एक अशी, दुसऱ्यावर नजर ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांची उतरड रचण, हेच आजकालच्या भ्रष्टाचाराच मूळ कारण आहे चौथ तात्पर्य----"

"बस्स बस्स ! माझा मुद्दा तुम्हाला कळला ! गोविंदजी हसत म्हणाले

आजच आपल अर्थकारण कस निव्वळ आकडेमोडीच बनलय, आणि आकड्याची जादूगिरी करून लोकांना बनवण्याचे प्रयत्न कसे सरकारतर्फे केले जातात, हे सगळ्या सुज्ञ लोकांनाच नव्हे, तर महागाईचे चटके सहन करावे लागणाऱ्या सामान्य जनतेलाही कळत चलनवाढ २१ टक्क्यावरून ७ टक्क्यावर आल्याबद्दल ढोल बडवले जातात ज्या नालायक जनता पक्षाच्या राज्यात महागाई काबूत आली होती, सगळ्या वस्तू मुबलक प्रमाणात मिळत होत्या, त्या पक्षाच्या डोकीवर चलनवाढीच खापर फोडण्याची सत्ताधारी पुढाऱ्यात अहमहमिका लागलेली असते पण इदिराजींच्या राजवटीत महागाईन जे अक्राळविक्राळ स्वरूप धारण केल आहे तिकडे जनतेन दुर्लक्ष कराव, अशी त्याची अपेक्षा असते खर म्हणजे लोकाना चलनवाढीच काहीच सोयरसुतक नसत तिला स्वस्ताई हवी असते चलनवाढ घटली की तिच्याबरोबर महागाईचा चढलेला पारा आपोआप खाली उतरतो, अस काही घडत नाही, आणि महागाईची चढती कमान सरकारलाही मान्य करावी लागते कारण जीवनोपयोगी वस्तूच्या किमतीचा निर्देशाक वाढला की आपल्या कर्मचाऱ्याच्या महागाईभत्त्यात सरकारला वाढ करावीच लागते ती वाढ काही अजून थाबलेली नाही परतु आर्थिक क्षेत्रात आपण फार मोठा विक्रम करून राहिलोय असा आभास सरकार निर्माण करू पहात असत पोलाद, कोळसा, औद्योगिक वस्तू वगैरेच्या उत्पादनात कशी नेत्रदीपक वाढ झालीय, किबहुना अन्नधान्य, साखर, तेलबिया, सिमेट वगैरेचही उत्पादन अफाट वाढल्याच आकडे देऊन सरकार सागत असत पण तुम्हा-आम्हाला साखर, तेल, सिमेंट वगैरे वस्तू मात्र दुप्पटतिप्पट किमत देऊन काळ्या बाजारातून घ्याव्या लागतात अशी ही आकड्याची चलाखी करून

आपण जनतेला बनवू शकू असं वाटतं पण लोक जे काही समजायचं ते समजतात या आकडेमोडीची हास्यास्पदता दाखवून देणारी एक मजेदार गोष्ट गोविंदजींनी सांगितली

'एकदा एका गावात दुष्काळ पडला म्हणून गावचा शेठजी आपला 'कुनबा' (कुटुंब) घेऊन दुसऱ्या गावाला निघाला वाटेत त्याला एक मोठी नदी लागली त्यानं काठावरच्या लोकांना विचारलं, 'या नदीचं पाणी किती खोल आहे?' लोकांनी सांगितलं, शेटजी, तुम्ही नदीत उतरू नका फार फार खोल आहे ती निदान साठ फूट तरी खोल असेल ' शेटजी म्हणाले, "काही पर्वा नाही माझ्याबरोबरच्या लोकांची एकूण उंची शंभर फुटापेक्षाही जास्त भरेल.' त्याप्रमाणे त्यानं आपल्या ताड्यातल्या प्रत्येक पुरुषाची, स्त्रीची, मुलाची, एवढंच नव्हे तर गुराढोरांचीही उंची मोजली ती एकूण शंभर–सव्वाशे फूट भरली त्याबरोबर त्या शेटजीनं आपल्या त्या परिवारातल्या एकेका माणसाला बेधडकपणे नदीत घुसून पलीकडे जायला सांगितलं परिणाम व्हायचा तोच झाला कुटुंबातली सगळी माणसं नदीत बुडून मेली शेटजी आश्चर्यचकित होऊन उद्गारला, हिसाब मेरा ज्यों का त्यों, कुनबा मेरा डुब्बा क्यों?' त्या शेटजीसारखी आहे आमच्या राज्यकर्त्यांची स्थिती! त्यांच्या आकडेमोडीप्रमाणे या देशातली चलनवाढ ७ टक्क्यापर्यंत खाली आलीय त्या अर्थी देशात स्वस्ताई झाली असून उत्पादनही बेसुमार वाढलय आता तुम्हाआम्हाला महागाईचे चटके बसतात, घराची दुरुस्ती करायला एक पोतभर सिमेंटही वर्षानुवर्षं मिळत नाही, पाचसहाशे रुपये भाडं देऊनही तीन–चार खोल्यांचं घर रहायला मिळत नाही दुसऱ्या वर्गाच्या पाचपट भाडं भरूनही आगगाडीच्या पहिल्या वर्गात बसायला जागा मिळेल याची शाश्वती नाही, पण सरकारी आकडेवारीनुसार सगळीकडे आबादी आबाद आहे " गोविंदजी उपहासानं म्हणाले

तर असे हे आगगाडीतले दोस्त! गाडीतून उतरल्यावर ज्यांची ओळख आपण तासाभरातच विसरून जातो, असे त्यांच्या खुबीदार बोलण्यानं माझ्या स्मरणात राहून गेले

अरसीकेरीहून आमची गाडी पॅसेंजर बनली आणि ताशी दहाबारा मैलांच्या तुफान वेगानं घोडदौड करीत सकाळी १०–१५ला मैसूर स्टेशनला येऊन एकदाची थडकली लेक-जावई स्वागताला हजर होतेच आईला घेऊन लेक रिक्शानं जयलक्ष्मीपुरमधल्या आपल्या भाड्याच्या बंगलीकडे गेली, आणि मी जावयाच्या स्कूटरवर त्यांच्या मागे बसून सकाळची ताजी हवा खाऊ लागलो

आम्ही मैसूरला विश्रांतीसाठी जातो असं आम्ही लोकांना सांगतो खरं, परंतु ते संपूर्ण सत्य नसतं अर्धसत्यही नसतं त्या विधानातला सत्याचा अंश नाममात्रच असतो कारण विश्रांतीच्या दृष्टिकोणातून विचार केला तर आमचं पुण्यातलं जीवन आणि मैसुरातलं जीवन यांत तसा फारसा फरक नसतो सौभाग्यवतींचा

गबंध दिवस जावयासाठी आणि मुलींसाठी कोणता तरी खास खाद्यपदार्थ तयार करण्यात जातो त्यातून वेळ उरला, तर लेकीसाठी पापड-लोणची करून देण्यात तो खर्च होतो हेच सार ती पुण्यात करीत असते फरक असलाच तर तो प्रमाणाचा पुण्याच कुटुंब मोठ असल्यान घरच्या कामातून तिला फुरसतच मिळत नाही. मैसूरला 'तुम दो--हम दो' आणि त्यातला मी खाण्यापिण्याच्या बाबतीत अगदीच निरुपद्रवी मला फक्त एक भाकरी दुपारी आणि एक रात्री मिळाली की माझ भागन भाजी-आमटीपैकी एखादा पदार्थ असला किंवा नसला तरी माझ अडत नाही 'लई ऱ्हाई लई ऱ्हाई मागण' ही सतोक्ती निदान जेवणाच्या बाबतीत तरी मी कटाक्षान आजवर अमलात आणत आलो आहे ! त्यामुळे तिथ थोडी अधिक फुरसत सौभाग्यवतीला मिळते, आणि त्या अवधीत तिच थोडफार वाचन होत

माझ्या दिनक्रमात तर काहीच फरक पडत नाही दिवसभर लेखनवाचन चालूच रहात आता सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीन लेखन-वाचन ही रिकामपणची कामगिरी असल्यान ती 'वेळ वाया घालवण', 'कालक्षेपम' या सदरातच पडते बाकी विश्राती म्हणजे तरी काय ? वेळ वाया घालवणच नव्हे काय ? इतर लोक हा कालापव्यय गादीवर लोळून किंवा रानावनात भटकून साजरा करतात; तर लेखक खुर्चीवर बसून वेळेबरोबरच कागद-शाईही वाया घालवतो. वेळ सत्कारणी लावायचा म्हणजे हालचाल, धावपळ केली पाहिजे असा सकेत आहे. लिखाणात तशी धावपळ असतच नाही त्यामुळे लिखाण हा विश्रांतीचाच एक वेगळा प्रकार आहे अस लोक समजतात ते काही अशी बरोबरही आहे

आता लिखाण करायच म्हणजे त्यासाठी पूर्ण तयारी हवी त्याप्रमाणे मनाशी काही योजना आखूनच मी तरी मैसूरला जातो पहिल्या एक-दोन खेपाना मैसूरमधली व आसपासची प्रेक्षणीय स्थळ पहायची आणि त्याच्यासबंधी लेख तयार करायचे, अशी योजना घेऊन मी गेलो होतो त्याप्रमाणे ती पुरीही केली वृदावन-उद्यान, राजवाडा, प्राणिसग्रहालय, श्रीरगपट्टण, हळेबीड-बेलूर, जोग (गिरसप्पा) धबधबा, वगैरेसबधी माझे लेख प्रसिद्ध झाले व 'भारतभ्रमण'मधे त्यापैकी काही समाविष्टही झाले एक फेरी खास 'कूर्ग देश आणि लोक' म्हणजेच 'दक्षिणेतली यक्षभूमी' हे पुस्तक तयार करण्यासाठीच वापरली मग मैसूरच्या प्रमुख व्यक्तीच्या भेटीगाठी आणि मुलाखती घेऊन त्याचा परिचय मराठी वाचकाना करून देण्याचा उपक्रम काही खेपामधे केला मैसूर विद्यापीठाचे कुलगुरू श्री जवरे गौडा, प्रख्यात कादबरीकार डॉ उ रा अनतमूर्ती, दलित लेखकाचा नेता देवनूर महादेव वगैरे-सबधीचे लेख वेळोवेळी प्रसिद्ध झाले मैसूरमधल्या मराठीभाषी लोकासबधीही माहिती मिळवून एक लेख प्रसिद्ध केला होता. याचा अर्थ असा की, दर खेपेस काही ना काही प्रकल्प मनाशी योजूनच मी मैसूरला जात असतो.

या खेपेला एक वेगळच काम घेऊन मी मैसूरला गेलो होतो माझ्या आत्म-

चरित्राचं लिखाण मी नुकतंच संपवलं होतं. माझ्या पत्नीनं आणि मुलीनं ते सारं वाचून पहावं आणि काही सूचना असल्यास मला सांगाव्यात, म्हणजे आवश्यक ते फेरफार करता येतील, या विचारानं मी हस्तलिखिताचं बाड मैसूरला घेऊन गेलो होतो. त्याप्रमाणे त्या मायलेकींशी चर्चा केल्यानंतर अनेक गोष्टींवर प्रकाश पडला. त्यानुसार लिखाणही आपोआप झालं. मूळ हस्तलिखितात पन्नास-साठ पानांची भर पडली. (बिचारा प्रकाशक! केविलवाण्या नजरेनं माझ्याकडे पहातोय!) जवळ-जवळ तेवढ्याच मजकुराचं हे प्रवासवर्णन लिहून झालं. (वाचकाची रागीट नजर मला स्पष्ट दिसते आहे!) 'सोबत'साठी एक लेखही लिहून पाठवला. गुंडूराव व कन्नड साहित्यसम्मेलन याच्यासंबंधीही लेख लिहून टाकले. एकूण काय, पुण्यात राहिलो असताना जेवढी लेखनकामाठी केली असती, तेवढीच मैसूरच्या मुक्कामा-तही होऊन गेली. गुजरातीत एक म्हण आहे. 'दरजी अने मोची जीवे त्यांसुधी सीवे.' शिंपी आणि चांभार जिवात जीव असेपर्यंत शिवतच रहातो. ही म्हण तयार झाली तेव्हा आजच्यासारखा व्यावसायिक किंवा हौशी लेखक अस्तित्वात असता तर त्याच अर्थाची 'लेखकाची लेखणी तो मेल्यावरच थांबायची' अशी म्हण तयार झाली असती. वार्धक्यामुळे ज्यांना स्वतःच्या हातानं लिहिणं अशक्य होतं ते इतरांकडून लिहवतात. त्यांनी, 'दिसामाजी काही तरी ते लिहावे, प्रसंगी अखंडीत वाचीत जावे' हा समर्थांचा उपदेश भलत्याच गंभीरपणे अमलात आणण्याचं ठरव-लेलं असतं. किंबहुना असंही म्हणता येईल की, दारू, गांजा, अफू यांसारखं लेखन हेही एक भयंकर व्यसन आहे आणि ते सुटता सुटत नाही. अखेर जेव्हा संपादक-प्रकाशक-वाचक पार कंटाळून, वैतागून जातात आणि त्या लेखकाचं लिखाण छापा-यचं-वाचायचं नाकारतात, तेव्हाच त्यांच्या मनात लेखनसंन्यासाचे विचार येतात. परंतु असं फार क्वचित घडतं. नवनवीन लेखकांच्या आगमनामुळे जुने लेखक मागं पडत असले तरी प्रत्येक लेखकाचा एक लहानसा वाचकवर्ग शेवटपर्यंत त्याला साथ देत रहातो. त्यामुळं लेखनसंन्यासाचा विचार स्मशानवैराग्यासारखा क्षणकालच टिकतो. म्हणून मी कुठेही गेलो तरी लिहिण्याची ही नशा चालूच असते.

शिवाय जावईबापूंच्या गावी जाऊन त्यांच्या कुटुंबियांची 'मातमपुरसी' (शोकसांत्वना किंवा दुखवटा) व्यक्त करण्याचा कार्यक्रम अनिवार्यच होता. तो प्रवास अत्यंत दगदगीचा. प्रसंगानुरोधानं इतरही काही कार्यक्रम ऐन वेळी ठरलेच.

सारांश, मुलीच्या गावी जाऊन विश्रांती घेण्याची कल्पना ही नेहेमीप्रमाणंच एक सबब ठरली. कामातला बदल म्हणजे विश्रांती, असं म्हणतात. पण आमच्या बाबतीत तेही लागू पडत नाही. आमच्या कामात बदल होतच नाही. फक्त कामाच्या जागेत आणि सभोवतालच्या वातावरणात फरक होतो. तेवढ्या अर्थानं आम्ही विश्रांतीला जातो आणि विश्रांती घेतो, असं म्हणता येईल.

मैसूरला गेल्यावर माझा पुण्याचा दिनक्रम सुरू झाला. सकाळी एक तासभर

फिरून यायचं आणि मग सबंध दिवस घरात बसून लेखन–वाचन करायचं जय-लक्ष्मीपुरजवळ मैसूर विद्यापीठाचं मानसगंगोत्री नावाचं आवार आहे स्वच्छ, गात डांबरी रस्ते, नव्यानं उभारलेल्या टुमदार इमारती आणि अधूनमधून भेटणारी तुर-ळक झाड, यामुळे तो परिसर रमणीय वाटतो सकाळच्या मोकळ्या हवेत तिथ फिरायला बर वाटत रस्त्यावर क्वचितच कुणी भेटत साखरझोपेचा मोह टाळून शरीराला व्यायाम देऊ इच्छिणारा माझ्यासारखा एखाददुसरा आवटषौकी पुरुष केव्हातरी भेटतो परंतु फिरायला यणाऱ्यामधे मला ओळखणार कुणी नसल्यामुळे माझ्या एकाग्रतेचा भग होत नसे

जयलक्ष्मीपुरम आणि मानसगंगोत्री यांच्या मधून मडिकेरी (मरकारा) या कूर्गच्या राजधानीला जाणारा मोठा प्रशस्त असा राष्ट्रीय हमरस्ता जातो दोन–तीन दिवस या रस्त्यानच मी फिरायला गेलो त्यात एक हेतू होता. आपला चाल-ण्याचा वेग मला पडताळून पहायचा होता वीस–पचवीस वर्षापूर्वी मी माझा वेग शोधून काढला होता त्यावेळी तो ताशी तीन मैल होता आता उतारवयामुळे तो थोडा कमी झाला असावा अशी माझी कल्पना होती दोनचार महिन्यापूर्वी मी नारायणगावला माझे मित्र, कॉंटिनेंटल प्रकाशन'चे मालक श्री अनंतराव कुलकर्णी यांच्याबरोबर माझ्या एका पुस्तकासबधी चर्चा करण्यासाठी तीन दिवस जाऊन राहिलो होतो तेव्हा पुणे–नाशिक रस्त्यावरून चालताना मी माझा वेग पडताळून पाहिला होता तेव्हाही तो ताशी तीन मैलच असल्याच मला आढळून आल होत याचा अर्थ असा की, वय वाढल, गात्र शिथिल झाली, पण चालण्याचा वेग कायम राहिला मैसूर, मडिकेरी मार्गावर किलोमीटरचे दगड आहेत म्हणून किलोमीटर-मधील वेग काढून मैल आणि किलोमीटर याचा परस्परसबध स्वत च्या बाबतीत शोधून काढावा, अस मी ठरवल माझ्या या सशोधनाचे निष्कर्ष असे निघाले की, एक किलोमीटर अंतर चालून जायला मला बारा मिनिट लागतात या बारा मिनि-टात मी १३२० पावल चालतो मैलाच्या संदर्भात माझा असा अनुभव होता की, एक मैल चालून जाण्यास मला वीस मिनिट लागतात, आणि त्या अवधीत मी २२०० पावल चालतो या हिशेबान मी दर मिनिटाला ११० पावलं चालतो त्याप्रमाणे खरोखरीच आपण दर मिनिटाला इतकी पावल चालतो किंवा नाही, याचाही मी पडताळा घेऊन पाहिला तो अगदी अचूक आला नेहेमीच्या वेगात थोडा बदल करून लांबलांब पावल टाकून पाहिली तेव्हा एका मिनिटात ११५ पावल भरली, आणि भरभर चालून पाहिल तेव्हा १२० पावल भरली या दोन्ही प्रकारानी थकवा येतो, परंतु त्या प्रमाणात म्हणावा तसा वेग मात्र वाढत नाही हे लक्षात आल शारीरिक शक्ती क्षीण झाली असतानाही चालण्याचा वेग मदावत नाही, हा माझ्या दृष्टीन महत्त्वाचा शोध होता. बहुधा नियमितपणे सतत फिरत राहिल्यामुळे तस घडल असाव !

पुण्यातल्या सकाळच्या फिरण्यात चालणं कमी नि बोलणं जास्त असं घडत वीस–बावीस लोकांचं आमचं एक टेकडीमंडळ आहे. त्यात अनेक जातींचे व अनेक भाषा बोलणारे, समाजातले प्रतिष्ठित लोक आहेत बारा देशांचं पाणी पिऊन आलेले, साहित्यरसिक श्री मो. ज्ञा शहाणे, 'श्रीविद्या प्रकाशन'चे श्री मधुकाका कुलकर्णी, आहारतज्ज्ञ डॉ के वि पानसे, कागदव्यापारी श्री. नवीनचंद्र गांधी, प्रख्यात चार्टर्ड अकाउंटंट श्री बा रा पंडित, पुण्याचे खानदानी कारखानदार श्री शंकरराव वाळवेकर, टायर व्यवसायातले 'किंग' म्हणून ओळखले जाणारे केरळचे श्री अण्णा नायर, बिडी-कारखानदार श्री रावजीभाई देसाई, ही नमुन्यादाखल सांगण्यासारखी काही नावं. बहुतेक सर्वजण डेक्कन–जिमखाना, शिवाजीनगर आणि एरंडवणा भागात स्वतःची घरं असणारे आहेत काहीजण लक्षाधीश आहेत, तर काहीजणांच्या बाबतीत ते कोट्यधीश असल्याची बोलवा आहे ही सारी मंडळी आपापल्या मार्गानं निघून 'फर्ग्युसन कॉलेज'च्या पिछाडीस असलेल्या टेकडीवर 'गोखले स्मारक' शिळेजवळ जमतात, आणि मग गप्पांचा अड्डा जमतो अचकट-विचकट चकाट्या पिटणं आणि साऱ्या जगातली लफडी–कुलंगडी चविष्टपणानं सांगणं–ऐकणं हा आमचा मुख्य उद्देश बाहेरच्या सभ्य जगात जे काही बोलता-सांगता येत नाही ते सारं इथं निःसंकोचपणे सांगितलं जातं पावित्र्यविडंबन, मूर्ति-भंजन आणि चारित्र्यहनन या त्रिविध कलेत टेकडीमंडळाचा हात धरू शकेल अशी व्यक्ती अथवा संस्था–संघटना जगात अजून जन्माला आली नसावी खुद्द परमेश्वर आमच्या अड्ड्यावर येऊन चार दिवस बसला तर आमच्या चिरफाडीनंतर तो विस्मयचकित होऊन म्हणेल, "अरे, मी इतका लोफर आणि बदमाष आहे हे मला कधी कळलंच नाही!" सर्वांचे मुखवटे इथं आपोआप गळून पडतात एखाद्यानं आपला मुखवटा टिकवून ठेवायचा प्रयत्न केला, तर तो टराटरा फाडून त्याच्यासमोर वस्तुस्थितीचा आरसा धरला जातो क्षणभर त्या गृहस्थाला भांबा-वल्यासारखं होतं परंतु लौकरच आपल्या खऱ्या चेहऱ्याची त्याला ओळख पटते, आणि आपलं वास्तविक रूप तो मान्य करतो टेकडीवरून खाली उतरताच प्रत्येक-जण आपापला नेहेमीचा मुखवटा धारण करून घरची वाट चालू लागतो त्यानंतर मात्र प्रत्येकजण इतका सज्जन, सालस बनतो, की काही क्षणापूर्वी तो इतका बदमाष होता, हे कुणाला खरही वाटायचं नाही.

हे सारं एका दृष्टीनं अगदीच बालिशपणाचं, गावढळपणाचं वर्तन असतं परंतु त्यामुळे कसं ताजतवानं झाल्यासारखं वाटतं टवटवीतपणाची ती शिदोरी चोवीस तास सहज पुरते या शिदोरीची आम्हाला एवढी चटक लागली आहे, की एखाद्या दिवशी टेकडीवरच्या अड्ड्यात जाणं जमलं नाही, तर अगदी चुकल्या-चुकल्यासारखं होतं जिमखाना-शिवाजीनगर भागातली मंडळी बहुधा रोजच 'रूपाली'त जाऊन चहा-कॉफी पितात आम्हा एरंडवनवासी लोकांना रोज तेवढा

वेळ वाया घालवणं परवडण्यासारखं नसल्यामुळे आम्ही फक्त रविवारच्या सामूहिक नाश्त्यात सहभागी होतो. काही वर्षांपूर्वी या नाश्त्याचा खर्च आठदहा रुपये होत असे. हल्ली तो वाढतवाढत चाळीस-पन्नास रुपयांपर्यंत जाऊन पोचला आहे. या खाण्यापिण्याच्या कार्यक्रमाला आम्ही 'ठुमरी' हे काव्यपूर्ण नाव दिलं आहे. दर आठवड्याला आळीपाळीनं एकेकानं ठुमरी द्यायची. वर्षातून दोनदा किंवा तीनदा अशी पाळी प्रत्येकावर येते. म्हणजे सुमारे शंभर-दीडशे रुपये प्रत्येकाला वार्षिक भुर्दंड द्यावा लागतो. जेव्हा कधी एखाद्याच्या जीवनात काही आनंददायक घटना घडते तेव्हा तो खास ठुमरी देतो. कुणाला बक्षिस मिळालं, कुणाचा फोटो वर्तमानपत्रात छापून आला, कुणाला नातवंड झालं, कुणाच्या मुलानं—नातवंडानं परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलं, म्हणजे तो अशी जादा ठुमरी देतो. परदेशी जाणाऱ्याला मंडळानं निरोपाची ठुमरी द्यायची, आणि त्यानं परत आल्यावर तशीच जोरदार ठुमरी देऊन तिची परतफेड करायची, असाही रिवाज आहे.

त्याखेरीज अधूनमधून वाढदिवस, लग्नसमारंभ वगैरे निमित्तानं सामूहिक भोजनाचेही कार्यक्रम होतात. त्याला आम्ही 'ख्याल' किंवा 'बडा ख्याल' असं नाव दिलं आहे. पूर्वी स्वस्ताईच्या काळात पन्नास-साठ रुपयांत हा ख्याल बसत असे. तेव्हा बहुतेक प्रत्येकजण 'ख्याल' देई. आता तसं काही विशेष कारण असलं तरच ख्यालाची मागणी केली जाते. टायरवाले अण्णा अथवा सरदार (काशिनाथ गणेश) जोशी यांच्यासारखी दिलदार मंडळी काही कारण नसताना उत्स्फूर्तपणे ठुमरी किंवा ख्याल देतात. डॉ. ग. स. कामत दर वर्षी न चुकता गणेशचतुर्थीत आपल्या बंगल्यावर बडी ठुमरी किंवा छोटा ख्याल देतात. टेकडीमंडळाच्या सभासदांच्या धर्मपत्नीनाही अनेकदा बड्या ख्यालात सामील केलं जातं. त्यामुळे एक प्रकारचं कौटुंबिक वातावरण निर्माण होतं. काही सभासदांच्या बायकाही येतात, पण त्यांचा कंपू वेगळा असून त्यांचे कार्यक्रम स्वतंत्रपणे चालतात. अधूनमधून प्रेक्षणीय स्थळांना भेटी देण्याचे कार्यक्रमही अमलात आणले जातात. मात्र कुठे जायचं हे ठरवण्यातच बहुधा कित्येक आठवडे निघून जातात. त्यासंबंधी नुसती चर्चा करण्यातही एक विशेष आनंद असतो.

माझ्या दृष्टीनं टेकडीमंडळाचा एक विशेष फायदा झाला आहे. श्री. मोहनराव शहाणे आणि काही प्रमाणात श्री. मधूकाका कुळकर्णी यांच्या व्यतिरिक्त इतर कुणालाच माझ्या साहित्यिक जीवनाची तशी विशेष कल्पना नाही. माझी पुस्तकं त्यांच्यापैकी कुणी वाचलेली नसतात. आणि मी ज्या नियतकालिकांत नियमानं लिखाण करतो ती त्यांच्या वाचनात येत नाहीत. त्यामुळे एक लेखक म्हणून नव्हे, तर एक सामान्य माणूस म्हणून ते लोक माझ्याकडे पहातात. आपल्यातला लेखक वगळल्यास आपल्यामध्ये ज्याला महत्त्व द्यावं असं किती कमी भांडवल आहे, याची

कल्पना या लोकामध्ये वावरल्यामुळे मला आली माणसाच्या डोळ्यात एक अद्भुत क्ष–किरण-यत्र असत त्यातून त्याला समोरच्या व्यक्तीच्या अतरगातले सारे काळे ठिपके दिसतात खुद्द त्या व्यक्तीला मात्र ते सहसा दिसत नाहीत अर्थात ते डाग काढून टाकण इतक सोप नसत पण आपल्या अत करणावर इतराना दिसणारे इतके डाग आहेत याची कल्पना त्या व्यक्तीला येत असल्यामुळे स्वत सबधीचे तिचे अनेक भ्रम दूर होतात माझ्या स्वत सबंधी असे अनेक भ्रम दूर व्हायला टेकडी-मडळाच्या लोकाच्या शरसधानाचा मला चागला उपयोग होतो व्यावहारिक जगात वावरताना, उगीच कशाला कुणाला दुखवाव ही सर्वसामान्य माणसाची वृत्ती असते त्यामुळे समोरच्या माणसातला चागला भागच आपण पहातो आणि त्याच कौतुक करतो ते ऐकून आपण फारच चांगले, विद्वान, प्रतिभावत, निर्भय, शूर वगैरे आहोत अस आपल्याला वाटत वस्तुत ते आपल एकागी दर्शन मला घडू लागल आणि मग, ‘ अहो, हा तर पोटभरू लेखक आहे ! ’. . ‘ तुमच लिखाण कोण वाचत ? ’. ‘ दर्जेदार सपादक–प्रकाशक तुम्हाला दाराशी उभ करीत नाहीत ! ’ ‘ तुमचा गाधीवाद म्हणजे निव्वळ ढोंग आहे ! ’ .. ‘ हा एक नबरचा चिक्कू आहे. जीव देईल, पण पैसा देणार नाही ! ’ केवळ स्वत च्या फायद्याचाच विचार कर-णारा विचारवत ! ’— यासारखी शेरेबाजी ऐकून अस्वस्थ होण मी सोडून दिल उलट लोक आपल्याविषयी अस का समजतात–बोलतात, त्यात आपलाही काही दोष नसेल काय, तो दोष कोणता असेल, या प्रश्नांनी मला अनेकदा अतर्मुख केल तसेच सर्वसामान्य लोकांच्या दृष्टीन साहित्य आणि साहित्यिक हे किती क्षुल्लक, उपेक्षणीय आहेत, परतु आपण मात्र स्वत:ला आणि स्वत च्या पेशाला उगीचच कस अवास्तव महत्त्व देत असतो, हेही लक्षात आल ‘ माझी किमत मजला कळली’ या माझ्या कवितेत खेड्यातल्या अशिक्षित शेतकऱ्याला माझ्या साहित्यिक महात्म-तेची काहीच कल्पना नसल्याबद्दल मी खत आणि हळहळ व्यक्त केली आहे पण ‘ टेकडीमडळा’त बसू लागल्यावर तो अडाणी शेतकरी आणि शहरातले सुशिक्षित, उच्चवर्णीय, उच्चवर्गीय लोक यांच्यात साहित्यिक अभिरुचीचा विचार करता फारसा गुणात्मक फरक नसल्याच मला आढळून आल त्याचा सुशिक्षितपणा वृत्त-पत्रांच्या वाचनापलिकडे फारसा जात नाही आणि त्या वाचनातही त्यांची मजल सनसनाटी बातम्याची मर्यादा सहसा ओलाडत नाही, हे माझ्या लक्षात आल अग्रलेख आणि गभीर विषयावरचे लेख यांच्याकडे कुणी ढुकूनही पहात नाही दैनदिन गरजा, बगल्याची सजावट, कपड्याची छानछोकी आणि एकूण चैनबाजी याच्यावर हजारो रुपये खर्च करणारे हे लोक पुस्तकाच्या खरेदीवर क्वचित पैसा खर्च करतात ज्यांना वाचनाची थोडीफार आवड असते ते लोकही ग्रथालयातून किवा उसनवार पुस्तक आणून वाचतात आमच्या सास्कृतिक दारिद्र्याच आणि दिवाळखोरीच हे दर्शन मोठ विदारक आहे

'टेकडीमंडळा'च्या अड्ड्यावरील गप्पांतून मला कधीकधी मजेदार विषय मिळतात. अनेक प्रश्नाचे वेगवेगळे पैलू मला दिसू लागतात त्याचा फायदा मला माझ्या लिखाणात होतो माझ्या विधानावर निर्दयपणे हल्ला चढवायला 'टेकडी'-वाले मुळीच मागेपुढे पहात नाहीत त्यातून माझ्या मुद्द्याची दुसरी बाजू मला समजते अर्थात माझं लिखाण ती मंडळी वाचीत नसल्यामुळे माझ्या विवेचनाला त्यांच्याकडून नकळत कसा हातभार लावला जातो या बाबतीत ते बहुधा नेहेमीच अनभिज्ञ रहातात

फिरून परत येताना माझ्याबरोबर मुख्यत मोहनराव शहाणे असतात त्यांच्याशी अनेक विषयांवर गंभीर चर्चा होते माझे स्वत चे विचार स्पष्ट व्हायला तिची मला मदत होते परंतु या साऱ्या प्रकारामुळे फिरण्याच्या वेळी जे मुक्त चिंतन व्हायला हव ते सहसा होत नाही

मैसूरच्या मुक्कामात या चिंतनाला भरपूर वाव मिळाला मी एकटाच फिरा-यला जाई, आणि वाटेत मुळीच विश्रांती न घेता तीन–साडेतीन मैलाचा कोटा पुरा करून घरी परत येई या वेळी मी कागद–पेन जवळ ठेवी एखादा चांगला मुद्दा सुचला की तो उभ्याउभ्याच टिपून ठेवी, आणि घरी आल्यावर त्याचा विचार करून लिहून काढी रस्त्यात उभं राहून जेव्हा मी डोक्यात आलेले मुद्दे टिपून ठेवी, तेव्हा आसपासचे लोक आपल्याला वेडपट तरी समजत असतील किंवा परकीय एजंट तरी समजत असतील, असा विचार माझ्या मनात येऊन जाई

जयलक्ष्मीपुरम किंवा सरस्वतीपुरम यासारख्या मैसूरच्या उपनगरांत गेल्या चारपाच वर्षांत जी नवी घर बांधली गेली आहेत त्याचा देखणेपणा आणि आधु-निकपणा चटकन नजरेत भरतो बहुतेक बंगले छोटे आणि बैठेच (एकमजली) आहेत पण त्यांची बांधणी इतकी कलापूर्ण आहे, की त्यांच्याकडे पहातच रहाव अस वाटत हे बंगले मुख्यत श्रीमंताचे असले तरी त्यांत मध्यमवर्गीय मालकाचे बंग-लेही पुष्कळच आहेत पुण्याला असे बंगले क्वचितच पहायला मिळतात प्रत्येक बंगल्याच्या आवारात किमान दोन तरी सिंगापुरी नारळाची झाड हमखास असतात पुण्याच्या लोकांनाकलमी आंबा, सोनचाफा, चिकू, गुलाब याची विशेष आवड असते मैसूरच्या लोकाना नारळाच्या झाडाच वेड आहे सहज हाताला येतील असे नार-ळाचे घड झाडांवर लटकलेले असतात परंतु ते चोरीला जात नाहीत हे विशेष पुण्याच्या नारळांच्या आणि आंब्याच्या चोऱ्यांनी घरमालक इतके हैराण होतात, की चोऱ्यांना वैतागून काही लोक बागेतली फळझाडच तोडून टाकतात मैसूरचे घर-मालक त्या बाबतीत फारच भाग्यवान कुणालाही हेवा वाटावा असे

मला लहानपणापासून नदी आणि डोंगर याच विलक्षण आकर्षण वाटत आल आहे इतक, की ज्या गावाला नदी नसेल आणि सभोवती डोंगर नसतील ते गावच मला आवडत नाही पुण मला आवडत याच एक प्रमुख कारण गावातून वाहणारी

मुळा–मुठा आणि गावाभोवती असलेल्या लहानमोठ्या टेकड्या हे होय मैसूरला तशी चामुंडी टेकडी आहे पण ती गावापासून इतकी दूर आहे, की तिचा फिरायला जाण्याच्या दृष्टीने फारसा उपयोग होत असेल असं वाटत नाही शिवाय तिच्यावर जाण्यासाठी डांबरी सडक तयार करण्यात आली असल्यामुळे तिचं नैसर्गिक सौंदर्य तेवढ्या प्रमाणात कमी झालं आहे तेवढी टेकडी वगळल्यास आसमंतात एकही डोंगर दिसत नाही जमिनीला टेकलेलं आकाश पहायला मला आवडत नाही क्षितिजाची 'मोनॉटनी' — एकसुरीपणा — तोडणारे डोंगर गावाभोवती असलेच पाहिजेत, असं माझं मत आहे मानसगंगोत्रीच्या आवारात फिरताना मैलोन् मैल पसरलेल्या माळरानाचा एकसुरीपणा डोळ्यांना खटकतो या बाबतीत मानसगंगोत्रीचं शांतिनिकेतनशी खूप साम्य आहे तिथही असंच विस्तीर्ण माळरान पसरलेलं आहे रवींद्रनाथांना त्यातही भरपूर काव्य दिसलं, हा भाग निराळा ।

मैसूरजवळ लहानमोठे तलाव बरेच आहेत, परंतु त्या शहराला लोकमातेचा शेजार मात्र लाभलेला नाही तशी मैसूरची नदी म्हणून कावेरीचा उल्लेख करता येईल परंतु ती आहे मैसूरहून बारातेरा मैलांवर — श्रीरंगपट्टण या शहराजवळ शहराजवळून वाहाणारी नदी त्या शहराला एक आगळं सौंदर्य प्रदान करते. त्या लाभापासून मैसूर नगर वंचित राहिलं आहे

मैसूरमधली आणि आसपासची प्रेक्षणीय स्थळं यापूर्वी अनेकदा पाहिली असल्यामुळे या खेपेला त्यांच्यासाठी वेळ आणि पैसा खर्च करायचा नाही असं आम्ही ठरवलं होतं परंतु आम्ही न पाहिलेली एक वस्तू लोकांना पहाण्यासाठी ठेवण्यात आली असून ती लौकरच कडीकुलुपात ठेवली जाणार आहे असं वृत्तपत्रातल्या बातमीवरून समजल्यामुळे, ती वस्तू पाहून घ्यावी असा विचार मनात आला, आणि ताबडतोब आम्ही तो अमलातही आणला. ती वस्तू म्हणजे मैसूरच्या महाराजाचं सुवर्ण-सिंहासन ! कोट्यवधी रुपये किमतीचं हे सिंहासन खरोखरीच पहाण्यासारखं आहे मैसूरच्या राजवाड्यातच सशस्त्र सैनिकांच्या पहाऱ्यात ते लोकांना पहायला मिळतं सामान्यतः दर वर्षी दसराउत्सवाच्या वेळी ते लोकांना पहाण्यासाठी बाहेर काढतात एरवी राजवाडा पहाण्याचा दर दोन रुपये असतो परंतु सिंहासन प्रदर्शनार्थ मांडलं असेल तेव्हा हा दर तीन रुपये माणशी असा करण्यात येतो तीन–चार पायऱ्या असलेलं हे सिंहासन संपूर्ण सोन्याचं असून त्यात जागजागी हिरे जडवलेले आहेत शिवाय अस्सल मोत्यांचे लांबसडक घोस समोरच्या बाजूस लटकलेले दिसतात सिंहासनावर सुंदर नक्षीकामही केलेलं आहे त्याच्या जवळच काही कलापूर्ण सुवर्णपात्रही प्रदर्शनार्थ मांडून ठेवलेली होती एवढं सोनं निष्कारण पडून असल्याचं पाहून मनाला हळहळही वाटली परंतु एक कलाकृती म्हणून असलेलं तिचं महत्त्वही मी नाकारू शकलो नाही बहुधा साम्यवादी देशा-

नीही आपल्या जवळील आपल्या मौल्यवान कलाकृती जपून ठेवल्या असाव्यात, अशी माझी समजूत आहे

हा राजवाडा पूर्वी एकदोनदा मी पाहिला होता त्यातील रविवर्म्यांच्या मूळ चित्रानी मला तेव्हाही मोहवल होत पुन पुन्हा पहाण्यासारख्याच त्या कलाकृती आहेत इतर भित्तिचित्रही पहाण्यासारखी आहेत अनेकविध शस्त्रास्त्राचा सग्रह, पेंढे भरून ठेवलेली हिंस्र श्वापद, भव्य दालन — सारच प्रेक्षणीय आहे हा राजवाडा पहाताना माझ्या मनात विचार येत होता जुने राजे–महाराजे गेले, त्याच्या जागी नवे राजे–महाराजे आले त्यांना मत्री, कारखानदार, व्यापारी अस म्हणतात त्याच्यापैकी अनेकाची प्राप्ती जुन्या राजे–रजवाड्याच्या सपत्तीपेक्षा कितीतरी पटींनी अधिक आहे परतु चिरतन मूल्य असणाऱ्या कलाकृतीच्या निर्मितीसाठी त्यापैकी कितीशी सपत्ती वापरली जात असेल ? जुने राजेरजवाडे चैनीसाठी म्हणून ज्या गोष्टी करीत त्यामुळे शेकडो-हजारो कारागिरांना आणि कलावताना रोजगार आणि प्रोत्साहन मिळत असे आजच्या नवश्रीमताकडून अशी काही लोकसेवा घडत असलेली दिसत नाही ते चैनी, उधळे तर आहेतच, पण स्वार्थी आणि आप्पल-पोट्येही आहेत जुन्या कलाकृती पहाताना हा विचार हटकून माझ्या मनात येऊन जातो आजच्या श्रीमताच्या श्रीमतीचा उपयोग फक्त त्याना आणि त्याच्या कुटुबियांना होतो जुन्या काळी त्या श्रीमतीचा लाभ गोरगरीबानाही मिळत असे बहुधा त्यामुळेच आर्थिक विषमता कुणाला फारशी बोचत नसावी

साडेपाचला राजवाडा बद होतो त्यानंतर सहा वाजता सपूर्ण राजवाडा आणि त्याच्या आवारातली मदिरे यावर सुदर रोषणाई केली जाते ती पहाण्यासाठी आम्ही थाबलो. परतु त्या दिवशी काहीतरी गडबड झाली होती दिवे लागायला साडेसात वाजून गेले अर्थात नतरच दृश्य पाहिल्यावर थांबल्याच सार्थक झाल असं वाटल देशात विजेचा तुटवडा असताना अशा प्रकारे रोषणाईवर वीज वाया घालवावी काय, हा प्रश्न माझ्या मनात निर्माण झाला परतु सर्वसामान्य लोकाना ती रोषणाई पाहून जो आनद मिळतो तो लक्षात घेता एवढी उधळपट्टी क्षम्य समजावी अशी मी माझ्या मनाची समजूत घातली

बिरुनाणी हे आमच्या कन्येच सासर यापूर्वी मी तिथ दोनदा जाऊन आलो होतो इजा, बिजा, तिजा होणार अस मी गृहीत धरलच होत त्याचप्रमाणे झाल मुलीच्या सासूच्या निधनाच वृत्त समजताच आम्ही दुखवटा व्यक्त करण्यासाठी बिरुनाणीला जायच ठरवल कारण चार भावांपैकी आमचे जावई डॉ० सुब्बय्या हे वगळता इतर तिघेजण बिरुनाणीच्या पैतृक घरातच रहातात खर म्हणजे दु ख करण्यासारखी स्थिती नव्हती आई जवळजवळ ऐंशी वर्षांची होती अलिकडे आजा-रान हैराण झाली होती त्यामुळे मृत्यून तिची यातनातून सुटका केली हे एका परीन बरच झाल होत परतु अखेर ती आईच होती तरुणपणी वैधव्य प्राप्त झालेल असताना

आपल्या चारी मुलांना शिकवून वर काढण्यासाठी तिने अपार कष्ट घेतले होते अत्यंत कर्तृत्ववान, बाणेदार, करारी बाई होती डॉ० सुब्बय्यांना आईचा फार लळा आमचाही आपल्या या शेंडेफळावर फार जीव होता बाईला मुलगी नव्हती माझ्या मुलीने तिचं मन असं जिंकून घेतलं की म्हातारपणी आपल्याला मुलगी मिळाल्याचं समाधान तिला लाभलं माझ्या मुलीलाही सासूविषयी आईइतकाच आपलेपणा वाटू लागला होता त्यामुळे श्रीमती पूवव्वांच्या निधनाचं खरं दुःख डॉ० सुब्बय्या आणि माया यानाच झालं होतं परंतु प्रचलित रिवाजाप्रमाणे त्यांच्या वडिलार्जित घरी जाऊन थोरल्या चिरंजिवांना भेटणं आवश्यक होतं अलिकडे आपल्या सुशिक्षित समाजात ही प्रथा विशेष कटाक्षाने पाळली जात नाही निदान मी तरी त्या बाबतीत काहीसा बेपर्वाच असतो आणि माझे आई-वडील वारले तेव्हा दुखवट्यासाठी फारसं कुणी आलं नाही तेव्हा मला मनातून बरंच वाटलं परंतु कोडव समाजात हा दुखवटा फार महत्त्वाचा समजला जातो दुखवटा व्यक्त करायला नात्यातली किंवा मित्र-परिवारातली एखादी व्यक्ती आली नाही तर तो मृत व्यक्तीचा आणि एकूण कुटुंबाचा अपमान समजला जातो व्यक्तिशः मला हा सारा औपचारिक शिष्टाचार मुळीच आवडत नाही परंतु सौभाग्यवतीला सर्व नातेवाइकांची मनं सभाळली पाहिजेत असं वाटतं म्हणून ती सारे शिष्टाचार काटेकोरपणे पाळते अर्थातच मग मलाही अनिच्छेने का होईना, तिच्याबरोबर फरफटत जावं लागतं यदा आम्ही मैसूरला जायचं ठरवलंच होतं त्यामुळे फक्त वेळापत्रक थोडं मागेपुढे झालं, एवढंच

कूर्गचा प्रदेश आधीच निसर्गरम्य त्यात बिरुनाणीचा भाग विशेषच सुंदर अत्यंत दाट जंगल आणि डोंगरदऱ्यांनी वेढलेला बिरुनाणी हे गावाचं नाव परंतु तुम्ही ते गाव कुठे आहे म्हणून पहायला गेलात तर तुम्हाला चारसहा चौरस मैलांत पायी फेरफटका मारावा लागेल इथल्या गावांची रचनाच अशी मजेदार आहे प्रत्येक घर दुसऱ्या घरापासून अर्ध्यापाऊण मैलाच्या अंतरावर मधल्या भागात शेती तरी असेल किंवा दाट जंगल तरी कोडव लोक इतके शूर कसे याचं उत्तर त्यांच्या या निवास-स्थानातून सापडतं प्रत्येक घर हेच जणू स्वतंत्र गाव असतं हिंस्र पशूपासून आणि चोराचिलटांपासून रक्षण करण्याचं बाळकडू प्रत्येक व्यक्तीला मिळालेलं असतं परवान्याशिवाय बंदूक वापरण्याचा अधिकार यामुळेच कोडवांना इंग्रजांकडून मिळालेला असून अजूनही तो चालू आहे प्रत्येक घरात किमान एक बंदूक असतेच

परंतु या बिरुनाणीला पोचणं मात्र मला फार दगदगीचं असतं मैसूरहून ८० कि मी दूर असलेल्या गोणीकोप्पळ या गावी जायचं तिथं तासभर थांबायचं आणि तिथून वीस मैलांवर असलेल्या बिरुनाणीला दुसऱ्या बसने जायचं आम्ही सकाळी सातला मैसूर-बसमध्ये चढलो आणि बिरुनाणीला पोचलो तेव्हा दुपारचे बारा वाजले होते बस-स्टँडपासून कीकणमाडा कुटुंबाचं घर अर्धा-पाऊण मैल दूर आहे बहुतेक रस्ता शेतांच्या बांधावरून जाणारा म्हणजे पायवाटच आहे त्यात

पुन्हा चढउतार हे सार सौभाग्यवतीला जमण्यासारख नसल्यामुळे मी एकटाच डॉ० सुब्बय्याबरोबर गेलो. या खेपेला त्यानी गोपीकोप्पळला न उतरता तिथून १०–१२ मैलांवर असलेल्या टी० शेट्टीगेरी या गावाचं तिकिट काढल होत टी० म्हणजे तावळ-गेरी ! गावाच नाव तावळगेरी–शेट्टीगेरी परतु लोकानी सुलभ उच्चारणासाठी त्याच टी० शेट्टीगेरी केलय तिथून बिरुनाणीचा फाटा फुटतो बिरुनाणीच्या गाडीची वाट पहात थांबण्यापेक्षा चालायला सुरुवात करावी, ही जावईबापूची सूचना मला एकदम पसत पडली माझ सकाळच चालण झाल नसल्यामुळे एका परीन मला ते बरच वाटलं परतु लौकरच माझ्या लक्षात आल की पहाटेच्या थड वेळेच फिरण वेगळ आणि उन्हात वाटचाल करण वेगळ तरी पण आम्ही तासभर चालत राहिलो एवढ्यात मागून बस आली, आणि पुढचा ७–८ मैलाचा प्रवास आम्ही आरामात केला

अधूनमधून कच्चा रस्ता असल्यामुळे थोडफार धूलिस्नान घडलं पण ते फार भयकर किंवा असह्य वाटल नाही या रस्त्याच्या हलाखीवरून या भागाकडे कर्नाटक–सरकारचं काहीस दुर्लक्ष झाल असल पाहिजे, हे माझ्या लक्षात आल कारण कर्नाटकातले रस्ते तसे फारच छान आहेत या दुर्लक्षाच कारण समजून घेण्याचा मी प्रयत्न केला तेव्हा एक गमतीदार गोष्ट समजली स्वातत्र्योत्तर काळात जेवढ्या निवडणुका झाल्या त्या सर्वांमधे या भागातून सत्ताधारी काँग्रेस पक्षाला लोकांनी कधीच मत दिल नाही ९० टक्के मत नेहेमीच विरोधी पक्षाच्या उमेद-वाराला पडत गेली प्रस्थापिताशी जिद्दीन टक्कर देणारा एक छोटासा प्रदेश अस्तित्वात आहे, हे पाहून मला फार बर वाटल आपल्या त्या समानधर्म्याविषयी माझ्या मनात विशेष आत्मीयता निर्माण झाली. कोडव समाजामधे तशी शभर टक्के साक्षरता (पारशांप्रमाणे) आहे त्यातही पुन्हा हा भाग विशेष जागृत समजला जातो भारतीय जनता पक्षाच्या कर्नाटक शाखेचे अध्यक्ष आणि विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते श्री ए के सुब्बय्या यांच हुडिकेरी हे गाव बिरुनाणीपासून फक्त दहा मैलावर आहे त्यांच्या चारित्र्याचा आणि सेवाभावी वृत्तीचाही हा परिणाम असण्याची शक्यता आहे आपल्या क्षुद्र स्वार्थापायी मिळेल त्या किमतीला विकल्या जाणाऱ्या शहरी बुद्धिवतांशी तुलना करता, स्वत च नुकसान होणार हे माहीत असू-नही भ्रष्टाचारी सत्ताधाऱ्याशी तडजोड न करता विरोधी पक्षांना साथ देणाऱ्या त्या शूर जनतेला मी मनोमन अभिवादन केल

टी० शेट्टीगेरीपासून आम्ही चालू लागलो आमच्या मागून चारपाच फेरीवाले डोकीवर हारे घेऊन येत होते काळी लुगी, अगात बुशशर्ट, कपाळाला गधाचा टिळा डोकीवरच्या हाऱ्यात अॅल्युमिनियमची भाडी वयान पचविशीच्या आसपासचे ते लोक आपसात बोलत असताना डॉ सुब्बय्यानी ऐकल ते म्हणाले, " ते लोक मराठी बोलताहेत " मी कान देऊन त्याच बोलण ऐकू लागलो पण मला काहीच

अर्थबोध होईना त्यांच्या काही शब्दावरून ते मराठी बोलताहेत हे समजत होत पण ते इतक्या भरभर बोलत होते, त्यांच्या मराठीत इतके कानडी शब्द येत होते आणि त्याचे हेल इतके कानडी होते, की ते बोलत असलेली भाषा मराठीच असेल यावर विश्वास बसत नव्हता

अखेर माझ्यान ऱ्हावल नाही मी त्यांच्या जवळ जाऊन बोलायला सुरुवात केली माझी भाषा कळायला त्यांना फारशी अडचण पडत नसावी अस दिसलं त्यांच म्हणण समजून घेण्यासाठी मला मात्र त्यांना पुन:पुन्हा विचाराव लागत होत त्यांच्यापैकी दाढी–मिश्या वाढवलेला तरुण त्याचा पुढारी होता त्याच्याशीच मी बोलू लागलो त्यान मला अस सांगितल की, ' आम्ही मैसूरचे मराठा गोंधळी आहोत " मराठा म्हणजे मराठी भाषा बोलणारा कारण गोंधळी जात मराठ्याहून वेगळी आहे ते लोक आजही लग्नात गोंधळ घालतात इतर वेळी डोकीवर हारा घेऊन गावोगावी भांडी विकत फिरत असतात मी त्याला विचारल, " ही काळी लुंगी तुम्ही कशासाठी नेसली आहे ? या भागात रंगीत लुंगी तर फक्त मुसलमानच वापरतात." यावर तो म्हणाला, " ही अय्याप्पाच्या उपासनेची खूण आहे जाने-वारीत आम्ही अय्याप्पाच्या दर्शनासाठी शबरीमले (केरळ)ला जाणार आहोत तिथे जाण्यापूर्वी फार कडक व्रत ठेवाव लागत रोज अंघोळ करायची मासमच्छर खायच नाही बायकोजवळ झोपायचं नाही " मी विचारल, तमचा देव कोणता ?" त्यान सांगितल, ' यल्लाम्मा आणि मारियम्मा ही आमची दैवत. पण तुम्ही लोक जसे पंढरपूरच्या वारीला जाता, तसे आम्ही अय्याप्पाच्या दर्शनाला एकदा तरी जाऊन येतो भाळ कष्टा !" (फार त्रासाची यात्रा असते ती )

मैसुरातील भावसारांच्या मराठीच संशोधन झाल आहे पण मैसुरात भाव-साराखेरीज इतरही अनेक मराठीभाषी समाज आहेत गोंधळी हे त्यांच्यातलेच भावसार हे शिंपी आणि कापडव्यापारी. ते चांगले सुस्थितीतले लोक आहेत पोलि-सात आणि सैन्यात असणारे मराठा क्षत्रियही तसे सुखवस्तू आहेत परंतु या गोंधळ्यासारखे काही गरीब समाजही असले पाहिजेत मी त्याला विचारल, ' तुमची नाव कशी असतात ?" तो म्हणाला, "माझ नाव फुटप्पाराव तो दुसरा आहे, त्याच नाव सुंदरराव !" या लोकांना मराठी लिहिता–वाचता येत नाही कारण सार शिक्षण कानडीतूनच होत असत त्यामुळे त्यांची मराठीही कन्नडमिश्रित असते

मी त्याला विचारल, "तुमच्या जातीत शिकलेले, श्रीमंत लोक नाहीत काय?" तो म्हणाला, "दोड्ड दोड्ड डॉक्टर, वकील, व्यापारी आमच्याबी जातीमदी हैत की ! आमच शिक्षण झाल नाही, म्हणून आम्ही हा धंदा करतो आम्हा गोंधळ्यांची मस्त घरं हैत मैसुरात " (मस्त म्हणजे पुष्कळ.)

हे लोक महाराष्ट्रातून या भागात कधी आले असतील कोण जाणे बहुधा

त्याच्या भाषेचा अभ्यास केल्यास त्यावरून त्यांच्या स्थलांतराचा काळ स्थूल मानाने सापडू शकेल या खडप्राय देशात अशी स्थलांतर अनादिकाळापासून चालत आली आहेत आणि आजही चालू आहेत जे समाज सुशिक्षित होते त्यांनी लेखनवाचनाद्वारे आपल्या मूळ भाषेशी थोडाफार संपर्क कायम ठेवला तरी पण त्यांची ही भाषा तशी जुनाटच राहिली आधुनिक भाषेच्या तुलनेने ती अशुद्धही समजली जाईल परंतु असे समाज फार थोडे बहुतेक स्थलांतरित नव्या समाजाशी आणि तिथल्या भाषेशी इतके एकरूप होऊन जातात, की त्यांची वेगळी ओळख किंवा आगळेपणा (identity) शिल्लकच उरत नाही एकात्म भारताच्या दृष्टीने ही गोष्ट चांगलीच समजली पाहिजे जशी मराठी मंडळी दक्षिणेकडे गेली, तशी दाक्षिणात्य मंडळीही महाराष्ट्रात आली आणि इथल्या मातीशी एकरूप होऊन गेली उदाहरणार्थ, आमच्या स्वतःच्याच घराण्यासंबंधी असं सांगतात की, आमचे पूर्वज मंगळवेढ्याच्या मार्गाने आंध्रातून महाराष्ट्रात आले, आणि निपाणी–कापशीमार्गे मुरगूडला जाऊन स्थायिक झाले संकेश्वर, निपाणी, कापशी वगैरे भागांत आमची पाळंमुळं अजूनही ओळखू येतात परंतु आपण तेलुगुभाषी होतो याचा काही पुरावा आमच्या घराण्याने मागे ठेवलेला नाही, इतके आम्ही महाराष्ट्र व मराठी भाषा यांच्याशी एकरूप होऊन गेलो या स्थलांतरांचं स्वरूप एकदा समजलं की अमुक एका भाषेशी आणि प्रदेशाशी आपलं नातं अपरिवर्तनीय नसल्याची जाणीव होते आणि मग इतर भाषा व प्रदेश यांच्याशी शत्रुत्व करण्यातला फोलपणा लक्षात येतो अर्थात सीमाप्रश्नाचा लढा एकदा सुरू झाला की हे सारं तत्त्वज्ञान बासनात गुंडाळलं जातं, आणि कानडी–मराठी माणसं हिंदू–मुसलमान किंवा हिंदुस्तान–पाकिस्तानप्रमाणे कायमच हाडवैर असल्यासारखी वागू–बोलू लागतात अशा वेळी आपला वेगळेपणा टिकवून ठेवलेल्या भिन्नभाषी लोकांची अवस्था मोठी अडचणीची होत असणार, हे उघड आहे.

कूर्गमधला एकमेव चहामळा बिरुनाणीजवळ आहे. कूर्गमध्ये सर्वत्र कॉफी व वेलदोडे यांचेच मळे आहेत काळी मिरीही भरपूर पिकवतात परंतु चहाच्या लागवडीकडे लोकांनी का लक्ष दिलं नाही याची चौकशी करता असं समजलं की, कॉफी, वेलदोडे, मिरी ही पिकं अगदी लहानलहान तुकड्यांतही करता येतात परंतु चहासाठी एका वेळी किमान हजार–बाराशे एकराचं क्षेत्र लागतं कोडवांजवळ एवढी मोठी शेती नाही. हा चहामळा एका गोऱ्या साहेबाचा होता तो आता एका बंगाल्यानं विकत घेतलाय त्याचा स्वतःचा मळा आसाममध्ये होता तिकडे मजुरांचा उपद्रव सुरू झाल्यानं त्यानं तो विकून हा मळा घेतला कूर्गमध्ये मजुरांचा त्रास अजून मोठ्या प्रमाणावर सुरू झालेला नाही मात्र त्याची पूर्वचिन्हं दिसू लागली आहेत.

ठरल्याप्रमाणे आम्ही बिरुनाणीला कोकणमाडा कुटुंबाच्या वडिलार्जित घरी गेलो. दुखवट्याच्या वेळी काय बोलायचं असतं याची मला काहीच कल्पना नसल्या-

मुळे डॉ० सुब्बय्याचे थोरले बंधू श्री बोपय्या यांच्याशी चार इकडच्यातिकडच्या गोष्टी बोलून प्रसंग साजरा केला माझ्यासारखा शाकाहारी पाहुणा आला की कोडव लोकांची फार पंचाईत होते पाहुण्याची सरबराई करायची म्हणजे मदिरा आणि मांस अपरिहार्यच असत त्या लोकांमध्ये नैवेद्यालाही हे दोन पदार्थ अनिवार्य असतात पण मी गेलो की त्यांना काहीच करता येत नाही तरी पण भात, पातळ भाजीसारखी आमटी, तांदुळाच्या पिठाच्या भाकरी आणि साबुदाणामिश्रित शेवयांची खीर असा बेत त्यांनी केला होता मला तो पसंत पडला जेवण होताच आम्ही निघालो कारण आम्हाला सायंकाळपर्यंत मडिकेरीला पोचायच होत

घरासमोरच्या एका पडवीत चारपाच बाहेरचे मजूर रहात असल्याच मला दिसलं त्याबद्दल श्री बोपय्यांना विचारल असताना ते म्हणाले, " हे केरळचे लोक आहेत. या दिवसांत कॉफीच्या लागवडीसाठी मशागत करायची असते त्याकरता यांची मदत लागते खड्डे तयार करण, झाडांची छाटणी, साफसफाई वगैरे काम ते करतात असल्या अंगमेहनतीच्या कामांसाठी सर्वांत उत्कृष्ट मजूर म्हणजे केरळचे मोपले (मुसलमान) त्याखालोखाल केरळचे ख्रिश्चन आणि मग मल्याळी आणि तामिळी हिंदू यांचा क्रमांक लागतो सर्वांत आळशी आणि कुचकामी म्हणजे कर्नाटकी मजूर त्यांना आम्ही सहसा काम देत नाही केरळचे हे मजूर महिनाभर इथ रहातात, काम पुर करतात आणि परत आपापल्या गावी जातात त्यांना कामाप्रमाणे रोज दहा ते पंधरा रुपये मजुरी आम्ही देतो त्यांचा कसलाही त्रास आम्हाला होत नाही अत्यंत साळसपणान ते वागतात."

" त्यांची भाषा तुम्हाला येते ?" मी विचारल

" हो, येते ना ! केरळची सरहद्द इथून फार जवळ आहे त्यामुळे त्या राज्याशी आमच दळणवळण फार पुरातन काळापासून आहे लहानपणापासून या लोकांशी संबंध असल्यान मल्याळम भाषा आम्हाला आपोआप कळू लागते अनेकदा तामिळनाडूचे मजूरही या भागात कामाला येतात त्यांचीही भाषा आम्हाला समजते आमच्या कोडव भाषेत कन्नडहून अधिक शब्द मल्याळम आणि तामिळ भाषांचे आहेत याच कारण हेच " त्यांनी सांगितल

असममधे पूर्व–बंगालमधून आलेल्या मुस्लिम शेतकऱ्याच्या समस्येन जे उग्र रूप धारण केलय, त्याच स्वरूप या संदर्भात सहज लक्षात येत फरक एवढाच की, असमिया जमीनमालक स्वत अत्यंत आळशी व ऐदी असल्यामुळे शेतकामासाठी आलेल्या मुसलमानांना परत पाठवण्याच त्यांना सुचल नाही त्यामुळे अशा या बहिरागतांनी किंवा घुसखोरांनी असमच अस्तित्वच धोक्यात आणल आहे. याच्या उलट कोडव लोक स्वत अंगमेहनत करणारे असल्यामुळे, बाहेरून आलेले मजूर शिरजोर होऊन जमिनी बळकावणार नाहीत याची खबरदारी त्यांना घेता आली

कोडव लोक जसे लष्करी बाण्याचे आहेत, तसे ते भूमिपुत्रही आहेत शेती-

विषयी त्यांना विलक्षण ओढ वाटते या संदर्भात डॉ सुब्बय्याचंच उदाहरण नमूद करण्यासारखं आहे वस्तुत लहानपणापासून शिक्षणाच्या निमित्तानं ते घरापासून दूर, शहरी वातावरणात वावरले परंतु त्यांच्यातला शेतकरी मरून गेला नाही तो त्यांना शेतीकडे खेचतच राहिला वडिलार्जित जमिनीपैकी सुमारे पंचवीस-तीस एकर जमीन त्यांना सहज मिळू शकली असती कोडवांच्या जमिनीसंबंधी एक वैशिष्ट्यपूर्ण कायदा पुरातन काळापासून चालत आला आहे याला 'जम्म' किंवा 'जम्मा' असं म्हणतात बहुधा 'जन्म' या शब्दापासून तो बनला असावा या कायद्या-प्रमाणे कुणाही कोडवाला आपली वडिलार्जित जमीन विकता येत नाही, अथवा तिच्यात वाटेही पाडता येत नाहीत कुटुंबाची सारी जमीन एकत्र असते ज्याला जेवढं शक्य असेल तेवढी जमीन तो आपल्या ताब्यात घेतो आणि तिच्यात शेती करतो एका भावानं एकदा जमीन ताब्यात घेऊन तिच्याभोवती कुंपण घातलं, की ती त्याच्या मालकीची होते

कोकणमाडा कुटुंबाची सुमारे शंभर एकर जमीन आहे डॉ सुब्बय्या आणि त्यांचे तीन भाऊ यांनी ती जमीन आपसात वाटून घेतली असती, तर प्रत्येकाच्या वाट्याला सुमारे पंचवीस एकर जमीन आली असती परंतु डॉ सुब्बय्या यांना कूर्गमध्ये राहून शेती करणं शक्य नसल्यामुळं त्यांनी शेतीवरला आपला हक्क सोडून दिला त्यामुळे इतर तीन भावांनी आपापल्या कुवतीप्रमाणे जमिनीवर ताबा मिळ-वला नुसतं कुंपण घातलं की जमीन मालकीची होत नाही तिच्यात प्रत्यक्ष शेती करावी लागते कॉफी, वेलदोडे, मिरी, संत्री यासारख्या पिकांसाठी खूप मोठं भांड-वल लागतं ते सर्वांनाच उपलब्ध होऊ शकत नाही म्हणून हातात जेवढं भांडवल असेल, जेवढी शेती करणं स्वतःला शक्य असेल तेवढीच जमीन प्रत्येकजण ताब्यात घेतो अनेकदा बरीचशी जमीन पडीतही रहाते परंतु बहुतेक जमीन डोंगराळ आणि जंगलानी भरलेली असल्यानं तिच्यावर शेजारचे नातेवाईक सहसा अतिक्रमण करीत नाहीत असं अतिक्रमण करण्याचा कुणी प्रयत्न केल्यास खूनही पडतात

जंगल साफ करून शेतीयोग्य जमीन तयार करणं हे अत्यंत कष्टाचं आणि खर्चाचं काम असतं परंतु त्यात एक विशेष आनंदही असतो आपल्याला कूर्गमध्ये जाऊन रहाता येणार नाही, हे लक्षात आल्यावर डॉ सुब्बय्यांनी मैसूरजवळ दोन एकराचं रान विकत घेतलं (किंमत वीस हजार रुपये) आणि तिथे शेती सुरू केली. त्या शेतीत ते इतके रंगून गेले आहेत, की विद्यापीठातलं आपलं अध्यापनाचं काम संपलं की ते शेतावर जातात आणि शेतीच्या लहान-सहान कामात गढून जातात महा-राष्ट्रातल्या ब्राह्मणांना शेतीचा मोह खेड्याशी बांधून ठेवू शकला नाही कारण त्यांच्या मनात भूमातेविषयी तो जिव्हाळा कधी निर्माणच झाला नव्हता शेती हे त्यांच्या दृष्टीनं एक शोषणाचं साधन होतं याच्या उलट कोडव माणूस मनानं शेत-करीच असतो त्यामुळं शक्य होताच तो शेतीत मेहेनत करू लागतो

दुपारी तीनच्या सुमारास आम्ही बिरुनाणीहून निघालो आणि चारच्या सुमारास गोणीकोप्पळला पोचलो गावात प्रवेश करताच आमची बस थांबली ही खासगी बस होती कूर्गमधे जिल्ह्यांतर्गत वाहतुकीसाठी खासगी बस–कंपन्यांना परवानगी आहे जगदीश्वर, जयलक्ष्मी, गणेश अशी या कंपन्यांची नावं आहेत जिल्ह्यातून बाहेर जायचं असेल तर मात्र सरकारी बसमधून जावं लागतं सरकारी गाड्यांना वेळेचं बंधन पाळावं लागतं खासगी गाड्यांना वेळेचं अथवा उतारूंच्या संख्येचंही बंधन नसावं असं वाटतं आमची बस बराच वेळ फतकल मारून बसली आम्हाला विराजपेटला जाऊन सरकाऱ्याची बस पकडायची होती त्यामुळे आमचा जीव कासावीस होऊ लागला चौकशी केल्यावर समजलं की, आसपासच्या गावातल्या मुली गोणीकोप्पळच्या कॉलेजात रोज शिकायला येतात त्यांना परत नेण्यासाठी बस थांबली होती

थोड्या वेळानं महाविद्यालय सुटलं, आणि साठसत्तर तरुणींनी टोळधाडीप्रमाणं बसवर हल्ला चढवला आधीच बस भरलेली त्यात या नवागतांना जागा कशी मिळणार ? पण त्यांना त्याची चिंता नव्हती जिथे जागा मिळेल तिथे त्यांनी शिरकाव करून घेतला दोन बाकांच्या मधल्या जागेतही त्या घुसल्या आमच्यासमोर तीन तरुणी येऊन आमच्याकडे पाठ फिरवून उभ्या राहिल्या एखाद्या उल्लू माणसाला गंमत करण्याची ती चांगली संधी होती परंतु तसा असभ्यपणा कुणी केला नाही. माझ्या बाबतीत मात्र दुसरंच संकट उभं राहिलं

अखेर एकदाचे आम्ही विराजपेटला पोचलो सरकाऱ्याची बस तयारच होती तिच्यात बसून आम्ही साडेपाचला निघालो आणि सव्वा तासात मडिकेरीला पोचलो गर्दीमुळे मनस्वी उकाडा होत होता समोर 'कूल ड्रिंक' चं (ज्याला आपण कोल्डड्रिंक म्हणतो त्याचं) दुकान होतं परंतु गर्दीतून खाली उतरून घसा ओला करून येण्याचा धीर झाला नाही ही बसही खासगीच असल्यामुळे उतारूंच्या संख्येवर काही बंधन नव्हतं सुदैवानं बहुतेक उतारू जवळपासचे असल्यानं लौकरच गर्दी ओसरली आणि बाहेरच्या निसर्गाचा आनंद लुटणं शक्य झालं बाहेरचं दृश्य पहाताना माझ्या डोळ्यांसमोरून गोवा, दक्षिण–कन्नड (साउथ कॅनरा), असम वगैरे प्रदेशातला निसर्ग तरळत होता भारताच्या या अगदी दोन टोकांच्या प्रदेशामधे केवढं अद्भुत साम्य आहे हे पाहून मला आश्चर्य वाटत होतं. आणि या देशाला एकतेच्या सूत्रात बांधून ठेवायला निसर्गही उत्सुक — नव्हे, तो आपल्या परीनं तशी खटपट करतो आहे, ही जाणीव किती सुखद होती !

आम्ही मैसूरला जायचं ठरवलं तेव्हा आमच्या तिथल्या मुक्कामाच्या अवधीत तिथून जवळच म्हणजे सुमारे ७५ मैलांवर असलेल्या मडिकेरी या कूर्गच्या जुन्या राजधानीच्या शहरी अखिल भारत कन्नड साहित्यसम्मेलनाचं ५४ वं अधिवेशन भरणार आहे, याची मला काहीच कल्पना नव्हती तशी ती असती तर काहीशा

तयारीनं मी गेलो असतो बेंगळूरच्या ज्या कन्नड साहित्यपरिषदेतर्फे या सम्मेलनाचं आयोजन करण्यात आलं होतं तिला पूर्वसूचना देऊन मी गेलो असतो तर सम्मेलनात हजरी लावता आली असती परंतु सम्मेलनासंबंधी काहीच कल्पना नसल्यामुळं तसं काही घडू शकलं नाही

मैसूरला गेल्यावर सम्मेलनाची बातमी समजली अर्थात नुसती बातमी समजूनही काही उपयोग नव्हता कन्नड भाषा जाणणारी कुणी जबाबदार व्यक्ती बरोबर नसताना तिथं जाण्यात काही अर्थ नव्हता परंतु माझे जामात डॉ कोकण-माडा कार्यप्पा सुब्बय्या याना परिषदेतर्फे खास निमंत्रण मिळालेलं होतं 'कोडगिन हिरिमे' (कूर्गचे मोठेपण— The glory of Kobago) या विषयावरील परि-संवादात 'जागतिक वेदिकेयल्लि कोडगु' (जागतिक संदर्भात कूर्ग) या पोटविषयावर त्याना निबंध वाचायचा होता त्यामुळं अनायासे माझी प्रवास, निवास वगैरेची सोय होणार होती म्हणून डॉ सुब्बय्यांबरोबर मी मडिकेरीला जायचा निर्णय घेतला. सौभाग्यवतीनं मरकारा पाहिला नव्हता परंतु बिरुनाणीचा प्रवास तिला झेपण्यासारखा नसल्यामुळं तिनं आमच्या कन्येबरोबर थेट मडिकेरीला यावं असं ठरलं

त्याप्रमाणं डॉ सुब्बय्या यांच्यासह मी शुक्रवार ता २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी मडिकेरीला पोचलो यापूर्वी मी नडियादचं गुजराती साहित्यसम्मेलन (१९५५) व तेजपूरचं असमीया साहित्यसम्मेलन (१९६८) अशा दोन अमराठी साहित्यसम्मेलनाना हजर राहून मराठी साहित्यिकांच्या शुभेच्छा त्या—त्या भाषांच्या लेखकांपर्यंत पोचवल्या होत्या आता कन्नड साहित्यिकाना तशा शुभेच्छा पोचवून 'हॅटट्रिक' साधावी, असा विचार माझ्या मनात येऊन गेला सम्मेलनाध्यक्ष डॉ. शं बा जोशी यांनी थोडी कल्पकता वापरली असती आणि उपस्थित कन्नड साहित्यिकानी जराशी आत्मीयता दाखवली असती तर माझी ही हॅटट्रिक साधून गेली असती अर्थात तशी ती साधली नाही म्हणून काही फारसं बिघडलं नाही देशाच्या तीन टोकांना भरलेल्या तीन विभिन्न भाषांच्या साहित्यसम्मेलनांना हजर रहाण्याची संधी आपल्याला मिळाली (बहुधा अशी संधी मिळालेला मी एकमेव मराठी लेखक असेन !) याबद्दल माझ्या आंतरभारती मनाला मिळालेलं समाधान पुरेसं होतं

महाराष्ट्रातल्या लोकाना गोव्याविषयी जसं एक खास आकर्षण वाटतं, तसंच कन्नडिगांना कूर्गविषयी वाटतं या दोन प्रदेशात तसं पुष्कळच साम्यही आहे गोव्या-प्रमाणंच कूर्गही निसर्गसौंदर्यानं नटलेला छोटासा प्रदेश आहे १६०० चौरस मैल (४२०० चौ. कि मी ) क्षेत्रफळ आणि सुमारे पाच लाख लोकवस्ती असलेला हा प्रदेश कर्नाटक व केरळ यांच्या सरहद्दींवर वसलेला आहे गोव्याचं सौंदर्य हे तिथला समुद्र, खाड्या, मंदिर, वनश्री यांमध्ये सामावलं आहे, तर कूर्गचं सौंदर्य हे लहान-मोठे डोंगर, दऱ्या, जंगल, कॉफीचे मळे यांमधून दृष्टीस पडतं गोव्याप्रमाणंच

कूर्गच्या स्त्रीसौंदर्याची ख्याती देशभर पसरलेली आहे पुरुषाच्या बाबतीत मात्र खूप फरक आहे गोव्याचे लोक शिक्षण, कला, साहित्य, विद्वत्ता, संगीत वगैरेसाठी प्रसिद्ध आहेत, तर कूर्गचे लोक शौर्य आणि नगदी पिकांची शेती यांबद्दल नावाजलेले आहेत गोव्याचे सारस्वत (हिंदू व ख्रिश्चन) हे त्या प्रदेशाचे प्रतिनिधी समजले जातात वस्तुत सारस्वत आणि कोडव यांची संख्या एकूण प्रदेशाच्या संख्येत तशी नगण्यच म्हणावी लागेल परंतु त्यांचा प्रभाव मात्र त्या–त्या प्रदेशाच्या जनजीवनावर अत्यंत अधिक आहे एके काळी गोवा हे पोर्तुगीजांचं राज्य होतं, त्याप्रमाणे कूर्ग हे केंद्रशासित राज्य होतं भाषावार प्रांतरचना झाल्यावर कूर्गचं राज्य कर्नाटकात विलीन झालं परंतु पोर्तुगीज संस्कृतीचं जतन करण्याच्या खुळचट कल्पनेनं गोव्याचं अस्तित्व मात्र वेगळं ठेवण्यात आलं महाराष्ट्रापासून आपलं वेगळेपण सिद्ध करण्यासाठी गोव्याच्या मित्रांनी कोंकणीचा आधार घेतला कूर्गच्या लोकांमधे गोवेकरांसारखी विभक्तपणाची भावना प्रबळ असती तर त्यांनाही आपल्या कोडव (कोडगू) भाषेचा आधार घेता आला असता कारण कोडगू भाषा जरी कन्नड लिपीत लिहिली जात असली तरी ती कन्नडची बोली नसून ती स्वतंत्र भाषा आहे, असा निर्वाळा भाषाशास्त्रज्ञांनी दिला आहे त्या भाषेत थोडीफार साहित्यनिर्मितीही झाली आहे तरीही आपण कर्नाटकाचा अविभाज्य भाग बनून रहाण्याचं कूर्गनं ठरवलं यात त्यांची त्यागभावनाच दिसून येते भाषावार प्रांतरचना अस्तित्वात आल्यावर फक्त कूर्ग हाच प्रदेश ६ कोटी रुपये घेऊन कर्नाटकात सामील झाला होता इतर प्रदेश तुटीचेच होते

आपण बाहेरचे लोक इंग्रजी शुद्धलेखनामुळं ज्या शहराला मरकारा असं म्हणतो, त्याचं स्थानिक नाव 'मडिकेरी' असं आहे सिमला, उटकमंड, महाबळेश्वर, माथेरान वगैरे थंड हवेच्या ठिकाणाप्रमाणं मडिकेरी हेही उंच डोंगरावर वसलेलं सुमारे ३० हजार लोकवस्तीचं शहर आहे समुद्रसपाटीपासून त्याची उंची सुमारे ४ हजार फूट आहे सर्वत्र पसरलेल्या दाट झाडीमुळं तिथली हवा नेहेमीच थंड आल्हाददायक असते ब्रिटिशांना मोहून टाकण्याचं सामर्थ्य या शहरात आहे ही गोष्ट आपल्याला चटकन पटते सारं शहर लहानलहान टेकड्यांवर वसलेलं असून गावात फिरायचं म्हणजे चढउतार करताकरता पाय दुखू लागतात अनेकदा एका घरातून दुसऱ्या घरात जायचं म्हणजे एक टेकडी उतरून दुसरी चढावी लागते मात्र त्याचा एक फायदाही झाला आहे कुठंही सांडपाणी साठून रहात नाही सारं शहर नेहेमीच स्वच्छ–लख्ख असतं 'मडिकेरी' या कोडगू शब्दाचा अर्थच मुळी 'स्वच्छ शहर' असा आहे.

तसं पाहिलं तर सारा कूर्ग प्रदेशच लहानमोठ्या डोंगरांनी व टेकड्यांनी व्यापलेला आहे दोन टेकड्यांमधील सपाट जागेत भातशेती केली जाते. आम्ही गेलो तेव्हा 'भाते पिकुनी पिवळी झाली' अशी स्थिती होती दुरून पाहिलं की

एखादी प्रचंड नदी संथ गतीने वाहत असावी असा भास होत होता काही ठिकाणी सभोवती सगळीकडे टेकड्या असल्यामुळ सरोवराचा भास होई भोवतालच्या टेकड्यांवर हिरवीगर्द झाडी ते दृश्य पाहून डोळे कसे निवाले ! मन तृप्त झाल पण हिरवे–पिवळे गालिचे सर्वत्र पसरले होते

मडिकेरीला आमची बस पोचली तेव्हा सायकाळचे पावणेसात वाजले होते दिवस लहान असल्यामुळ सर्वत्र अधाराच साम्राज्य पसरल होत शहरात प्रवेश करण्यापूर्वीच दुरून दिसणाऱ्या विद्युत्दीपाची शोभा दृष्टी खिळवून टाकणारी होती एखादा उठावाचा नकाशा पहावा तस सार शहर डोळ्यांसमोर उभ राहिल एवढीशी लोकसख्या इतक्या विस्तीर्ण भूभागावर पसरलेली पाहून बर वाटल कारण त्याचा अर्थ असा होता की तिथ गर्दी नाही तस मडिकेरीमध्ये पहाण्या-सारख फारस काही नाही सभोवताली पसरलेल्या निसर्गाला डोळ्यात साठवून घेण हा तिथला खरा आनद नाही म्हणायला ओंकारेश्वर मदिर, छोटासा किल्ला व त्यातला राजवाडा, राजाची बैठक (राजाज सीट) वगैरे काही प्रेक्षणीय म्हणता येतील अशी स्थळ तिथ आहेत परतु त्यात तस जगावेगळ फारस काही नाही मडिकेरीला जाणारी मडळी मुख्यत तलकावेरी या कावेरीच्या उगमाला भेट देण्यास उत्सुक असतात मडिकेरीहून ६० मैल दूर असलेल हे स्थान अत्यत रमणीय आहे तिथून कुद्रेमुख बेट, मैसूरची चामुडी टेकडी, मलबारमधील वायनाडचे डोंगर आणि तामिळनाडूतील नीलगिरी पर्वताच्या रागा दिसतात सूर्यास्ताच्या वेळी अरबी समुद्रही स्पष्ट दिसतो याच्या जवळच भागमडल नावाच एक प्रेक्षणीय तीर्थक्षेत्रही आहे

इकडे सम्मेलन चालू होत आणि तिकडे सपूर्ण कर्नाटकातून आलेले प्रतिनिधी त्याच्यासाठी सोडण्यात येणाऱ्या खास गाड्यांनी तलकावेरीला जात होते त्याच्या दृष्टीन समेलन हे नुसत निमित्त होत खर उद्दिष्ट तलकावेरीला जाऊन तिथल्या कुडात स्नान करण हेच होत

थडी नुकतीच सुरू झाली होती परतु प्रतिनिधींच्या सुदैवान आकाश ढगाळ-लेल होत त्यामुळ थडीचा कडाका फारसा जाणवत नव्हता डॉ सुब्बय्या विशेष निमत्रित असल्यामुळ 'श्री विनायक लॉज' या हॉटेलात त्यांच्या निवासाची सोय करण्यात आली होती त्याचा पाहुणा म्हणून माझीही तिथच सोय झाली त्यामुळ माझा मुक्काम आरामात झाला अर्थात हॉटेलात सोय झाली नसती तरी फारस बिघडल नसत डॉ० सुब्बय्याचे अनेक मित्र आणि नातेवाईक मडिकेरीत असल्यामुळ आमची सोय कुठही सहज झाली असती

ता २८ ला सकाळी ध्वजारोहण व समेलनाध्यक्षाची मिरवणूक हे दोन महत्त्वाचे कार्यक्रम सम्मेलनाला प्रत्यक्ष प्रारंभ होण्यापूर्वी झाले यांपैकी अध्यक्षांची मिरवणूक खरोखरीच प्रेक्षकाचे डोळे दिपवणारी होती अग्रभागी

दोन शृंगारलेले हत्ती डौलात चालत होते. त्यांची शान पाहिल्यावर प्राचीन कवींनी सुंदर रमणीला गजगामिनी का म्हटलं असावं याची कल्पना आली मैसूर भागात हत्ती भरपूर असल्यामुळे लग्नासारख्या सामान्य मिरवणुकीतही शोभेचा हत्ती असतो डोकीवर कलश व त्यावर नारळ असलेल्या तरुणींचा एक जथा दोन रांगा करून मंथर गतीने हत्तीच्या मागोमाग चालला होता (त्या तरुणीमधे ज्यांना सुंदरी म्हणता येईल अशा मात्र फारच थोड्या होत्या !) त्याच्या मागोमाग श बा जोशी व कन्नड भाषा यांचा जयजयकार करीत रबा–संबा ढंगाचा नाच करणारे जोषीले युवक होते त्यांच्या पाठोपाठ ट्रॅक्टरवर सजवलेला मोठा रुबाबदार रथ होता त्या रथात मागील सम्मेलनाचे अध्यक्ष व कन्नड साहित्यपरिषदेचे अध्यक्ष यांच्या मधे डॉ० श बा जोशी थाटात बसले होते सर्वात शेवटी कर्नाटक माता व कावेरी माता अत्यंत देखण्या व चेहेऱ्यावर सात्त्विक भाव असणाऱ्या होत्या सारांश, मडिकेरीच्या लोकांना एक सुंदर, सांस्कृतिक मिरवणूक या निमित्तानं पहायला मिळाली

हे सम्मेलन इतर सर्व बाबतीत आपल्या मराठी साहित्यसम्मेलनासारखंच वाटलं उद्‌घाटन, संदेशवाचन, अध्यक्षांचं भाषण, परिसंवाद, कविसंमेलन आणि सर्वात महत्त्वाचा भाग म्हणजे मनोरंजनाचा सांस्कृतिक कार्यक्रम सारी गर्दी या शेवटच्या कार्यक्रमालाच असे माझ्या स्मरणात राहिलेला विशेष महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे भोजनाचा ! 'ब्राह्मणो भोजनंप्रियं' असं म्हटलंच आहे ना !

विठोबाचं भजन झालं होतं आता पोटोबाची चिंता ! संमेलनाचं सामूहिक भोजनालय समोरच्याच टेकडीवर होतं पण तिथं भलीमोठी रांग लागलेली सकाळी नाश्त्याच्या वेळी रांग पाहून जावईबापू माझ्याबरोबर इतरही दोन मित्रांना घेऊन बाजारात गेले होते, आणि तिथं आम्ही इडली–दोसा–केशरी (शिरा) वगैरेचा नाश्ता केला होता आता मी एकटाच होतो जावईबापूंचे मित्र मडिकेरीत घरोघरी आहेत ते त्यांना घरी नेऊन खाऊपिऊ घातल्याखेरीज सोडत नाहीत त्या खानपानाचा मला काही उपयोग नसल्यामुळे त्यांच्या बरोबर रहाण्यात काही अर्थ नव्हता त्यामुळे एक डोंगर चढून भोजनगृहात जाऊन जेवण करणं किंवा अर्धा मैल तंगड्या तोडून बाजारात जाऊन हॉटेलात जेवण यापैकी एकाची निवड मला करायची होती हॉटेलचं जेवण टाळण्याकडे माझा नेहेमीच कल असल्यामुळे मी डोंगर चढून भोजनालयाकडे गेलो तेथील रांग पाहून माझी छाती दडपून गेली परंतु तिथून हॉटेलपर्यंत जायचं म्हणजे जवळजवळ मैलभर पायपीट करावी लागणार होती मनात विचार केला एवढा वेळ चालण्यात घालण्याऐवजी रांगेत उभं रहाणं बरं म्हणून रांगेच्या टोकाकडे चालू लागलो तो तिथं वेगळंच आश्चर्य माझ्यापुढं वाढून ठेवलं होतं रांगेत जास्तीत जास्त दीड–दोनशे लोक असतील असा माझा समज होता कारण माझ्या डोळ्यासमोर एकाच टेकडीवरील रांग होती परंतु जसजसा मी

रांगेच्या टोकाला जाऊ लागलो तसतसं नवंच दृश्य दिसू लागलं. हिमालयात प्रवास करताना ज्याप्रमाणं एक डोंगर संपला की दुसरा डोंगर सुरू होतो, त्याप्रमाणं इथं एक टेकडी संपली की दुसरी टेकडी सुरू होत होती, आणि नागमोडी आकाराच्या रांगेचा तेवढाच भाग दृग्गोचर होत होता. अशा दोन–चार टेकड्या चढून गेल्यावर मी चांगलाच दमून गेलो. तरी पण नदीचा उगम शोधायला निघालेल्या धाडसी संशोधकाप्रमाणं मीही हट्टाला पेटलो, आणि रांगेचा उगम शोधून काढण्याच्या जिद्दीनं पुढं चढू लागलो. सुमारे अर्धा मैल वाटचाल केल्यावर मी रांगेच्या टोकाला पोचलो. ही रांग इतकी लांब होती की संध्याकाळपर्यंत आपण थांबलो तरी आपण भोजनगृहात पोचू शकणार नाही याबद्दल माझी खात्री झाली, म्हणून मी उलट्या पावली परत फिरलो. परतताना मनात एक मजेदार कल्पना तरळून गेली. अखेर या रांगेत माणसं तरी किती आहेत, ते मोजून पहावं. त्याप्रमाणं मी माणसं मोजत खाली उतरू लागलो. त्याचा एक फायदाही झाला. मला आलेल्या थकव्याचा विसर पडला. माझ्या शिरगणतीचा निष्कर्ष काय? अकराशेहून अधिक माणसं रांगेत उभी होती. त्यामध्ये जसे प्रतिनिधी स्त्रीपुरुष होते, तसे स्वयंसेवक, मजूर, कामगार स्त्रीपुरुषही मोठ्या संख्येनं होते. प्रतिनिधींसाठी स्वतंत्र रांग का लावली नाही, याचं कोडं मला उलगडलं नाही.

अखेर जी पायपीट मी टाळू इच्छीत होतो, ती मला करावीच लागली. खाली उतरून बाजारातल्या श्रीकृष्णभवन या उडुपी हॉटेलात दोन रुपयांचं तयार जेवण घेतलं. भात, सांबार, रसम्, ताकाची पुळकवणी, भाजी व लोणचं हे दक्षिण-भारतातलं ठराविक साच्याचं जेवण होतं. ते जेवण मला आवडतं. परंतु त्यातील झणझणीत तिखट आणि आजूबाजूचा गलिच्छपणा यामुळं पुन्हा तिथं जायचं नाही, असं ठरवून टाकलं. हॉटेलातही एवढी गर्दी होती की टेबलावरचा माणूस केव्हा एकदा उठतो आणि आपण त्याची जागा पटकावतो यासाठी कावळ्याच्या नजरेनं तिथं ताटकळत उभे राहिलेले अनेक सहभोजनेच्छू भेटले.

या अनुभवापासून धडा घेऊन संध्याकाळी जेवणाच्या वेळेआधीच अर्धा तास म्हणजे साडेसहा वाजताच मी भोजनालयात प्रवेश मिळवला. माझ्यासारखे अनेक दूरदर्शी शहाणे तिथं आधीच जाऊन पोचल्याचं पाहिल्यावर आपल्या शहाणपणाची घमेंड दूर झाली. सात वाजता सुरू होणारं भोजन साडेसातला झालं. म्हणजे एक तास तपश्चर्या करावी लागली. मात्र ती तपश्चर्या वाया गेली नाही. जेवण छान होतं. भात, सांबार, रसम्, बटाट्याची भाजी, ताक व लोणचं हा नेहेमीचाच बेत होता. पण मुख्य म्हणजे तिखट बेताचं होतं. त्यामुळं चवीनं जेवता आलं. दुसऱ्या दिवशीच्या जेवणात एक चपाती व शिऱ्याची एक लहान मूद अशी भर पडली. खरं म्हणजे दाक्षिणात्य भोजन तसं करायला सोपं. त्यामुळं भराभर पंक्ती उठवता

येतात परतु सचालकमडळींना असल्या कार्यक्रमाचा पूर्वानुभव नसल्यामुळ त्याची धादल उडाली दुसऱ्या दिवशी जेवणाची व्यवस्था भारतीय जनता पक्षाच्या एका कार्यकर्त्याकडे सोपवण्यात आली त्यान सघाचे स्वयसेवक मदतीला घेऊन चटकन शिस्त आणली नतर मात्र व्यवस्था चोख राहिली. रागांची लांबीही अगदीच कमी झाली अर्थात शेवटच्या दिवशी मला त्या व्यवस्थेची गरज उरली नव्हती मी दोनच दिवस तिथ जेवलो

कूर्गमधे यापूर्वी मी दोनदा जाऊन आलो होतो दर खेपेला काहीतरी नवीन पाहून घेतल होत परतु एक महत्त्वाची गोष्ट राहून गेली होती ज्या बागायती शेतीबद्दल कूर्गची ख्याती आहे त्या शेतीचा उत्कृष्ट नमुना पाहिला नव्हता माझे जावात डॉ० सुब्बय्या याच्या घराभोवती असलेले कॉफीचे आणि वेलदोडयाचे मळे पाहिले होते परतु ते काहीसे परपरागत पद्धतीचे होते आधुनिक पद्धतीचा शेत-मळा — ज्याला आपल्याकडे 'फार्म' आणि कूर्गमध्ये 'इस्टेट' म्हणतात तो — पहाण्याचा योग आला नव्हता. वस्तुत डॉ० सुब्बय्याचे अनेक मित्र असे लखपती बागायतदार आहेत आणि त्यानी मला आपल्या इस्टेटीला भेट देण्याच निमत्रणही अनेकदा दिल होत परतु तशी सधी जमून आली नव्हती अ भा कन्नड साहित्यसम्मलनास हजर रहाण्यासाठी डॉ० सुब्बय्याबरोबर मडिकेरी (मरकारा) या जुन्या राजधानीच्या शहरी गेलो असताना मी त्याना सहज विचारल, "तुम्ही मडिकेरीला अनेकदा येत असाल ना ?"

यावर ते म्हणाले, " वारवार येतो गप्पूची इस्टेट इथून दहाबारा मैलावरच आहे. राजश्री आणि मी अनेकदा त्याच्या इस्टेटीवर येऊन रहातो गप्पूची पत्नी मुत्तू आणि राजश्री (सौ सुब्बय्या) याची जीवश्चकठश्च मैत्री आहे. आम्ही गेलो की त्यांनाही बर वाटतं. तिथे आल की मग मडिकेरीला सहज येण होत गप्पूची सासुरवाडी इथेच आहे त्याचे सासरे इथले प्रख्यात वकील आहेत. तेव्हा मला एकदम गप्पून मला दिलेल्या निमत्रणाची आठवण झाली. मी डॉ० सुब्बय्याना म्हणालो, ' गप्पून मला आपल्या घरी यायचा फार आग्रह केला होता. त्याची इस्टेट इथून इतक्या जवळ असेल याची मला कल्पना नव्हती नाहीतर इथ आल्याबरोबर त्याला फोन करायला मी तुम्हाला सांगितल असत इतक्या जवळ येऊन मी त्याच्या घरी गेलो नाही, तर त्याला फार वाईट वाटेल. म्हणून तुम्ही त्याला जरूर कळवा. तो येऊन आपल्याला घेऊन जाईल."

परतु आमचे जावईबापु अत्यत भिडस्त ! आपल्यासाठी कुणाला, आपल्या जिवलग मित्रालाही काही करायला सागायच त्याच्या जिवावर येत. आयुष्यात सर्वांवर उपकार करीत राहील परतु कुणाचेही उपकार त्याना कधी घेतल नाहीत या बाबतीत माझी वृत्ती बरोबर उलटी ! उपकार घेत रहावेत आणि करीत रहावेत, अस मी मानतो माझ्या समाधानासाठी ते 'हो' म्हणाले खरे, परतु ते काही

हालचाल करतील अशी अपेक्षा मी बाळगली नव्हती पण माझं नशीब त्या दिवशी जोरावर असावं संमेलन संपण्याच्या आदल्या दिवशी सायंकाळी आम्ही मंडपाजवळ गप्पागोष्टी करीत उभे असताना अचानक गप्पूच तिथे आला मी त्याला सांगितलं "बघ रे बाबा, मी तुझ्या शेतमळ्यावर यायला तयार आहे आता केव्हा, कसं घेऊन जायचं ते तू ठरव " गप्पूची एक अडचण होती त्याची पत्नी आपल्या बहिणीच्या बाळंतपणासाठी मडिकेरीत येऊन राहिली होती ती तिथं नसताना आम्हाला तिथं नेलं तर आमची गैरसोय होईल असं त्याला वाटत होतं मी म्हणालो, "अहो, आमची कसली गैरसोय होणार ? रात्रीचं जेवण इथं करून वस्तीला तुमच्या इस्टेटीवर जाऊ आणि उद्या दुपारी इथं जेवायला परत येऊ, म्हणजे झालं "

गप्पूशेठ म्हणाले, " जेवणाची काही अडचण नाही उत्कृष्ट स्वैपाक करणाऱ्या बायका तिथं आहेत अन तुम्हाला काय लागणार ? भात, सांबार असलं की पुरे ! पण घरात गृहिणी नसताना यायला तुम्हालाच संकोच वाटेल, म्हणून.. "

मी त्यांना मधेच अडवून म्हणालो, " संकोच हा शब्द माझ्या शब्दकोशात असता तर मी असा पायाला भिंगरी बांधल्यासारखा देशात–विदेशात भटकूच शकलो नसतो त्याची चिंता तुम्ही करू नका तुम्ही तयारीला लागा "

त्याप्रमाणं रविवारी रात्री आम्ही गप्पूशेठच्या नव्याकोऱ्या 'फियाट' गाडी-तून मडिकेरीहून निघालो, आणि पाऊण तासात तिथं जाऊन पोचलो खरं तर पंधरावीस मिनिटांचाच रस्ता, पण वळणावळणाचा घाट आणि रात्रीची वेळ यामुळं रस्ता छान असूनही गप्पूशेठनी गाडी सावकाश चालवली माझी कन्या डॉ० राज्यश्री ही तिच्या मातोश्रीला मडिकेरी दाखवण्यासाठी त्याच दिवशी मैसूरहून घेऊन आली होती, आणि शहरदर्शनाचा कार्यक्रम त्या दोघींनी दिवसाउजेडीच उरकून घेतला होता. त्यामुळे त्या दोघीही आमच्याबरोबर आल्या. नंदनवनातल्या इंद्रभुवना-सारख्या त्या बंगल्यात एकट्यानं झोपायची पाळी आली असती, तर मला नक्कीच झोप लागली नसती, इतकं तिथलं वातावरण रोमँटिक होतं

आम्ही जिथं गेलो होतो त्या जागेचं नाव ' हॅपी व्हॅली इस्टेट ' आरेकाड गावाच्या हद्दीत ती होती परंतु गावाचा कुठे पत्ताच नव्हता सुमारे शंभर–सव्वाशे एकराच्या आवारात हा शेतमळा पसरलेला होता सर्वत्र घनदाट झाडी. नीरव शांतता श्री. काडुमंडा मुत्तण्णा गणपती ऊर्फ गप्पू हे त्या इस्टेटीचे मालक त्यांच्या इतर भावांच्या इस्टेटी जवळपासच आहेत आपल्याकडे गणपतीचं संक्षिप्त रूप गणपा, गणू, गणेश असं होतं कोडव लोक ते गप्पू असं करतात गप्पूशेठ हे तसे पदवीधर आहेत. डॉ० सुब्बय्याचे ते कॉलेजमित्र परंतु मास्तरकी, कारकुनी किंवा राजकारण करण्याऐवजी आपल्या शिक्षणाचा उपयोग करून नमुनेदार शेतमळा तयार कर-ण्याचं त्यांनी ठरवलं, आणि त्याप्रमाणं सैन्यातून निवृत्त होऊन त्यांनी करून दाख-

वल अष्टौप्रहर स्वतःला जगल्यात गाडून घेतल्याशिवाय असल काही कर्तृत्व करून दाखवता येत नसत त्यासाठी शहरी जीवनाचा, चैनबाजीचा मोह टाळावा लागतो. गप्पूशेठ अगदी निर्व्यसनी आहेत त्यांना व्यसन एकच— शेतीत नवनव्या सुधारणा करण्याच अर्थात यामुळे शहरात वाढलेल्या त्यांच्या सौभाग्यवतींना प्रारंभी फार एकलकोंड वाटल असणार हे उघड आहे परंतु आता त्याही त्या वातावरणात रमून गेल्या आहेत

गप्पूशेठचा बंगला मला फार आवडला गोबर गॅस प्लँट बसवून त्यानी ऊर्जा-निर्मितीला हातभार लावला आहे त्याचबरोबर विजेची सोय असल्यामुळे साऱ्या आधुनिक सुखसोयी बंगल्यात आहेत मुख्यत वाटेल तेव्हा गरम पाणी मिळण्याची सोय आहे कारण इथ नेहेमीच हवा थंड असते घराच्या बांधणीत आधुनिक वास्तु-कलेचा वापर केलेला असून, आतल फर्निचर आणि सामानही अद्यतन पद्धतीच आहे त्यामुळ घरात वावरताना आपण पुण्या–मुंबईच्या एखाद्या लक्षाधीशाच्या घरातच आहोत अस वाटत मात्र गप्पूशेठ हे फार देवभोळे आहेत रोज सकाळी अर्धा–पाऊण तास ते देवपूजेत घालवतात वस्तुत कोडव लोक हे मूर्तिपूजक नव्हेत सकाळी–सध्याकाळी पणती लावायची आणि तिला नमस्कार करून ती मालवून टाकायची, एवढीच त्यांची देवभक्ती परंतु गप्पूनी जगातल्या साऱ्या देवदेवताच्या मूर्ती–तसबिरी गोळा केल्या आहेत त्याच्यासाठी एक प्रशस्त व देखण देवघरही बांधल आहे चि० राज्यश्रीन दिलेली तिरुपतीच्या व्यंकोबाची व गणपतीची तस-वीरही त्यांच्या देवघरात आहे सर्व देवाना गंध–फुल वाहाण, स्तोत्रपठण व आरती करण यात त्यांचा बराच वेळ जातो परपरेन मूर्तिपूजक असलेले माझ्यासारखे लोक एकीकडे मूर्तिभजक बनत आहेत, तर ज्यांच्या संस्कृतीत मूर्तिपूजा नव्हती ते नव्यानं मूर्तिपूजक बनत आहेत, हे पाहून कालचक्राच्या मिस्किलपणाची मला गमत वाटली

गप्पूशेठ मला म्हणाले, " दादा, तुम्ही जानेवारी–फेब्रुवारीत इथ यायला हव माझी बाग पाहून खूष व्हाल ! लागोपाठ गेली दोन वर्ष मला उत्कृष्ट पुष्प-वाटिकेच पहिल बक्षिस मिळाल आहे त्याची तयारी सध्या चालू आहे प्रत्यक्षात जी बाग अस्तित्वात होती, तिच्यावरूनही मी त्या भावी बगीच्याच स्वरूप काय असेल याची कल्पना करू शकलो गुलाबाची टपोरी फुल अधूनमधून डोकावत होती आणि इतरही अनेक फुलं बागेचं अस्तित्व जाणवून देत होती

सकाळी उठताच माझी मुलगी मला म्हणाली, "दादा, आपण शेतमळ्यातून फेरफटका मारून येऊ आईला काही इतक्या लांब चालता येणार नाही आणि गप्पू–बोजू (डॉ० सुब्बय्या) अजून साखरझोपेत असतील " त्याप्रमाणे आम्ही इस्टेट पहायला निघालो हा मुख्यत कॉफीमळा आहे जिकडेतिकडे कॉफीचीच झाड दिसत होती सारा मळा कसा स्वच्छ, साफ होता कॉफीचे बुंद तयार होऊ

लागले होते हिरव्यागार पानातून डोकावणारे फिकट किरमिजी रंगाचे बुदांचे घोस मोठे मजेशीर दिसत होते कॉफीच्या खालोखाल काळी मिरी दिसत होती सुपारीच्या किंवा तसल्याच अन्य झाडावर चढलेल्या मिरीच्या वेलींनाही भरपूर घोस आलेले होते अधूनमधून सत्र्याची झाड होती सत्र्याच्या भारानी फांद्या वाकलेल्या होत्या नागपूर--पुणे भागात सत्र्याची झाड बुटकी असतात, पण इथे सभोवती उंच-उंच झाड असल्यामुळे सत्र्याची झाडही उच वाढतात तस पाहिल्यास कॉफी, सत्री आणि मिरी या तिन्ही पिकांनी सारखीच जमीन व्यापली आहे ती तिन्ही एकत्रच वाढतात परतु कॉफी हे जास्त पैसा देणार पीक असल्यामुळे त्याच महत्त्व विशेष असत अर्थात सध्या जागतिक बाजारपेठेत कॉफीचा भाव घसरल्यामुळे कॉफीमळेवाले हवालदिल झाले आहेत ही झाली पैसा मिळवण्यासाठी काढली जाणारी पिक त्याखेरीज केळी, भाजीपाला वगैरेही भरपूर प्रमाणात काढला जातो गप्पू पूर्वी सैन्यात होता, त्या वेळी त्यान बगालमधून आणून लावलेल लीचीच झाडही तिथ आहे आम्ही गेलो त्या वेळी लीचीच्या फळानी फाद्या अगदी डवरल्या होत्या सत्री किंवा लीची झाडावरून काढून त्याचा स्वाद चाखण हा एक आगळाच आनद असतो सामान्यत मी सत्री खात नाही त्यातला आंबटपणा मला आवडत नाही. पण माझ्या मुलीन जेव्हा तीन सत्र्यांचा एक पेलाभर रस काढून तो पिण्याचा मला आग्रह केला तेव्हा तिच्या आग्रहाखातर मी तो तोंडाला लावला पहिला घोट घेताच मी आश्चर्यान थक्क झालो मी तिला विचारल, " यात तू साखर घातली आहेस काय ?" ती हसून म्हणाली, "मुळीच नाही तो सत्र्यांचा अगभूत गोडवा आहे " आणि मग डॉ० सुब्बय्या म्हणाले, " भारतात कूर्गची सत्री आपल्या मिठासीबद्दल प्रख्यात आहेत इतकी गोड सत्री अन्यत्र क्वचितच पैदा होतात " लीची हेही तस माझ्या विशेष आवडीच फळ नव्हे, पण गप्पूच्या बागेतली लीची मी अगदी आवडीन खाल्ली मैसूरला परत येताना गप्पूनी सत्र्यांचा एक भलामोठा पेटारा आमच्याबरोबर दिला त्यामुळे आयुष्यात प्रथमच सकाळ--सध्याकाळ भरपूर सत्रारस पिण्याची सधी मिळाली

कॉफीबुदांवर प्रक्रिया करण्याची आधुनिक यत्रसामग्री गप्पूनी बसवली आहे तसच काही पशुपक्षीही पाळले आहेत गाई, म्हशी, कोंबड्या, टर्की हे प्राणी तर आहेतच, परतु पाढरी विलायती डुकरही त्यानी पाळली आहेत एक भलीमोठी गलेलठ्ठ डुकरीण त्यानी आम्हाला दाखवली तिची माहिती देताना ते म्हणाले, ' आम्हा कोडवाच्या सभारभात डुकराच्या मासाला विशेष मागणी असते या डुकरिणीचीही विक्री होऊन चुकली आहे हिच वजन एकशेतीस--चाळीस किलो भरेल बाजाराचा भाव तेरा--चौदा रुपये किलो आहे परतु मी दहा रुपये किलोन मित्राना डुक्कर देतो त्या भावान हिची किमत तेराशे--चौदाशे रुपये येईल ' मी त्यांना विचारल, " गायीम्हशींच दूध, अडी, कोंबड्या बाजाराला नेण्याची तुम्ही

काय सोय केली आहे ?" ते म्हणाले, "हे प्राणी आणि भाजीपाला विक्रीसाठी नाही इथ रहाणाऱ्या लोकांच्या वापरासाठीच ते आहेत "

त्यातून मग मजुरांचा प्रश्न निघाला आतापर्यंत कूर्गमधे मजुरांच्या समस्येन विशेष भयकर रूप धारण केलेल नाही. अधूनमधून ट्रेड युनियनवाल्याच्या भडकावण्यामुळे काही शेतमळचात सप होतात. परतु त्या वर्षीच्या पिकावर पाणी सोडून बागायतदार सप मोडून काढतात यासबधी विचारता श्री गप्पू म्हणाले, "माझ्याकडे पन्नास—साठ मजूर कुटुब आहेत त्याना जास्तीत जास्त सवलती देऊन समाधानी ठेवण्याचा मी प्रयत्न करतो त्यांच्यासाठी आधुनिक पद्धतीची घरही मी बांधून दिली आहेत सरकारला आयकर भरण्यापेक्षा तो पैसा कामगाराना देण मला अधिक योग्य वाटत त्यामुळे माझे मजूर संतुष्ट असतात त्यांच्या अगावरचे झुळझुळीत कपडे, चेहेऱ्यावरची आरोग्याची झाक आणि त्याची कामातली तत्परता यांवरून तुमच्या लक्षात ते आलच असेल बहुतेक मजूर केरळमधून आलेले मोपले, ख्रिश्चन, हिंदू आहेत स्थानिक मजूर फारच आळशी असल्यामुळे त्यांना मात्र आम्ही जवळ करीत नाही वर्षाकाठी माझी उलाढाल पाचसहा लाखाचीच आहे पण भूमीशी सबंध आणि निर्मितीचा आनद यामुळे या लहानशा व्यवहारात मी समाधानी आहे "

इस्टेटीमधून बारमाही वहाणारा एक ओढा आहे त्याला ते लोक नदी म्हणतात त्या नदीला बांध घालून तिच पाणी नळान सर्वत्र खेळवल आहे. गप्पूचा स्वच्छतेवर विशेष कटाक्ष असल्यान कुठेही किंचितही घाण दिसत नाही माझ्या सौभाग्यवतीला तिथल अतिथिगृह विशेष पसत पडल त्याच्या व्हराड्यात खुर्च्या टाकून तासन् तास बसल तरी कटाळा यणार नाही, अस तिन आपल मत व्यक्त केल ते बरोबर होत समोर दाट झाडीन आच्छादलेले देखणे डोंगर असून, निरभ्र आकाशाची शोभा तिथून काही औरच दिसते पुढच्या खेपेला मैसूरला आल्यावर आठ दिवस त्या अतिथिगृहात येऊन रहाण्याच आश्वासनही तिन देऊन टाकल गप्पू आणि मुत्तू यांना माझी मुलगी म्हणजे जिवलग सखी आणि सख्खी बहीणच वाटते तीही त्याच्या जीवनात अगदी समरस होऊन गेली आहे, हे पाहून मला फार बरं वाटलं

शहरी कोलाहलापासून दूर असलेल्या त्या शेतमळचात वावरताना आपण एका वेगळचाच स्वर्गीय जगात आहोत असा भास होत होता लोकवस्तीची गडबडगोंधळ यांचा पूर्ण अभाव असला तरी साऱ्या आधुनिक सुखसोयी तिथे आहेत. त्यामुळे केव्हाही चार दिवस विश्रांतीसाठी जाऊन तिथे रहाण निश्चितच कुणालाही आवडेल. कूर्गमधे याहून खूप मोठमोठचा व श्रीमत इस्टेटी आहेत तिथेही साऱ्या सुखसोयी आहेत परंतु गप्पूसारखा प्रेमळ, भोळाभाबडा परतु तेवढाच व्यवहारकुशल मालक मात्र बहुधा दुर्मिळच असावा त्याचा स्नेह, शालीनता, आतिथ्य-

शीलता यांनी मी अगदी भारावून गेलो, आणि त्यांच्या शेतमळ्याचा निरोप घेताना जणू आपण आपलंच घर सोडून जात आहोत असं मला वाटलं

भरपूर गरम पाण्यानं स्नान करून आम्ही न्याहरी केली तांदुळाच्या पिठाच्या भाकरी, पातळ भाजी, पाव, लोणी, दूध, सत्री, केळी, मिरची असा झकास बेत होता. त्यामुळं अशी भक्कम न्याहरी आम्ही केली, की दुपारच्या जेवणाची गरजच राहिली नाही गप्पूच्याच गाडीतून आम्ही परत आलो ते स्वतःच गाडी चालवतात, आणि छान चालवतात दिवसाची वेळ असल्यामुळे घाट चढून आम्ही अर्ध्या तासात मडिकेरीला येऊन पोचलो, आणि मैसूरला परत जाण्याची तयारी करू लागलो

गप्पूशेठची इस्टेट पाहून आल्यावर एक विचार माझ्या मनात तरळू लागला आपल्या देशाला आज सर्वांत अधिक गरज उत्पादनवाढीची आहे त्याच वेळी त्या उत्पादनाचा लाभ उत्पादकानाही मिळणं आवश्यक आहे गप्पूसारखे जे उद्यमशील जमीनमालक आपल्या कामगारांना उत्पादनाच्या वितरणात उदार मनानं सहभागी करून घेतात, त्यांना सरकार व जनता यांच्याकडून सर्व प्रकारचं सहकार्य मिळालं पाहिजे परंतु समाजवादाच्या खोट्या कल्पनांच्या आहारी जाऊन आपण अशा लोकांना भांडवलदार ठरवून त्यांचा द्वेष करायला लोकांना शिकवतो. त्यातून फक्त असंतोषच निर्माण होतो, आणि उत्पादनच थंडावतं या गोष्टीचा आपण थंड डोक्यानं विचार करणार आहोत काय ?

केंद्रीय भारतीय भाषासंस्थानानं 'मराठीतलं हा-ही-हे' या शीर्षकाचा एक छोटासा अनुबोधपट तयार केला आहे संस्थेच्या थिएटरमध्ये जाऊन आम्ही उभयतांनी तो पाहिला नव्यानंच मराठी शिकणाऱ्या बिगरमराठी विद्यार्थ्यांना मराठीतील लिंगविचार समजून सांगणं हा त्याचा उद्देश आहे माझ्या मुलीनं इतर अनेक सहकाऱ्यांच्या सहकार्यानं तो बोधपट तयार केला असून, तिनं त्यात निवेदिकेची प्रमुख भूमिका केलेली आहे मोठा गमतीदार चित्रपट आहे तो आपण मराठी मंडळी अगदी सहजपणे जो लिंगविचार समजून घेतो तो इतरांना समजायला किती अवघड जात असेल, याची त्यावरून कल्पना येते याचं कारण असं की, मराठीतील लिंग कसं ठरतं याला कसलाच नियम किंवा धरबंद नाही

माझी मुलगी तशी काळीसावळीच असली तरी छायाचित्रात तिच्या रेखीव चेहऱ्यामुळे ती फारच सुंदर दिसते तिचा तो बोधपट पाहून व्यावसायिक नाट्यदिग्दर्शक तिला नाटकात काम करण्याची गळ घालू लागले होते तशी ती नाटकातही काम करते परंतु हल्ली तिचं स्वतःचं लेखनवाचनाचं काम वाढल्यामुळं तिनं त्यातून अंग काढून घेतलं आहे तिचा हसरा चेहरा प्रेक्षकाचं मन कसं खिळवून ठेवतो ते पहाणं मनोरंजक ठरतं तो अनुबोधपट पहात असताना मला एक जुनी आठवण झाली मुंबई दूरदर्शनवर माझा पहिलावहिला आणि आजपर्यंतचा एक-

मेव असा कार्यक्रम झाला होता अली सरदार जाफरींनी 'महफिले यारॉं' या आपल्या नेहेमीच्या उर्दू कार्यक्रमात श्री० सेतू माधवराव पगडींबरोबर माझीही मुलाखत घेतली होती कार्यक्रम उर्दूचा असल्यामुळे माझ्या परिचितांपैकी कुणाच्या पहाण्यात तो येईल अशी माझी अपेक्षाही नव्हती परंतु चुकून एका मित्रानी तो पाहिला त्यासंबंधी त्यानी काय मतप्रदर्शन कराव ? ते मला म्हणाले, "अहो तुमचा पुढचा दात पडलाय हे आमच्या लक्षातच आल नव्हत टीव्हीवर तुम्हाला बोलताना पाहिल, आणि ती गोष्ट एकदम माझ्या लक्षात आली तुमच बोलण ऐकण्याऐवजी मी तुमच्या पडलेल्या दाताच्या पोकळीकडेच पहात राहिलो !"

मी कपाळावर हात मारून घेतला माझा हा समोरचा खालचा दात जेव्हा पडला तेव्हा माझे मित्र मला म्हणाले होते, "तुम्ही त्या जागी कृत्रिम दात बसवून घ्या, म्हणजे तुमचा चेहेरा विद्रूप दिसणार नाही" मी त्यांना म्हणालो, "तरुणपणी दात पडला असता आणि तो कामाचा असता तर मी अवश्य त्याच्या जागी दुसरा दात बसवून घेतला असता आता म्हातारपणी तो शोभेचा दात बसवून, आपण काही अजून म्हातारे झालो नाही असा आभास निर्माण करण्यात काय अर्थ ? मी म्हातारा झालो असेन तर म्हाताराच दिसलो पाहिजे !' त्यात माझा आणखी एक हेतूही होता माझे दात लहानपणापासूनच सुरेख आहेत इतके, की साठी उलटल्यावर एक गृहस्थ मला म्हणाले, "तुमची कवळी किती छान आहे हो ! अगदी नैसर्गिक दात असल्याचा भास होतो" मी त्याना म्हणालो, "महाशय, ती कवळी नसून ते माझे खरे दात आहेत" त्याचा विश्वासच बसेना ! मी दिवसभर पान खात असूनही माझे दात रंगलेले नसतात, यामुळेही लोकांना त्याच्या नैसर्गिकपणाविषयी शका येते जेव्हा समोरचा दात पडला तेव्हा मी मनाशी म्हणालो 'आता तरी लोकाची माझ्या दातांच्या नैसर्गिकपणाबद्दल खात्री पटेल कारण कवळी वापरणारे लोक अशा पडक्या दाताची कवळी कधी वापरीत नसतात'

तस पाहिल्यास आपल्या या पडक्या दाताची शान मला आवडते हीच गोष्ट पाढऱ्या केसाच्या बाबतीतही घडलेली आहे तरुणपणी जेव्हा माझे केस पिकू लागले तेव्हा मित्रमडळी कलप लावायचा आग्रह करू लागली पण माझ्या गाधीवादी मनाला तसली कृत्रिम सजावट कधीच पसत पडली नाही मी मनातल्या मनात देवाला प्रार्थना करू लागलो की, 'हे देवबाप्पा, हे जे केस पिकण्याच सकट तू माझ्यावर आणल आहेस त्याबद्दल माझी मुळीच तक्रार नाही कारण टक्कल पडण्यापेक्षा केस पिकण मला अधिक आवडेल मात्र अर्धवट पिकलेले केस फार वाईट दिसतात म्हणून तू माझे सगळे केस लौकरात लौकर पांढरे करून टाक' माझी इतर कुठलीच प्रार्थना देवान कधी इतक्या गभीरपणे मनावर घेतली नव्हती पण ही प्रार्थना मात्र त्यानं विनाविलब एकदम मंजूर करून टाकली बघताबघता डोक पाढरशुभ्र झाल. तरुण चेहेऱ्यावरच ते म्हातार डोक विचित्र दिसे. पण त्यातही

एक शान होती, भारदस्तपणा होता रुपेरी केसाच कौतुक करणारे लोकही अधून-मधून भेटत पण सर्वात कमाल झाली ती जपानमध्ये तिथले लोक मोठ्या उत्सुकतेन अन कौतुकान मला विचारू लागले, " अहो, तुमच्या केसाचा रग किती छान आहे ! अगदी नैसर्गिक असल्यासारखा दिसतो कोणता रग वापरता तुम्ही ?" जगात कुणाला कशाच कौतुक वाटेल, ते सागण कठिण आहे ! मी जेव्हा केसासाठी रग वापरीत नसल्याच तिथल्या लोकाना सागितल, तेव्हा त्याचा विश्वासच बसेना तरुणीनी तर माझ्या केसात बोट फिरवून आपली खात्री करून घेतली ! त्या वेळी झालेल्या गुदगुल्या काही औरच होत्या

खर सागायचं तर मला स्वत लाच पाढऱ्या केसाच आकर्षण वाटत आल आहे ॲनी बेझट, विजयालक्ष्मी पडित, जे कृष्णमूर्ती वगैरे अनेक स्त्रीपुरुषांच्या शुभ्र केसांनी मला मोहून टाकल आहे पुण्याला रोज सकाळी फिरायला जाताना एक म्हाताऱ्या परतु तरतरीत देखण्या बाई भेटतात त्याच्या डोकीवरचा पाढरा-शुभ्र केशसभार मला इतका आवडतो, की त्या केसावरून हात फिरवून पहाण्याची अनिवार इच्छा त्या बाईंच्या पायातल्या चपला नजरेसमोर ठेवून मनातल्या मनात दडपून टाकण मला अनेकदा अशक्य होत

सामान्यत माणसाची लेखनापेक्षा वाचनाकडे अधिक प्रवृत्ती असते किंबहुना अधिकाश लोक जन्मभर नुसत वाचनच करीत रहातात लेखन करायच म्हणजे त्यांना महासकट वाटत जे लोक लिखाण करतात त्यानाही वाचनाची गोडी व गरज असते काही लेखक तर एका भाषेतल वाचलेल दुसऱ्या भाषेत लिहून काढण्याचाच धदा जन्मभर करतात, आणि त्यानी कुठून वाङ्मयचौर्य केलय ते इतराना माहीत नसल्यामुळे असे लेखक थोर, स्वतत्र, मौलिक लेखकही ठरतात कधी तरी त्यांची चोरी उघडकीला येते आणि जाणकाराच्या दृष्टीन त्या लेखकाच मूल्य घटत पण सर्वसामान्य वाचकाला ते समजतही नाही, अथवा समजल तरी त्याला त्याची पर्वाही नसते त्यामुळ त्या लेखकाच मोठेपण कायम टिकून रहात ना सी फडक्यांपासून तो विजय तेंडुलकरांपर्यंत अनेकानेक लेखक या प्रक्रियेत घुसळले गेले पण त्यामुळे त्यांची लोकप्रियता मुळीच कमी झाली नाही सर्वसामान्य समाज इतका गाजरपारखी असतो, की त्याला असली चिजेपेक्षा नकली चीजच जास्त मौल्यवान वाटते

हे सार सुचायच कारण अस की, म्हैसूरला जाताना वाचण्यासाठी म्हणून दिवाळी–अकांचा एक भलामोठा गठ्ठा मी बरोबर नेला होता परत निघताना जेव्हा सार सामान गोळा करू लागलो तेव्हा माझ्या लक्षात आल की त्या अकांपैकी एकाही अकाला आपण हात लावला नव्हता खर म्हणजे एवढ सार ओझ मी म्हैसूरला न्यायलाच नको होत कारण लेखनाच माझ व्यसन इतक जबरदस्त आहे, की त्याच्यापुढ वाचन कुठल्या कुठे कोपऱ्यात जाऊन पडत व्यवसाय म्हणून लेखनाचा

स्वीकार करण्यापूर्वी जे काही थोडफार वाचन मी केलं असेल, तेवढंच एकदा लिखाणाला सुरुवात झाल्यावर माझं वाचन जे थंडावलं ते कायमचंच ! कुटुंबाचा चरितार्थ चालवण्यासाठी मला इतकं लिखाण करावं लागे, की वाचनाला वेळच उरत नसे इतर भाषांची गोष्ट तर सोडाच, खुद्द मराठीचंही वाचन फारसं झालं नाही एखाद्या विषयावर लेख किंवा पुस्तक लिहायचं असेल, तेव्हा जेवढं काही वाचन अपरिहार्यपणे करावं लागे तेवढंच मी केलं वृत्तपत्रीय लिखाण करायला सुरुवात केल्यावर रोजची वर्तमानपत्रं वाचणं आवश्यक वाटू लागलं म्हणून त्यांचं तेवढं वाचन झालं याचा एक परोक्ष फायदा झाला. दुसऱ्या कुठल्याच लेखकाचा माझ्यावर प्रभाव पडला नाही आणि वाङ्मयचौर्याचा आरोप माझ्यावर करण्याची गरज कुणाला भासली नाही सांगायचं तात्पर्य काय की, मैसूरच्या मुक्कामात वाचनापेक्षा लिखाणच जास्त झालं कन्नड दलित लेखकांना मराठी दलित लेखकांनी भेट म्हणून दिलेली पुस्तकं त्यांना मराठी येत नसल्यामुळे त्यांनी माझ्या मुलीला देऊन टाकली होती शिवाय माझ्या मुलीनं स्वतःच्या वाचनासाठी काही मराठी पुस्तकं विकत घेतली होती दिवाळी-अंकांतला भुसा किंवा कचरा चिवडण्यापेक्षा ही पुस्तकं वाचून काढणं अधिक बरं, असं ठरवून श्री० दया पवारांचं 'बलुतं' आणि 'कोंडवाडा', श्री० अर्जुन डांगळ्यांचं 'छावणी हलते आहे', डॉ० अरुण लिमये यांचं क्लोरोफॉर्म' वगैरे पुस्तकं वाचून काढली त्यामुळं मराठीत सध्या कोणत्या प्रकारचं लिखाण लोकप्रिय आहे त्याची थोडीफार कल्पना मला आली आता हे दिवाळी-अंक केव्हा वाचायचे ? पुढच्या दिवाळीपर्यंत तरी ते वाचायला सवड मिळेल की नाही, हे सांगणं अवघड आहे अर्थात लिखाण भरपूर झालं एकाच विषयावर मी लक्ष केंद्रित केलं असतं, तर एक झकासपैकी पुस्तक तयार झालं असतं परंतु मी तर विश्रांतीसाठी मैसूरला गेलो होतो विश्रांतीच्या मनःस्थितीत ग्रंथलेखन कसं काय जमणार ? सुदैवानं या खेपेला कन्येच्या मित्रमंडळींनी जेवणाखाण्याची फारशी निमंत्रणं लादली नाहीत नाही म्हणायला जयरामच्या घरी एक दिवशी दोसे खायला जावं लागलं आणि एकदा राजेश सचदेव या पंजाबी तरुणानं भरपूर पराठे खायला घातले राजेशच्या घरचं जेवण एका वेगळ्याच कारणानं लक्षात राहिलं त्याच्याकडे मैसूर मराठा जातीची एक चुणचुणीत मुलगी कामाला असते मोलकरीण असूनही पांढरपेशा मालकिणीसारखी ती दिसते माझ्या मुलीला ती आपल्या खास मैसुरी मराठीत म्हणाली, "अय्योयो ! तुमचं आई किती देखणं हाय हो ! अगदी बामणासारखंच दिसतंय बगा !" माझ्या कन्येचं रंगरूप, कानडी बोलणं, मासमच्छर खाणं, यामुळं ती मुळात ब्राह्मण असावी या गोष्टीवर त्या मुलीचा विश्वासच बसत नव्हता तिच्या आईला पाहिल्यावर मात्र ती ब्राह्मण असू शकेल हे तिनं मान्य केलं तिनं तसं स्पष्ट सांगितलं नाही, परंतु माझ्या मुलीच्या शूद्र आचारविचाराची आणि रंगारूपाची जबाबदारी

आईवर नसून बापावर असल्याच तिन ओळखल असाव, अस दिसल कारण तिनं एकदा माझ्याकडे पाहून जी मान वळवली ती पुन्हा काही माझ्याकडे फिरवली नाही.

ह्या ह्या म्हणता एक महिना निघून गेला दिवस कसे गेले ते कळलंच नाही वस्तुत यापूर्वी आम्ही उभयता इतके दिवस मुलीकडे राहिलो नव्हतो. या खेपेला अगदी कटाळा येईपर्यंत रहायच अस ठरवून आम्ही निघालो होतो पण कटाळा यायची गोष्ट दूरच राहिली परत जाण्याचे दिवस जसजसे जवळ येत चालले, तसतशी मनाला एक अनामिक हुरहुर लागली बरेच दिवस माहेरी राहून परत सासरी निघालेल्या गृहिणीच्या मनाची काय स्थिती होत असेल याची कल्पना मला आली खर म्हणजे मी काही दुसऱ्याच्या घरी जाणार नव्हतो उलट दुसऱ्या-च्या घरून स्वत च्याच घरी परत येणार होतो त्या माझ्या घरी माझी मुल, सुना, नातवड — सगळीजण आमची उत्सुकतेन वाट पहात असणार, आम्ही मुलीकडे जास्त दिवस राहिल्याबद्दल मनातून थोडी नाराजही झाली असणार, याची मला कल्पना होती तरीही मुलीला सोडून जाण्याच्या कल्पनेन मन कातर होत होत तशी माझी भावनाप्रधानतेबद्दल कधी ख्याती नव्हती. उलट माझ्यावर रुक्ष, कठोर, भावना-हीन असल्याचाच आरोप केला जात होता तरीही मी भावविवश झालो होतो त्या मानान सौभाग्यवती अधिक धीराची निघाली तिला माझ्यापेक्षा आपल्या घराची ओढ अधिक लागली होती जावयाच्या घरात रहाण्याचा तिला कटाळा आला होता. माझ्या आणि तिच्या मन स्थितीतली ही तफावत मला फारच चमत्कारिक वाटली पुरुषानं इतक हळव व्हायच नसत हे कळत असूनही मी बहुधा वयोमानामुळ हळवा बनलो होतो आयुष्यभर केलेल्या भ्रमतीत अगदी परक्या ठिकाणीही मला असा अनुभव अनेकदा आला होता ज्याचा—आपला काही सबध नाही, आयुष्यात पुन्हा ज्याची गाठभेट होण्याची शक्यता नाही, अशा लोकाच्या घरून निघतानाही त्याच्या आत्मीयतेमुळ माझ मन भरून आल होत त्यावरून माझ्यातला भावुक माणूस कुठे-तरी अत करणात खोल खोल दडून बसला असावा आणि मधूनच तो वर येत असावा, असा निष्कर्ष मी काढला मात्र त्याबद्दल मला दु ख झाल नाही कारण तेच तर माणुसकीच लक्षण आहे ती माणुसकी आपल्यामधे शाबूत आहे हे आश्वासन सुख-दायकच होत

या खेपेला मैसूरला जाताना जो त्रास झाला त्यामुळ त्या वेळी यापुढे ही दगदग आपण विकत घ्यायची नाही, असा मी मनाशी निश्चय केला होता माझा हा निश्चय बहुधा माझ्या सौभाग्यवतीला अतर्ज्ञानान समजला असावा मैसूरहून परत निघण्याच्या दिवशी ती माझ्याशी शिळोप्याच्या गप्पा मारतामारता म्हणाली, "तुमच्या चेहेऱ्या-वर चागलाच तजेला आलाय जावयाच्या घरचा मुक्काम तुम्हाला मानवलेला दिसतो" मी जरा सशयानच तिच्याकडे पाहिल आम्हा उभयताचा असा विश्रब्ध

वार्तालाप क्वचितच घडतो एकमेकाशी काय बोलायच हे बहुधा आम्हा दोघानाही लग्न झाल्यापासून आजपर्यंत कधी समजलच नाही आमच्या आवडीचे विषय इतके भिन्न राहिले, की दोन मित्रांप्रमाण सुखसवाद करण आम्हाला कधी जमलच नाही त्यामुळे माझ्या चेहऱ्यावरच्या टवटवीचा उल्लेख तिन मनात काहीतरी हेतू धरून केला असावा अस मला वाटल परतु तस काही आढळल नाही थोड्या वेळानतर कन्या बाहेरून आली आणि सहज बोलताबोलता म्हणाली, " दादा, तुम्ही आता कसे 'फ्रेश' दिसता इथ आलात त्या वेळी तुमचा चेहेरा कोमेजल्यासारखा दिसत होता " मी तिच्याकडेही सशयान पाहिल मायलेकींनी आपसात सगनमत तर केल नसेल ना, अशी शंका माझ्या मनाला चाटून गेली परतु तिला काही आधार मला मिळाला नाही मैसूरात राहून विश्रांती घेतली की माझी प्रकृती सुधारते, म्हणून मी वारवार मैसूरला याव, अस तिला नि तिच्या आईला सुचवायच असाव, असही मला आढळून आल नाही दोघींच्या प्रतिक्रिया स्वतत्र, परतु सारख्याच होत्या, हा योगा-योगच असावा खर म्हणजे पुण्यातल्या आणि मैसूरातल्या माझ्या दैनिक जीवनक्रमात काहीच फरक नव्हता पुण्याला जेवढ लिखाण मी करीत होतो, तेवढच मी मैसूरात राहून केल होत फरक असलाच तर तो एवढाच की, मैसूरात मी अधिक निश्चिंत होतो माझ्या वेळेचा मी राजा होतो पुण्यात माझ्या वेळेवर आक्रमण करणारी अनेक लहानथोर मडळी आणि व्यवधान असतात त्याचा मैसूरात अभाव होता परतु त्यात एक धोकाही होता त्या निश्चिंतपणामुळ माझ वजन वाढल असण्याची शक्यता होती, आणि म्हातारपणी वजन वाढण म्हणजे अनारोग्याला निमत्रण असत वाढलेल वजन कमी करण फारच तापदायक असत. परतु दोघांच्या मते माझ वजन फारस वाढलेल नसाव वजन न वाढता चेहेरा तजेलदार होत असेल तर तो प्रयोग पुन्हा करून पहाण्यास हरकत नाही, असा विचार माझ्या मनात येऊन गेला बहुधा माझ्या विचाराची धाव या दिशेन वळावी, अशीच त्या दोघींची सुप्त इच्छा असावी त्यांची ती इच्छा पूर्ण झाली

पुण्याहून मैसूरला जाताना मिरजेत जो अनिश्चिततेचा ताण पडतो, तो मैसूरहून पुण्याला येताना सहन करावा लागत नाही कारण तिथे मिरजेच्या डब्यात जागा मिळाली की मिरजेपर्यंत काही काळजी नसते अर्थात उतारूंना चिंतामुक्त मन स्थितीत प्रवास करूच द्यायचा नाही, असा भारतीय रेल्वेन निश्चय केला असल्यामुळे तुम्ही काळजीपासून पूर्णपणे मुक्त राहू शकत नाही मैसूरपासून अरसी-केरीपर्यंत असलेली पॅसेंजर-गाडी अरसीकेरीला वेळेवर पोचली नाही, तर 'कर्नाटक एक्सप्रेस' निघून जाते आणि मग तुम्हाला रात्रभर दहा-बारा तास मिरजेच्या डब्यात पडून रहाव लागत, आणि सकाळी दहाच्या सुमारास बेंगळूरहून येणाऱ्या गाडीत बसून दिवसभर रखडत प्रवास करावा लागतो. अर्थात असे प्रसग फारसे येत नाहीत कारण मैसूरची गाडी आणि बेंगळूरची गाडी यामध्ये एक तासाच अंतर

असत परतु माझ्या चितातुर मनाला दुसरीच एक काळजी ग्रासून राहिली होती मैसूरहून पुण्याला जाणारे उतारू तसे थोडेच असतात त्यामुळ पहिल्या वर्गाच्या डब्यात उतारू कमीच असतात आजकाल आगगाड्यावरचे दरोडे ही नेहेमीची गोष्ट झालेली असल्यामुळ पहिल्या वर्गातून प्रवास करणाऱ्याच जीवितवित्त नेहेमीच धोक्यात असत सबध डब्यात आपणा दोघांखेरीज इतर कुणीच नसल, तर रात्रभर आपल्याला काळजी करीत जागच रहाव लागणार, अशी भीती मला वाटत होती सुदैवानं तस घडल नाही शेजारच्या खोलीत तीन उतारू असल्याच पाहून माझा जीव भाड्यात पडला आमच्या खोलीत मात्र आम्ही दोघच होतो स्वाभाविकपणेच कुपेचा आनद लाभला गाडी तिच्या सवयीप्रमाण रेंगाळत चालली अर्धा-पाऊण तास लेट झाली तरीही बराच वेळ होता तरी पण जसजसा तिला उशीर होऊ लागला, तसतशी पुढची गाडी चुकण्याची काळजी वाढू लागली सुदैवान 'कर्नाटक एक्सप्रेस' अरसीकेरीला पोचण्यापूर्वी आमची गाडी पोचली, आणि मी सुटकेचा नि श्वास टाकला कधीकधी मला वाटत, ही चिंताही एका दृष्टीन उपयुक्त असते तिच्यामुळे वियोगाच्या दु खाचा विसर पडतो स्टेशनवर पोचवायला जाणाऱ्या लोकांबद्दल मला नेहेमी कुतूहल वाटत त्यांना त्यात कोणता आनद मिळत असेल ? (मी तर कधीच कुणाला पोचवायला स्टेशनवर जात नाही परतु त्यांना आनद मिळत असो अथवा नसो, गावाला जाणाऱ्या लोकाच वियोगदु ख हटकून कमी होत असल पाहिजे मैसूरहून परत येताना जयराम आणि शाली नेहेमीच निरोप द्यायला येतात त्यामुळे गप्पागोष्टी होतात मायाला सोडून जाण्याच्या कल्पनेन होणार दु ख त्या गप्पामधे वाहून जात त्यामुळ मी त्याचे मन पूर्वक आभार मानतो

आमच्या व्याह्यांचे व्याही श्री वसतराव लोकरे मोठे उत्साही आणि जिंदादिल गृहस्थ आहेत पुण्याला आले की हुबळीला येण्याच निमत्रण ते अगदी आग्रहान देत असत या खेपेला त्यांच्या निमत्रणाचा स्वीकार करायच आम्ही जातानाच ठरवल होत परत येताना दोन दिवस त्यांच्याकडे मुक्काम करण्याच आश्वासन आम्ही त्याना दिल होत परतु दोन दिवसावर त्याच समाधान झाल नाही, म्हणून हुबळीला चार दिवस रहायच आम्ही मान्य केल सौभाग्यवतीला तिच्या लेकी-सुनांसाठी धारवाडी पातळ खरेदी करायची होती म्हणून आपल्या नातवडात परत जाण्याची तिला घाई झाली असली तरी तिन हुबळीतला मुक्काम वाढवायला विरोध केला नाही एका गोष्टीची मला मोठी गमत वाटली तसा मी स्वभावान घरकोंबडा. स्वत च्या घराखेरीज इतरत्र माझ मन फारस रमत नाही परतु मैसूरला मुलीकडे गेल्यावर मात्र मला घरची आठवण फारशी सतावीत नाही पुण्यात असल्यासारखाच मी मसूरला रहातो. बहुधा कन्या आणि जामात यांच्याशी बौद्धिक पातळीवर चर्चा करता येत असल्यामुळे माझ मन तिथ रमत असाव सौभाग्यवतीवर भावनेचा पगडा जास्त असतो. नातवडात गुतलेल तिच मन

पुण्याला परत जायचं टुमण तिच्या मागं लावत मैसुरात नातवंड असती, तर कदाचित तिथही तिचं मन थोडं अधिक रमलं असतं पण त्या बाबतीतही मी साशंक आहे. किती झालं तरी पुण्याची नातवंडं ही तिची स्वतःची ! त्यांच्यांत तिचं मन फारच गुंतलेलं आहे मुलीची भूल किती झाली तरी परकीच नातवंडाच्या या ओढीचा एक फायदा मात्र तिला निश्चितच होतो कन्यावियोगाचं तिचं दुःख तेवढ्या प्रमाणात कमी होतं हा लाभ आपल्याला मिळत नाही म्हणून मला तिचा हेवाही वाटतो ते असो

हुबळीतले आमचे चार दिवस मजेत गेले सौ. लोकरेवहिनींनी तऱ्हेतऱ्हेचे कर्नाटकी खाद्यपदार्थ खायला घालून आमच्या पथ्यपाण्याचा बट्ट्याबोळ केला, आणि आम्हीही पथ्याची पर्वा न करता त्या पदार्थांचा मनमुराद आस्वाद घेतला थोडफार समाजकार्यही घडलं मी हुबळीला येणार हे कळताच तिथल्या 'महाराष्ट्र मंडळा'चे श्री० गोपाळराव सोहोनी यांनी माझी अनुमती गृहीत धरून माझं एक व्याख्यान ठेवून टाकलं. थंडीत कुडकुडत स्टेशनवर येऊन त्यांनी आमचं स्वागत केलं, आणि अनुमतीशिवाय व्याख्यान ठेवल्याबद्दल माफीही मागून टाकली वस्तुत आमच्यासारख्या प्रसिद्धिप्रिय— किंबहुना प्रसिद्धिलोलुप लोकांना जाहीर व्याख्यान म्हणजे एक पर्वणीच असते बहुधा व्याख्यान ठेवणाऱ्यांनाही ते माहीत असतं तरी पण त्यांना एक कार्यक्रम मिळवल्याचं समाधान लाभतं त्याप्रमाणं 'भाषाभगिनीमधील स्नेहसंबंध' या विषयावर माझं भाषण झालं तो तर माझा अगदी आवडीचा विषय आंतरभारतीचा चिटणीस म्हणून आणि व्यक्तिशः देखील मी त्या क्षेत्रात थोडफार काम केलं असल्यामुळे स्वानुभवाचे चार बोलही मला श्रोत्यांना ऐकवता येतात श्रोते तसे थोडेच--- पन्नाससाठच होते परंतु कार्यकर्त्यांना तोच संख्या मोठा वाटला इतरत्र जसं असतं तसंच तिथही होतं "लोक व्याख्यानांना येत नाहीत ! त्यांना मनोरंजनाचे कार्यक्रम--- मुख्यतः नाटक वगैरेंचे--- हवे असतात परवा गो नी दा. आले होते त्या वेळी यापेक्षाही फार कमी उपस्थिती होती." खरं म्हणजे हुबळीत मराठी बोलणाऱ्यांची संख्या बरीच मोठी आहे तीस-चाळीस हजार तरी लोक असावेत परंतु व्याख्यानाची आणि तीही गंभीर विषयांवरील भाषणांची गोडी त्यांच्यांत नाही, याबद्दल संचालकांनी तक्रार केली तेव्हा मी त्यांना सांगितलं, "अहो, इतके लोक व्याख्यानासाठी जमतात, हेच भाग्य समजा. आमच्या पुण्याला इतकेही लोक जमत नाहीत साहित्यपरिषदेतली बहुतेक व्याख्यानं रिकाम्या खुर्च्यांसमोरच होत असतात"

मराठीभाषिकांमध्ये प्रसिद्धी न मिळण्याचा योग मला काही तसा नवा नाही. कारण मी मराठीतला लोकप्रिय लेखक नाही तरी पण त्याची भरपाई नेहेमीच इतर भाषिकांतील प्रसिद्धीनं होत असते. हुबळीलाही तसंच झालं संयुक्त कर्नाटक' या हुबळी आणि बेंगळूरहून प्रसिद्ध होणाऱ्या कर्नाटकातल्या अग्रगण्य कन्नड दैनि-

काचे मुख्य उपसंपादक श्री०नारायण श्रीपाद घळगी यांना माझी माहिती होती श्री वसतराव लोकरे यांनी त्यांना माझं 'दक्षिणेतली यक्षभूमी' हे पुस्तक वाचायला दिल होत ते त्याना इतक आवडल, की त्यानी ते दोनदा वाचून काढल चागला प्रकाशक मिळाला तर ते कानडीत भाषान्तरित कराव, असाही त्याचा विचार आहे श्री० घळगी हे स्वत कन्नडभाषी आहेत परतु त्याच्या पत्नी मराठीभाषी आहेत त्यामुळ त्याना बऱ्यापैकी मराठी येत बोलता येत नाही, परतु बोललेल आणि वाचलेल चागल समजत 'तरुण भारत' आणि 'सोबत' यांमधले माझे काही लेख त्याच्या वाचनात आले असावेत 'सयुक्त कर्नाटक' हे इदिरा कॉंग्रेसच मुखपत्र पण श्री० घळगी सघवाले असूनही तिथ मुख्य उपसपादक आहेत, यावरून त्याना बरच स्वातत्र्य असाव अस दिसत त्या दैनिकात एक अनियमित किंवा नैमित्तिक सदर असत त्याच शीर्षक 'महानगरक्के बदवरु' (महानगरात आलेले) अस असून, शहरात आलेल्या उल्लेखनीय पाहुण्याची ओळख त्याच्या छायाचित्रासह करून देण हे त्या सदराच उद्दिष्ट आहे मला ती कल्पना एकदम पसत पडली किंबहुना अशा प्रकारच सदर गावातल्या प्रत्येक दैनिकात असाव आणि ते नैमित्तिक नसून नित्य स्वरूपाच असाव, म्हणजे आपल्या गावात बाहेरच कोण आलय याची माहिती सर्वांना मिळत राहील, अशा प्रकारचा विचार माझ्या मनात अनेकदा येऊन गेला होता सामान्यत. पतप्रधान, मुख्य मत्री किंवा एखादा मोठा पुढारी जेव्हा गावात यायचा असतो, तेव्हा त्याचे सगळे कार्यक्रम वृत्तपत्रातून प्रसिद्ध होत असतात परतु तुम्हा-आम्हा सामान्य लोकांना त्यांच्या येण्याजाण्याशी काहीच कर्तव्य नसत एखादा साहित्यिक, विचारवत, कलाकार गावात आला तर त्याला भेटायला आपण उत्सुक असतो त्याचीच माहिती आपल्या दृष्टीन महत्त्वाची असते अर्थात या माहितीचा उपयोग वाचक करून घेतीलच अस नाही पण त्यान काही बिघडत नाही

सागायच तात्पर्य हे की श्री० घळगी यानी या सदरासाठी माझी मुलाखत घेतली आणि ती ता० १० डिसेंबरच्या अकात छायाचित्रासह प्रकाशित झाली त्यानी त्या मजकुराला जे शीर्षक दिल त्यानं मात्र मी जरा गोंधळलो त्यानी म्हटलं होत, 'निष्ठुर मतिन' मी वसतरावांना विचारल, "त्यांनी मला निष्ठुर का म्हट-लय?" ते हसून म्हणाले, "अहो, कानडीत निष्ठुर म्हणजे नि.स्पृह 'निष्ठुर मतिन' म्हणजे नि.स्पृहपणे बोलणारे, स्पष्ट ' अर्थात तेच माझ वैशिष्टच असल्यामुळे आणि मुलाखतीतल्या मजकुरात माझ्या दृष्टीन आक्षेपार्ह असं काहीच नसल्यामुळे तो मजकूर पाहून मी खूष झालो मात्र त्या माहितीच्या सदर्भात कुणीतरी माझी चौकशी करतील अशी जी अपेक्षा होती, ती पुरी झाली नाही रा. स्व सघाच्या दोन कार्यकर्त्यांनी फोनवरून भेटायला येत असल्याच कळवल होत परतु ते आले नाहीत काहीतरी अडचण आली असावी

हुबळी हे मुख्यत. उद्योग व व्यापार यासाठी प्रसिद्ध असलेल शहर आहे.

तिथं पहाण्यासारखं फारसं काही नाही नाही म्हणायला तिथला सिद्धारूढ-स्वामींचा मठ आणि स्वामींची समाधी या तशा अलिकडल्या गोष्टी असल्या तरी प्रेक्षणीय आहेत मला मात्र त्या संस्थेचा भटारखानाच विशेष आवडला भात शिजवण्याचे दहावीस मोठमोठे रिकामे हंडे चुलीवर ठेवले होते भिंतीवर भोपळ्यांच्या रांगा आणि ओसरीवर तांदुळाच्या पोत्यांच्या थप्प्या होत्या आजच्या अन्नतुटवड्याच्या काळात ते दृश्य डोळ्यांना सुखकर वाटलं पूर्वी इथे अन्नछत्र चालत असे खेड्यापाड्यातून येणारी शेतकरीमंडळी एखाद्या खाणावळीत हक्कानं जावं त्याप्रमाणं इथं मोफत जेवण करून आपल्या कामाला जात स्वामींच्या जीवनातल्या चमत्काराची चित्रंही मजेशीर आहेत स्वामीजी हे लिंगायत. खुद्द शंकराचेच अवतार ते देवापुढच्या दगडी नंदीवर बसले तर गावचे शिवभक्त त्यांना मारायला धावले त्या चित्रातले मारणारे लोक कोण ? पूर्वी त्यांच्या गळ्यात जानवं दाखवलं होतं त्यावरून ते ब्राह्मण असल्याचं सूचित होत होतं अलिकडे ते जानवं पुसून टाकलं आहे त्यामुळं जातिद्वेष कमी व्हायला मदत होत असावी !

कर्नाटकाची राजधानी बेंगळूर तिथलं काचघर (ग्लास हाउस) प्रख्यात आहे त्याच धर्तीवर हुबळीलाही एक छोटं परंतु नीटस काचघर आहे सत्कारसमारंभ, फुलांचं प्रदर्शन यासारखे सार्वजनिक कार्यक्रम तिथे होतात परंतु मला हुबळीतली सर्वात अधिक आवडलेली गोष्ट म्हणजे 'नृपतुंग बेट्ट' नावाची टेकडी नृपतुंग हे नाव अलिकडेच दिलेलं टेकडी तशी लहानशी आहे पुण्यातल्या पर्वतीसारखी परंतु तिथून खलाटीत वसलेलं हुबळी शहर छान दिसतं तिथून दिसणाऱ्या सूर्यास्ताची शोभा काही अपूर्वच असते अंधार पडला आणि दिवे लागले की धारवाडही दिसू लागतं अगदी माथ्यापर्यन्त उत्तम डांबरी रस्ता बनवण्यात आला आहे त्यामुळे डोंगर चढू न शकणाऱ्यांचीही चांगली सोय झाली आहे

हुबळीला गेल्यावर धारवाडला जाऊन येणं सहज घडतं विशेषतः घरची गाडी असल्यावर तर त्यात कसलीच अडचण पडत नाही तसं ते जोडशहरच बनलं आहे फक्त बारा मैलांचं अंतर रस्ता उत्तम मुंबई–बेंगळूर हमरस्त्यावर ते शहर आहे हुबळीची लोकसंख्या साडेचार लाख, तर धारवाडची दीड लाख दोन्ही शहरं मिळून महानगरपालिका बनवण्यात आली आहे हुबळी व्यापारी शहर आहे, तर धारवाड हे पुण्याप्रमाणे विद्येचं माहेरघर कर्नाटक विद्यापीठ तिथंच आहे. लहानलहान टेकड्यांवर वसलेलं असल्यानं धारवाड हे खूपच स्वच्छ शहर राहिलं आहे आमचे जुने स्नेही डॉ०श बा जोशी यांना भेटण्यासाठी धारवाडला जाण्याचा मूळ विचार होता परंतु मडिकेरीला त्यांची भेट झाल्यामुळे दुसऱ्या एका मित्रांना भेटायचं ठरवलं—— ज्यांना मी कधी पाहिलं नव्हतं, परंतु ज्यांच्या लिखाणामुळे जे आपल्या ओळखीचेच आहेत.असं वाटत होतं ते मराठीचे प्रख्यात कथाकार प्रा जी ए कुलकर्णी परंतु त्यांचा पत्ता माझ्याजवळ नव्हता म्हणून प्रथम त्यांच्या महा-

विद्यालयात जाऊन त्याच्या घरचा पत्ता मिळवला. घरी जाऊन चौकशी केली, तेव्हा ते जिमखाना-क्लबात गेल्याच समजल म्हणून क्लबात गेलो. तिथेही ते भेटले नाहीत खूपच विरस झाला

हुबळीहून पुण्याला यायच म्हणजे मिरजेत गाडी बदलण्याची कटकट आलीच शिवाय सगळ्या महत्त्वाच्या गाड्या बेंगळूरहून येत असल्यामुळे आरक्षणाचीही निश्चिती नसते म्हणून आम्ही बसन प्रवास करायच ठरवल. त्या . बाबतीत एक वेगळच सकट उभं राहिल. आम्ही हुबळीत असतानाच वेळगाव-सकेश्वरमधील सुतकट्टीच्या बारीजवळ अनेक बसगाड्या आणि ट्रकगाड्या अडवून दरोडेखोरानी त्याची लुटालूट केल्याची बातमी वृत्तपत्रात प्रसिद्ध झाली होती सुतकट्टीची बारी तिथल्या दरोडेखोर बेरडाबद्दल फार पूर्वीपासून प्रसिद्ध आहे आमच्या लहानपणी तर त्या बेरडांची दहशत खूपच अधिक होती काही वर्षांपूर्वी श्री रणजीत देसाई यानी 'बारी' नावाची जी एक उत्कृष्ट कादबरी लिहिली होती, ती या सुतकट्टीच्या बारीतल्या बेरडासबधीच होती माझ्या मते रणजीतजीची ती सर्वोत्कृष्ट कादबरी. पण 'स्वामी', 'श्रीमान योगी' यासारख्या त्यांच्या बखरवजा कादबऱ्या इतक्या लोकप्रिय झाल्या, की 'बारी'ची आठवणच कुणाला राहिली नाही ('बारी' या कन्नड शब्दाचा अर्थ विहिरीच्या मोटवणावरील बैल फिरतात ती उतरती जागा किंवा रस्त्याचं वळण. मी स्वतः सुतकट्टीची बारी पाहिलेली नाही परतु ती डोंगराच्या उतरणीवरची किंवा दरीतली वस्ती असावी असा माझा समज आहे ) आता इतक्या वर्षांनंतर समाजविकासाचे अनेक प्रकल्प अमलात आणले गेल्यामुळ बारीचे बेरड शांतताप्रिय नागरिक बनले असावेत अशी माझी समजूत झाली होती तिला या दरोड्याच्या बातमीन धक्का दिला परतु नतर समजल की, दरोडेखोर उत्तर-भारतातून आलेले हिंदीभाषी लोक होते

असल्या बातम्याचा परिणाम थोडाफार तरी होतोच सायकाळी सातला निघणारी हुबळी-मुबई लक्झरी आणि दहा वाजता सुटणारी महाराष्ट्र राज्य-परिवहन मडळाची बस वेळ वाचवण्याच्या दृष्टीन सोयीची होती परतु वेळापेक्षा प्राण वाचवण अधिक महत्त्वाच होत. म्हणून आम्ही पहाटे सव्वापाचला निघणाऱ्या कर्नाटक राज्य-परिवहन मडळाच्या हुबळी-पुणे गाडीन निघालो या गाडीन निघण्यात एकच अडचण होती पहाटे उठण्याची ! यजमानाना आपल्यासाठी किती तसदी द्यायची याला काही मर्यादा हवी की नाही ? परतु असले मुद्दे वसतरावापुढे टिकाव धरीत नाहीत त्यांनी चारचा गजर लावला होता, पण त्यापूर्वीच जागे होऊन त्यानी सर्वांना उठवल आणि पाचच्या पूर्वीच आम्हाला बसस्टँडवर आणून सोडल सव्वापाचला गाडी स्टँडला लागली गर्दी फारशी नव्हती परतु आमच्याजवळ सामान पुष्कळच होत. कर्नाटकात जड सामान ड्रायव्हरजवळच्या मोकळ्या जागेत

ठेवायची पद्धत आहे. म्हणून मी अथरूण नि पेटी तिथे ठेवली ड्रायव्हरसाहेब कायद्यावर बोट ठेवून चालणारे. त्यांनी ते सामान टपावर टाकायला लावल मी त्याना म्हणालो, "अहो, तुमच्या कर्नाटकात इथे सामान ठेवायची प्रथा आहे ना ?" त्यावर ते उत्तरले, "आमच्या कानडी लोकाना डोक थोड कमीच आहे " आता यावर मी काय बोलणार ? गाडी थांबली की बाहेर जाऊन टपावर आपल सामान सुरक्षित आहे की नाही हे पहायची कवाईत मी करीत राहिलो तरी पण ड्रायव्हरचा राग मात्र मला आला नाही कुणीतरी कायद्याला धरून वागण्याचा आग्रह बाळगतो, ही काय कमी समाधानाची गोष्ट होती ? थोड्या वेळान गाडीत बिडीच्या धुराचा वास सुटला त्याबरोबर ड्रायव्हरन त्या इसमाला ताबडतोब बिडी विझवायला भाग पाडल मी ड्रायव्हरच मनःपूर्वक अभिनदन केल देशभर वर्षानुवर्षं फिरलेला मी धूम्रपानासबधीचा नियम इतक्या काटेकोरपणे पाळायला लावणारा हा पहिलाच आणि एकमेव ड्रायव्हर मला भेटला होता ! बहुतेक ड्रायव्हर–कडक्टर या नियमाच्या उल्लघनाकडे डोळेझाक करतात आमच्यासारख्या उतारूनी तक्रार केली, तर ते आम्हालाच सागतात " जाऊ द्या हो साहेब ! काय होतय तेवढ्यान ?" असा अनुभव असल्यामुळे बेळगाव जिल्ह्यातल्या त्या मराठीभाषी कन्नड ड्रायव्हरच मला फार कौतुक वाटल ड्रायव्हरन गाडीही फार छान चालवली ताशी साठ किलोमीटरचा वेग ठेवूनही गाडीवरचा त्याचा ताबा पक्का होता सुमारे ४२० किलोमीटर अतर त्यान सुमारे दहा तासांत अगदी मजेत कापल बेळगाव, कोल्हापूर, सातारा वगैरे ठिकाणी घालवलेला विश्रांतीचा काळ जमेस धरता ते अतर त्यानँ साडेआठ तासांतच तोडल होत त्यामुळ सायकाळी पावणेचारला आम्ही स्वारगेटला पोचलो तेव्हा अग आंबून गेल होत तरी प्रवासाचा कटाळा आला नव्हता !

घरात पाऊल टाकताच नातीन म्हातारीला पहिलाच प्रश्न केला " आजी, तुला वाघोबा भेटला का ग ? कस सोडल त्यान तुला ? त्याच्या डोळ्यात राख गेली काय ?"

" बाई ग, फार मोठा वाघोबा मिरजेत भेटला ! तो म्हणाला, 'म्हातारे, खातो तुला मी त्याला म्हटल, 'बाबा रे, आत्ता मला खाऊन तुला काय मिळणार ? मी लेकीकडे जाते तूपरोटी खाते, लठ्ठमुठ्ठ होते, मग परत येताना खा मला 'तेव्हा त्यान मला सोडल पण त्यान बजावल, ' बघ ह म्हातारे, त्या गोष्टीतल्या म्हातारीसारख फसवू नकोस मला ! मी इथ तुझी वाट पहात थांबतो.' आणि मी निसटल्ये त्याच्या तावडीतून !"

" खरच ग आजी ! तू चांगलीच लठ्ठ झाली आहेस की ! पण आजोबा मात्र पार वाळून गेलेत. चेहेरा बघ कसा रापल्यासारखा दिसतोय त्याचा !" छोकरी हळहळत उद्गारली

म्हाताऱ्यान म्हातारीकडे प्रश्नार्थक नजरेन पाहिल आपल्या चेहेऱ्यावर म्हातारीला आणि तिच्या लेकीला दिसलेला तजेला खोटा होता की काल्पनिक ?

" बर, मग तू वाघोबाला चकवलस तरी कस ?" नातीन मुद्द्याचा प्रश्न केला.

" अग, ते अगदी सोप होत. परत येताना आम्ही मिरजेला गेलोच नाही तो मेलां वाघोबा तिथ बसला असेल वाट बघत माझी ! चांगली जिरली त्याची !" म्हातारीन सांगितल.

" म्हणजे तू भोपळ्याऐवजी मोटारीत बसलीस, एवढाच फरक. मोटार हाच तुझा भोपळा म्हण की ! तू वसला म्हणाली असशील, 'चल रे भोपळ्या टुणुक टुणुक' आणि तुझा तो भोपळा भर्रकन निघून इकडे आला असेल " अस म्हणून नात खुदकन हसली

" म्हाताऱ्ये, तुझ आपल ठीक आहे कुठेही गेल तरी तुला मागली चिंता नसते. त्यामुळ तुझ वजन वाढतच रहात पण म्हाताऱ्याची दशा बघ काय झालीय ती ! भरपूर वजन उतरलेल दिसतय त्याच तरी आम्ही त्याला सांगत असतो की, बाबा रे, तू आपल घर सोडून कुठ जात जाऊ नकोस गुमान हरी-हरी करीत बस पण आमच ऐकतय कोण ?" धाकट्या पोरान शेरा मारला !

ग्रंथ संग्रहालय
६५०
दा. क्र. 242327
शाखा (स्थळ प्रत)

# काश्मिरचे पुनर्दर्शन

१९६१ सालच्या ऑक्टोबरात आचार्य काकासाहेब कालेलकर यांचे खाजगी चिटणीस श्री. नरेश मंत्री व त्यांचे जपानी मित्र श्री कोकी नागा यांच्यासह मी काश्मिरचा प्रवास केला होता त्या प्रवासाचा वृत्तान्त 'चिनारच्या छायेत' या पुस्तकाच्या रूपाने १९६२ सालच्या ऑक्टोबरात प्रसिद्ध झाला होता त्यानंतर जवळजवळ सोळा वर्षांनी म्हणजे १९७७ सालच्या मे महिन्यात मी दुसऱ्यांदा काश्मिरला गेलो. सामान्यतः ज्या देशात किंवा प्रदेशात मी एकदा जातो आणि त्या प्रवासासंबंधी लेख अथवा पुस्तक लिहितो तेथे पुन्हा जाण्याची उत्सुकता मला फारशी नसते कारण माझा प्रवास केवळ आनंदासाठी नसतो त्या प्रदेशाची ओळख स्वतः करून घेणे आणि आपल्या वाचकांना ती करून देणे, हा माझा उद्देश असतो त्यामुळे एकदा भेट दिलेल्या स्थानाविषयी पुन्हा नव्याने काही लिहिण्याची शक्यता फार कमी असल्याने अशा पुनर्भेटीचे मला विशेष आकर्षण वाटत नाही

परंतु काश्मिरच्या बाबतीत मला हा नियम माझ्या पत्नीच्या आग्रहास्तव मोडावा लागला. माझ्याप्रमाणे सौ. माणिकलाही प्रवासाची खूप आवड आहे परंतु घरच्या जबाबदाऱ्या आणि स्वतःची अशक्त प्रकृती यामुळे तिला मनसोक्त प्रवास करता आला नाही काश्मिरच्या बाबतीत मात्र तिने आपली चिकाटी सोडली नाही. काश्मिरला जायचेच, आणि तेही मला बरोबर घेऊन, असा निश्चय तिने केला होता, आणि योग्य वेळ येताच तो पार पाडला अर्थात यासाठी आम्हाला आर्थिक दृष्ट्या तशी जबर किंमतही मोजावी लागली. १९६१ साली माझा सारा प्रवास शंभर रुपयांत बसला होता, आणि सारी खरेदी दोनशे रुपयांत आटोपली होती. याच्या उलट १९७७ च्या प्रवासाचा माणशी खर्च १७०० रुपये (एकूण सुमारे ३५०० रुपये) आणि खरेदी २००० रुपये, म्हणजे एकूण खर्च सुमारे साडे-पाच हजार रुपये झाला याचे प्रमुख कारण गेल्या सोळा वर्षांत रुपयाची किंमत खूपच घसरली होती, हे होय. परंतु त्यापेक्षाही अधिक महत्त्वाचे कारण असे की, पहिल्या खेपेला मी तिसऱ्या वर्गाने प्रवास केला होता, आणि काश्मिरमध्ये 'खादी

ग्रामोद्योग मंडळा'च्या अतिथिगृहात रहाण्याची सोय झाल्याने हॉटेलचा खर्च करावा लागला नव्हता वस्तूंची महागाईही भरमसाट वाढली आहे जो नमदा मी १५ रुपयांना घेतला होता, त्याला या खेपेस ११५ रुपये द्यावे लागले केशराची किंमत १२ रुपये तोळ्यावरून ८० रुपये तोळ्यापर्यंत गेली आहे, तर दीड रुपया शेर या भावाने मिळणारा बदाम (सालीसकट) १७ रुपयापर्यन्त चढला आहे पन्नास रुपयांना मिळणारी हलक्या प्रतीची पश्मीना शाल आता पाचशेच्या घरात जाऊन पोचली आहे खरा पश्मीना हजाराच्या पुढेच यावरून महागाईची कल्पना यावी

सामान्यत यात्रा कंपनीतून प्रवास करणे मला आवडत नाही कारण त्या प्रवासात आपल्याला स्वातंत्र्य नसते सर्कशीतल्या सिंहाने पिंजऱ्यातून जगभर प्रवास करावा, तसे काहीसे घडते शिवाय प्रवासवर्णनाच्या उद्देशाने बाहेर पडणाऱ्या लेखकाने पहिल्या वर्गाचा प्रवास टाळून शक्य तर तिसऱ्या (आता दुसऱ्या) वर्गाने प्रवास केला, आणि हॉटेलात उतरण्याऐवजी मित्रमंडळीकडे मुक्काम केला तरच त्याला खरे लोकजीवन पहायला व अनुभवायला मिळते, असा माझा अनुभव असल्याने मी पहिल्या वर्गाने क्वचितच प्रवास केला आहे. अर्थात ज्या काळात मी बहुतेक सारा प्रवास केला, त्या काळात पहिला वर्ग मला परवडणारा नव्हता, हे खरेच आहे परंतु या खेपेला सौ माणिक बरोबर असल्याने दुसऱ्या वर्गाने जाणे शक्य नव्हते आपल्या मातोश्रींचा प्रवास जास्तीत जास्त सुखकर झाला पाहिजे असा चिरंजिवाचा आग्रह असल्यामुळे आणि त्यापायी येणारा खर्च स्वत करण्याची त्याची तयारी असल्यामुळे पहिल्या वर्गाने जाणे भागच होते सुदैवाने 'राजा ट्रॅव्हल्स'-सारख्या बादशाही थाटाच्या कंपनीतून प्रवास करण्याची संधी आम्हाला मिळाली, आणि कसलीही दगदग करावी न लागता हा प्रवास मजेत होऊ शकला कंपनीचे संचालक श्री राजा व सौ राणी पाटील यांची शिस्त, आस्था, आत्मीयता यांचा आमच्यावर चांगला प्रभाव पडला, आणि त्यामुळे केलेला खर्च सार्थकी लागला असे वाटले सौ राणी यांचा उत्साह, हसतमुख सावळा चेहेरा, तरतरीतपणा, सौजन्य वगैरे गोष्टीमुळे आम्हाला आमच्या कन्येची वारंवार आठवण होत होती, व त्यामुळे त्यांच्याशी एक प्रकारची जवळीकही निर्माण झाली एकदरीत सौ माणिकबाईंना दगदग न होता काश्मिर पहाता आले

'राजा ट्रॅव्हल्स'ची ती खास गाडी होती. पहिल्या व दुसऱ्या वर्गाचे मिळून सुमारे ३५० प्रवासी होते १३ डब्याची संपूर्ण गाडीच काश्मिरप्रवासाला निघाली होती या गाडीला श्री राजा पाटील यांनी 'इंटलेक्च्युअल्स स्पेशल' असे नाव दिले होते आणि ते प्रत्येक डब्यावर ठसठशीत अक्षरात (लाल शाईने) छापलेल्या कागदी नामपट्टिकांतून व्यक्त केले जाईल अशी व्यवस्था केली होती डॉक्टर कामत दंपती, प्राचार्य एन के कुलकर्णी व प्रा मावळंकर (दोघेही सपत्नीक), 'हेर'-'रंभा'चे संपादक श्री. दीनानाथ पै, इंजीनियर, सरकारी व बिनसरकारी अधिकारी वगैरे

मडळी बरोबर असल्यामुळे या गाडीला 'बुद्धिमताची खास गाडी' असे नाव देण्यात आले असावे, अशी माझी समजूत झाली. परतु श्री. राजा पाटील याना विचारल्या-वर त्यानी असा खुलासा केला की, " इतर कपन्याहून आमचं वेगळेपण लोकाच्या लक्षात याव म्हणून आम्ही आमच्या सर्वच सहलीना हे नाव देतो आणि आमच्या सहलींमधे धर्मभोळेपणापेक्षा सौदर्यदृष्टी आणि मनरजन यानाच अधिक महत्त्व असल्यान ते सार्थही असत श्रीयुत पु ल आणि सौभाग्यवती सुनीताबाई देशपांडे यांनी, तसेच इतरही अनेक लेखक, कवी, डॉक्टर, इजीनियर, बिझनेस एक्झिक्युटिव्ह यानी आमच्या कपनीतर्फे प्रवास केला आहे " त्यांच्या त्या खुलाशाने आपण बुद्धि-मताच्या श्रेणीत सामील झाल्याचा माझा आनद द्विगुणित झाला की कमी झाला हे सागणे कठिण आहे

आग्रा, फत्तेपूर शिक्री व दिल्ली पहाण्याची सोयही (जादा ६० रुपये देणाऱ्यां-साठी) या सहलीत होती परतु ही सारी स्थळे आम्ही उभयतानी पाहिलेली अस-ल्याने व तेवढी दगदग पुन्हा करण्याची इच्छा नसल्याने आम्ही आग्र्याला गाडीतच दिवसभर मुक्काम केला, व सायंकाळी 'ताजमहाल' पाहून आलो आधीच आग्र्याचा भयकर उन्हाळा आणि त्यात पुन्हा रणरणत्या उन्हात तापलेला आगगाडीचा डबा. जणू पचाग्निसाधनच झाले ते ! तरी पण सकाळी हिंदीचे प्रख्यात लेखक व 'मैत्री क्लब' या सस्थेचे सस्थापक–सचालक श्री रवी स्टेशनवर येऊन भेटल्याने आग्र्याचा मुक्काम अगदीच व्यर्थ गेला नाही. श्री० रवींचे मूळ नाव रामप्रसाद विद्यार्थी (रा० वि०) परतु आता ते रावी या नावानेच सर्वांना परिचित आहेत आज ते ६७ वर्षांचे आहेत परतु उत्साह मात्र तरुणाला लाजवील असा आहे वैयक्तिक व सामाजिक नवनिर्माण आणि हार्दिक चेतना–विकास ' हे त्यांचे जीवन–ध्येय आहे (फ्रीमेसन पास्टमास्टर आहेत ) जन्मभर लेखना-वरच उपजीविका चालवत आले आहेत. परतु कधीही हलक्या प्रतीचे लिखाण केले नाही विचारवत व निष्ठावत लेखक म्हणून त्यांची हिंदी साहित्यात चागली प्रतिष्ठा आहे आग्र्याजवळील कैलास या भागात एका निर्जन मदिरात ते रहातात तेच ' मैत्री क्लबा 'चे कार्यालय आम्ही उभयता पूर्वी तेथे जाऊन दोन दिवस राहिलो होतो मोठे रम्य व निवान्त स्थान आहे तेथील भुताटकीच्या काही गमतीदार घटना त्यांनी सागितल्या नतर पुस्तकप्रकाशनासबधी गप्पा निघाल्या एवढा प्रथमश्रेणीचा लेखक, परतु त्याच्या पुस्तकांना प्रकाशक मिळणे अवघड झाले आहे अनेक पुस्तके सपून गेली आहेत परतु त्यांच्या पुनरावृत्त्या काढण्यास कोणी तयार नाही ! आम्हा दोघांच्या अनुभवातली समानता पाहून गमत वाटली

बऱ्याच वर्षांनतर 'ताज' पाहिला खूपच काळवडल्यासारखा वाटला आस-पासच्या कारखान्यातल्या धुराचा तो परिणाम असावा किंवा कदाचित माझ्या वयोवृद्ध, थकलेल्या डोळ्याना तो तसा दिसला असावा

आग्र्याच्या उकडहंडीचा अनुभव घेतल्यानंतर दिल्लीला दिवसभर डब्याबाहेर रहाण्याचे ठरवले पंजाबीचे लोकप्रिय लेखक श्री गुरमुखसिंह जीत यांची भेट बऱ्याच दिवसात झाली नव्हती म्हणून त्यांच्याकडे जाण्याचे ठरवले 'नेहरू प्लेस'समोरच्या हेमकुट वस्तीत त्यांनी नुकताच सुमारे एक लाख रुपये खर्च करून टुमदार बंगला बांधला आहे बंगल्यात प्रवेश करताच सारा शीण नाहीसा झाला जीत पति-पत्नीच्या (व मुलाच्याही) प्रेमळपणाचा अनुभव फार जुना त्यामुळे नवल वाटले नाही मनमुराद स्नान, कपडे धुणे, चमचमीत पंजाबी भोजन, सुखदुःखाच्या व साहित्याच्या गप्पागोष्टी आणि विश्रांती यांनी ताजेतवाने होऊन आम्ही रात्री गाडीवर परत आलो, तेव्हा लाल किल्ल्यातील ध्वनिप्रकाशाचा कार्यक्रम हुकल्याबद्दल आम्हाला मुळीच हळहळ वाटली नाही

२४ मे १९७७ रोजी दिल्लीहून रात्री १० वाजता निघून 'जम्मू-तवी'ला दुसऱ्या दिवशी दुपारी एक वाजता पोचायचे, असा पूर्वनियोजित कार्यक्रम होता परंतु गाडी सुटायला दोन तास उशीर झाला, आणि तो वेळ भरून काढण्याऐवजी आमची गाडी त्या उशीरात भरच घालत चालली 'जम्मू-तवी' हे अलिकडेच तयार झालेले स्टेशन आहे पूर्वी गाडी पठाणकोटपर्यंतच जाई व तिथून बसचा प्रवास सुरू होई मात्र दिल्लीला थेट श्रीनगरचे तिकिट मिळे गेल्या खेपेला जम्मूत फेरफटका मारता आला नव्हता या खेपेला दुपारी एकपासून रात्रीपर्यंत जम्मूत वेळ घालवता येणार होता परंतु गाडी इतक्या संथ गतीने चालली होती, की ही संधीही हुकणार असल्याचे लौकरच आमच्या लक्षात आले त्यात पुन्हा 'जम्मू-तवी'च्या अलिकडे सांब्रा स्टेशनवर संध्याकाळी ६ च्या सुमारास आमची 'इंटलेक्च्युअल स्पेशल' जी उभी राहिली ती पुढे सरण्याचे नावच घेईना आणीबाणीच्या काळात बुद्धिमताच्या बुद्धीला जसा पक्षाघात (लकवा) झाला होता तसेच काहीसे आमच्या या बुद्धिमताच्या गाडीचे झाल असावे असे दिसू लागले पण त्यात निसर्गाचा काही दोष नसून रेल्वेवाल्यांचे ते एक कपटकारस्थान असल्याचे लौकरच स्पष्ट झाले आमची गाडी तेथेच थांबवून, तेलाचे इंजिन असलेली एक मालगाडी 'जम्मू-तवी'ला न्यायची, व तिचे इंजिन 'श्रीनगर एक्सप्रेस'ला जोडून ती दिल्लीकडे पाठवल्यावर मग आमची गाडी सोडायची असा त्यांचा डाव होता श्री राजा पाटील यांच्या मराठी बाण्याने त्यांचा हा डाव हाणून पाडण्याचे ठरवले त्यांनी सगळ्या (म्हणजे त्यातल्या त्यात जवान) उनारूंना बरोबर घेऊन रुळावर सत्याग्रह केला मालगाडी अडवली अखेर त्यांची बाजू न्यायाची असल्याने रेल्वेवाल्यांना त्यांच्यापुढे नमावे लागले वाटाघाटीतून अशी तडजोड निघाली, की मालगाडीचे तेलाचे इंजिन आमच्या 'इंटलेक्च्युअल्स स्पेशल'ला जोडून आम्हाला पुढे जाऊ द्यावे त्याप्रमाणे आम्ही 'जम्मू-तवी'ला अखेर पोचलो परंतु तोपर्यंत रात्रीचे आठ वाजून गेले होते. 'जम्मूतवी'पासून जम्मू शहर चारपाच मैल दूर असल्याने श्रीरघुनाथजीचे दर्शन

घेऊन येण्याचा बेतही त्यामुळे रद्द करावा लागला इतर यात्रा कंपन्यांचे संचालक रेल्वे-अधिकाऱ्यांना फार दबून वागतात, त्यामुळे यात्रा कंपन्यांवर दडपशाही करण्याची रेल्वेला सवयच लागली आहे, असे श्री राजाभाऊ पाटील यांनी सांगितले त्यांचे हे विधान बरोबर असावे असे दिसते

वस्तुत आम्ही पहिल्या वर्गाने प्रवास करीत होतो, आणि दिवस उन्हाळ्याचे होते यामुळे कमीत कमी सामान बरोबर घ्यायला हवे होते पण प्रवासात जास्तीत जास्त (व बहुधा अनावश्यक) सामान बरोबर घेणे ही आमची भारतीय संस्कृतीच आहे शिवाय आमच्या आधी वीस दिवस म्हणजे २ मे रोजी ' राजा ट्रॅव्हल्स'मधून काश्मिरला गेलेल्या मित्रांनी तिकडे खूपच थंडी असल्याचे कळवल्यामुळे त्या तथा-कथित थंडीच्या बंदोबस्तासाठी आम्ही बरेच गरम कपडे बरोबर घेतले होते खरे म्हणजे काश्मिरमध्ये मे महिन्याच्या उत्तरार्धात चांगलाच उन्हाळा सुरू झालेला असतो फक्त उंच पहाडावर गेल्यानंतरच थंडी जाणवू लागते परंतु पहिल्या खेपेला आम्ही ऑक्टोबरच्या तिसऱ्या आठवड्यात तेथे असताना थंडीने गारठून गेलो होतो म्हणून भरपूर गरम कपडे बरोबर घेण्याचा शहाणपणा करणे भागच होते दु:खात सुखाची गोष्ट एवढीच की, अंथरूण–पांघरूण ' जम्मू-तवी 'ला गाडीतच ठेवण्याची सोय होती त्यामुळे तेवढे ओझे तरी कमी झाले ।

उकाडा व डास यामुळे रात्री झोप अशी लागलीच नाही त्यामुळे पहाटे उठून श्रीनगरला जाणाऱ्या खास बसेसमध्ये बसताना थोडा थकवा वाटत होता परंतु बस सुरू झाल्यावर वाऱ्याची थंड झुळूक लागली आणि तरतरी वाटू लागली पूर्वी पठाणकोटहून बसचा प्रवास सुरू होई तेव्हा एका दिवसात श्रीनगरला पोचता येत नसे कारण जम्मूपर्यंतचा १०० किलोमीटरचा प्रवास व तेथून पुढे ३००किलो-मीटर असे एकूण ४०० किलोमीटरचे अंतर बारा–चौदा तासांत तोडणे खासगी मोटारींना शक्य असले तरी प्रवासी मोटारींना ते शक्य होत नसे मग कूद किंवा बटोत या मध्यावर असलेल्या ठिकाणी रात्री वस्ती करावी लागे आता ती कटकट उतरलेली नाही सकाळी जम्मूहून निघाले की संध्याकाळी श्रीनगरला आरामात पोचता येते वस्तुत ३०० किलोमीटर हे अंतर काही फार अधिक म्हणता येणार नाही परंतु बहुतेक सबंध रस्ता अवघड घाटातून व डोंगरदऱ्यांतून गेलेला अस-ल्याने अवजड वाहनांच्या वेगावर आपोआपच नियंत्रण येते वाटेत बटोतला भोजना-साठी बसेस थांबल्या त्या वेळी वळवाच्या पावसाची एवढी जोराची सर आली की बरीच मंडळी भिजून चिंब झाली अर्थात त्यामुळे उकाडा सुसह्य झाला आणि काश्मिरची गुलाबी थंडीही सुखवू लागली, यात शंका नाही काश्मिरमध्ये भातापेक्षा भाजी महाग असते, हा गेल्या खेपेचा अनुभव होता अजूनही त्या परिस्थितीत फरक पडलेला नाही भाताची प्लेट एक रुपयाला, तर भाजीची प्लेट अडीच रुप-याला मिळाली. तांदूळ सरकारी भावाने व मुबलक मिळतो, आणि भाजी मात्र

बाहेरून आणावी लागते, हे याचे कारण असावे जम्मूहून निघाल्यानंतर काही वेळ तवी नदी आपली सोबत करते पुढे रामबनपासून चिनाबचे शेकडो फूट खोल दरी-तून सळाळत, उसळत, वेगाने धावणारे मातकट पाणी दिसू लागते (ही काश्मिरी चिनाब पंजाबमधून वाहणारी चिनाब वेगळी अशीच काश्मिरी सिंधू नदीही वेगळी आहे तिचा पंजाबी सिंधूशी काही संबंध नाही !) बसमध्ये ड्रायव्हरजवळच्या पेटीवर बसलेला एक पोलिस-अधिकारी सांगू लागला, ' ही नदी चीनमध्ये उगम पावते म्हणून तिला चीन+आब (पाणी) = चिनाब असं म्हणतात हिच्या पाण्याला इतकी ओढ असते की तिच्या काठावर बसून अंघोळ करणंही शक्य नसत, मग तिच्यात पोहायची गोष्ट दूरच राहिली " ही नदी चुनखडीच्या प्रदेशातून वाहात येते म्हणून तिचे पाणी नेहमीच मातकट, गढूळ असते, असे काही लोकांनी सांगितले तर सौ० राणी पाटील म्हणाल्या, " एरवी पाणी स्फटिकासारख असत, पण अलिकडेच झालेल्या पावसानं ते गढूळ झालय "

तसे पाहिल्यास जम्मूहून श्रीनगरला जाताना सुमारे १२० मैलावर बनिहाल खिंडीतील पावणेदोन मैल लांबीचा जवाहर बोगदा जिथे लागतो तिथे चिनारचा वृक्ष प्रथम पहायला मिळतो म्हणजे खरे काश्मिर तिथूनच सुरू होते तरी पण त्यानंतरही डोंगराळ भाग चालूच असतो त्यामुळे 'असली' काश्मिरचे दर्शन तेथे घडत नाही ते घडते श्रीनगरच्या अलिकडे ५२ व्या मैलावर, शेवटचा घाट उतरून आपण काश्मिरच्या खोऱ्यात प्रवेश करतो तेव्हा मुख्य राजमार्गापासून उजवीकडे एक लहान फाटा जातो त्या रस्त्याने दोन--अडीच मैल गेल्यावर झेलम (जेहलम) नदीचा उगम असलेला वेरीनाग हा झरा लागतो त्या झऱ्याच्या पाण्यावर जहांगीर बादशहाने बनवलेल्या देखण्या बगिच्यात चिनारचे डेरेदार वृक्ष पहायला मिळतात, आणि मन तृप्त होते वेरीनागच्या पाण्यावर बांधलेल्या अष्टकोनी पुष्करणीतले 'ट्राउट' मासेही मोठे सुंदर दिसतात हे इंग्रजी जातीचे मासे काश्मिरच्या थंडगार पाण्यात चांगले जगतात, वाढतात यामुळे अनेक ठिकाणी त्यांचे व्यापारी पद्धतीने उत्पादन केले जाते. मात्र वेरीनाग, कोकरनाग, मट्टन (मार्तंड) वगैरे ठिकाणचे मासे मारले जात नाहीत. तरीही त्यांचा आकार किंवा संख्या कुंडात न मावण्या-इतकी वाढत नाही हे पाहून गमत वाटते

काश्मिर-खोऱ्यात प्रवेश करताच निसर्गाचे स्वरूप एकदम बदलून जाते जिकडेतिकडे फुललेली (विशेषत जंगली गुलाबाची) फुले आणि हिरवीगार शेते पाहून डोळे सुखावतात गेल्या खेपेस आम्ही काश्मिरमध्ये पानगळ ऋतूचे सौंदर्य पाहिले होते. झाडांची पाने गळू लागली होती चिनारची पाने पिकून लालभडक बनली होती पण केशराच्या शेतात मात्र गवताच्या पात्यासारख्या पानांत भुईसरशी फुललेली निळी--जांभळी फुले डुलत होती या खेपेला झाडांना फुटलेली कोवळी पालवी, अक्रोड, बदाम, सफरचंद वगैरे फळझाडांवर सुपारीएवढी कोवळी फळे,

विविध प्रकारची रंगीबेरंगी फुले यांनी डोळे आकर्षित करून घेतले. एरवी सुस्त व रिकामटेकडा दिसणारा शेतकरी आपल्या कुटुंबियांसह शेतीच्या कामात गुतलेला दिसत होता कोरडच्या प्रदेशात असणारी गहू, मोहरी वगैरे पिके कापणीला आली होती, पण त्यांची सख्या फार थोडी काश्मिरच्या शेकडा ऐंशीनव्वद टक्के शेतात भाताचीच लागवड होत असते त्यामुळे बहुतेक ठिकाणी भातशेतीची वेगवेगळी कामे चाललेली दिसत होती काही शेते नागरून तयार झाली होती, तर काही शेतात नागरट चालू होती

खेळण्यातल्यासारखा लाकडी नागर आणि तो ओढणारे, त्याला शोभतील असे खुरटे, मरतुकडे बैल पाहिल्यानंतर काश्मिर हा शेतीच्या बाबतीत अजून पन्नास वर्षे मागे असल्याचे प्रत्ययास येत होते, आणि काश्मिरी शेतकऱ्याचे दारिद्रच कमी होण्याऐवजी दिवसेंदिवस का वाढत आहे याचे उत्तरही मिळत होते. शेते तरी केवढी ? टीचटीच लाबीरुदीची भरमसाट लोकसख्यावाढीचा परिणाम शेताच्या आकारावर कसा होतो, याचे प्रात्यक्षिक काश्मिरमध्ये पहायला मिळते सभोवतालच्या डोंगरावरचा बर्फ वितळल्याने काश्मिर-खोऱ्यात या वेळी भरपूर पाणी वाहात असते ते अडवून ते शेतांच्या वाफ्यांत भरले जाते बहुतेक सर्व वाफे पाण्याने तुडुंब भरलेले होते नांगरून झालेल्या शेतांतील ढेकळे लाकडी बडवण्याने फोडणे, वाफ्यात पाणी भरणे, चिखलणी करणे वगैरे कामे काही ठिकाणी चालली होती काश्मिरमध्ये रासायनिक खते अजून पोचलेली दिसत नाहीत त्याऐवजी घरच्या उकिरड्यातले शेणखत व पालापाचोळा यांचाच वापर खत म्हणून केला जातो या खताचे ढीग शेतांत जागोजागी दिसत होते हे खत आधी शेतात पसरून मग पाणी भरण्याऐवजी आधी पाणी भरायचे आणि मग खोरी व कुदळी यांच्या साहाय्याने ते शेतात पसरायचे अशी प्रक्रिया तेथे चालते कोकणातल्याप्रमाणे शेताच्या एका भागात रोपे तयार केली जातात आणि ती काढून इतरत्र लावली जातात रोपे काढणे, त्यांची मुळे पाण्यात खळबळून त्यांना लागलेला चिखल काढून टाकणे, त्यांच्या लहानलहान पेढ्या बनवणे आणि मग रोपांची लावणी करणे — ही सारी कामे कोकणातल्यासारखीच चालली होती, आणि त्यामध्ये काश्मिरी लावण्यवतींचाच सहभाग प्रधान होता फरक एवढाच की कोकणी पुरध्री मांड्यापर्यंत पाय व ढोपरांपर्यंत हात उघडे ठेवून राबते, तर काश्मिरी सुंदरी कमीज–सलवारींनी बहुतेक संपूर्ण शरीर झाकून (आणि डोकीला रुमाल बांधून) चिखलात काम करते दोघीही सारख्याच कष्टाळू आणि मस्तपणे गाणी गात दारिद्र्याचा विसर पाडण्याचा प्रयत्न करणाऱ्या!

काश्मिरी शेतकऱ्याचे दारिद्रच संपायचे असेल तर त्याच्या शेतीत आधुनिकता आली पाहिजे त्यासाठी आधुनिक दृष्टिकोण हवा तो यायचा तर शिक्षण हवे त्याचीच तर उणीव आहे स्वातंत्र्यानंतरच्या तीस वर्षांत काश्मिरी शेतकऱ्याकडे कुणी लक्षच दिले नाही —– मग ते 'नॅशनल कॉन्फरन्स'चे शेख अब्दुल्ला असोत की

'कॉंग्रेस 'चे बक्षी गुलाम मुहम्मद अथवा सादिक असोत ! सर्वांनीच शेतकऱ्यांच्या अडाणीपणाचा आपापल्या राजकारणासाठी उपयोग करून घेतला

काश्मिरमधील ' नेडौस '(Nedous) व ' बूलवर्ड ' (Boulevard) ही दोन पहिल्या प्रतीची हॉटेले आमच्यासाठी राखून ठेवण्यात आली होती 'नेडौस' हे जुन्या पद्धतीचे बादशाही हॉटेल आहे मोठमोठ्या प्रशस्त खोल्या, टबबाथची सोय असलेली स्नानगृहे वगैरे खानदानी थाट तेथे आहे त्या मानाने ' बूलवर्ड ' आधुनिक आहे लहान परंतु सर्व सुखसोयींनी युक्त अशा खोल्या तेथे आहेत आम्हाला दुसऱ्या मजल्यावरची पंधरा क्रमांकाची खोली मिळाली. तिच्या मागील सज्ज्यातून रस्त्याच्या पलिकडे असणाऱ्या ' डल ' सरोवराचे नयनमनोहर दर्शन सहज होत होते श्रीनगरच्या गाभ्यात असलेले हे डल सरोवर विस्ताराने तसे मोठे असले तरी ते फार उथळ आहे, आणि शहरात असल्याने व त्यात हाउसबोटी कायम नांगरून पडलेल्या असल्याने वर्षानुवर्षांची घाण साचून ते अत्यंत गलिच्छ बनले आहे. अर्थात त्याचा गलिच्छपणा जवळ गेल्यावरच जाणवतो आमच्या खोलीतून व सज्ज्यातून ते फारच देखणे दिसत होते रंगीबेरंगी लहान–मोठे शिकारे (नौका) आणि हाउस-बोटी यांच्यामुळे डलच्या आकर्षकतेत चांगलीच भर पडत होती

गेल्या खेपेला हजरतबल हे ठिकाण व्यवस्थितपणे पाहिले नव्हते बहुधा' हजरतबाल प्रकरण गाजल्यानंतरच या स्थानाकडे बाहेरच्या लोकांचे लक्ष गेले असावे हजरत मुहम्मद पैगंबर यांच्या दाढीचा एक केस येथील मशिदीत मोठ्या इतमामाने जपून ठेवण्यात आला आहे त्यावरून या स्थानाला हजरतबाल (केस) हे नाव पडले असावे, अशी आमची समजूत होती परंतु ती चुकीची असल्याचे या खेपेला समजले खरे नाव 'हजरतबाल' नसून 'हजरतबल' असे आहे बल म्हणजे काय ? सौ राणी पाटील सांगत होत्या, "बल म्हणजे पाणी, सरोवर समोरच्या डल सरोवरावरून हे नाव पडल आहे" पण माझ्या काश्मिरी मित्रांनी सांगितले, "बल या काश्मिरी शब्दाचा अर्थ आहे, स्थान हजरतबल म्हणजे पवित्र स्थान" इथली मशिद अगदीच जुनाट, मामुली आहे तिच्या एका खोलीत हा केस ठेवलेली डबी आहे पूर्वी ती तळमजल्यावरच्या खोलीत होती परंतु मध्यंतरी त्या केसाची चोरी होऊन भयंकर दंगली झाल्यामुळे आता ती डबी वरच्या मजल्या-वर ठेवलेली आहे तेथे सशस्त्र पहारा अहोरात्र चालू असतो. मशिदीपासून समोरच्या डल तळ्यापर्यंत प्रशस्त हिरवळ आहे दर शुक्रवारी या हिरवळीवर सामुदायिक नमाजाचा कार्यक्रम होतो वर्षातून ठराविक दिवशी हजरतबालची डबी लोकांना दर्शन घेता यावे म्हणून बाहेर काढली जाते त्या वेळी हजारो लोक येथे जमतात आता या मशिदीसमोर एक प्रचंड संगमरवरी मशिद उभारली जात आहे तिला तीन कोटी रुपये खर्च येईल असे म्हणतात ही मशिद भारतातील इतर जामा मशिदीसारखीच असेल त्याऐवजी काश्मिरी स्थापत्याचे आगळेपण दाखवणारी

मशिद बांधायला हवी होती, असे म्हणतात. माझ्या मित्रांना या बाबतीत विचारता ते म्हणाले, "शेख अब्दुल्ला यांना जेव्हा मी हे मत सांगितलं तेव्हा ते म्हणाले, 'मशिदीचं बांधकाम हाती घेण्यापूर्वी विचारवंतांनी आणि स्थापत्यविशारदांनी यासंबंधी आपापल्या कल्पना सांगाव्यात, असं आवाहन मी केलं होतं. पण त्या वेळी काश्मिरी स्थापत्याची कल्पना कुणी पुढे मांडली नाही. चूक आमचीच आहे."

या ठिकाणी काश्मिरी स्थापत्याचा वेगळेपणा कोणता, याचे थोडक्यात विवरण करणे उचित होईल. काश्मिरमधील मशिदींवर गोल घुमटाऐवजी मंदिरा-सारखे कळस असतात. त्यामुळे दुरून या मशिदी मंदिरासारख्याच दिसतात. बहुधा बौद्ध धर्माचा व स्थापत्याचा हा प्रभाव असावा, असे म्हणतात. तशी ही गोष्ट अगदी क्षुल्लक दिसते. परंतु काश्मिरी मुसलमानाला आपण भारतीय उपखंडातल्या इतर (भारतीय, पाकिस्तानी व बांगलादेशी) मुसलमानांपासून अगदी वेगळे आहोत असे का वाटते, त्याच्या अनेक कारणांपैकी स्थापत्यातले हे वेगळेपण हेही एक कारण असू शकते. काश्मिरबाहेरच्या, बिगरकाश्मिरी लोकांपासून आपल्या अस्मितेचे रक्षण करण्याचा प्रयत्न काश्मिरी लोक सतत करीत आले आहेत असे दिसते. येथील मूळचे नाग लोक व नंतर आलेले आर्य यांच्यांतले करार 'नीलमत-दर्पण' या ग्रंथात आहे. त्यातूनही हीच भूमिका स्पष्ट होते. हे नाग लोक झऱ्याच्या काठी रहात असत. त्यावरून नाग म्हणजे झरा हा नवाच अर्थ रूढ झाला. नागांना सुरक्षित वाटावे, म्हणून आर्यांनी त्यांचे झरे पवित्र मानले. आजही या झऱ्यांतील मासे हिंदू–मुसलमान खात नाहीत. तसेच हिंदूंच्या भावना दुखावू नयेत यासाठी काश्मिरी मुसलमान गोहत्या करीत नाहीत अथवा गोमांसही खात नाहीत. गोमांस न खाणारा मुसलमान बहुधा फक्त काश्मिरी मुसलमानच असावा. तेही त्याचे एक वेगळेपणच म्हटले पाहिजे. माझे मित्र मला सांगत होते, "आम्ही पूर्वी ज्या मोहल्ल्यात रहात होतो तिथं एका मुस्लिम संताचा उरूस तीन दिवस भरत असे. त्या तीन दिवसांत मोहल्ल्यातले सारे मुसलमान शाकाहारी रहात. काश्मिरी पंडित (ब्राह्मण) मांसाहारीच असल्यानं हिंदू–मुसलमानांच्या खानपानात तसा फरक आढळत नाही, आणि असल्या प्रसंगांनी आम्हाला शाकाहाराचीही कधी अडचण वाटत नाही!"

श्रीनगरपासून जवळच असलेल्या तुलामुला या गावी असलेले खीरभवानीचे देऊळ हे एक प्रेक्षणीय स्थान आहे. चिनार वृक्षांच्या गर्द सावलीत हे छोटेसे देऊळ एरवी तसे शांत असते. परंतु या खेपेला आम्ही तेथे गेलो तेव्हा (ज्येष्ठ शुद्ध नवमीस) तेथे जत्रा भरली होती. काश्मिरी पंडितांची कुटुंबे मंदिराभोवती असलेल्या फरशीवर चटया अंथरून मुक्काम ठोकून बसली होती. स्टोव्हवर त्यांचे स्वैपाक-पाणी चालू होते. काश्मिरी पंडिताच्या (काश्मिरमध्ये सारे हिंदू पंडितच असतात. त्यांच्यांत इतर जाती नाहीत) खानदानी स्त्रिया बाहेरच्या प्रवाशाच्या नजरेला

सहसा पडत नाहीत अगमेहेनतीची कामे मुसलमान स्त्रिया करीत असल्यामुळे त्याच आपल्याला जागोजागी दिसतात. या जत्रेत आबालवृद्ध काश्मिरी महिलांचे दर्शन घडले कावाडकष्ट करावे न लागल्याने त्यांचा रग अधिक गोरा होता चेहेऱ्यावर राकटपणाऐवजी मार्दव अधिक दिसत होते. त्यांच्याकडे पाहिल्यानतर त्यांच्यामध्ये शहरी–सुशिक्षित स्त्रियाऐवजी ग्रामीण–अल्पशिक्षित स्त्रियांचीच संख्या जास्त असावी असे दिसत होते ओल्या फरशीवर अनवाणी चालताना आमची पावले थडीने कुडकुडू लागली पण तेथे बसलेल्या भक्तगणावर थडीचा फारसा परिणाम झाल्याचे दिसत नव्हते अर्थात त्यांच्या दृष्टीने तो उन्हाळाच होता.

बांडीपुराजवळची वुलर सरोवराच्या काठची 'निशात बाग' एका खास कारणासाठी लक्षात राहिली (डल सरोवराकाठची प्रख्यात 'निशात बाग' वेगळी. बांडीपुराच्या या निशात बागेला 'निशात पार्क' म्हणतात.) या छोट्याशा बागेत एका झाडावर चार प्रकारची फळे येतील अशी किमया करण्यात आली आहे. म्हणजे एका झाडावर तीन इतर झाडांची कलमे केलेली आहेत आम्हाला बदाम, अक्रोड व सफरचद ही फळेही पहायला मिळाली. नाशपातीची नुसतीच फांदी होती. वस्तुत बदाम व अक्रोड यांची जात आणि सफरचद व नाशपाती याची जात यामध्ये खूपच फरक आहे परतु कलम–विज्ञानाने केलेली प्रगती या झाडाच्या रूपाने पहायला मिळाली

'चिनारच्या छायेत' हे माझे पुस्तक आपण वाचले असल्याचे, ते आपल्याला आवडल्याचे, एवढेच नव्हे तर इतरांना ते पुस्तक वाचण्याची शिफारस आपण करीत असल्याचे जेव्हा श्री० राजा पाटील यानी मला सांगितले, तेव्हा सोळा वर्षांपूर्वी आपण केलेल्या परिश्रमाचे चीज झाले असे मला वाटले अर्थात अक्षरश हजारो रुपये काश्मिरच्या सहलीत उडवणाऱ्या शौकिन लोकांपैकी एकानेही माझे पुस्तक वाचलेले नव्हते व वाचण्याची कोणाला फारशी उत्सुकताही नव्हती (मग विकत घेण्याचा प्रश्नच नको!) हे पाहिल्यानतर मराठी पुस्तकप्रकाशनाची अशी का दैना झाली आहे, याचे उत्तर सहज मिळाले ही अशी परिस्थिती असूनही आम्ही लेखक लिहीत रहाणार, प्रकाशक आमची पुस्तके प्रकाशित करीत रहाणार आणि रद्दीवाल्यांची चगळ होणार, हे दैवच बोलून चुकला आहे!

माझ्या पुस्तकाचा कोणी उपयोग करून घेतला नाही, याचे शल्य मनात सलत असतानाच सौ० राणी पाटील यांनी माझ्या उर्दू–ज्ञानाचा आपण उपयोग करून घेणार असल्याचे जेव्हा जाहीर केले तेव्हा मला बरे वाटले. 'निशात पार्क'–मध्ये दुपारचे जेवण आटोपल्यावर त्यानी आमच्या बसेस बारामूलाकडे वळवल्या. वस्तुत बारामूला म्हणजे वराहमूल जलमग्न काश्मिरभूमीला वर काढणाऱ्या वराहाचे स्मारक त्याचा मूल्लाशी काही सबध नाही म्हणजे काश्मिरची पावनखिड. पाकिस्तानी टोळीवाल्यांच्या टोळधाडीला काश्मिरी देशभक्तानी पहिली जोरदार

टक्कर या गावाजवळ दिली त्यामध्ये मकबूल शेरवानी हा वीर हुतात्मा झाला त्याचे एक स्मारक बारामूला गावात आहे एका दृष्टीने साऱ्या भारतवासीयानी ज्याचे दर्शन घेऊन पुनीत व्हावे, असे ते पवित्र, प्रेरणादायक स्थान. गावाबाहेर पाकिस्तानी लुटारूशी दोन हात करताना धारातीर्थी पडलेले कॅप्टन राय व त्याची तुकडी यांची दोन स्मारके आहेत त्यानाही प्रत्येकाने आदरांजली वाहणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे परंतु केवळ चैनबाजीसाठी काश्मिरला जाणारी मंडळी तिकडे फिरकत-देखील नाहीत. काश्मिर–दर्शन सहलीत त्यांचा समावेश नसल्याने खुद्द आम्हालाही गेल्या खेपेस ती स्मारके पहाता आली नव्हती ' राजा ट्रॅव्हल्स मात्र आपल्या प्रत्यक प्रवाशाला त्या पावनखिंडीचे व तेथील स्मारकांचे दर्शन घडवून आणतात, याबद्दल देशप्रेमी भारतीयानी त्याचे ऋणी बनले पाहिजे दुर्दैवाची गोष्ट अशी की, हुतात्मा मकबूल शेरवानी याचा खुद्द काश्मिरी लोकांनाच विसर पडला आहे. गेल्या तीस वर्षांत त्याचे एखादे भव्य स्मारक उभारावे असे कोणाला वाटले नाही ! आज जे स्मारक आहे ते पाहिले की आपल्या कृतघ्नपणाची शिसारी येते रस्त्याच्या कडेला भर बाजारात सुमारे दोनअडीच फूट उंचीच्या एका काळ्या दगडावर उर्दूत लिहिलेला, सहजासहजी वाचता न येणारा एक लेख बस्स, हेच त्या हुतात्म्याचे स्मारक ! जगातल्या कोणत्याही स्वाभिमानी जनतेने आपल्या आदरणीय नेत्याचा असा अपमान केला नसेल ! शेजारून उघडे गटार वाहात आहे. आजू बाजूला चिखल, कचरा, घोंघावणाऱ्या माश्या .शिलालेखापर्यंत पोचण्यासाठी केवढी कसरत करावी लागली !

सौ० राणी पाटील मला म्हणाल्या, "या शिलालेखावरचा मजकूर आम्हाला वाचता येत नाही म्हणून आम्ही इथल्या कुणाला तरी तो वाचून दाखवायची विनती करतो परतु या लोकांना लेखातल्या उदात्ततेच वावड असल्यान ते बराचसा मजकूर गाळूनच वाचून दाखवतात आज तुम्ही आम्हाला संपूर्ण मजकूर वाचून दाखवा " शेरवानीने पाकिस्तानी लुटारूना खबीरपणे अडवले त्यानी त्याच्या निष्पाप हृदयावर अनेक गोळ्या झाडल्या. तो मरताना ' अल्ला हो अकबर. .शेरे काश्मिर झिंदाबाद. हिंदू–मुस्लिम-सिक्ख इत्तेहाद (ऐक्य) झिंदाबाद '—अशा घोषणा देत होता अशा अर्थाचा तो मजकूर आहे पाकिस्तान्याच्या क्रूरतेचा व हिंदू–मुस्लिम–ऐक्याचा उल्लेख काश्मिरी लोकाना अजूनही आवडत नाही असे दिसते !

ते कसेही असले तरी काश्मिरचे भारतातील विलीनीकरण ही दगडावरची रेघ आहे असे मानणाऱ्या आणि मरताना ज्याने आपल्या नावाचा जयघोष केला त्याच्या ऋणातून मुक्त होण्याची जबाबदारी ज्याच्यावर आहे त्या शेख अब्दुल्लानी तरी आपल्या मित्राचे वीरोचित स्मारक उभारायला हवे होते, असा विचार मनात आल्याशिवाय रहात नाही पण आता हवे आहेत कोणाला हुतात्मा आणि क्रांति-वीर ? आता राज्य आहे भ्रष्टाचाराचे !... मनाला खिन्न करणारे हे विचार

डोक्यात घेऊनच मी बसमध्ये बसलो, आणि आपल्या विचारांना गदगदा हलवून सोडणारे हे दृश्य दाखवल्याबद्दल मी 'राजा ट्रॅव्हल्स'चे पुन्हा एकदा मनःपूर्वक आभार मानले

तसे पाहिल्यास खिलनमर्ग हे काश्मिरला जाणाऱ्या सर्वसामान्य प्रवाशाच्या दृष्टीने सर्वात उंच ठिकाण (उंची सुमारे १० हजार फूट) परंतु तेथे पहाण्या-सारखे काही नाही बर्फावरचे घसरगुंडीसारखे खेळ करून झाले की प्रवासी उलट-पावली परत फिरतात त्या मानाने सोनमर्ग किंवा सोनामर्ग (सोनेरी कुरण) हे थोडे कमी उंचीवर (२७४५ मीटर किंवा सुमारे ८ हजार फूट) असले तरी खऱ्या अर्थाने कुरण आहे सर्वत्र हिरवळीचा गालिचा पसरलेला आणि त्यावर रंगीबेरंगी फुलांची नक्षी श्रीनगरहून ५२ मैल जायचे आणि परत यायचे त्यातच संपूर्ण दिवस जातो म्हणून गेल्या खेपेला आम्ही सोनमर्ग वगळले होते त्याच्या वाटेवर इतर काही प्रेक्षणीय स्थळे नसल्याने तिकडे जाणारे लोक तसे कमीच परंतु ज्यांच्याजवळ भरपूर वेळ असेल त्यांनी या स्थळाला अवश्य भेट दिली पाहिजे

वाटेत जाताना काश्मिरी सिंधूचे खळखळणारे पात्र दूरपर्यंत सोबत करते काही ठिकाणी सिंधूच्या पैलतीरावर बर्फ शिल्लक असल्याचे दिसले खुद्द सोन-मर्गला गाव वगैरे नाही दुकाने, हॉटेले वगैरे आहेत परंतु तेथील मंडळीही सूर्यास्ता-पूर्वीच तिथून बाहेर पडतात कारण रात्री फार कडाक्याची थंडी पडते लडाखला जाण्याचा रस्ता इथून जात असल्याने तसे हे अगदी कोपऱ्यात पडले असले तरी रहदारी आहे आम्ही दुपारी १२ वाजता तेथे जाऊन पोचलो, तेव्हा हवा मोठी उबदार होती सभोवताली उंचउंच डोंगर, त्यांच्या घळीतून साचलेले बर्फ (ग्लेशि-यर अथवा हिमनदी) आणि मधोमध प्रशस्त कुरणाचे पठार आम्ही गरमागरम जेवण उरकून थोडे सुस्तावलो एवढ्यातच काही उत्साही तरुण मंडळी डोंगरावर जाऊन बर्फाचे गोळेही घेऊन आली त्यांनी आपल्याबरोबर कागदासारख्या झाडाच्या सालीही आणल्या होत्या त्या गमतीदार वाटल्या एव्हाना दोन वाजून गेले होते हळूहळू थंडीचा कडाका एवढा वाढला की केव्हा एकदा तिथून पळ काढतो असे होऊन गेले अडीच वाजता आम्ही सोनमर्गचा निरोप घेतला, त्या वेळी संध्याकाळचे सहा वाजले असावेत असा भास होत होता एखादी जत्रा संपल्यावर त्या स्थानाला जसे स्वरूप प्राप्त होते तसे सोनमर्ग दिसत होते आपल्या खिशाचा भार हलका करण्यासाठीच काश्मिरला जाणाऱ्या काही आबटशौकिनांनी श्रीनगरला तयार होणाऱ्या साड्या, शाली वगैरे माल सोनमर्गच्या दुकानातून खरेदी केला, आणि श्रीनगरपेक्षा तो स्वस्त असल्याचे समाधान मानून घेतले

गेल्या खेपेला झेलम नदीतून शिकाऱ्यात बसून जलविहार केला होता त्या वेळी मी म्हणालो होतो, "चांदण्यातल्या जलविहारामध्ये आपल्या शेजारी आपली प्रेयसी — आमच्यासारख्यांच्या बाबतीत धर्मपत्नी— नसेल तर तो व्यर्थच !" या

खेपेला धर्मपत्नी बरोबर होती पण आमच्या कंपनीने जलविहाराचा कार्यक्रम भर दिवसा आखला होता. म्हणजे चांदण्या रात्रीची गंमत पुन्हा हुकलीच ! या खेपेला 'डल व नगिन' या सरोवरांतून आमचा शिकारा फिरला सकाळी आठपासून दुपारी एकपर्यंतच्या या जलविहाराशाठी प्रत्येक शिकारवाल्याला (दोन माणसांसाठी) २० रुपये मिळाले. आमच्या शिकाऱ्याचे नाव 'डॉन' (प्रभात) असे होते मला वाटले, ते 'इव्हिनिंग' (संध्या) असते तर अगदी चपखल शोभले असते. इंग्रजीचा 'मोह अडाणी नाववाल्यांनाही जबरदस्त आहे एका शिकाऱ्यावर झोकदार अक्षरात लिहिले होते 'UNIONIZZTRNGTH' प्रथम मला काहीच समजले नाही पण थोडा वेळ धडपड केल्यावर उलगडा झाला ते वाक्य होते 'union is strength' त्यातील 'S' हा उलटा म्हणजे 'Z' सारखा लिहिला होता strength 'मधील 'E' गायब होतो, आणि वाक्यातील शब्द उर्दूसारखे एकमेकात गुंफून टाकले होते

दिवसा जलविहार करण्यातला एक लाभ म्हणजे आजूबाजूचे दृश्य पहाता येते. आम्ही ते इतके मनमुराद पाहिले की शेवटी-शेवटी डोळे कटाळले प्रथम आम्ही 'चार चिनार' या छोटेखानी बेटावर गेलो तिथे चार प्रचंड चिनार वृक्षांची रचना अशी करण्यात आली आहे, की प्रत्यक्ष त्या बेटावर गेल्यानंतरच ते चार वृक्ष असल्याचे बघायला मिळते दुरून पाहिल्यास ते दोन किंवा तीन असल्याचा भास होतो. या बेटावरील तळहाताएवढे नाना रंगांचे टपोरे गुलाब हे खरे आक- [illegible] बौद्धकालीन गुंफा दिसतात तेथे दारा शुकोहने स्थापन

केलेले फलज्योतिषशास्त्राचे विद्यालय होते [illegible]
म्हणतात काश्मिरचे भूतपूर्व राजे श्री करणसिंग यांचा राजवाडा व 'ओबेरॉय पॅलेस हॉटेल' यांच्या रुबाबदार इमारतीही स्पष्ट दिसतात 'ओबेरॉय पॅलेस' हे येथील पंचतारांकित हॉटेल श्री० करणसिंगांनी आपल्या राजवाड्यात काढलेले हे हॉटेल त्यांना चालवता न आल्यामुळे त्यांनी ते ओबेरॉय यांना चालवायला दिले मात्र त्यात 'पॅलेस' हा शब्द ठेवण्याची त्यांनी अट घातली आता ते हॉटेल झकास चालले आहे असे म्हणतात.

डल आणि नगिन ही सरोवरे तशी जोडलेलीच आहेत फरक एवढाच की, डल हे उथळ व गलिच्छ असून नगिन हे खोल व स्वच्छ आहे तळ्यातले गाळयुक्त शेवाळ काढणारे काही लोक वाटेत भेटले आपल्या नौका घेऊन ते फिरत होते त्याचे अवजार म्हणजे एक भलामोठा, लांबलचक बांबू तो तळ्यात खुपसायचा आणि गोलगोल फिरवायचा तळाचे शेवाळ त्याच्या टोकाशी गुंडाळले जाते मग बांबू वर काढायचा, आणि ते शेवाळ नौकेवर ठेवून बांबू उलट्या दिशेने फिरवून मोकळा करायचा या शेवाळाचा उपयोग तरंगती शेते तयार करण्यासाठी केला जातो 'नगिन' सरोवरात कायम नांगरलेल्या बऱ्याच बोटी असून त्यावर हॉटेले आहेत. अशाच एका हॉटेलात आम्ही तासभर मुक्काम केला, आणि सर्फ रायडिंग

पाहिले यांत्रिक बोटीच्या (लाँचच्या) मागे एका लाकडी चौकटीवर सर्फ रायडर नौकेला बांधलेल्या दोऱ्या घट्ट पकडून तोल सांभाळीत उभा रहातो मग लाँच वेगाने धावू लागते त्या वेळी सर्फ रायडर आपला तोल सावरण्यासाठी जे कौशल्य दाखवतो ते प्रेक्षणीय असते अशा एका लाँचमधून आम्ही एक चक्कर मारून आलो काही मंडळींनी त्या स्फटिकवत पाण्यात पोहण्याची हौसही भागवून घेतली

तेथून आम्ही नेहरू पार्कात एकत्र जमलो परस्परपरिचयाचा मजेदार कार्यक्रम येथे पार पडला. डॉक्टर, वकील, अध्यापक, प्राध्यापक, व्यावसायिक वगैरे मंडळींचाच भरणा विशेष असल्याचे दिसून आले

काश्मिरमध्ये होणारी गिऱ्हाइकाची फसवणूक पाहून सोळा वर्षांपूर्वीही मन विषण्ण झाले होते या खेपेला ती विषण्णता अधिकच वाढली धार्मिक लोकांच्या यात्रा–जत्रा व खुशालचेंडूंच्या शौक–यात्रा अर्थात पर्यटने, ही फसवण्याची व फसवून घेण्याचीच ठिकाणे असतात कारण त्याच भावनेवर त्यांची उभारणी झालेली असते परंतु त्याला काही नैतिक, सांस्कृतिक मर्यादा असावी अशी सर्वांचीच अपेक्षा असते. काश्मिरमध्ये फसवून घेणारा अधिक बेहोष असल्याने फसवणाऱ्याचे विशेष फावते, आणि तो अधिक निगरगट्ट बनतो असे दिसते

वानगीदाखल अक्रोडखरेदीचे उदाहरण सांगता येईल आमच्या 'बूलवर्ड' हॉटेल'पासून जवळच कोपऱ्यावर [illegible] एक दुकान आहे त्याचे वैशिष्ट्य असे की, प्रत्यक्ष मालापर्यंत गिऱ्हाइकाचा हात पोचत नाही इतक्या उंचावर ते आहे त्यामुळे आपल्याला कोणता माल दुकानदाराने दाखवला, आणि प्रत्यक्षात कोणता माल दिला या बाबतीत दिवसाउजेडी आपण अंधारात रहातो मी दुकानदाराला कागदी अक्रोडाचा भाव विचारला कागदी म्हणजे पातळ सालीचे, सहज बोटात दाबून फोडता येण्यासारखे अक्रोडाप्रमाणे बदामही कागदी असतात परंतु खरे कागदी अक्रोड अथवा बदाम आपल्याला क्वचितच मिळतात कागदी म्हणून दाखवलेला नमुन्याचा अक्रोड अथवा बदाम तेवढा कागदी असतो पण प्रत्यक्षात आपल्या पिशवीत पडतो तो साधा, बिनकागदी अक्रोड किंवा बदामच ! आपल्या ब्रीदाला अनुसरून त्या दुकानदाराने मला फसवले पण हॉटेलवर येऊन पिशवीतून अक्रोड काढल्यावरच ती फसवणूक माझ्या ध्यानात आली परंतु भावाच्या बाबतीतील फसवणूक मात्र तेथेच लक्षात आली आमच्यापैकी एका गृहस्थांनी आदल्याच दिवशी आठ रुपये किलो भावाने त्याच दुकानातून अक्रोड घेतले होते योगायोगाने ते गृहस्थ मी अक्रोड घेताना मजजवळ उभे होते दुकानदाराला जेव्हा मी ते सांगितले, तेव्हा तो म्हणाला, "कालचा माल काल संपला आजचा माल चढ्या भावातला आहे. आजचा भाव नऊ रुपये " परंतु मी तिथून गेल्यावर त्याच गृहस्थांना

त्याने आठ रुपये भावाने अक्रोड दिले वस्तुत ते अक्रोड होते सहा रुपये भावाचे कारण त्या भावात सरकारनियंत्रित बाजारात ते मिळत असल्याचे दुसऱ्या दिवशी समजले, आणि तेच अक्रोड पहलगामला आम्ही साडेपाच रुपये किलो या भावाने विकत घेतले

अशी फसवणूक काश्मिरमध्ये सगळीकडेच होते काश्मिरच्या सरकारी एम्पो-रियममध्ये सौभाग्यवतीने विलो (बेंद) या वेतासारख्या लाकडी कामटयाची एक करडी १८ रुपयाना विकत घेतली तेथून बाहेर पडल्यावर सहज चौकशी केली, तेव्हा तसलीच करडी बाहेर ६ रुपयाला मिळते असे आढळून आले केशर तर काश्मिरमध्ये १० रुपयांपासून ८० रुपये तोळ्यापर्यंत वेगवेगळ्या किमतीला विकत मिळते त्यामुळे सर्वसामान्य खरेदीदार तेथे अगदी चक्रावून जातो श्री० राजा पाटील यांना मी विचारले, “ इतक्या वर्षांच्या अनुभवानंतर तुम्ही खात्रीशीर दुकानदार का मिळवून देऊ शकत नाही ?” ते म्हणाले, “इथ कुणाचीच खात्री देता येत नाही म्हणून आम्ही ती जबाबदारी घेत नाही ”

३० मे हा दिवस अश्वारोहण, गाराचा पाऊस व बर्फावरील घसरगुंडी या रोमांचकारक घटनानी चांगला स्मरणात राहिला. श्रीनगरहून टगमर्ग ४५ कि मी , तेथून गुलमर्ग ६ किलोमीटर व तेथून खिलनमर्ग ५ किलोमीटर खिलनमर्ग हे १० हजार फूट उंचीवर असल्याने तेथे रहाण्याची सोय नाही सोनमर्गप्रमाणेच दिवजाउजेडी तेथून परत गुलमर्गला यावे लागते सोनमर्गला हिरवळीचा मखमली गालिचा तरी आहे खिलनमर्गला तेही दृष्टिसुख नाही तेथे जायचे ते मुख्यत बर्फावरील घसरगुंडीचे खेळ खेळण्यासाठी

सोळा वर्षांपूर्वी टगमर्गपर्यंतच मोटाररस्ता होता तेथून खिलनमर्गपर्यंत घोडयावरून जावे लागे घोडयाचा सरकारी दर त्या वेळी ७–५० रुपये होता परतु आम्ही बिगरमोसमात गेल्यामुळे घोडेवाल्याना गिऱ्हाईकच नव्हते. त्यामुळे जातायेता १६ मैलांचे अतर फक्त पाच रुपयात आमचे ओझे वाहून न्यायला घोडे-वाले तयार झाले आता गुलमर्गपर्यंत मोटार जाते तेथून खिलनमर्गपर्यंत सुमारे चार मैल अतर जाऊन यायला घोडयाचा सरकारी दर त्याच्या आकारमानाप्रमाणे १२ ते १५ रुपये आहे मे महिना हा ऐन मोसमाचा काळ गिऱ्हाईक भरपूर त्यामुळे घोडेवाले मनाला येईल ती रक्कम सागतात— पचवीस, तीस, चाळीस वगैरे ! परतु ‘ राजा ट्रॅव्हल्स’ने आम्हाला टोकन्स दिली होती मिळेल त्या घोडया-वर बसायचे, आणि परत आल्यावर त्याला कपनीचे टोकन द्यायचे घोडेवाल्याने कपनीकडून आपले भाडे घ्यायचे ते त्याला सरकारी दराप्रमाणे दिले जाते अर्थात हे घोडेवाले इतके चिकट व बनेल असतात, की तुमच्याकडून भाडयाव्यतिरिक्त दोन–चार रुपये बक्षिसी उपटल्याशिवाय तुम्हाला सोडतच नाहीत तरी पण एकूण महागाईचा विचार करता घोडेवाल्यांच्या प्राप्तीत फार वाढ झाली आहे असे

म्हणता येत नाही सोळा वर्षांपूर्वी असलेल्या त्यांच्या दारिद्र्यात भरच पडली असल्याचे दिसून आले त्याचे दैन्य बघवत नाही आणि त्याची लबाडी या दैन्या-पोटीच उत्पन्न झाली असल्याचे लक्षात आल्यावर त्यांचा राग येण्याऐवजी कीवच येते काश्मिर-सरकारने या घोडेवाल्यासाठी दुसरे काही केले नाही, तरी खिलनमर्ग-पर्यंत घोड्यावरून जाता येईल अशी त्यातल्या त्यात बरी वाट तरी तयार करण्यास हरकत नसावी

सौभाग्यवतीची अशक्त प्रकृती व गुडघेदुखी यामुळे ती अश्वारोहणाच्या कार्यक्रमात सहभागी होणार नाही, अशी सर्वांचीच कल्पना होती. परंतु समोर घोडी पहाताच तिच्यातील सरदेसायांचे खानदानी क्षात्रतेज एकदम उफाळून वर आले, आणि तिने रोपवेऐवजी घोड्यावरून जाण्याचाच निर्णय घेतला तिच्या मदतीसाठी १२ रुपये देऊन एक मदतगार (हेल्पर) घेण्यात आला आश्चर्याची गोष्ट अशी की, ती एकदाही घोड्यावरून खाली न पडता शेवटपर्यंत जाऊन सहीसलामत परत आली अचानक झालेला गाराचा वर्षाव तिने धैर्याने सहन केला एवढेच नव्हे, तर कंबर अथवा पाठ दुखत असल्याची तक्रारही नंतर तिने केली नाही आपल्या क्षत्रियत्वाची तिने नक्कीच लाज राखली

काश्मिरमध्ये माणसे, राजकारण व हवामान ही नेहेमीच बेभरवशी असतात असे म्हणतात माणसांची अविश्वसनीयता आम्ही काश्मिरमध्ये पाऊल टाकल्या-पासूनच अनुभवीत होतो राजकारणाचा बेभरवसेपणा नंतरच्या निवडणुकांनी प्रत्ययास आणून दिला हवामानाचा लहरीपणा खिलनमर्गच्या प्रवासात अद्दल घडवणारा ठरला आम्ही गुलमर्गला सकाळी १०–३० च्या सुमारास पोचलो या वेळी हवामान फार छान होते किंबहुना उकडू लागले होते म्हणून बर्फावर खेळण्यासाठी लागणारे भाड्याचे बूट, मोजे, ओव्हरकोट वगैरे सामान आम्ही घेतले नाही त्याबद्दल नंतर आम्हाला पस्तावावे लागले

श्री० राजाभाऊ पाटील सर्वांना सांगत होते घोडेवाल्याशी दराची घासा-घीस करीत बसू नका मिळेल तो घोडा घ्या आणि रपेट सुरू करा '' परंतु आज गिऱ्हाईक फार होते त्यामुळे घोडेवाले सहजासहजी तयार होत नव्हते राजा कंपनी कडून सरकारी दराने पैसे मिळणार हे माहीत असल्याने दुसरे गिऱ्हाईक मिळ-वायची धडपड घोडेवाले करीत होते त्यांच्या या प्रयत्नाला त्यांचे घोडेही प्रयत्न करीत होते त्याचा अनुभव मला स्वतःलाच आला एका घोड्यावर मी बसलो परंतु दहापाच पावले गेल्यावर तो अडला पुढे जाईचना घोडेवाला म्हणाला, ' साहेब, घोडा जात नाही पुढ मी काय करू ? मी ओळखले की, घोड्याच्या नव्हे, तर घोडेवाल्याच्या मनात काहीतरी काळेबेरे आले आहे पण त्याच्याशी भांडण्यात अर्थ नव्हता म्हणून दुसरा घोडा घेऊन मी निघालो

निम्म्या वाटेपर्यंत हवामान ठीक होते अलिकडे जवळजवळ रोज सध्याकाळी

या भागात पावसाची एखादी जोरदार सर येऊन जाते असे समजले त्यामुळे डोंगरातील त्या पायवाटेत चिखल झाला होता तरी पण घोडे जबरदस्त आत्मविश्वासाने, धीमी चाल ठेवून, डोंगर चढत होते दुपारचे बारा वाजल्यानंतर लहरी प्रणयिनीप्रमाणे हवा बिथरली काळेभोर ढग आकाशात गर्दी करू लागले अधून–मधून पावसाचे थेंब आमच्या चेहेऱ्यांवरील घामाच्या थेंबाशी चुंबाचुंबी करू लागले तरी पण खिलनमर्गवरील बर्फाच्या ठिकाणापर्यंत आम्ही जाऊन पोचलो डोंगरदऱ्यातून वाहाणाऱ्या हिमनदीचा तो ओघळ होता काही मंडळी स्लेज (बर्फावरून घसरत जाण्याची बिनचाकाची गाडी)वरून घसरगुंडीचा खेळ खेळत होती आम्ही थोडा वेळ बर्फाचे गोळे तयार केले व एकदोनदा आपटच्या खाल्ल्या, एवढ्यात जोराचा पाऊस सुरू झाला

जवळपास सुरक्षितपणे उभं रहाता येईल असा निवारा नव्हता, म्हणून आल्या वाटेने परत निघालो. सुदैवाने ही वाट देवदारांच्या बनातून जाते त्यामुळे मोठेसे झाड पाहून त्याच्या आडोशाला उभे राहिलो हा पाऊस साधासुधा नव्हता. टपोऱ्या गाराचा होता घोड्याचा लगाम धरलेल्या हातावर, तोंडावर सपासप गारा आपटत होत्या हात हुळहुळे झाले, चेहेरा बधिर झाला सभोवताली गारांचा इतका सडा पडला की सारा डोंगर पाढऱ्याशुभ्र बर्फाने झाकून गेल्यासारखा दिसू लागला थंडीने कुडकुडत असताही ते दृश्य पाहून गमत वाटत होती पावसाचा—विशेषत गारांचा जोर थोडा कमी होताच आम्ही पुढे निघालो आपली जर ही स्थिती, तर सौभाग्यवतीची काय दशा झाली असेल या कल्पनेने मी तिच्याकडे पहाण्याचे टाळीत होतो पण तिचे नशीब बलवत्तर ती ज्या झाडाखाली थाबली होती तिथे तसल्या पावसातही कोणीतरी शेकोटी पेटवली होती, आणि त्या शेकोटीजवळ उभी राहून सौभाग्यवती आपले गारठलेले हातपाय शेकत होती ते दृश्य पाहून मला बरे वाटले चुकून आपला दगड लागलेला पक्षी खाली पडताना पाहून मन खिन्न व्हावे, आणि लगेच दुसऱ्या क्षणी तो उडून जाताना पाहून आपल्या मनावरचे ओझे उतरावे, तशी काहीशी माझी मन स्थिती होती या वर्षास्नानाची काही पूर्वकल्पना नसल्याने आम्ही जादा कपडे आणले नव्हते त्यामुळे हॉटेलमध्ये परत जाईपर्यंत ते ओले कपडेच अगावर वागवावे लागले ' सुदैवाने सर्दी झाली नाही.

स्वातंत्र्योत्तर काळात गरीब आणि श्रीमत यांच्यातील दरी दिवसेंदिवस कशी वाढत गेली आहे, गरीब जास्त गरीब व श्रीमत जास्त श्रीमत कसे होत गेले आहेत, हे ठसठशीतपणे दाखवून देणारे राज्य म्हणजे काश्मिर. श्रीनगरसारख्या शहरात वैभव आणि विलास याच्या प्रमाणात बेसुमार वाढ झाली आहे, तर शेतकरी व मजूर याचे दैन्य पराकोटीला जाऊन पोचले आहे, खेड्यातून जाताना शेतकऱ्याच्या अंगावरील मळक्या चिंध्या, पडकी घरे, मरतुकडी जनावरे आणि रोगट माणसे ग्रामीण

दारिद्र्याचे दर्शन घडवतात, तर शहरातील मजुराचे दैन्य त्यांच्या चेहेऱ्यावरून ओसंडत असते

२१ मे रोजी आम्ही ओरिएटल कार्पेट फॅक्टरी पाहिली त्या कारखान्यात दोन हजार रुपयापासून एक लाख रुपयांपर्यंत किंमत असलेले गालिचे तयार होतात हे गालिचे विणण्याचे काम करणारी खास कुटुंबे असून, ती शतकानुशतके वंशपरंपरेने ते काम करीत आली आहेत एक-एक गालिचा तयार करायचा म्हणजे त्याला कित्येक महिने, कित्येक वर्षे लागतात एका गालिच्यावर एक संबंध कुटुंब राबते—ऐंशी वर्षांच्या आजोबांपासून आठ वर्षांच्या नातवंडापर्यंत त्यांच्या अंगावरील फाटके कपडे पाहिले की त्यांच्या पिळणुकीची कल्पना येते कारखाना पहायला येणाऱ्या पर्यटकांकडे मागावर काम करणारी मुले जेव्हा केविलवाण्या स्वरात भीक मागतात तेव्हा कामगारालाही भीक मागावयास लावणाऱ्या त्या व्यवसायाच्या अनैतिकतेबद्दल खात्री पटते प्रत्येक कुटुंब एकेक गालिचा खडून घेते त्यामुळे तेथे काम करणाऱ्याला किती मजुरी मिळत असेल ते सागता येत नाही वस्तुत' गालिच्यामध्ये कच्च्या मालापेक्षा मजुरीच अधिक असली पाहिजे परंतु प्रत्यक्षात मात्र त्यात रक्कम गुंतवणाऱ्याचा फायदाच प्रमाणाबाहेर असल्याचे दिसून येते या विणकराच्या बायका-मुली घरी राहून लोकरीवरील कशिदाकारी करतात, आणि अशा प्रकारे त्या कुटुंबाला अर्धपोटी का होईना, जगण्यास मदत करतात काश्मिरमध्ये अधिकारावर येणारे प्रत्येक सरकार गरीबाच्या कल्याणाची हमी देत असते, परंतु शेतकरी, शेतमजूर, हमाल, घोडेवाले, विणकर यापैकी कोणाचीच स्थिती गेल्या तीस वर्षांत सुधारलेली नाही, किंबहुना ती अधिकाधिक बिघडतच चालली आहे, हे पाहिले की मन विषण्ण होते, आणि गालिच्यावर लोळण्याच्या अथवा जिवाचे काश्मिर करण्याच्या आनंदावर विरजण पडते

१ जून हा दिवस मुख्यत पहलगामसाठी राखून ठेवलेला होता जाताना कोकरनाग, अच्छाबल व मट्टन (मार्तंड) याना धावत्या भेटी दिल्या कोकरनाग हा स्फटिकवत् निर्मळ व थंड पाण्याचा झरा त्याच्या सभोवतालच्या दाट झाडीमुळे लक्षात राहिला, तर अच्छाबलचा झरा तेथील गेंदेदार गुलाबाच्या फुलांमुळे संस्मरणीय ठरला अच्छाबलचे पाणी उन्हाळ्यात थंड व हिवाळ्यात कोमट असते, असे म्हणतात त्याचे हे रहस्य शोधून काढण्यासाठी एका साहेबाने या झऱ्याच्या मुखापाशी खोदून पाहिले त्याला तेथे एक पणती तेवत असलेली आढळली तिला तेल कुठून मिळत होते, वात कशी टिकली वगैरे गोष्टींचा उलगडा त्या साहेबालाही झाला नाही मात्र त्या गडबडीत ती पणती विझून गेली, अशी दंतकथा ऐकायला मिळाली मट्टनच्या सूर्यमंदिरातील सूर्याची मूर्ती जयपुरी शुभ्र संगमरवराची आहे. ती अगदी अलिकडची आहे मूळ मार्तंडमंदिर जरा आडबाजूला असून ते भग्नावस्थेत आहे तिकडे सहसा कोणी जात नाही.

पहलगाम हे थंड हवेचे (उंची २१३० मीटर, ७ हजार फूट) ठिकाण श्रीनगरहून अमरनाथला जाण्याच्या मार्गावर ६० मैलांवर (९६ कि मी) आहे दोन्ही बाजूंना उंच व हिरवेगार डोंगर आणि मधून खळखळ वाहणारी अल्लड लिदर नदी हे दृश्यच मोठे मनोहर आहे सामान्यत: येथील हवा खूप थंड असते परंतु आम्ही गेलो त्या दिवशी चांगलाच उकाडा होत होता त्यामुळे बरोबर नेलेल्या उबदार कपड्यांचे ओझे निष्कारण वागवावे लागले अर्थात लिदरचे पाणी मात्र बर्फासारखे थंडगार होते त्यात फार वेळ पाय सोडणे अशक्य असल्याचे आढळून आले पहलगामच्या रात्री फार आल्हाददायक असतात असे समजल्या-वरून काही मंडळींनी तेथे मुक्काम करण्याचे ठरवले परंतु बहुतेक सारी हॉटेले आधीच भरून गेली होती, आणि जेथे जागा मिळण्याची शक्यता होती तेथील भाडे फारच भरमसाट (रात्रभर केवळ झोपण्यासाठी सव्वाशे ते दीडशे रुपये) होते त्यामुळे त्याना तो बेत रहित करावा लागला थंड हवेच्या ठिकाणी हौशी प्रवाशांची होणारी गर्दी व तेथे ते करीत असलेला बेफाट खर्च पाहिल्यानंतर, या देशात खरोखरीच दारिद्र्य शिल्लक राहिले आहे काय, असा प्रश्न त्रयस्थाला पडल्याशिवाय रहात नसेल लिदरच्या काठाकाठाने वसलेली एक बाजारपेठ याव्यतिरिक्त पहलगामला पहाण्यासारखे दुसरे काही नाही सभोवतालचे दृश्य पाहून डोळे कंटाळले आणि आम्ही आमच्या गाड्या सुटण्याची प्रतीक्षा करीत तिथल्या प्रतीक्षालयात बसून राहिलो अक्रोड स्वस्त मिळाल्याने बहुतेकानी भरपूर खरेदी करून टाकली

विसरभोळ्या बायकांच्या नवऱ्याना प्रवासामध्ये वस्तू विसरणे, हरवणे, चोरीला जाणे यासारखी एखादी घटना घडली नाही तर चुकल्याचुकल्यासारखे होते कारण त्यामुळे बायकोवर खेकसण्याची संधीच मिळत नाही मलाही असेच होत होते इतक्यात कोकरनागला सौभाग्यवतीने अंगातील स्वेटर काढला, आणि माझे लक्ष तिच्या गळ्याकडे गेले त्या ठिकाणी मंगळसूत्रच नव्हते ! हे म्हणजे फारच झाले अस्मादिकांच्या अस्तित्वावरच घाला! खूप खोदाखोदी झाल्यावर, रात्री झोपताना काढून ठेवलेले मंगळसूत्र पुन्हा घालण्याचेच राहून गेले व अंगात स्वेटर असल्याने ते लक्षात न आल्याचे निष्पन्न झाले सुमारे तीन तोळ्याचा नग म्हणजे किमान दोन हजाराचा फटका मंगळसूत्र तुटण्याच्या, ओघळण्याच्या व हरवण्याच्या घटना अनेकदा घडल्या असल्यामुळे मंगळसूत्र या दागिन्याबद्दलच माझ्या मनात एक तिटकारा निर्माण झाला आहे अगदीच रहावत नसेल तर साध्या दोऱ्यात ओवलेले नुसत्या काळ्या मण्यांचे मंगळसूत्र बायकानी (निदान आमच्या सौभाग्य-वतीने) घालावे, असा माझा आग्रह पण सोन्या-मोत्यांचे दागिने करण्याचा व इतरांसमोर त्यांचे प्रदर्शन करण्याचा सोस मात्र कमी होत नाही हा सारा भडिमार सौभाग्यवतीने निमूटपणे सहन केला आणि मग हळूच ती मला म्हणाली, " हॉटेला-

तली वस्तू चोरीला जात नाही असं राणी सांगत होती !" मी धुसमुसत गप्प राहिलो. सबंध दिवसाच्या उत्साहावर पाणी पडले होते. अखेर सायंकाळी साडेसात वाजता हॉटेलातील खोलीत जाऊन पाहिले तर मंगळसूत्र गायब ! खोली स्वच्छ करण्यासाठी आम्ही खोलीची किल्ली काउंटरवर देऊन गेलो होतो. त्याप्रमाणे मिलापसिंगाने खोली झाडून ठेवली होती. पुन्हा काउंटरवर जाऊन, 'एखादी वस्तू सापडली आहे काय ?' असे मी विचारणार, इतक्यात शेजारी उभा असलेला मिलापसिंग म्हणाला, "झाडताना मला एक वस्तू सापडली आहे. ती मी कपाटात ठेवलीय." त्याला घेऊन वर येत होतो इतक्यात सौ० कुलकर्णी धावत आल्या आणि मंगळसूत्र सापडल्याची सुवार्ता त्यांनी दिली. जीव भांड्यात पडला. मात्र सौभाग्यवतीला ते मंगळसूत्र कपाटात न मिळता कॉटखाली पडलेले सापडले. पलंग झाडताना ते खाली पडले असावे. मिलापसिंगाला दुसरीच एखादी वस्तू सापडली असावी. परंतु नंतर त्या चौकशीच्या भानगडीत आम्ही पडलो नाही. मिलापसिंग हा हिमाचल प्रदेशातला नोकरीसाठी आलेला. काश्मिरी लोकांइतका अप्रामाणिकपणा आपल्या भागात नसल्याचे त्याने सांगितले होते. कसेही असो. पेल्यातले वादळ पेल्यातच शमले, एवढे खरे!

१९६१ साली मी काश्मिरला गेलो होतो तेव्हा तिथल्या स्थानिक लोकांमध्ये माझ्या परिचयाचे कोणी नव्हते. सामान्यत: भारतातल्या बहुतेक सर्व भाषांमध्ये माझ्या वैयक्तिक ओळखीचे कोणी ना कोणीतरी निघतेच. परंतु त्या वेळी काश्मिरी लेखकाशी माझी ओळख झाली नव्हती. त्यानंतर प्रा० पृथ्वीनाथ पुष्प आणि श्री० अख्तर मुहीउद्दीन यांच्याशी परिचय झाला. १९६३ साली हैदराबाद येथे भारतसरकारने आयोजित केलेल्या अखिल भारतीय लेखक-अनुवादक शिबिरात अख्तरसाहेबांशी चांगली दोस्ती झाली होती. त्या तीन आठवड्यांच्या काळात झालेल्या अनेक ओळखीचे दाट स्नेहात रूपान्तर झाले होते. परंतु नंतर इतका काळ लोटला, की त्या स्नेहाचे रूप पुसट होऊ लागले. अख्तरसाहेबांचा पत्ताही हरवला. काश्मिरला निघण्यापूर्वी प्रा० पुष्प यांना मी पत्र पाठवले होते, परंतु त्यांच्याकडून काही प्रतिसाद मिळाला नाही. त्या अर्थी त्यांना माझे पत्र मिळाले नसावे. दिल्लीला पंजाबीचे प्रख्यात कादंबरीकार श्री० गुरमुखसिंग जीत यांना अख्तरसाहेबांचा पत्ता विचारला, तेव्हा त्यांनी तो झटकन काढून दिला. कारण त्या दोघांची अलिकडेच भेट झाली होती.

श्रीनगरला पोचताच अख्तरसाहेबांना घरच्या व कचेरीच्या नंबरांवर फोन करण्याचा सपाटा सुरू केला. पण सारा मारा व्यर्थ गेला. कारण ते दोन्ही नंबर बदलले होते. साहित्यअकादमीचे पारितोषिक मिळवलेला पहिलाच काश्मिरी लेखक, अकादमीचा सभासद, सरकारी नोकरीतही बडा हुद्देदार. पण त्याचा फोन नंबर सांगणारा कोणी भेटेना. अखेर श्री० जीत यांनी दिलेल्या पत्त्यावर एक कार्ड

टाकले दुसऱ्याच दिवशी अख्तराचा फोन आला नतर त्याची कर्तबगार, गोरीपान मुले येऊन भेटली श्री० अख्तर यानी मला न विचारताच रेडियो काश्मिर'मध्ये माझी मुलाखतही निश्चित करून टाकली त्याप्रमाणे २ जूनला त्या मुलाखतीचे ध्वनिमुद्रणही झाले आकाशवाणी व रेडियो काश्मिर या दोन सस्था म्हटल्या तर वेगळ्या, म्हटल्या तर एक आहेत नावे स्वतत्र असली तरी सचलन दिल्लीहूनच होते केंद्रसचालक श्री० नैयर भले गृहस्थ वाटले तेरा मिनिटाच्या कार्यक्रमाला मोबदला काय द्यायचा ? श्री० नैयर म्हणाले, "तुम्ही ज्या केंद्राच्या कक्षेत रहाता त्या केंद्राकडून तुम्हाला जो मोबदला मिळतो तोच आम्ही दिला पाहिजे, असा नियम आहे तुमच पुणे केंद्र तुम्हाला पन्नास रुपये देत आम्हाला त्याहून जास्त देता येत नाही तो देण्यापूर्वीही पुण्याला विचारून खात्री करून घ्यावी लागेल हा नियम नसता तर तुमच्यासारख्याला आम्ही दहा मिनिटांसाठी पचाहत्तर–शभर रुपये सहज दिले असते " माझ्या दृष्टीने पैशाचा मुद्दा अगदीच गौण होता श्रीनगर केंद्रावरून अस्सल उर्दूमध्ये अख्तर मुहीउद्दीन यांच्यासारख्या प्रतिष्ठित साहित्यिकाबरोबर मोकळेपणाने गप्पा मारता आल्या याचाच खरा आनद होता महात्मा गाधींशी असलेला माझा सबध, उर्दूचा व इस्लामचा अभ्यास, काश्मिरप्रवास वगैरे विविध विषयावर अख्तरनी मला प्रश्न विचारून आपल्या श्रोत्याना माहिती मिळवून दिली

अख्तरसाहेब काश्मिरी भाषेचे ज्येष्ठ व श्रेष्ठ लेखक असल्याने आकाशवाणी व दूरचित्रवाणी या दोन्ही ठिकाणी त्यांचा दबदबा विशेष आहे त्यामुळे आकाशवाणीवरील कार्यक्रम सपवून जवळच असलेल्या दूरचित्रवाणीच्या आवारात आम्ही गेलो, तेव्हा साऱ्या कचेऱ्या बद झाल्या असल्या तरी कामासाठी मागे राहिलेल्या सचालकानी आम्हा दोघाचे प्रेमाने स्वागत केले, आणि उद्यापरवा टी०व्ही०वर कार्यक्रम करण्याचे आश्वासन दिले किंबहुना असा अलभ्य लाभ मिळवून दिल्याबद्दल त्यांनी अख्तरसाहेबाचे आभारच मानले

त्याप्रमाणे ३ जून रोजी सध्याकाळी श्रीनगरच्या रगीत दूरदर्शन-केंद्रावरून अस्मादिकाचे दर्शन काश्मिरवासीयाना घडले श्री० अख्तर मुहीउद्दीन यांनी आकाशवाणीवर जे प्रश्न विचारले होते, त्याच धर्तीचे प्रश्न दूरचित्रवाणीवरील मुलाखतीतही विचारले फरक एवढाच की, 'चिनारच्या छायेत' आणि 'वाळवटातील चद्रकोर' (अरबी मुलूखातील मुशाफिरी) ही माझी पुस्तके त्या मुलाखतीत दाखवण्यात आली मानधनाच्या बाबतीत आकाशवाणीसारखा काही नियम नसल्यामुळे मुलाखत सपल्यावर लागलीच १०० रुपयाचा चेक माझ्या हवाली करण्यात आला दूरदर्शनवरील माझा तो पहिलाच कार्यक्रम असल्याचे ऐकून टी व्ही चे श्री० जफर याना आश्चर्य वाटले माझे उर्दू लिखाण त्यानी वाचले असल्याने महाराष्ट्रात मला विशेष स्थान असावे अशी त्यांची समजूत होती "पहिलाच कार्यक्रम असून तुम्ही अगदी

सहजपणे, सफाईदारपणे बोलत होतात '' ते म्हणाले अख्तरसाहेबांनाही आश्चर्य वाटले ते म्हणाले, " पिकत तिथ विकत नाही, हेच खर !" या सदर्भात मला सऊदी अरबस्तानची उपराजधानी जद्दा येथील रेडिओवरून झालेल्या माझ्या उर्दू कार्यक्रमाचे स्मरण झाले मी म्हणालो, "मला त्याच काही वाटत नाही आपली कदर करणारी तुमच्यासारखी मडळी जगाच्या पाठीवर ठिकठिकाणी आहेत, यातच मला समाधान आहे हे भाग्य मराठीतल्या दुसऱ्या कोणत्या लेखकाच्या वाट्याला आल आहे ?"

दूरचित्रवाणीच्या या कार्यक्रमामुळे 'राजा ट्रॅव्हल्स'ने आखलेला 'शालिमार' बागेतला ध्वनिप्रकाशाचा कार्यक्रम मात्र हुकला कारण ज्या वेळी तो कार्यक्रम होता त्याच वेळी टी व्ही वर माझा कार्यक्रम होता माझा कार्यक्रम पाहिलेल्या काश्मिरी मडळीनी जेव्हा त्याना तो आवडल्याचे सांगितले व 'तुम्ही महाराष्ट्रीय असून इतकी छान उर्दू कशी बोलता ?' असे आश्चर्य व्यक्त केले, तेव्हा आपला दुसरा कार्यक्रम हुकल्याचे माझे दु:ख कुठल्या कुठे नाहीसे झाले

त्याच दिवशी 'शकराचार्य टेकडी'वर भर दुपारी जाण्याचा कार्यक्रम होता सुमारे एक हजार फूट उच असलेल्या त्या टेकडीवर चढताना गेल्या खेपेस पुष्कळच त्रास झाला होता त्यामुळे पुन्हा आता ती तसदी घ्यावी की नाही याचा विचार मनात येत होता परतु आता टेकडीच्या तीनचतुर्थांश टप्प्यापर्यंत बस जाते व थोडेच चढावे लागते, असे समजल्यावरून त्या कार्यक्रमात आनदाने सामील झालो उन्हाची वेळ असली तरी मद वारा वाहत असल्याने तेवढा डोंगर चढून जाण्यास मुळीच त्रास झाला नाही सौभाग्यवती मात्र बसच्या तळापर्यंतच येऊन थांबली. अर्थात टेकडीच्या शिखरावरून श्रीनगरचा जो परिसर पहायला मिळतो तोच खालच्या टप्प्यावरूनही दिसत असल्याने तिचे फारसे नुकसान झाले नाही

त्यानतर 'चश्माशाही', 'निशात' व 'शालिमार' या बागा पाहिल्या तिन्ही ठिकाणी पाणी नसल्याने सारा परिसर श्रीहीन भासत होता अलिकडे या बागात केवळ चैनीखातर वापरले जाणारे पाणी शेतीसाठी वापरले जाते असे समजले, तेव्हा बरे वाटले पाण्याचे कर्तव्य जीवनदान ते पार पाडण्यापायी आपले नेत्रसुख थोडे कमी झाले तरी त्याबद्दल माणसानी कुरकुर करू नये अर्थात हा समजसपणा सर्वां-मध्येच नसल्यामुळे अधूनमधून या बागांतली कारजी उडवावी लागतात

४ जून हा काश्मिरच्या मुक्कामातील शेवटचा दिवस गाठीभेटी आणि उरलीसुरली खरेदी यासाठी राखून ठेवलेला सकाळी 'राजा ट्रॅव्हल्स'च्या सर्व प्रवाशांचे स्नेहसम्मेलन 'नेडौस हॉटेल'च्या अलीशान दिवाणखान्यात झाले त्या सम्मेलनाचे अध्यक्षस्थान भूषवण्याची सधी मला देऊन माझा गौरव करण्यात आला. तसा मी या प्रवासात मागेमागेच रहात होतो परतु श्री० राजाभाऊनी माझी प्रवासवर्णने वाचली होती, आणि त्यात पुन्हा श्रीनगर आकाशवाणी व दूरचित्र-

वाणीवर माझे कार्यक्रम झाले होते यामुळे इतरांपेक्षा मीच या कामासाठी अधिक-उपयुक्त असल्याचे त्यांनी ठरवले असावे अर्थात याची मला काहीच कल्पना नव्हती मी इतराप्रमाणे प्रेक्षकात जाऊन बसलो होतो करमणुकीच्या कार्यक्रमात आपल्या एकदोन गमतीदार कविता म्हणून दाखवण्याची तयारी करून मी गेलो होतो समारभाचा अध्यक्ष झाल्यामुळे ती सधी मात्र हुकली गाणी, नृत्ये, भाषणे, फिश-पाँड वगैरे विविध कार्यक्रमानी चागले मनोरजन झाले फिशपाँडच्या वेळी कोणाच्या भावना दुखावणार नाहीत याची खबरदारी सौ राणी पाटील घेत होत्या आक्षेपार्ह चिठ्ठ्या न वाचता बाजूला काढण्याचे त्यांचे कौशल्य त्याच्या लोकसग्रहवृत्तीची साक्ष देत होते "राजाभाऊ यानी आपल्या कडक शिस्तीतला कठोरपणा थोडा कमी करून राणीताईंकडून सौम्यपणा व आर्जव आपल्या अगी बाणवण्याचा प्रयत्न करावा," असे मी सागताच सभागृहाने टाळ्यांचा कडकडाट करून आपली सहमती प्रकट केली राजाभाऊनीही खिलाडूपणाने तो अहेर स्वीकारला

दुपारचे जेवण श्री० अख्तर मुहीउद्दीन याच्या बगल्यात झाले टी व्ही चे श्री० जफरही आमच्या पक्तीला होते "माझ्यामुळे तुम्हा दोघाना भात–भाजीच शाकाहारी भोजन घ्याव लागत, याबद्दल मला वाईट वाटत तुम्ही तुमच्यासाठी नेहेमीसारख मासाहारी जेवण तयार करवल असत तर मला जास्त बर वाटल असत मी स्वत शाकाहारी असलो तरी इतराच्या मांसाहाराला माझी मुळीच हर-कत नसते " मी म्हणालो

यावर अख्तर आणि जफर म्हणाले, "आम्ही रोज मांसाहार करतो, ही तुमची समजूत चुकीची आहे, जोशीसाहेब ! आजकाल रोजचा मांसाहार सर्वांनाच परवडत नाही. हे असल 'वैष्णो भोजन' आम्हाला नवीन नाही "

'वैष्णो भोजन' म्हणजे शाकाहारी जेवण काश्मिरमध्ये सर्वच लोक मासा-हारी–मत्स्याहारी असल्याने तेथील सारी 'वैष्णो हॉटेल्स' ही बहुधा बाहेरच्या मडळींसाठी असतात या हॉटेलातून चपाती, पुरी, पराठा वगैरे मिळतात परतु काश्मिरी घरात फक्त भातच खातात त्यामुळे आमच्या त्या मेजवानीत भात, दही व चार भाज्या एवढेच पदार्थ होते एका ताटात जेवावे लागेल अशी माझी कल्पना होती परंतु अलिकडे सुशिक्षित मुसलमानामध्ये एका ताटात जेवण्याची प्रथा कमी होत चालली आहे चिनी मातीच्या मोठमोठ्या वाडग्यातून भोज्य पदार्थ समोर ठेवले होते त्यातून चमच्याने आम्ही आपल्याला हवा तो पदार्थ हवा तेवढा घेत होतो गेल्या खेपेला काश्मिरी लोकाची 'कडम' ही आवडती पालेभाजी खाल्ली होती या खेपेला अख्तरसाहेबांनी 'हाक' ही पालेभाजी केली होती तीही काश्मिरी लोकाची आवडती भाजी परतु मी पालेभाज्यांचा भोक्ता नसल्यामुळे मी माझ्या आवडत्या फूलगोभी (फ्लॉवर) वरच ताव मारला

सौभाग्यवतीला सकष्टी असल्यामुळे उपाशीच रहावे लागले हिंदूच्या

उपासाची त्याना काहीच कल्पना नसते. त्यामुळे सौ० अख्तर यांची मोठी पचाईत झाली तिची सरबराई कशी करायची ते त्याना समजेना अखेर जेव्हा त्याना समजले की उपासाला फळे चालतात, तेव्हा त्यांनी मोठे तबक भरून चेरीची फळे आणून तिच्यासमोर ठेवली त्यातली मोठ्या बोराएवढी चारपाच टपोरी फळे खाताच सौभाग्यवतीला कटाळा आला मग आला चहा 'समावार' नावाच्या विशिष्ट भाड्यात तयार केलेला काश्मिरी चहा त्याला तिथे 'कहवा' म्हणतात वेलदोडे, दालचिनी, बदामाचे कूट, साखर वगैरे घालून तयार केलेला हा चहा म्हणजे आपण पडसे झाल्यावर घेतो त्या गवती चहासारखाच लागतो एरवी मी चहा घेत नाही (कधी घेतल्याच नाही!) परतु हा चहा मात्र आवडीने घेतला कारण यात 'चहा'च नव्हता थडीच्या दिवसात काश्मिरी लोक दिवसभर हा चहा घोट–घोट पीत असतात

अख्तर हे दिसायला कुरूप आहेत रगही काळवडलेला काश्मिरी असल्याचे जाणवतच नाही परतु त्याची पत्नी व मुले मात्र खास काश्मिरी — गोरोपान, नाकी-डोळी नीटस, रेखीव स्वभावाने इतकी प्रेमळ, की जणू आमच्या नात्यातलीच होती सौ० अख्तरना काश्मिरीखेरीज दुसरी भाषा येत नाही त्यामुळे सौ० माणिक-बाईंना त्यांच्याशी सगळे सभाषण खुणाच्या द्वारेच करावे लागले त्याच्या मुलीला मोडकेतोडके उर्दू येत होते तिच्याशी थोडेफार सभाषण होऊ शकले मुलांना मात्र उर्दू व इग्रजी येते सर्वसामान्य काश्मिरी जनतेला उर्दू अजिबात कळत नाही श्री० अख्तर यांच्यासारख्या शहरी व सुशिक्षित कुटुबांची ही स्थिती, तर ग्रामीण भागा-तील अशिक्षित लोकाची काय स्थिती असेल याची कल्पनाच करावी ती स्थिती पाहिल्यानतर श्री० अख्तर यांच्यासारखे लोकहितेच्छू लेखक काश्मिरी ही काश्मिरची राजभाषा झाली पाहिजे असा आग्रह का धरतात त्याची कल्पना येते

५ जूनला पहाटे ४–३० वाजता आम्ही श्रीनगरचा निरोप घेतला भूतला-वरचा स्वर्ग समजल्या जाणाऱ्या काश्मिरमध्ये आम्ही एकूण दहा दिवस राहिलो. शरीर स्वर्गात गेले तरी मन मर्त्यलोकातच रेंगाळत रहाणाऱ्या सामान्य लोकाचे आम्ही प्रतिनिधी स्वाभाविकपणेच आम्हाला घरची ओढ लागली. गद्य भाषेत सागायचे तर त्या स्वर्गाचाही शेवटीशेवटी कटाळा येऊ लागला होता आपले गाव, आपले घर, हाच अखेर खराखुरा स्वर्ग असतो, याचा अनुभव मी देशातील व परदेशातील प्रत्येक मुशाफिरीनतर जन्मभर घेत आलो आहे त्यामुळे काश्मिरचा कटाळा आल्याचे मला आश्चर्य वाटले नाही

बनिहालच्या 'जवाहर बोगद्या'तून जाताना श्री० राजाभाऊ पाटील मला म्हणाले होते, "जोशीसाहेब, तुम्ही तुमच्या 'चिनारच्या छायेत'मधे अस म्हटलय की, 'या बोगद्याचे तीन भाग आहेत एक भाग जाणाऱ्या मोटारीसाठी आणि मधला भाग पायी चालणारी माणसे, गुरेढोरे यांच्यासाठी ' आम्हीही प्रथम तसच समजत

होतो पण नतर अधिक चौकशी केल्यावर समजलं की, मध्यभागी तिसरा बोगदा असल्याचा जो भास होतो तो वस्तुत बोगदा नसून तो स्टोअर हाउसेस आहेत· पादचाऱ्यासाठी प्रत्येक बोगद्यात कठडे घालून उजव्या बाजून चालण्याची सोय केलेली आहे शिवाय एका बोगद्यातून दुसऱ्या बोगद्यात जाण्यासाठी तीनचार ठिकाणी भुयारी गुफासारखे मार्ग बनवले आहेत ते आता तुम्ही प्रत्यक्षच पाहून घ्या ' त्याचे म्हणणे बरोबर होते सुमारे पावणेदोन मैल (८१०० फूट) लाबीचा हा बोगदा ओलांडायला गेल्या खेपेला पाच मिनिटे लागली होती या खेपेला तेच अतर साडेतीन मिनिटात तोडले गेले याचा अर्थ, आता या मार्गावरून धावणाऱ्या बस-गाड्या पूर्वीपेक्षा अधिक वेगवान बनल्या आहेत या बोगद्यामुळे पूर्वी सुमारे ९ हजार फूट उंचीवरून जाण्याचा जो आनद मिळत असे, त्याला आपण पारखे झालो, ही भावना फारच थोड्या लोकाच्या मनाला स्पर्श करून जात असेल

जम्मूला आम्ही दुपारी अडीच वाजता पोचलो गावात जाऊन रघुनाथजीचे दर्शन घेणे शक्य होते परतु त्याच वेळी रघुनाथजीला वामकुक्षी करण्याची लहर येत असल्यास आपली फेरी फुकट जाईल हे एक, आणि सतत दहा तास भरधाव प्रवास केल्याने आलेला थकवा हे दुसरे अशा दोन कारणांमुळे आम्ही गावात जाण्याचे रहित केले स्टेशनबाहेरचा 'बासमती' तांदूळ तीन रुपये किलो या भावाने मिळत होता प्रत्येकाने पाच–दहा किलो तादूळ खरेदी करून दुकानदाराचे ओझे हलके केले

आजच्या प्रवासात लक्षात राहिलेले ठिकाण म्हणजे 'रामसू' व 'रामबन' यांच्या दरम्यानचा 'खूनी नाला' पावसात दरडी कोसळून या विशिष्ट ठिकाणचा रस्ता धोक्याचा बने अनेकदा या ठिकाणी वाहने कड्यावरून खाली कोसळत म्हणून त्याला 'खूनी नाला' हे नाव मिळाले होते पूर्वी या ठिकाणी डोंगराला लागून एक बोगदा तयार केला होता पण त्यानेही अपघात कमी होईनात अखेर त्याच्या शेजारी एक भक्कम, प्रशस्त पूल बांधण्यात आला आहे आपल्या स्थापत्यविशारदांच्या कौशल्याची तारीफ करायला लावणारा हा पूल शेजारच्या 'खूनी नाल्या'-मुळे विशेष उठून दिसतो

जम्मूहून सध्याकाळी निघालो व मथुरेला दुसऱ्या दिवशी दुपारी ३-३० वाजता पोचलो तेथे ८–३० पर्यंत मुक्काम होता त्या अवधीत बहुतेक मडळी मथुरा–वृंदावनचे दर्शन करून आली आम्हाला तेवढा उत्साह उरला नसल्याने आणि पूर्वी ती स्थळे अनेकदा पाहिली असल्याने आम्ही गाडीतच बसून राहिलो ७ जून रोजी रात्री १०–४५ ला आमची 'इटलेक्च्युअल्स स्पेशल' दादरला पोचली घरी जाण्याची आम्हाला इतकी घाई झाली होती, की भरमसाट भाड्याची टॅक्सी करून ताबडतोब निघालो आणि ८ जून रोजी पहाटे ४ वाजता पुण्यास पोचलो –– हुश्श !

एकूण प्रवास छान झाला श्री० राजाभाऊ व सौ० राणीताई यांच्या काटेकोर

शिस्तीमुळे कदाचित काही स्वेच्छाचारी मंडळींची थोडी अडचण झाली असेल. परंतु इतरांना ती शिस्त उपयुक्त व लाभदायक ठरली आतापर्यंत माझे प्रवास स्वतःच्या जबाबदारीवर केलेले असल्याने त्यात दगदग विशेष जाणवे यात्रा कंपनीतून जाण्याचा फायदा एवढाच की, ती दगदग वाचते अर्थात बहुतेक यात्रा कंपन्या बेभरवशाच्या असल्याने त्यांच्यावर विसबून जाणारे शेवटी पस्तावतात 'राजा ट्रॅव्हल्स'ने तशी पस्तावण्याची पाळी आमच्यावर आणली नाही, हेच त्यांच्या यशाचे गमक होय 'महंगा एक बार रोता है, सस्ता बारबार रोता है' हा त्यांचा सावधगिरीचा इषारा योग्य असल्याचा अनुभव आम्हाला आला

सोळा वर्षांपूर्वी 'चिनारच्या छायेत' या पुस्तकाच्या शेवटी 'काश्मिरचे भवितव्य' या शीर्षकाचे एक प्रदीर्घ प्रकरण मी जोडले होते त्याच्या उपसंहारात मी म्हटले होते, "काश्मिरचे भवितव्य आमच्याच हातात आहे. आजवर आम्ही भीत-भीत पावले टाकली त्याऐवजी आता थोडे निर्भय बनलो आणि काश्मिरी जनता ही भारताच्या इतर राज्यातल्या जनतेसारखीच आहे हे मान्य करून तिला भारतीय जनतेशी समरस होण्याची संधी मिळवून दिली, तर काश्मिरचा प्रश्न आपोआपच निकालात निघेल काश्मिरी जनता मूकपणे आम्हाला विनवते आहे की, 'आम्हाला भारतात सामील करून घ्या आम्ही भारतात यायला उत्सुक आहोत' तिला भारतीय बनवून घ्यायचे किंवा नाही हे सर्वस्वी आमच्याच हाती आहे"

दुर्दैवाची गोष्ट अशी की, सोळा वर्षांनंतरही हीच स्थिती आहे. केंद्रामध्ये काँग्रेस जाऊन 'जनता' आली तरी बदल होण्याची काहीच चिन्हे दिसली नाहीत ज्या निर्भयपणाची अपेक्षा काश्मिरी जनता आमच्याकडून करीत आहे तो काँग्रेसजवळही नव्हता आणि जनता पक्षाजवळही आढळला नाही मुस्लिम जातियवादापुढे लोटांगण घालण्याचे जे धोरण काँग्रेस पक्षाने गेली तीस वर्षे अवलंबिले होते, तेच पुढे चालवण्याचे व्रत जनता पक्षानेही पुढे चालवले

आम्ही काश्मिरमध्ये असताना तिथले वातावरण मोठे उत्साही बनलेले होते भारतातल्या आणीबाणीबरोबर काश्मिरवर तीस वर्षे विळखा घालून बसलेली आणीबाणीही संपुष्टात आली होती लोक मोकळेपणाने चर्चा करीत होते सामान्य टांगेवाला, घोडेवाला, मोटार ड्रायव्हर, दुकानदार, हॉटेलवाला यापासून तो बुद्धिवंत व राजकीय पुढारी यापर्यंत सर्वजण शेख अब्दुल्ला, त्यांची 'नॅशनल कॉन्फरन्स', काँग्रेस व काँग्रेस–पुढारी यांच्याविषयी प्रकटपणे आपली नाराजी व्यक्त करीत होते. जनता पक्षाच्या ज्या मिरवणुका आम्ही पाहिल्या, त्यामध्ये तरुण व स्त्रिया यांची प्रचंड संख्या होती त्यावरून काश्मिरवरील जातियवाद्यांची पकड ढिली होईल आणि राष्ट्रवादी शक्ती अधिकारावर येईल असे वाटत होते परंतु जेव्हा निवडणुकांचे निकाल जाहीर झाले तेव्हा आपण जे पाहिले, अनुभवले तो केवळ आभासच होता, असे दिसून आले शेखसाहेबांची लोकप्रियता अजून पूर्वीसारखीच चक-

चकीत असल्याचं मला वाटते. भारतातील इतर राज्यामध्ये सर्व विरोधी पक्षानी एकजूट करून काँग्रेसला विरोध केला तसे काश्मिरमध्ये घडले नाही 'नॅशनल कॉन्फरन्स'च्या विरुद्ध असलेली मते काँग्रेस, जनता व अपक्ष याच्यात विभागली गेली किंबहुना 'नॅ०कॉ०'चा उमेदवार आला तरी हरकत नाही, पण 'जनता'चा उमेदवार पडला पाहिजे, हीच काँग्रेसची भूमिका असावी, असे नतरच्या घटनावरून वाटते संजय गाधीप्रमाणे शेख अब्दुल्लांचा मुलगा तारिक याने हुकुमशाही व भ्रष्टाचार याचा कळस केला पण त्याचा काहीच परिणाम शहरी लोकमतावर झालेला दिसला नाही कदाचित आजवरचे सगळेच सत्ताधारी भ्रष्टाचार व 'कुनबा परवरी' (आपल्या नात्यागोत्यातील लोकाचेच हित पहाणे) करणारे असल्यामुळे काश्मिरी जनतेला शेख अब्दुल्लाचा भ्रष्टाचार व कुनबा परवरी फारशी आक्षेपार्ह वाटली नसावी असे दिसते

सरकारी यत्रणेनेही शेखना मदत केली आणि भरपूर पैसा जवळ असल्याने 'नॅ०कॉ०'ला गुंडाची फौज बाळगणे सहज शक्य झाले या सर्व कारणांमुळे 'नॅशनल कॉन्फरन्स' विजयी झाली, आणि शेखसाहेबांनी आपल्या राज्यापुरती आणीबाणी जाहीर केली तरी केन्द्र-सरकारला बोटे मोडीत स्वस्थ बसावे लागले दुःखात सुखाची गोष्ट एवढीच की, शेखसाहेबानी काश्मिरच्या भारतातल्या विलीनीकरणाला मान्यता दिल्याने सार्वमताचा अथवा पाकिस्तानात सामील होण्याचा प्रश्न कायमचा निकालात निघाला आहे राज्यांना अधिकाधिक स्वायत्तता मिळाली पाहिजे, या आपल्या मताच्या समर्थनार्थ पश्चिम-बगाल, तामिळनाडू यासारख्या राज्याचा पाठिंबा मिळवण्यात शेखसाहेब यशस्वी झाले तरी त्यात चिंता करण्यासारखे काही नाही परतु स्थानिक जनतेच्या मनात वेगळेपणाचं आणि भारताविषयीच्या भीतीची व अप्रीतीची भावना निर्माण करण्यात त्यांना जे यश मिळाले आहे ती खरी धोक्याची बाब आहे पाकिस्तानातल्या घडामोडीमुळे काश्मिरी जनतेचा पूर्ण भ्रमनिरास झाला आहे, तरी पण जनाब भुट्टोविषयी तिला अजूनही आत्मीयता वाटते असे समजले भुट्टोसाहेबाचा निकाल लावणे तिथल्या लष्करी राजवटीला अपरिहार्य असल्याने तो प्रश्नही यथाकाली निकालात निघेल परतु फुटीरतावादी 'नॅशनल कॉन्फरन्स' आणि काँग्रेस याच्या कचाट्यातून काश्मिरी जनता कशी मुक्त होईल, हा खरा प्रश्न आहे त्यासाठी भारतातील व काश्मिरमधील राष्ट्रवादी शक्तींना काही निर्भय पावले उचलावी लागतील त्यापायी जातीयवादी शक्तींचा रोषही पत्करावा लागेल तेवढे सामर्थ्य राष्ट्रवादी शक्तीना लाभावे, एवढीच इच्छा आपण व्यक्त करू शकतो

# श्रीमंतांचा तिरुपती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
६५०
दा. क्र. २७२३२
ग्रं. २६।७।८७
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

तसे पाहिले तर मी खरा किंवा पुरा नास्तिक आहे असे म्हणता येणार नाही पण मी बुरा (वाईट) ही नाही, असलो तर थोडा बराच असेन म्हणजे असे की मी देवाचा किंवा आस्तिकांचा द्वेष अथवा तिरस्कारही करीत नाही, आणि नास्तिकाचे किंवा नास्तिकतेचे देव्हारेही माजवीत नाही या जगात रहाण्याचा आस्तिकांना जितका हक्क आहे, तितकाच नास्तिकांनाही आहे असे मी मानतो त्यामुळे पक्के आस्तिक व पक्के नास्तिक या दोन्ही प्रकारच्या लोकाशी माझे चांगले जमते सतत परिवर्तनशील जगात देव–धर्मासंबंधीच्या कल्पनाही बदलत असतात व काळानुसार त्या बदलत राहिल्या पाहिजेत असे मला वाटते या बदलाला विरोध करणाऱ्यांना भवितव्य नाही, याविषयी माझी खात्री आहे एवढ्या मर्यादित अर्थानेच मी स्वत साठी नास्तिक या विशेषणाचा वापर केला आहे

'दि फ्यूचर ऑफ गॉड' ('परमेश्वराचे भवितव्य') या १९६९ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात कार्ल ब्राटन यांनी असे म्हटले आहे की, 'आम्हा ख्रिश्चनांच्या दृष्टीने एका क्रान्तिकारक ईश्वरशास्त्राची गरज आहे ते जर नसेल तर या विसाव्या शतकाच्या उरलेल्या भागात काय करावयाचे तेच आम्हाला कळणार नाही " हे विधान ख्रिश्चनांना जितके लागू पडते तितकेच, किंबहुना त्याहूनही अधिक अन्यधर्मीयांनाही लागू पडते सामान्यत धर्म हा जरी समाजाच्या धारणेसाठी आवश्यक समजण्यात आलेला असला, तरी त्याचे प्रमुख आकर्षण परलोकात म्हणजेच भावी काळात मिळवायचे सुख हेच असते जर्मनीतील आजचे एक तरुण सुधारणावादी ईश्वरशास्त्रज्ञ जूर्जेन मोल्टमन यांनी 'दि थिऑलॉजी ऑफ होप' (आशेचे ईश्वरशास्त्र) या आपल्या ग्रंथात हा विचार जरा वेगळ्या पद्धतीने मांडला

चकीत असल्याचे मला वाटते भारतातील इतर राज्यांमध्ये सर्व विरोधी पक्षांनी एकजूट करून काँग्रेसला विरोध केला तसे काश्मिरमध्ये घडले नाही 'नॅशनल कॉन्फरन्स'च्या विरुद्ध असलेली मते काँग्रेस, जनता व अपक्ष यांच्यात विभागली गेली. किंबहुना 'नॅ०कॉ०'चा उमेदवार आला तरी हरकत नाही, पण 'जनता'चा उमेदवार पडला पाहिजे, हीच काँग्रेसची भूमिका असावी, असे नंतरच्या घटनांवरून वाटते. संजय गांधीप्रमाणे शेख अब्दुल्लांचा मुलगा तारिक याने हुकुमशाही व भ्रष्टाचार याचा कळस केला पण त्याचा काहीच परिणाम शहरी लोकमतावर झालेला दिसला नाही. कदाचित आजवरचे सगळेच सत्ताधारी भ्रष्टाचार व 'कुनबा परवरी' (आपल्या नात्यागोत्यातील लोकांचेच हित पहाणे) करणारे असल्यामुळे काश्मिरी जनतेला शेख अब्दुल्लाचा भ्रष्टाचार व कुनबा परवरी फारशी आक्षेपार्ह वाटली नसावी असे दिसते

सरकारी यंत्रणेनेही शेखना मदत केली आणि भरपूर पैसा जवळ असल्याने 'नॅ०कॉ०'ला गुंडाची फौज बाळगणे सहज शक्य झाले या सर्व कारणामुळे 'नॅशनल कॉन्फरन्स' विजयी झाली, आणि शेखसाहेबानी आपल्या राज्यापुरती आणीबाणी जाहीर केली तरी केन्द्र-सरकारला बोटे मोडीत स्वस्थ बसावे लागले दु:खात सुखाची गोष्ट एवढीच की, शेखसाहेबांनी काश्मिरच्या भारतातल्या विलीनीकरणाला मान्यता दिल्याने सार्वमताचा अथवा पाकिस्तानात सामील होण्याचा प्रश्न कायमचा निकालात निघाला आहे राज्यांना अधिकाधिक स्वायत्तता मिळाली पाहिजे, या आपल्या मताच्या समर्थनार्थ पश्चिम-बंगाल, तामिळनाडू यासारख्या राज्यांचा पाठिंबा मिळवण्यात शेखसाहेब यशस्वी झाले तरी त्यात चिंता करण्यासारखे काही नाही परंतु स्थानिक जनतेच्या मनात वेगळेपणाच आणि भारताविषयीच्या भीतीची व अप्रीतीची भावना निर्माण करण्यात त्यांना जे यश मिळाले आहे ती खरी धोक्याची बाब आहे पाकिस्तानातल्या घडामोडीमुळे काश्मिरी जनतेचा पूर्ण भ्रमनिरास झाला आहे, तरी पण जनाब भुट्टोविषयी तिला अजूनही आत्मीयता वाटते असे समजले भुट्टोसाहेबांचा निकाल लावणे नियल्या लष्करी राजवटीला अपरिहार्य असल्याने तो प्रश्नही यथाकाली निकालात निघेल परंतु फुटीरतावादी 'नॅशनल कॉन्फरन्स' आणि काँग्रेस यांच्या कचाट्यातून काश्मिरी जनता कशी मुक्त होईल, हा खरा प्रश्न आहे त्यासाठी भारतातील व काश्मिरमधील राष्ट्रवादी शक्तींना काही निर्भय पावले उचलावी लागतील त्यापायी जातीयवादी शक्तींचा रोषही पत्करावा लागेल. तेवढे सामर्थ्य राष्ट्रवादी शक्तींना लाभावे, एवढीच इच्छा आपण व्यक्त करू शकतो

# श्रीमंतांचा तिरुपती

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
८५०
दा. क्र. २७२३२
ग्रं. २६।७।८४
संग्र. शाखा (स्थळ प्रत)

तसे पाहिले तर मी खरा किंवा पुरा नास्तिक आहे असे म्हणता येणार नाही पण मी बुरा (व्हाईट) ही नाही, असलो तर थोडा बराच असेन म्हणजे असे की मी देवाचा किंवा आस्तिकांचा द्वेष अथवा तिरस्कारही करीत नाही, आणि नास्तिकांचे किंवा नास्तिकतेचे ढंढोरेही माजवीत नाही या जगात रहाण्याचा आस्तिकांना जितका हक्क आहे, तितकाच नास्तिकांनाही आहे असे मी मानतो त्यामुळे पक्के आस्तिक व पक्के नास्तिक या दोन्ही प्रकारच्या लोकांशी माझे चागले जमते सतत परिवर्तनशील जगात देव-धर्मासंबंधीच्या कल्पनाही बदलत असतात व काळानुसार त्या बदलत राहिल्या पाहिजेत असे मला वाटते या बदलाला विरोध करणाऱ्यांना भवितव्य नाही, याविषयी माझी खात्री आहे एवढ्या मर्यादित अर्थानेच मी स्वतःसाठी नास्तिक या विशेषणाचा वापर केला आहे

'दि फ्यूचर ऑफ गॉड ('परमेश्वराचे भवितव्य') या १९६९ साली प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात कार्ल ब्राटन यांनी असे म्हटले आहे की, "आम्हा ख्रिश्चनांच्या दृष्टीने एका क्रान्तिकारक ईश्वरशास्त्राची गरज आहे ते जर नसेल तर या विसाव्या शतकाच्या उरलेल्या भागात काय करावयाचे तेच आम्हाला कळणार नाही" हे विधान ख्रिश्चनांना जितके लागू पडते तितकेच, किंबहुना त्याहूनही अधिक अन्यधर्मीयांनाही लागू पडते सामान्यत धर्म हा जरी समाजाच्या धारणेसाठी आवश्यक समजण्यात आलेला असला, तरी त्याचे प्रमुख आकर्षण परलोकात म्हणजेच भावी काळात मिळवायचे सुख हेच असते जर्मनीतील आजचे एक तरुण सुधारणावादी ईश्वरशास्त्रज्ञ जूर्जेन मोल्टमन यांनी 'दि थिऑलॉजी ऑफ होप' (आशेचे ईश्वरशास्त्र) या आपल्या ग्रंथात हा विचार जरा वेगळ्या पद्धतीने माडला

आहे ते म्हणतात, "ख्रिस्ती धर्मश्रद्धा ही ख्रिस्ताच्या जागतिक भवितव्या-संबधीच्या आश्वासनांवर आधारलेली आहे ख्रिस्ती देवधर्मशास्त्रातील एकमेव वास्तविक समस्या म्हणजे भविष्यकाळाची समस्या ही आहे" मोल्टमन यांच्या मते ख्रिस्ती धर्मसंघटनेने (चर्चने) ख्रिस्ती धर्माच्या या मध्यवर्ती बिंदूकडे जवळजवळ पूर्णपणे दुर्लक्षच केले आहे ती भविष्यातील नंदनवनाकडे पहाण्याऐवजी जुनाट भूतकाळाकडेच आशाळभूतपणे पहात आली आहे 'रिलीजन, रेव्होल्यूशन अँन्ड दि फ्यूचर' (धर्म, क्रांती आणि भविष्यकाळ) या आपल्या आणखी एका ग्रंथात मोल्टमन म्हणतात, "ख्रिस्ती धर्मसंस्था ही जुन्या स्मृतींवर जगते, पण जग मात्र आशेवर जगत असते" अर्न्स्ट ब्लॉश हे मार्क्सवादी तत्त्वज्ञ म्हणतात, "जेथेजेथे आशा आहे तेथेतेथे धर्म आहे" बायबलामुळे जगामध्ये एक आशायुक्त भविष्यकाळ अस्तित्वात आला, असे ते सांगतात ख्रिस्ताचे मरण आणि पुनरुत्थान याच्यामुळेच माणसाला भविष्यकाळाविषयी आश्वासन मिळत आले आहे माणसात मूलत असणाऱ्या उन्नतीच्या व प्रगतीच्या कल्पनेमुळे त्याला भविष्याविषयी आश्वासन मिळते आहे असे जे आधुनिक लोक सांगतात ते खरे नाही, असे त्यांचे म्हणणे आहे त्यांच्या मते ख्रिस्ताचे पुनरुत्थान ही भावी आशेची खूण आहे, आणि ख्रिस्ताच्या आत्मबलि-दानामुळे क्रूस हा निराश लोकांसाठी आशेचा किरण बनला आहे

सारांश, देव आणि धर्म ही आजपर्यंत आशेच्या आधारानेच टिकून राहिली आहेत, आणि यापुढेही त्यांना टिकावयाचे असेल तर आपल्या अनुयायांच्या अंत करणात त्यांनी आशेची ज्योत प्रज्वलित ठेवली पाहिजे

दुर्दैवाने आज कोणतीच धर्मसंस्था आपले हे कर्तव्य पार पाडीत असलेली दिसत नाही निराश्रितांना, पददलितांना, दु खितांना ज्याबद्दल आशा वाटावी असे काहीच आजच्या धर्मांजवळ व त्यांच्या देवांजवळ नाही, आणि बहुधा म्हणूनच जगातील बहुसंख्य दलितपीडित जनता इहलोकी नंदनवन निर्माण करण्याचे आमिष दाखवणाऱ्या भौतिकवादी, साम्यवादी विचाराकडे झपाट्याने ओढली जात आहे हा विचारच त्यांचा देव बनला आहे व तेच त्यांचे धर्मशास्त्र बनले आहे. अर्थात जुन्या धर्मातला धोका या नव्या धर्मातही आहे, हे त्यांना कोणीतरी नीट पटवून दिल्याशिवाय समजणार नाही. जुन्या धर्माचार्यांनी बहुजनसमाजाला अंधारात ठेवून स्वत ची चैन अबाधित चालू राहील अशी व्यवस्था केली होती आता हे नवे धर्माचार्य आपली सत्ता टिकवून धरण्यासाठी जनतेचे विचारस्वातंत्र्य हिरावून घेऊन तिला पशुतुल्य जीवन जगण्यास भाग पाडीत आहेत हे पशू त्यांच्या कामाला आवश्यक असल्यामुळे ते त्यांना उपाशी न ठेवता भरपूर खाऊपिऊ घालून धष्टपुष्ट ठेवतील यात नवल नाही परंतु दुधाला निरुपयोगी ठरलेली गुरे पाश्चात्य गोपालक जितक्या निर्विकारपणे कापून टाकतात, तितक्याच निर्विकारपणे हे नवे धर्माचार्य आपल्या ताब्यातील जनतेला आपल्या स्वार्थासाठी कापून टाकायला मागेपुढे पहात

नाहीत, हे रशिया, चीन, हंगेरी, झेकोस्लोव्हाकिया, पोलंड वगैरे देशातील घटनांनी दाखवून दिले आहे सारांश काय, जुने धर्म व देव जसे कुचकामी ठरले तसे हे नवे धर्म व देवही खऱ्या लोकहिताच्या दृष्टीने निरुपयोगीच ठरत आहेत नवसाला न पावणारे देव ' म्हणून त्याची संभावनाही केली जात आहे परंतु माणसाचे देवा-शिवाय भागत नसावे असे दिसते वस्तुतः माणूस हा स्वतःच देवाचा निर्माता आहे परतु देवाने आपल्याला निर्माण केले व तोच आपला त्राता आहे, अशी तो स्वतःची समजूत करून घेतो आणि त्या गोड समजुतीतच राहू इच्छितो त्यामुळे चद्रावर स्वारी करण्यापूर्वीही अतराळवीर क्रूसाला नमस्कार करायला विसरत नाही अशा स्थितीत माझ्यासारखा कट्टर नास्तिक नसलेला सशयात्मा देवा–धर्माच्या बाबतीत इकडून तिकडे हेलकावे खात राहिला तर नवल काय ? जुन्या धार्मिक व भाविक सस्कारांच्या आहारी जाऊन अलीकडेच तर मी माझ्या घराच्या जागेचे भूमिपूजन केले होते आणि त्या जागेवर उभारलेल्या वास्तूची वास्तुशातही केली होती तेव्हा कुलदेवाच्या दर्शनाला जाण्याचा सौभाग्यवतीचा आग्रह मी कोणत्या तोंडाने मोडू शकत होतो ?

आमचे कुलदैवत ' गिरीचा व्यकोबा ' असल्याचे मी लहानपणापासून ऐकत आलो होतो हा देव आन्ध्रात असल्यामुळे आम्ही मूळचे आध्रातले असून, सोलापूर-पढरपूरमार्गे महाराष्ट्रात आलो व शेवटी दक्षिणेत उतरून निपाणी-कापशीच्या आसपास स्थिरावलो असे जे वाडवडील सागत असत, ते खरे असले पाहिजे असे मला वाटत आले आहे त्यामुळे त्या कुलदैवताबद्दल व ज्या भूमीत ते निवास करीत आहे त्या आध्राबद्दल मला सदैव एक प्रकारची आत्मीयता वाटत आली आहे. रग-रूप तर इतके आध्रीय आहे, की हा माणूस आपला नाही असे कोणाही आध्राला वाटणार नाही परतु का कोण जाणे, त्या देवाच्या भेटीची ओढ मला कधीच निकडीने जाणवली नाही त्यामुळे त्या भागात अनेकदा जाण्याचा प्रसग आला असताही मी तिरुपतीला जाण्याचा कधी प्रयत्न केला नाही कदाचित एकूण मूर्ति-पूजेविषयीच माझ्या मनात असणाऱ्या उदासीनतेचा तो परिणाम असावा अर्थात उदासीनता असली तरी कट्टर विरोध नसल्यामुळे सौभाग्यवतीने कुलदैवताच्या दर्शनासाठी जोडीने जाण्याचा आग्रह धरल्यानंतर मी तिचे मन मोडावयाचे नाही असे ठरवले तिच्याबरोबर मी तिच्या माहेरच्या कुलदैवताचे (गोव्याच्या नागेशाचे) दर्शन घेऊन आलो होतो परतु खुद्द आमच्या (म्हणजे आता तिच्याही) कुलदैवताचे दर्शन राहूनच गेले होते ती अधूनमधून आजारी असते तिच्या वडिलांच्या मनाने घेतले की कुलदैवताचे दर्शन न घडल्यामुळे तिच्यामागे हा आजार लागलेला आहे म्हणून ते तिला तिरुपतीच्या दर्शनाला जाऊन येण्याचा आग्रह करीत होते. तमिळचे महाकवी श्री कोत्तमगलम् सुब्बू काही महिन्यापूर्वी पुण्यास आमच्या घरी आले

असता त्यांनी सौभाग्यवतीला मद्रासला येण्याचे निमत्रण दिले आणि मद्रासला गेल्यास तिरुपतीचे दर्शन घडवून आणण्याचे आमिषही दाखवले हे आमिष खूपच प्रभावकारी ठरले. फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात मैसूरमध्ये मैसूर विद्यापीठाच्या कन्नड विभागातर्फे होणाऱ्या परिसवादात भाग घेण्यासाठी मराठीचा प्रतिनिधी म्हणून मला निमत्रण आले आणि या दोन कार्यक्रमाची सागड घालण्याचा मोह मला झाला ती सांगड निश्चितपणे बसली ही समाधानाची गोष्ट

वस्तुत मद्रासला जाताना सुमारे शभर मैल अलीकडेच रेणीगुटा स्टेशनवर उतरून तिरुपतीला जाणे आमच्या दृष्टीने सोयीचे होते तिरुपती गाव व रेणीगुटा यांच्यातील अतर अर्ध्या मैलाचे आणि प्रत्यक्ष वेकटेश्वराचे मंदिर ज्या पर्वतावर आहे त्या तिरुमलै डोंगरावर पोचण्यासाठी मोटारीने १२ मैलांचे व पायी (पाय-ऱ्यांनी) ७ मैलांचे अतर कापावे लागते एका दिवसात दर्शनाचा कार्यक्रम उरकून आम्ही मद्रासला पोचू शकलो असतो परतु आमच्याबरोबर तिरुपतीला सहकुटुब येण्याची कुरुबूची इच्छा असल्यामुळे आम्ही थेट मद्रासला गेलो आणि तेथून खाजगी मोटरने सुमारे १०० मैलाचा प्रवास करून ४-२-७० रोजी तिरुपतीला पोचलो

सामान्यत तीर्थक्षेत्राचे ठिकाण जसजसे जवळ येऊ लागते तसतसे पडे, पुजारी-बडवे यांचे घोळके यात्रेकरूच्या भोवती घोंघावू लागतात तिरुपतीला पोचताच तेथील पड्यांच्या कल्पनेने माझ्या पोटात भीतीचा गोळा उठला परंतु गावातील एका प्रशस्त हॉटेलच्या दारात आमची गाडी पोचताच पुजाऱ्यांऐवजी भिकाऱ्यांनी— विशेषत महारोग्यांनी— आमच्यावर हल्ला चढवला ते दृश्य इतके किळसवाणे होते, की यापेक्षा बडवे पुरवले, असा विचार माझ्या मनात येऊन गेला तसा भिकाऱ्यांचा प्रश्न साऱ्या हिंदुस्तानभरच आहे, कारण हा देशच भिकाऱ्यांचा आहे कोणी इग्लड–अमेरिका–रशियाकडे भीक मागतात, कोणी या भिकेवर जगणाऱ्या स्थानिक सुखवस्तूकडे भीक मागतात, एवढाच काय तो फरक परतु तमिळनाडू आणि आध्रामध्ये भिकाऱ्यांच्या प्रश्नाने फारच उग्र रूप धारण केले असावे, असे दिसते बहुधा त्यामुळेच महाराष्ट्रात— विशेषत मुबई-पुण्यात— दाक्षिणात्य भिकाऱ्यांचे अस्तित्व इतक्या मोठ्या प्रमाणावर जाणवत असावे तो भिकाऱ्यांचा घोळका पाहून माझा फार विरस झाला. मनात विचार आला 'जो देव आपल्या पायाशी इतक्या भिकाऱ्याना असले दुर्दैवी व लाजिरवाणे जिणे जगावयास भाग पाडतो, त्यांचे दु ख दूर करण्याचे सामर्थ्य ज्याच्यात नाही, तो आमची काय मदत करणार ?' अर्थात असा विचार सर्वांच्याच मनात आला तर देवाचे आसनच डळमळू लागेल, हे उघड आहे मीही तो विचार थोड्याच वेळात झटकून टाकला.

सुमारे ४० हजार लोकसख्या असलेल्या तिरुपती गावाची हद्द सपून वेंकटा-चलाची हद्द सुरू झाली की तिरुमल-तिरुपती देवस्थानाचे (T T. D ) राज्य सुरू होते एका सुदर कमानीतून घाटात प्रवेश करताना खाजगी मोटारींना कर

द्यावा लागतो सुरुवातीला श्रीगणेशाची भव्य मूर्ती आहे आमच्या गाडीच्या ड्राय-व्हरने त्या गणपतीला नारळ ठेवला आणि गाडी घाट चढू लागली तिरुपतीच्या सात टेकड्या म्हणजे आदिशेषाच्या सात फणा आहेत, असे भाविक लोक समजतात १२ मैलांचा डांबरी रस्ता देवस्थान संस्थानाने उत्तम स्थितीत ठेवला आहे एका-मागून एक डोंगर चढत आपण सुमारे ३ हजार फूट उंचीवर जाऊन पोचलो की तेथील थंडगार वाऱ्याची झुळूक आपले प्रेमाने स्वागत करते सगळे डोंगर हिरवेगार असल्यामुळे डोळे सुखावतात मात्र नालाच्या आकाराची ३५ वळणे ओलांडताना जीव सतत टांगणीला लागलेला असतो इतकी अवघड व इतक्या अधिक संख्येने असलेली वळणे एका घाटात क्वचितच पहायला मिळतात परंतु वाहनचालक हुशारीने वाहने चालवीत असल्यामुळे अपघात घडत नाहीत या पर्वतासंबंधी अशी आख्यायिका सांगतात की एकदा आदिशेष आणि वायू यांच्यांत युद्ध जुंपले आणि मेरुपर्वत भगून त्याचा एक तुकडा पृथ्वीवर पडला तोच हा वेंकटाचल किंवा शेषाचल हा श्रीविष्णूचा अत्यंत प्रिय पर्वत समजला जातो श्रीव्यंकटेश्वर हे विष्णूचे अत्यंत थोर व महत्त्वपूर्ण रूप आहे असे वैष्णव संतांनी व आचार्यांनी नमूद करून ठेवले आहे रामानुजांनी घालून दिलेल्या प्रथाप्रमाणे येथील पूजाविधी चालू असतात

प्रलयकल्पानंतर महाविष्णूंनी श्वेतवराहाच्या रूपाने अवतार घेऊन पृथ्वीला वर काढले आणि तिरुमल (याला्च तमिळमध्ये तिरुमलै म्हणतात) पर्वतावरील स्वामी पुष्करणीच्या काठावर निवास केला त्या आदिवराहस्वामीचे मंदिर आजही विद्यमान आहे. याच्या जवळच वेंकटेश्वराचे मुख्य मंदिर आहे परंतु तरीही हेच बहुधा या पर्वता-वरील सर्वात जुने मंदिर असावे लक्षावधी रुपये दर साल भक्तांकडून जमा होतात सोन्याचे व हिऱ्याचे वेंकटेश्वराच्या अंगावरील दागिने १ कोटी १० लाख रुपये किंमतीचे असून, या मंदिराचे वार्षिक उत्पन्न सरासरी ५ कोटी रुपये असल्याचे अलीकडेच ('टाइम्स', २७ मार्च १९७०) जाहीर करण्यात आले होते म्हणजे रोजची सरासरी जमा दीड लाखाची आहे जमलेल्या पैशातून कानातील व डोकीवरील हिऱ्यांच्या आभूषणासाठी ५ लाख रुपये आणि गाभाऱ्याचा दुसरा दरवाजा सुवर्ण-जडित करण्यासाठी ३ लाख रुपये खर्च करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले आहे एका मोठ्या थैलीत किंवा कणगीत भक्तगण आपापल्या ऐपतीप्रमाणे व इच्छेप्रमाणे पैसे, दागिने वगैरे टाकतात या थैलीला हुंडी म्हणतात या हुंडीत गोळा होणारी रक्कम मोजून तिची प्रतवारी लावण्यासाठीच पाचसहा लोक बसलेले असतात त्यांच्यासमोर नोटा, नाणी व दागिने यांचे ढीग पडलेले पाहून देवस्थानाच्या ऐश्वर्याची कल्पना येते याशिवाय वेगवेगळ्या सेवा (तोलनसेवा, एकान्तसेवा, अर्चना वगैरे) पहाण्यासाठी वेगवेगळ्या दरांची तिकिटे ठेवण्यात आलेली आहेत. त्यापासूनही भरपूर उत्पन्न होते. वेगवेगळ्या प्रकारचे अभिषेक व

उत्सव याच्यासाठी ५० रुपयांपासून २ हजार रुपयापर्यंतची तिकिटे दिली जातात ही तिकिटे घेण्यासाठी लांबलचक रांगा लावलेल्या असतात त्यावरून देवस्थानाच्या उत्पन्नाची सहज कल्पना येते

आम्ही १० वाजता डोंगरावर पोचलो होतो त्या वेळी आम्ही लगेच दर्शनाला गेलो असतो तर अर्चनाची तीन रुपयांची तिकिटे घेऊन आम्हाला दर्शन मिळवता आले असते परंतु आमच्यापैकी काही मंडळींचे स्नान व्हावयाचे होते आणि मुख्य म्हणजे सुब्बूच्या छोट्या मुलीचे-- कांतिमतीचे-- मुंडन उरकावयाचे होते त्यामुळे आम्हाला ताबडतोब दर्शनासाठी जाता आले नाही आणि त्याबद्दल नंतर चांगलेच पस्तावावे लागले

तिरुपतीवरील मुंडन याला तमिळमध्ये मुडीइरक्कुडल असे म्हणतात हा एक महाभयंकर प्रकार आहे श्रीवेंकटेशाच्या प्रत्येक भक्ताने आयुष्यात एकदा तरी आपल्या माथ्यावरील केसांचा भार उतरून टाकलाच पाहिजे, असा नियम आहे सामान्यत मुलगा किंवा मुलगी लहान असतानाच त्याला किंवा तिला तिरुपतीला घेऊन जातात व त्याचे किंवा तिचे मुंडन करतात देवाला आपले केस वाहण्यात काय रहस्य आहे ते मला काही समजले नाही परंतु तेथील सामुदायिक मुंडनविधी पाहून मनात किळस निर्माण झाली एवढे मात्र खरे हे माणसाचे विद्रूपीकरण कशासाठी चालले आहे, त्याने काय साधते, हे मला समजत नाही खास या कामासाठी कल्याणमंडपम् किंवा कल्याणकट्टा या नावाचा एक भलामोठा हॉल बांधण्यात आलेला असून, शे-पन्नास न्हावी एका रांगेने शिस्तीत बसलेले असतात त्यांची कल्याणकट्टासंघम् या नावाची एक संघटनाच आहे मुंडनासाठी आधी एक तिकिट मिळवावे लागते त्यासाठी भलीमोठी रांग लागलेली असते ते तिकिट मिळाल्यानंतर न्हाव्यासमोर रांग लावावयाची. इतके न्हावी असले तरी ते अपुरेच पडतात प्रत्येक न्हाव्यासमोर तीन-चार स्त्रीपुरुष आपला नंबर लावून उभे असतात 'मला आधी काप' म्हणून बकऱ्यांनी कसाबासमोर रांग लावावी, तसे ते दृश्य मला वाटले सर्वांत हास्यास्पद दृश्य प्रौढ स्त्रियांच्या मुंडनाचे वाटले क्षणापूर्वी विपुल केशसंभार असलेली एखादी सौभाग्यवती सुंदरी दुसऱ्याच क्षणी जुन्या काळच्या विधवेप्रमाणे किंवा भिक्षुणीप्रमाणे विद्रूप होऊन आपल्यासमोर उभी रहाते तेव्हा आपल्या सौंदर्यदृष्टीला धक्का बसल्याशिवाय रहात नाही बहुधा लहानपणी ज्यांचे मुंडन झालेले नसते अशा स्त्रिया प्रौढपणी मुंडन करवून घेत असाव्यात, किंवा काही स्त्रियांनी विशिष्ट मनोकामनेच्या पूर्ततेसाठी देवाला केस वाहण्याचा नवस केला असल्यामुळे तो फेडण्यासाठी त्या हे केशवपन करवून घेत असाव्यात या सर्वांवर कळस म्हणजे नुकतेच लग्न झालेले एखादे जोडपे हळदीच्या अंगाने येऊन मुंडन करून घेते, तो होय हातात हिरवा चुडा असलेली मुंडिता सौभाग्यवती पहाताना मनाला कसेसेच होते. आपल्या नवविवाहित पत्नीच्या मस्तकावरून हात फिरवताना

तरुण पतीला काय वाटत असेल या कल्पनेनेच माझे अंग शहारले. असल्या या धर्माची इतरांनी कुचेष्टा केली तर राग का यावा हेच मला कळत नाही मध्यंतरी तिरुपतीवर गोळा होणारे स्त्रियांचे लांब केस टोप व गंगावने बनवण्यासाठी परदेशी पाठवून परकीय चलन मिळवण्यासंबंधीची एक बातमी प्रसिद्ध झाली होती, आणि पाकिस्तानी रेडिओने त्या घटनेचे भांडवल करून बरेच दिवस आपल्या श्रोत्यांची करमणूक व भारताची निंदानालस्ती केली होती, हे मला आठवले भारत इतका भिकारडा बनला आहे, की आता आपल्या बायकांचे केस विकून परकीय चलन मिळवण्याची पाळी त्याच्यावर आली आहे, हे त्या प्रचाराचे मुख्य सूत्र होते. इतरांनी आमची अशी टिंगल करावी किंवा करू नये हा अगदी वेगळा प्रश्न आहे परंतु कालगती ओळखून आपण आपल्या प्रथांत काही सुधारणा करणार की नाही, हा खरा प्रश्न आहे हे मुंडन करवून घेणारे लोक केवळ खेडवळ व अशिक्षित असतात असे नव्हे, तर चांगले सुशिक्षित, श्रीमंत व शहरी लोकही या प्रथेच्या मगरमिठीतून आपली सुटका करून घेऊ शकलेले नाहीत, ही खरी चिंतेची बाब आहे

अर्थात माझे हे सारे विवेचन अरण्यरुदनच ठरणार याची कल्पना मला तेथेच आली मुलाच्या रडण्याने कानठळ्या बसल्यामुळे मी बाहेर येऊन उभा राहिलो थोड्या वेळाने छोटी कांतिमतीही आपल्या आईच्या कडेवरून बाहेर आली काळ्याभोर कुरळ्या केसांनी मोहक दिसणारा तिचा गोरापान गोंडस चेहेरा इतका विद्रूप दिसत होता की मला तिच्याकडे पहावेनाच तरी पण ती रडत असल्यामुळे तिची समजूत घालण्यासाठी मी म्हणालो, "जाऊ दे बाळ पुन्हा येतील लौकरच केस " यावर ती चिमुरडी आपले रडे आवरून म्हणाली, " काका, केसांचं एवढं काही नाही, पण माझी रिबिन त्या केसांबरोबर गेली हो ! ' मी कपाळावर हात मारून घेतला त्या पोरीला केसापेक्षा आपल्या रिबिनीचेच महत्त्व अधिक वाटत होते साहजिकच आहे तिने आपल्यासारखीच मुंडित मुले सभोवार पाहिली होती त्यामुळे तिला त्याचे काहीच वाटत नव्हते किंबहुना आपणही आता इतरांसारखेच झालो, याचे कौतुक तिला मनोमन वाटत असले पाहिजे बहुधा याच भूमिकेतून सौभाग्यवती स्त्रिया भादरलेल्या माथ्याने आपल्या गावी जाताना मोठेपणाचा व पावित्र्याचा अनुभव घेत असतील

या साऱ्या प्रकरणात तिकिटाच्या दर्शनाची वेळ टळून गेली होती आता भारी रकमा भरून अभिषेक करणाऱ्या लोकांच्या खाजगी दर्शनाचा विभाग सुरू झाला श्री कोत्तमंगलम् सुब्बू हे आजचे तमिळनाडचे महाकवी त्यांना ओळखणारे कोणी भेटेल व आपल्याला आत जावयाला मिळेल या आशेने आम्ही दाराजवळ घुटमळत राहिलो कारण वशिल्याची मंडळी सारखी आत येतजात असलेली आम्हाला दिसत होती सुब्बूचे माहात्म्य जाणणारे एक अर्चक (पुजारी) भेटलेही.

त्यानी आपल्याकडून पुष्कळ खटपट केली, परतु त्याचे काही चालले नाही लाच देऊन प्रवेश मिळवण्याचीही आमची तयारी होती, परतु नक्की कोणाला लाच द्यायची हे न कळल्यामुळे आम्ही नुसतेच वेड्यासारखे घोटाळत राहिलो आता सर्वांना मोफत मिळणारे 'सर्वदर्शन' किंवा 'धर्मदर्शन' घेणे एवढाच मार्ग आमच्यासमोर खुला होता परतु एव्हाना बारीची राग एवढी मोठी झालेली होती, की तिच्यात उभे राहिल्यास किती तासांनी आमचा नबर लागेल हे सांगता येत नव्हते अत्यत चिंताग्रस्त मन स्थितीत आम्ही बारीजवळ उभे होतो इतक्यात एक माणूस बारीजवळ आला आणि माणशी दोन रुपये दिल्यास बारीच्या मधे जागा मिळवून देण्याची हमी देऊ लागला तो बहुधा ड्यूटीवर नसलेला देवस्थानाचा शिपाई असावा अखेर त्याची मदत घेण्याचे ठरवले आणि आम्ही बारीत मध्येच प्रवेश मिळवला बारीवर लक्ष ठेवणाऱ्या शिपायाने आम्हाला राजरोसपणे मधे घुसू दिले बारीतील लोकही स्वभावाने गरीब दिसले आमचे बेकायदेशीर अतिक्रमण त्यानी फारशी कुरकुर न करता सहन केले अर्थात बारीत उभे रहाणे हीसुद्धा काही लहानसहान तपश्चर्या नव्हती आधीच डोंगरावरील हवा थडगार. त्यात पुन्हा त्या दिवशी चावरे वारे वाहात होते तशा त्या वाऱ्यात चार तास उभे राहिल्या-बद्दलच देवाने आमच्यावर प्रसन्न व्हावयास हवे होते परतु दुर्दैवाने तसे घडले नाही. त्या थडीमुळे सौभाग्यवतीला जी सर्दी झाली ती जवळजवळ दहाबारा दिवस तिला पुरली।

वस्तुत देवस्थानाच्या मार्गदर्शक पुस्तिकेत छापल्याप्रमाणे हे सर्वदर्शन १२-३०-ला सुरू व्हावयास हवे होते. परतु कोणाचा तरी अभिषेक चालू असल्यामुळे आज दोन वाजता सर्वदर्शन सुरू होईल असे कळले दोन वाजून गेले तरी दर्शन सुरू होण्याची चिन्हे दिसेनात अखेर तीनला दर्शन सुरू झाले. तोंडाने 'वेंकटरमणा गोविंदा' असा हरिनामाचा गजर करीत मुगीच्या पावलाने सरकत-सरकत आम्ही ढे जाऊ लागलो, आणि सुमारे अर्ध्या तासानतर आम्ही मदिराच्या गाभाऱ्यात प्रवेश केला तत्पूर्वी तीन प्राकारातून जावे लागले पहिल्या प्राकाराचे नाव सपगी दक्षिणाम् त्याच्या बाहेरच्या प्रवेशद्वाराजवळ कृष्णदेवराय, वेंकटपतिराय व अच्युतराय आणि त्यांच्या पत्नी याच्या भव्य मूर्ती आहेत अकबराचा मत्री तोडरमल व त्याची पत्नी याच्याही तांब्याच्या मूर्ती येथे पहावयास मिळतात दुसऱ्या प्राकाराला विमान प्रदक्षिणाम् असे म्हणतात विमान म्हणजे कळस किंवा घुमट हाही सोन्याचा मुलामा दिलेल्या पत्र्याने मढवलेला आहे याला आनद निलयम् असे म्हणतात स्वयपाकघर, यागशाळा व कल्याणमडपम् वगैरे भाग यात आहेत या आवारातच गरुड, अश्व, हंस वगैरे वेगवेगळी, सोन्याच्या मुलाम्याने मढवलेली मोठी वाहने पहावयास मिळतात यावरून उत्सवमूर्तीची मिरवणूक निघते तिसऱ्या प्राकाराचे नाव वैकुठ प्रदक्षिणाम् असे आहे मुख्य प्राकारात प्रवेश करण्याचे

दरवाजेही सोन्याचा मुलामा दिलेल्या पत्र्याने मढवलेले आहेत त्याना जगारू वकिली असे म्हणतात

बारीची रांग नागमोडी आकृतीची होती तिचा जो भाग मंदिराच्या गाभान्याभोवती होता, तेथे वाटेत भिंतीवर एके ठिकाणी परंपरागत ढोबळ शैलीची रामायण–महाभारतातील मोठी रंगीत चित्रे होती त्यांचे वर्णन तेलुगू लिपीत व भाषेत असल्यामुळे परभाषिकांना त्याचा अर्थ कळण्याची शक्यता नव्हती तेलुगूची लिपी कन्नडलिपीला फार जवळ असल्यामुळे मला त्यातील काही मजकूर वाचता आला परंतु रांग पुढे सरकत असल्यामुळे ते वाचन पुरे होऊ शकले नाही.

श्रीवेंकटेश्वराचे मंदिर, त्याचे गोपुर, त्याच्या समोरचा सोन्याचा मुलामा दिलेला ध्वजस्तंभ, त्याच्या जवळच असणारी स्वामी पुष्करिणी वगैरे सर्व गोष्टीं-प्रमाणे मंदिराचा गाभारा व मूर्ती ही दोन्ही प्रचंड आहेत या गाभान्याला खिडक्यादारे नसल्यामुळे हवा व प्रकाश याचा तेथे अभाव असणार आणि मोठ्या संख्येने येणाऱ्या भक्ताच्या श्वासोच्छ्वासानी खुद्द परमेश्वरालाच गुदमरल्यासारखे होत असणार हे उघड आहे आधुनिक विज्ञानाच्या साहाय्याने आता हा दोष दूर करण्यात आला आहे एका पंपाने आतील उष्ण व दूषित हवा बाहेर काढण्यात येते व दुसऱ्या पंपाने ताजी व गार हवा आत सोडण्यात येते त्यामुळे दर्शनेच्छू लोकावर आत गुदमरण्याची पाळी येत नाही

आत प्रवेश करताच समोर भगवान वेंकटेश्वराची कृष्णपाषाणाची, गंडकी शिळेची, शंख–चक्र–गदा–पद्म धारण केलेली भव्य चतुर्भुज मूर्ती दृष्टीस पडते सुमारे सहा फूट उंचीची अशी ही उभी मूर्ती आहे दडास सर्पाची बाहुभूषणे आहेत अंगा-वरील हिरे चमचमत असतात मूर्तीचे ध्यान सुरेख आहे, परंतु मूर्तीचे सारे कपाळ गंधाने भरून त्यावर मधोमध एक काळी किंवा तांबडी रेघ कोरलेली असते त्यामुळे चेहेरा झाकाळून जातो मूर्तीचे कपाळ अशा प्रकारे गंधाने झाकून टाकण्याचे कारण नुकतेच कळले सुप्रसिद्ध कन्नड कवी प्रा गोकाक यानी पुण्यात दिलेल्या एका व्याख्यानात सांगितले की, ' तिरुपतीचे हे दैवत मूळचे शैवाचे तेथील मूर्ती वीरभद्राची असून त्याच्या कपाळावर त्रिशूळ कोरलेला आहे तो वैष्णव भक्तांना दिसू नये म्हणून त्यावर गंधाचा लेप दिला जातो ' खरेखोटे पुजारी जाणोत श्री सुब्बू याना ओळखणारा एक अर्चक गाभाऱ्यात भेटला, त्याने त्याना व त्याच्याबरोबर आम्हा सर्वांना विशेष दर्शन घेण्याची संधी दिली (म्हणजे थोडा वेळ मूर्तीसमोर रेंगाळ ण्याची परवानगी दिली ) तेथील पद्धतीप्रमाणे मूर्तीच्या मुकुटाचा आमच्या मस्तकाना स्पर्श करवला आणि मुगाच्या कच्च्या डाळीचा खास प्रसादही दिला तेवढ्याने बारीतील साऱ्या कष्टाचा विसर आम्हाला पडला, आणि आम्ही कृतकृत्य होऊन बाहेर पडलो

बाहेर पडल्यावर ' हुंडी ' लागते. त्या हुंडीत यथाशक्ती द्रव्य टाकून बाहेर

जावयाचे तेथे मोफत प्रसाद मिळतो तो प्रसाद घेण्यासाठी पत्रावळीची पाने आधी वाटली जातात आम्ही बारीत उभे असता एक माणूस प्रसादासाठी प्लॅस्टिकच्या पिशव्या विकत होता परतु त्याचे महत्त्व त्या वेळी आम्हाला न कळल्यामुळे आम्ही तिकडे दुर्लक्ष केले त्या वेळी त्या पिशव्या घेतल्या असत्या तर बरे झाले असते असे नतर वाटले ती घेण्यासाठी एवढी झुंबड उडाली, की मी तो नादच सोडला हातावरच प्रसाद घ्यावा असे मी ठरवले परतु रागेत जेव्हा प्रत्यक्ष प्रसाद पाहिला, तेव्हा तो हातावर घेता येणार नाही हे माझ्या लक्षात आले तेव्हा ड्यूटीवर असलेल्या पोलिसाच्या पत्रावळीचाच अर्धा भाग त्याच्याकडून मागून घेतला (तोही स्वत साठी प्रसाद घेण्याच्या तयारीत होता ) गरमगरम गोड भात हाच तो प्रसाद गव्हाची दाट खीर (हुग्गी) खावी तसा तो प्रसाद वाटला अर्थात या भातात काजू, बदाम, बेदाणे वगैरे असल्यामुळे तो अत्यत रुचकर लागतो यात मुळीच शका नाही खारा व गोड भात प्रसाद म्हणून विकतही मिळतो परतु आम्ही बरेच दिवस बाहेर रहाणार असल्यामुळे तो प्रसाद विकत घेतला नाही.

पढरपूरच्या विठोबाप्रमाणे गिरीचा व्यकोबा किंवा बालाजी हाही एकटाच आहे त्याच्या डाव्या उजव्या बाजूला पद्मावती व रुक्मिणी याच्या अत्यत लहान मूर्ती छातीशेजारीच असल्याचे सागण्यात आले परतु त्याचे स्पष्ट दर्शन आम्हाला झाले नाही वेंकटेश्वराची पत्नी पद्मावती हिचे मुख्य देवालय डोंगराखालील तिरुपती गावापासून तीन मैलांवर असलेल्या तिरुचानूर या गावी आहे तिरुपतीहून परत येताना आम्ही या मदिरालाही भेट दिली आणि देवी पद्मावतीचे दर्शन घेतले परतु येथे भाविक आढळले नाहीत या देवळासमोरचे पद्मासरोवर नावाचे तळेही मोठे छान आहे परतु त्यातील पाणी नेहेमीप्रमाणे शेवाळलेले होते

पद्मावतीचे देऊळ वेंकटेश्वराच्या देवळापासून इतके दूर का, यासबधीची आख्यायिका मी पूर्वीच घरी आईच्या तोंडून ऐकली होती वेंकटेश्वराने पद्मावतीच्या नाकावर टिचून रुक्मिणी ही दुसरी सवत आणली, म्हणून ती रागावून खालीच राहिली श्रीकृष्ण, विठोबा, व्यकोबा, सुब्रह्मण्यम् (कार्तिकेय) ही सारी विष्णूचीच रूपे त्यांना दोनदोन बायका असल्याचे पुराणात नमूद आहे त्यासबधी गप्पा चालल्या असता श्री कोत्तमगलम् सुब्बू मिस्किलपणे म्हणाले, " सुब्रह्मण्य स्वामीने दोन बायका केल्यामुळे मलाही (सुब्बू = सुब्रह्मण्यम्) दोन बायका करणे भाग पडले देवानेच धडा घालून दिलाय त्याचे उलघन कसे करणार ?"

तिरुमलै डोंगरावर यात्रेकरूसाठी अनेक धर्मशाळा असून, आधुनिक उपकरणांनी सुसज्ज अशा खोल्याही तेथे भाड्याने मिळतात त्यामुळे दोनतीन दिवस मुक्काम करण्याच्या तयारीनेच तेथे गेले पाहिजे स्वच्छ, थडगार हवा, भरपूर पाणी, हिरवागार निसर्ग यांमुळे तेथील वास्तव्य नक्कीच सुखकारक होत असले पाहिजे तेथील अर्चक (पुजारी) पहाताना माझ्या मनात एक चमत्कारिक विचार चमकून

गेला हे लोक माझेच तर भाईबंद आहेत याचे आणि माझे पूर्वज एकच असणार त्याच्यापैकी काही लोक जर हा भाग सोडून महाराष्ट्रात गेले नसते तर आपणही आज याच्यातच कुठेतरी दिसलो असतो आमचे पूर्वज हा प्रदेश सोडून का बरे गेले असतील ?

या डोंगराशी संबधित असणारी आणखी एक दंतकथा मला आठवली आमच्या लहानपणी आम्हा भावंडाची जेव्हा आपसात भांडणे होत, तेव्हा आम्ही भाऊ आमच्या बहिणींना लाथा मारीत असू त्या वेळी आई सांगे, "बाबानो, बहिणीला लाथ मारू नका बहिणीला लाथ मारली तर भावाच्या पायात किडे पडतात आणि मग बहिणीलाच ते किडे काढीत बसावे लागते व्यंकोबाच्या गिरीवर अशीच एक बहीण आपल्या भावाच्या पायातले किडे काढीत वर्षानुवर्षे बसली आहे" प्रारंभी मला वाटे, एखादी खरोखरीची बहीण-भाऊ गिरीवर असावीत परंतु नंतर अशी कल्पना आली की, बहुधा अशा प्रकारचे एखादे शिल्प तेथे असावे माझे डोळे तिरुपतीवरील मुक्कामात अशा एखाद्या शिल्पाचा शोध घेण्यासाठी भिरभिरत होते परंतु तसे शिल्प कोठे दिसले नाही माझा काहीसा विरस झाला

केशवपनाचे ते हिडीस दृश्य आणि देवदर्शनाचा चाललेला राजरोस व छुपा व्यापार पाहून माझ्यातील नास्तिक अधिकच कडवा बनला हे मला मान्य केले पाहिजे कोणत्याही देवाच्या दर्शनानंतर माणसातील नास्तिकता कमी होते की वाढते, यावर त्याचे लहानमोठेपण अवलंबून आहे असे मी समजतो त्या दृष्टीने पाहिल्यास तिरुपतीवरील वातावरणाने माझा विरस झाला हे कबूल करायला पाहिजे तेथे गरीब भक्ताच्या भक्तीची कदर न करता श्रीमंतांच्या श्रीमंतीचे स्तोम माजवले जाते (बहुधा यामुळेच बहुसंख्य मारवाडी लोक बालाजीचे भक्त असावेत!) आधुनिक काळाच्या विचारप्रवाहाशी हे विसंगत वाटते वस्तुतः पहाटे-पासून रात्रीपर्यंत देवाचे दर्शन सर्वांना खुले असले पाहिजे कोणालाही बारीमध्ये एका तासापेक्षा जास्त वेळ थांबावे लागू नये देवाचे नित्य-नैमित्तिक कार्यक्रम एकीकडे चालू ठेवून ही बारी अहोरात्र चालू ठेवता येईल ज्यांना देवाला दाग-दागिने व पैसाअडका दान करायचा असेल त्यांच्यासाठी हुंडीचे तोंड खुले असतेच त्यासाठी श्रीमंतांची मक्तेदारी निर्माण करण्याची काहीच जरुरी नाही

अशा प्रकारचे विचार मनात घोळवीत मी परतलो दुसऱ्या दिवशी सकाळी 'हिंदू'त वाचकाच्या पत्रव्यवहारात हेच विचार मांडणारे पत्र मला वाचावयास मिळाले त्यानंतरही 'हिंदू'मध्ये याच आशयाची अनेक पत्रे प्रसिद्ध होत होती मला त्या योगायोगाची गमत वाटली व्ही. नागराजन नावाच्या मद्रासच्या एका गृहस्थांनी ता ८-२-७० च्या 'हिंदू'त लिहिले होते,--

"What Tirupati needs most is an administration for it's temple, free of nepotism and curruption, as well as amenities not in the Shape of choultries(धर्मशाळा) and cottages and villas which tend to convert the place in to a picnic spot, but in the Shape of uninterrupted and free Darshan right from early morning till the temple is closed for worship in the night."

या गृहस्थांनी धर्मदर्शनासाठी आपल्याला सकाळी सहापासून सायकाळी पाच वाजेपर्यंत थांबावे लागल्याचे आपल्या पत्रात नमूद केले आहे दर्शनतिकिटे मिळवण्यासाठी कसा भ्रष्टाचार केला जातो त्याचेही सविस्तर वर्णन त्यांनी दिले आहे

मी मनात म्हणालो, 'ही परिस्थिती अशीच चालू राहिली तर आस्तिकांचे परिवर्तन नास्तिकांमध्ये होण्यास फार काळ लागणार नाही !'

## विश्वमोहिनी
## ललित

मुद्रा । पु भा भावे । रु १५
कलावताचे आनंदपर्यटन ।
ग दि माडगूळकर । रु. १०
सुखाचे दिवस । रमेश मंत्री । रु. २५
स्मरणी । पु भा भावे । रु १५
हिमफुलांच्या देशात । प्रभाकर तामणे । रु ३०
तीळ आणि तांदूळ । ग दि माडगूळकर । रु ३५
स्वराच्या बनात । अरविंद गजेंद्रगडकर । रु. १५
नवरंग । रमेश मंत्री । रु २५
हाय मोगलाई । सिनिक । रु. १०
चषक आणि गुलाब । सुभाष भेण्डे । रु २५
क्रिकेट–वेध । शिरीष कणेकर । रु ३५
जत्रा । वसुंधरा पटवर्धन । रु २५
अष्टचक्री रामायण । प्रवीण कारखानीस । रु २०
एका नास्तिकाची तीर्थयात्रा । श्रीपाद जोशी । रु ३०

## चरित्रे | आत्मचरित्रे

प्रथमपुरुषी एकवचनी । पु भा. भावे । रु ४०
मी दासी हिटलरची । पॉलिन कोहलर । रु १५
रणजी । शंकर अभ्यंकर । रु १०
वाटेवरल्या सावल्या । ग दि माडगूळकर । रु ४०
प्रथमपुरुषी एकवचनी ( खंड २ ) ।
पु भा. भावे । रु. ४०

विश्वमोहिनी, ६२।१२, कर्वे रोड, पुणे ४.

६५०
दा. क्र. २४२३२
ग्रंथ २४५४२
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

विश्वमोहिनी

## कथासंग्रह

खेकडा दु० आ० / रत्नाकर मतकरी / रु १८
हिंदुस्थानातला कावळा / क दि सोनटक्के / रु १०
दुर्गी / सुरेश वेंगुर्लेकर / रु १५
निजधाम / रत्नाकर मतकरी / रु १५
दोलाचल / सुधा नरवणे / रु १०
देवयानी / लता सप्रे / रु १५
रंगाधळा / रत्नाकर मतकरी / रु २५
शरण गच्छामि / सुधा नरवणे / रु २०
हृदयकथा भाग १-५ / १ व २ रु २५ / ३ ते ५ रु २०
चिनाब / श्री दा पानवलकर / रु २०
भूमी / आशा दामले / रु १५
लाबलचक काळीशार सावली /
सुभाष भेण्डे / रु २०
सोनेरी मनाची परी / रत्नाकर मतकरी / रु १०
आटप, अरे आटप लौकर ! / द पा खाबेटे / रु २५
यमुनातीरीचे बुलबुल / कृष्णा जे कुलकर्णी / रु १०
चंद्रावरचा खून / द पा खाबेटे / रु ३०
सॉलिटरी कीपर्स / अ र कुलकर्णी / रु ३०
शेवटचा दिस ( विज्ञानकथा ) /
यशवंत राजणकर / रु ४०
मृत्युंजयी / रत्नाकर मतकरी / रु ३०

REFBK-0024232

## कविता

स्वस्तिक ( दु० आ० ) / वसंत सावंत / रु १५
देवचाफे / यशोदा / रु. १२
तनमनाची गाणी / यशोधरा साठे / रु १०
चंद्रबन । ग दि माडगूळकर । रु ५०

विश्वमोहिनी, ६२।१२, कर्वे रोड, पुणे ४